शुक्रवार
१३
फेब्रुवारी २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३३९
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत



आयसीसीने नबीच्या खिशाला लावली कात्री (पान ७ वर)

## थोडक्यात

### हिंसाचार आणि बॉम्बस्फोटांचे राज्य- निर्मला सीतारमण



**नवी दिल्ली :** सध्या राजधानी दिल्लीत अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. बजेटवरील चर्चेला उत्तर देताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या, पश्चिम बंगालमध्ये कायदा-सुव्यवस्थेचे राज्य नाही. हिंसाचार आणि बॉम्बस्फोटांचे राज्य आहे. बजेटमध्ये पश्चिम बंगालचा बजेटमध्ये उल्लेख न केल्याचा टीएमसीचे खासदार सौगत राय यांचा आरोप पूर्णपणे चुकीचा आहे. पूर्वोदय योजनेत पश्चिम बंगाल हे राज्य महत्वाचे आहे. पूर्व औद्योगिक कोरीडॉर बांधला जात आहे. दुरगापूर त्याचे केंद्र असणार आहे. वाराणसी ते सिलीगुडी पर्यंत हायस्पीड रेल्वे प्रोजेक्ट केला जात आहे. यामुळे उत्तर बंगालला फायदा होणार आहे. निर्मला सीतारमण यांनी खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्या प्रश्नावर देखील उत्तर दिले आहे. मी त्यांचे पूर्ण भाषण ऐकले पण मला दु:ख आहे की त्यांनी ते तोडफोड करून सभागृहात मांडले. निर्मला सीतारमण यांनी जीएसटी बाबत लगावण्यात आलेल्या आरोप फेटाळून लावले आहे. त्या म्हणाल्या, २०१७ मध्ये जीएसटी लागू झाल्यावर दुधावर जीएसटी नाही.

### अपात्र ठरलेल्या ९०० संस्थांवर कारवाई



**मुंबई :** राज्यात दिव्यांग व्यक्ती अधिनियम अंतर्गत दिव्यांगासाठी कार्यरत संस्थांना दिव्यांग कल्याण आयुक्त यांच्याकडे नोंदणी असणे अनिवार्य आहे. राज्यात साधारणत: दोन हजारांहून अधिक संस्था दिव्यांगांच्या कल्याणासाठी कार्यरत आहेत. यापैकी सुमारे ९०० संस्था विविध कारणांमुळे अपात्र ठरल्याने त्यांच्यावर विभागाने कारवाई करून त्यांची नोंदणी रद्द केली असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले. विशेष म्हणजे सन २०२५ या वर्षातच ३६३ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. नोंदणी रद्द केलेल्या संस्थांमध्ये कोकण ५२, नाशिक ४९, पुणे ६०, नागपूर ४९, अमरावती ५० आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील १०३ संस्थांचा समावेश आहे.

## एअर इंडिया अपघातात धक्कादायक खुलासा

# पायलटने फ्यूल स्विच मुद्दाम बंद केल्याचा संशय!

**नवी दिल्ली, दि. १२** वृत्तसंस्था

अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघाताबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. प्राथमिक तपासात हा अपघात तांत्रिक बिघाडामुळे नाही, तर जाणीवपूर्वक केल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. इटलीतील कोरीएरे डेला सेरा या वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, भारत आणि अमेरिकेतील तपास अधिकाऱ्यांच्या चर्चेनंतर असे निष्कर्ष काढले आहेत की, १२ जून २०२५ रोजी झालेल्या या दुर्घटनेत विमानाच्या इंजिनचे फ्यूल कंट्रोल स्विच मुद्दाम बंद करण्यात आले होते. त्यामुळे विमानाची पॉवर अचानक गेली आणि काही सेकंदांतच ते कोसळले.





हे विमान ७८७ प्रकारचे होते. टेकऑफ नंतर लगेचच ते अहमदाबाद विमानतळाजवळ कोसळले. या भीषण अपघातात तब्बल २६० जणांचा मृत्यू झाला होता, तर केवळ एक प्रवासी वाचला होता.

विमान ज्या इमारतीवर कोसळले, तिथे राहणाऱ्या वैद्यकीय विद्यार्थ्यांचाही यात समावेश होता. भारताच्या तपास संस्थेने यापूर्वी जुलै २०२५ मध्ये दिलेल्या प्राथमिक अहवालात कॉकपिटमधील शेवटच्या संभाषणाचा उल्लेख केला होता. त्या व्हॉइस रेकॉर्डिंगमध्ये एक पायलट दुसऱ्या पायलटला म्हणत होता, ''तू फ्यूल बंद का केलं?'' त्यावर उत्तर येतं, ''मी नाही केलं.'' तपास यंत्रणांना आता संशय आहे की दोन्ही इंजिन बंद होण्यामागे पायलट कारणीभूत असू शकतो. विमानाचे कॅप्टन सुमीत सभरवाल होते, तर फर्स्ट ऑफिसर क्लाइव कुंदर को-पायलट होते. काही अहवालांमध्ये कॅप्टनच्या मानसिक आरोग्यावरही प्रश्न उपस्थित झाले आहेत, मात्र त्यांच्या कुटुंबीयांनी हे आरोप साफ फेटाळले असून नव्याने स्वतंत्र चौकशीची मागणी केली आहे.

**कॉकपिटमधील फ्यूल स्विच बंद केल्याची शक्यता :** ब्लॅक बॉक्सच्या डेटावरून सुरुवातीच्या तपासात कोणताही मोठा मेकॅनिकल फॉल्ट आढळलेला नाही. उलट, फ्यूल स्विच मॅन्युअली करण्यात आल्याचा संशय आहे. (पान २ वर)

# मुंबई उच्च न्यायालयाने फरार विजय मल्ल्याला फटकारले!

**मुंबई, दि. १२** वृत्तसंस्था

फरार उद्योगपती विजय मुल्ल्याला मुंबई उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी (१२ फेब्रुवारी) पुन्हा एकदा आपला पवित्रा मांडला की विजय मल्ल्या भारतात परत येईपर्यंत त्याने दाखल केलेल्या याचिकेवर विचार करणार नाही. फरार आर्थिक गुन्हेगार कायद्याच्या (एफईओ) तरतुदींना आव्हान देणाऱ्या विजय मल्ल्या यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली. मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंकर यांच्या खंडपीठाने सांगितले की मल्ल्या यांनी प्रथम तो भारतात परतणार आहे की नाही हे स्पष्ट करावे. मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले, तुम्ही (विजय मल्ल्या) परत यावे जर तुम्ही परत येऊ शकत नसाल तर आम्ही या याचिकेवर सुनावणी करू शकत नाही. विजय मल्ल्या २०१६ पासून युकेमध्ये राहत आहेत. त्यांनी उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल केल्या आहेत. एका याचिकेत त्यांनी त्यांना फरार आर्थिक गुन्हेगार घोषित करण्याच्या आदेशाला आव्हान दिले आहे, तर दुसऱ्यामध्ये ते २०१८ च्या कायद्याच्या घटनात्मकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. दारूचे व्यापारी मल्ल्या (७०) यांच्यावर फसवणूक आणि मनी लॉंड्रिंगच्या आरोपाखाली भारतात अनेक खटले सुरू आहेत. याचिकेवर सुनावणीसाठी १८ फेब्रुवारीची तारीख निश्चित करताना खंडपीठाने म्हटले आहे की, ते मल्ल्या यांना भारतात परतण्यास इच्छुक आहेत की नाही हे स्पष्ट करण्याची आणखी एक संधी देत आहेत. न्यायालयाने म्हटले आहे की, तुम्ही न्यायालयीन (पान २ वर)

### विजय मल्ल्याला कधी फरार घोषित करण्यात आले?

■ मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर म्हणाले, तुम्ही कधी परतणार? तुम्ही (मल्ल्या) आधीच असा युक्तिवाद केला आहे की तुम्हाला न्यायालयात वैयक्तिकरित्या उपस्थित न राहता सुनावणीचा अधिकार आहे. पण आधी हे स्पष्टपणे सांगणारे प्रतिज्ञापत्र दाखल करा. मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) खटल्यांची सुनावणी करणाऱ्या विशेष न्यायालयाने जानेवारी २०१९ मध्ये विजय मल्ल्याला फरार आर्थिक गुन्हेगार घोषित केले.



## दूरदर्शनच्या ज्येष्ठ वृत्तनिवेदिका सरला माहेश्वरी यांचे निधन

**नवी दिल्ली, दि. १२** वृत्तसंस्था

दूरदर्शनच्या सुवर्णकाळातील ओळख आणि आपल्या संयत शैलीने घराघरांत पोहोचलेल्या ज्येष्ठ वृत्तनिवेदिका सरला माहेश्वरी यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या जाण्याने भारतीय वृत्त जगतातील एक अभ्यासू आणि आश्वासक आवाज काळाच्या पडद्याआड गेला.



सरला माहेश्वरी यांनी दीर्घकाळ दूरदर्शनमध्ये वृत्तनिवेदकाचे कार्य केले. त्यांचे स्पष्ट शब्दोच्चार, सौम्य आवाज आणि बातमी सादर करण्याची ओघवती पद्धत यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले होते. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांच्या निधनाची बातमी समजताच सर्व स्तरांतून शोक व्यक्त करण्यात आला.

## लाल किल्ला स्फोटात जैशचा हात!

**वॉशिंग्टन, दि. १२** वृत्तसंस्था

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या १२६७ प्रतिबंध देखरेख समितीच्या नवीन अहवालात पाकिस्तानबद्दल महत्त्वाची माहिती उघड झाली आहे. अहवालात, पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मद दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ल्यावरील दहशतवादी हल्ल्यात थेट सहभागी होती, असे स्पष्टपणे म्हटले आहे. दरम्यान, हा भारतासाठी एक मोठा राजनैतिक विजय मानला जात आहे, कारण पाकिस्तानने बऱ्याच काळापासून दावा केला आहे की त्यांच्या भूमीवरून कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटना निष्प्रभ करण्यात आल्या आहेत.

अहवालानुसार, जैश-ए-मोहम्मदने भारतात केवळ दहशतवादी हल्ले केले नाहीत तर त्यांची ताकद आणि नेटवर्क देखील वाढवत आहे. अहवालात असे म्हटले आहे की संघटना ''जमात-उल-मुमिनत'' नावाची एक विशेष महिला-विभाग तयार करण्याची योजना देखील आखत आहे. एका सदस्य देशाने अहवाल दिला आहे, की जैश-ए-मोहम्मदने अनेक हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली आहे. असेही वृत्त आहे, की तो ९ नोव्हेंबर रोजी लाल किल्ल्यावरील हल्ल्यात सहभागी होता, ज्यामध्ये १५ लोक मारले गेले होते. ८ ऑक्टोबर रोजी, जैश-ए-मोहम्मदचा नेता मौलाना



### संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या अहवालात नाव आल्याने पाकचा तिळपापड

मसूद अझहर अल्वीने औपचारिकपणे महिलांसाठी असलेली एक शाखा जमात-उल-मुमिनतची स्थापना केली, ज्याचा उद्देश दहशतवादी हल्ल्यांना पाठिंबा देणे होता. या अहवालातील सर्वात मनोरंजक पैलू म्हणजे जैश-ए-मोहम्मदच्या समावेशावर आक्षेप घेणारा पाकिस्तान हा एकमेव देश होता. पाकिस्तानने म्हटले आहे, की ही संघटना आता निष्क्रिय आहे. तथापि, इतर देशांनी भारताच्या भूमिकेला पाठिंबा दिला आणि अहवालात जैश-ए-मोहम्मदचा उल्लेख सुरूच राहिला. पाकिस्तानला केवळ जैशच्या बाबतीतच नव्हे तर बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) बद्दलही निराशा झाली. पाकिस्तानला बीएलएला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या १२६७ निर्बंध यादीत समाविष्ट करायचे होते, ते तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानशी जोडले गेले होते, त्यामुळे ते अल-कायदा किंवा शी जोडले गेले होते. तथापि, अहवालात पाकिस्तानची विनंती नाकारण्यात आली. अहवालात असे म्हटले आहे की (पान २ वर)

## महाशिवरात्री पूजा आणि हिंदू विधी थांबवा!

### दर्गा समितीची सुप्रीम कोर्टात धाव

**नवी दिल्ली, दि. १२** वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने कर्नाटकातील आलंद लाडले मशैख दर्गा व्यवस्थापनाने गुरुवारी (१२ फेब्रुवारी) दर्गा संकुलातील हिंदू महाशिवरात्री पूजा आणि इतर हिंदू विधी थांबवण्याचे निर्देश मागणाऱ्या याचिकेवर सुनावणी करण्यास नकार दिला. महाशिवरात्री रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी साजरी केली जाणार आहे.

दर्गा व्यवस्थापनाने भारतीय संविधानाच्या कलम ३२ अंतर्गत याचिका दाखल केली होती, जी मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झालेल्या पक्षांना थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची परवानगी देते. दर्गा व्यवस्थापनाने याचिकेत दावा केला होता की दर्ग्याचे धार्मिक





स्वरूप बदलण्यासाठी दरवर्षी पूजेसाठी धोरणात्मक परवानगी मिळविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. दर्ग्याचे मूळ धार्मिक स्वरूप जपण्यासाठी व्यवस्थापनाने सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपाचीही मागणी केली. तसेच न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि एस.सी. शर्मा यांच्या खंडपीठाने असे म्हटले आहे की अशा प्रकरणांना प्रथम उच्च न्यायालयात आव्हान द्यावे. यापूर्वी, मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी असेही म्हटले होते की कलम ३२ अंतर्गत प्रत्येक प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयात आणणे योग्य नाही, कारण त्यामुळे उच्च न्यायालये अप्रभावी असल्याचा (पान २ वर)






# भारतीय संरक्षण दलाची ताकद वाढणार!

## ११४ राफेल जेट आणि ६ पी-८ आय विमाने खरेदीला मान्यता

**नवी दिल्ली, दि. १२** वृत्तसंस्था

भारताच्या लष्करी सामर्थ्याला आणखी चालना मिळणार आहे. संरक्षण मंत्रालयाच्या संरक्षण अधिग्रहण परिषदेने फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. भारतीय नौदलासाठी सहा अतिरिक्त -८ सागरी जासूसी विमाने खरेदी करण्यासही मान्यता दिली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षा मंत्रिमंडळ समिती कडून या प्रस्तावाला आता अंतिम मंजुरीची वाट पाहत आहे.

अंदाजे ₹३.२५ लाख कोटी किमतीचा हा करार भारताच्या इतिहासातील सर्वात मोठ्या संरक्षण खरेदींपैकी एक मानला जातो. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भारत भेटीपूर्वी, दोन्ही देशांमधील धोरणात्मक संबंधांच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. भारतीय हवाई दलाकडे सध्या अंदाजे २९ स्कॉड्रन आहेत, तर गरज ४२ असण्याचा अंदाज आहे. जुन्या विमानांच्या निवृत्तीमुळे आधुनिक लढाऊ विमानांची तातडीने आवश्यकता होती. या करारामुळे स्कॉड्रनची संख्या अंदाजे ३५-३६ पर्यंत वाढू शकते. भारतीय हवाई दलाकडे आधीच दोन स्कॉड्रनमध्ये ३६ राफेल विमाने आहेत. शेवटच्या 'सी' प्रकाराची डिलिव्हरी डिसेंबर २०२४ मध्ये पूर्ण झाली. राफेल हे हवेतून हवेत, हवेतून जमिनीवर आणि सागरी हल्ल्यांसाठी सक्षम असलेले बहु-भूमिका लढाऊ विमान आहे. ते क्रूझ क्षेपणास्त्र, उल्का हवेतून हवेत क्षेपणास्त्र, हॅमर प्रिसिजन-मार्गदर्शित शस्त्रे, स्पेक्ट्रा इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणाली आणि आधुनिक रडारने सुसज्ज आहे. भारताने ऑपरेशन सिंदूर दरम्यान राफेल विमानांचा वापर देखील केला, ज्याने अचूक हल्ल्यांसाठी आपली क्षमता दर्शविली. हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल नागेश कपूर यांच्या मते, राफेलसारख्या आधुनिक विमानांमुळे हवाई दलाच्या क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ होईल आणि प्रादेशिक सुरक्षा आव्हानांना तोंड देणे सोपे होईल. भारतीय नौदलासाठी सहा अतिरिक्त पी-८आय पोसायडॉन विमानांनाही मान्यता देण्यात आली आहे. ही बोईंग-निर्मित लांब पल्ल्याची सागरी देखरेख विमाने आहेत जी शत्रूच्या पाणबुड्या, जहाजे आणि हवाई हालचाली शोधण्यास सक्षम आहेत. भारताकडे आधीच १२ पी-८आय विमाने आहेत. या नवीन विमानांच्या समावेशामुळे हिंद महासागर क्षेत्रातील सागरी सुरक्षा आणि देखरेख क्षमता आणखी मजबूत होतील. पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी हा करार सरकार-ते-सरकार आधारावर असेल. हा करार तंत्रज्ञान हस्तांतरण आणि स्थानिक उत्पादनाला प्राधान्य देतो. गेल्या वर्षी भारत आणि फ्रान्समध्ये डसॉल्ट एव्हिएशन आणि टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टम्स लिमिटेड यांच्यात झालेल्या करारांमुळे ही प्रक्रिया वेगवान होण्याची अपेक्षा आहे.



### राफेल कराराचे प्रमुख मुद्दे

■ १८ राफेल विमाने थेट फ्रान्सकडून उड्डाण-योग्य स्थितीत खरेदी केली जातील. ■ उर्वरित ९६ विमाने भारतात तयार केली जातील. स्वदेशी सामग्रीचा वाटा सुरुवातीला ३०% पेक्षा जास्त आणि नंतर ६०% पेक्षा जास्त असू शकतो. ■ 'मेक इन इंडिया'ला प्रोत्साहन देताना हजारो रोजगाराच्या संधी निर्माण काही विमाने दोन-सीटर असतील आणि प्रशिक्षणासाठी वापरली जातील.

## पान 1 वरून...

### पायलटने फ्यूल स्विच मुद्दाम...

दरम्यान, अंतिम अहवालात भविष्यात पायलट्ससाठी नियमित मानसिक आरोग्य तपासणी आणि मानसशास्त्रीय चाचणी बंधनकारक करण्याची शिफारस होण्याची शक्यता आहे. मात्र, भारताची नागरी विमान वाहतूक संस्थेचा अंतिम रिपोर्ट येईपर्यंत कोणताही ठोस निष्कर्ष काढू नये, असेही तज्ज्ञ सांगत आहेत. थोडक्यात सांगायचं तर या अपघातामागे तांत्रिक बिघाड नव्हे, तर कॉकपिटमधील फ्यूल स्विच बंद केल्याची शक्यता आहे. मात्र सत्य काय आहे, हे अंतिम अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे.

### मुंबई उच्च न्यायालयाने फरार ...

प्रक्रियेला टाळत आहात हे आम्हाला रेकॉर्डवर नोंदवावे लागेल. तुम्ही कार्यवाहीचा फायदा घेऊ शकत नाही. तुमच्याशी प्रामाणिक राहून, आम्ही याचिका फेटाळत नाही तर तुम्हाला आणखी एक संधी देत आहोत. उच्च न्यायालयाने डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या शेवटच्या सुनावणीत आपली भूमिका स्पष्ट केली होती की, मल्ल्या भारतात परतला तरच ते याचिकेवर सुनावणी करतील. त्यांनी मल्ल्या यांच्या वकिलाला या संदर्भात परिस्थिती स्पष्ट करण्याचे निर्देश दिले होते. गुरुवारी खंडपीठाने सांगितले की, व्यावसायिकाने भारतात परतणार की नाही हे स्पष्टपणे सांगणारे प्रतिज्ञापत्र दाखल करावे.

### लाल किल्ला स्फोटात जैशचा हात...

बीएलएने चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरवर हल्ला केला, ज्यामध्ये ३२ पाकिस्तानी सैनिक मारले गेले. त्यात असेही स्पष्टपणे म्हटले आहे की, काही देशांचा असा विश्वास आहे की बलुचिस्तान लिबरेशन आर्मी ही एक दहशतवादी संघटना आहे. अल-कायदा आणि या दोन गटांमध्ये कोणताही संबंध नाही आणि असा कोणताही संबंध वाढत नाही.

### महाशिवरात्री पूजा आणि हिंदू...

संदेश जातो. काल जेव्हा हे प्रकरण मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्यासमोर आले तेव्हा खंडपीठाने असाही प्रश्न उपस्थित केला की प्रथम उच्च न्यायालयात जाण्याऐवजी कलम ३२ याचिका का दाखल करण्यात आली. २०२५ मध्ये कर्नाटक उच्च न्यायालयाने १५ हिंदू भाविकांना महाशिवरात्रीला पूजा करण्याची परवानगी दिली होती, जी कडक सुरक्षेत पार पडली होती. पूर्वी न्यायालयाच्या आदेशानुसार मर्यादित संख्येने पूजा केली जात होती. दर्गा व्यवस्थापनाने सांगितले की वारंवार अंतरिम आदेश देऊन धार्मिक स्थळाचे स्वरूप बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे, ज्यामुळे प्रार्थनास्थळे (विशेष तरतुदी) कायदा, १९९१ चे उल्लंघन होऊ शकते. या कायद्यानुसार, १५ ऑगस्ट १९४७ रोजी अस्तित्वात असलेल्या धार्मिक स्थळाचा दर्जा राखणे आवश्यक मानले जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेनंतर, या प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई उच्च न्यायालयात होण्याची अपेक्षा आहे. धार्मिक हक्क, ऐतिहासिक दावे आणि कायदा यांचे संतुलन साधण्याच्या दृष्टीने हा खटला महत्त्वाचा मानला जातो.

**वाद काय आहे? :** हा वाद १४ व्या शतकातील सूफी संत हजरत शेख अलाउद्दीन अन्सारी (लाडले मशैख) आणि १५ व्या शतकातील हिंदू संत राघव चैतन्य यांच्याशी संबंधित मानल्या जाणाऱ्या दर्ग्याशी संबंधित आहे. दर्गा संकुलात राघव चैतन्य शिवलिंग म्हणून ओळखली जाणारी एक रचना देखील आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समुदायांनी या ठिकाणी पूजा केली आहे, जरी २०२२ मध्ये पूजा करण्याच्या अधिकारावरून तणाव निर्माण झाला होता.

# नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सव रविवारपासून

## * निसर्ग पर्यटनाधारित साहसी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल
## * जिल्ह्यांतील निसर्गप्रेमींमध्ये उत्साह; उपक्रमांना मोठा प्रतिसाद

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १२ :** जिल्ह्याचे भूषण असलेला मेळघाटातील ऐतिहासिक नरनाळा किल्ला, समृद्ध वनसंपदा आणि स्थानिक संस्कृती यांचे दर्शन घडवणारा नरनाळा महोत्सव येत्या दि. १५ ते १७ फेब्रुवारीदरम्यान उत्साहात साजरा होणार आहे. दीर्घ कालावधीनंतर महोत्सव होत असल्यामुळे जिल्ह्यातील निसर्ग पर्यटनप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण असून, यानिमित्त आयोजिण्यात आलेल्या विविध उपक्रमांत मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभागी होत आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय व वनविभाग, अकोट वन्यजीव विभाग यांच्या सहकार्याने निसर्गप्रेमींसाठी नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात विविध यंत्रणांच्या सहकार्याने नियोजन व पूर्वतयारी करण्यात आली आहे. महोत्सवाच्या माध्यमातून नरनाळा किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व, स्थानिक संस्कृती, पर्यावरण संवर्धन आणि इको टुरिझमबाबत जनजागृती करण्याचा हेतू असून, साहसी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच अनेकविध उपक्रम घेतले जाणार आहेत. या महोत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्यातील पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते दि. १५ फेब्रुवारी रोजी दु. ४. ३० वा. महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे. मान्यवर लोकप्रतिनिधी, अधिकारी, विविध क्षेत्रांतील




मान्यवर, निसर्गप्रेमी व मोठ्या संख्येने नागरिक यावेळी उपस्थित राहणार आहेत.

**विविध स्पर्धांचे आयोजन :** महोत्सवात निसर्ग पर्यटनावर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे तिन्ही दिवस सकाळी ६ ते सायंकाळी ६ दरम्यान ट्रेकिंग, जंगल सफारी, बोटिंग, नरनाळा किल्ला सफारी असे निसर्गपर्यटनाधारित कार्यक्रम होतील. दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता महिला व पुरूषांसाठी 'मॅरेथॉन- संवर्धनासाठी धाव' होणार आहे. त्यासाठी अकोट फॉरेस्ट डेपो ते श्री संत गजानन महाराज विहीर फाटा असे साधारणत: १२ किमी अंतर असेल. चित्रकला स्पर्धा दि. १६ फेब्रुवारीला सकाळी १० ते २ दरम्यान विहीर फाटा परिसरात होईल व याच दरम्यान शहानूर येथे पाक कला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. वन्यजीव छायाचित्रण स्पर्धाही आयोजिण्यात आली आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी :** महोत्सवात तिन्ही दिवस सांस्कृतिक कार्यक्रम सायं. ५ ते रा. १० वा. दरम्यान होणार आहेत. दि. १५ फेब्रुवारीला 'चला हवा येऊ द्या' टीमचे प्रसिद्ध मराठी कलावंत कार्यक्रम सादर करणार आहेत. दि. १६ फेब्रुवारीला 'शिवशंभो गर्जना टीम'कडून सादरीकरण होणार आहे. इंडियन आयडॉल विनर सलमान अली 'लाईव्ह इन कॉन्सर्ट' सादर करणार आहेत. दि. १७ फेब्रुवारीला पद्मश्री कैलाश खेर यांची 'लाईव्ह इन कॉन्सर्ट' होणार आहे. निसर्ग संवर्धनाबाबत जनजागृती करणे व मानव आणि पर्यावरण यांच्यातील नाते दृढ करणे हा महोत्सवाचा प्रमुख हेतू आहे. ऐतिहासिक महात्म्य लाभलेला नरनाळा किल्ला व मेळघाटचे समृद्ध जंगल हे अकोला जिल्ह्याचे गौरवस्थान आहे. महोत्सवात अधिकाधिक निसर्गप्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना, उपवनसंरक्षक राहूलसिंह टोलिया व जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## महात्मा गांधी अस्थी विसर्जन स्मृती दिनी सर्वोदय मंडळाची व्यसनमुक्ती संवाद यात्रा

**अकोला, दि. १२ :** महात्मा गांधींचा ३०जानेवारी १९४८ रोजी खून झाल्यानंतर १२ फेब्रुवारीला देशभरातील विविध पवित्र नद्यांमध्ये त्यांच्या अस्थींचे विसर्जन करण्यात आले. तत्कालीन मंत्री ब्रजलालजी बियाणी,आबासाहेब खेडकर, नानासाहेब सपकाळ यांच्या अथक प्रयत्नाने विदर्भात वर्धा जिल्ह्यातील पवनार व अकोला जिल्ह्यातील वाघोली येथील पूर्णा नदीत हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत अस्थी विसर्जन करण्यात आले. तेव्हापासून वाघोली या गावाला गांधीग्राम हे नाव मिळाले.गांधीग्राम चे ग्रामस्थ व सर्वोदयी कार्यकते या ऐतिहासिक घटनेचा वसा आणि गांधी विचारांचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी दरवर्षी १२ फेब्रुवारीला पूर्णा नदी घाटावर एकत्र येऊन गंगापूजन व सर्वधर्म प्रार्थना आयोजित करतात. महात्मा गांधी मेमोरियल ट्रस्ट द्वारा संचालित महात्मा गांधी विद्यालयात या सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शाळेच्या आवारात गांधीजींची प्रिय भजने म्हटली जातात. एकादश व्रताचे धारण केले जाते. अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाचे सर्व कार्यकर्ते याप्रसंगी आवर्जून हजेरी लावतात. ही परंपरा पुढे चालू ठेवत यावर्षी सकाळी७.३० वाजता महात्मा गांधी विद्यालयाच्या आवारातील महात्मा गांधीजींच्या पुतळ्यास ज्येष्ठ सर्वोदयी श्रीकृष्ण विखे पाटील, दिगांबरराव काठोळे, महात्मा गांधी मेमोरियल ट्रस्टचे सचिव विलासराव झामरे, सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड, महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. शि. ना. ठाकुर, हरिपाठ मंडळाचे गणेशराव अढाऊ, सरपंच शरद ठाकरे,प्राचार्य प्रफुल्ल डोंगरे यांचे हस्ते पूजन व हारार्पण करण्यात आले. पूर्णानंदी घाटापर्यंत महात्मा गांधी विद्यालय, सर्वोदय मंडळ, महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे वतीने व्यसन मुक्ती संवाद रॅली काढण्यात आली. पूर्णा तीरावर एकादश व्रत, रामधून घेण्यात आली. सर्व उपस्थितांनी गंगापूजन केले. ओम तत्स श्री नारायणतू... चिदानंद हरी,सविता पावक तू... रहीम ताओ तू...ही सर्वधर्म प्रार्थना घेण्यात आली. ज्येष्ठ सर्वोदयी महादेवराव भुईभार, प्रा राजाभाऊ देशमुख, अकोला-वाशिम जिल्हा सहकार बोर्डाचे अध्यक्ष प्रा. विवेक हिवरे, विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे माजी तज्ज्ञ संचालक डॉ. संजय खडक्कार, सौ. सुमित्रा निखाडे यांनी व्यसन मुक्ती यात्रेस शुभेच्छा दिल्या.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**अकोला, दि. १२ :** अमरावती विद्यापीठ संलग्नित श्री शिवाजी शिक्षण संस्था संचलित अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय अकोला येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डोंगरगाव (ता. अकोला) येथे सात दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन नुकतेच पार पडले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. प्रशांत थोरात यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून डोंगरगावच्या सरपंच सौ.रुपाली नागापुरे, उपसरपंच किशोर काकडे कृषी मिशनचेप्रमुख ए.एस नाथन, तंटामुक्ती अध्यक्ष गिरीशजी देशमुख, प्रा. गजानन भरसाकाळे उपस्थित होते. या सात दिवसीय शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता, परिसर स्वच्छता, वृक्षारोपण, जलसंधारण, आरोग्यविषयक जनजागृती, योग-प्राणायाम, प्रभात फेरी, पथनाट्य, हास्य जत्रा, पाळीव प्राण्यांचे आरोग्य तपासणी शिबिर, माती परीक्षण, पाणी तपासणी, सुदृढ बालक स्पर्धा, स्वच्छ घर स्पर्धा, रक्तदान शिबिर तसेच 'उन्नत भारत अभियान' अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनाचे प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहेत. मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथींनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. समाजाची जाणीव, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य च्या माध्यमातून होते. प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणासोबतच समाजासाठी योगदान देणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक कु. धनश्री काचकुरे या विद्यार्थिनीने केले, तर आभार प्रदर्शन कु. वैष्णवी आस्वार या विद्यार्थिनीने केले. प्रमुख अतिथींनी शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. वरील कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. जी. एस. झांमरे आणि प्रा. डॉ.एस. सी. मकवाना यांनी उपस्थिती दर्शविली. या सर्व शिबिराची जबाबदारी डॉ. विजय ठाकरे आणि महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. ज्योती शेगोकार यांच्याकडे आहे. तसेच महाविद्यालयातील कु. वैशाली कातखेडे, स्वयंसेवक समितीचे सदस्य प्रेम सोनवणे, महादेव भुतेकर, वेद कळमशेरे, अर्जुन बटकर, ओम बुंदिले,संकेत रहाटे, दीपक भोम्बळे, श्रुती हिंगणकर, मैत्री सोनोने, कल्याणी बोडखे आणि इतरही सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख, व सर्व कार्यकारिणी सदस्य तसेच स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य यांचे कार्यक्रम आयोजनाकरिता मार्गदर्शन लाभले.

## शहरातील २० शाळांत 'मना सज्जना भक्तीपंथेचि जावे': २५,००० विद्यार्थ्यांचा एकसुरात गुंजला निनाद!

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**अकोला, दि. १२ :** श्रीरामदास नवमीच्या पावन निमित्ताने अकोला शहरात भक्ती आणि संस्कारांचा अद्वितीय संगम अनुभवायला मिळाला. ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्पाच्या संकल्पनेतून बुधवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी 'समर्थ रामदासांचे ५१ मनाचे श्लोक' पठनाचा भव्य उपक्रम राबविण्यात आला. 'जागर भक्तीचा' या विशेष उपक्रमांतर्गत शहरातील २० शैक्षणिक संस्थांतील सुमारे २५,००० विद्यार्थ्यांनी एकाच वेळी समूहशः श्लोक पठण करून वातावरण भक्तिमय केले.



यंदा श्रीरामदास नवमीला ३४४ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचा जागर व्हावा, हिंदू संस्कृतीची मूल्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावीत आणि त्यांच्या मनामध्ये संस्कार व राष्ट्रभक्तीची बीजे रुजावीत, या उदात्त हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. बुधवारी सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी प्रत्येक शाळेच्या प्रांगणात सर्व विद्यार्थी एकत्र जमले आणि ''मना सज्जना भक्तीपंथेचि जावे'' या ओजस्वी शब्दांनी परिसर दुमदुमून गेला.

शहरातील खंडेलवाल इंग्लिश प्रायमरी स्कूल, मोहरिदेवी खंडेलवाल हायस्कूल, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, भिकमचंद खंडेलवाल हायस्कूल (गोडबोले प्लॉट), माँ रेणुका मराठी प्राथमिक शाळा, ज्ञानदर्पण इंग्रजी शाळा, अमृत कलश विद्यालय, भारत विद्यालय प्राथमिक व माध्यमिक, विवेकानंद इंग्लिश हायस्कूल, बाल शिवाजी प्राथमिक व माध्यमिक शाळा, खंडेलवाल ज्ञान मंदिर (गौरक्षण), महाराष्ट्र माध्यमिक शाळा (अकोला), विद्याभारती (अकोला), डी. वाय. पाटील माध्यमिक शाळा, संताजी इंग्रजी प्राथमिक शाळा सन्मित्र प्राईमरी स्कूल सन्मित्र पब्लिक स्कूल हाईस्कूल विभाग आदी संस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

समूह पठणामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकात्मता, शिस्त आणि आध्यात्मिकतेची जाणीव अधिक दृढ झाली. समर्थांच्या शिकवणीतील आत्मबल, कर्तव्यनिष्ठा आणि सदाचार यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजले. अनेक शाळांमध्ये शिक्षकांनी श्लोकांचे अर्थही समजावून सांगत विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील उपयुक्ततेची जाणीव करून दिली.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन ब्राह्मण सभेचे श्री. अविनाशजी देव तसेच दि. प्रोफेशनल कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटचे संचालक श्री. नरेंद्रजी देशपांडे व सौ. वैशालीताई देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शाळा प्रशासन, शिक्षकवृंद आणि पालकांनी या ऐतिहासिक व आध्यात्मिक उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. ''संस्कारक्षम, चारित्र्यसंपन्न आणि समाजभान असलेली पिढी घडविण्यासाठी असे उपक्रम काळाची गरज आहेत,'' असे मत ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प व निलेश देव यांनी व्यक्त केले.

# अकोला येथील इकरा उर्दू शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**अकोला, दि. १२ :** येथील इकरा उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळेचे २६ वे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साही व मंगलमय वातावरणात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. मोहम्मद सादिक मोहम्मद कासम (अध्यक्ष, इकरा उर्दू शाळा) होते. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सैयद इसहाक राही (, शाहबाबु सोसायटी, पातूर) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षण विभागातील अनेक मान्यवर अधिकारी व प्रतिष्ठित पाहुणे उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांमध्ये. डॉ. अरविंद भा. मोहरे (शिक्षणाधिकारी, माध्यमिक). रत्नसिंग पवार (शिक्षणाधिकारी, प्राथमिक). संजय कुमार झापे (शिक्षणाधिकारी, योजना), . अनिल नारायण




कोल्हे (वेतन पथक अधीक्षक, माध्यमिक), राजेश तेलमोरे (वेतन पथक अधीक्षक, प्राथमिक), . प्रमोद टेकाडे (उपशिक्षणाधिकारी, माध्यमिक), . सुभाष त्र्यंबक भालेराव (उपशिक्षणाधिकारी, माध्यमिक) . अनिल गजानन पारधी (उपशिक्षणाधिकारी, योजना). जितेंद्र कुमार प्रधान (उपशिक्षणाधिकारी, प्राथमिक), . वर्षा कल्याणकर (गटशिक्षणाधिकारी, अकोला), सैयद फरहतुल्ला (पोलीस सब-इन्स्पेक्टर),. डॉ. मोहम्मद जामिल (उपाध्यक्ष, इकरा उर्दू शाळा), . मोहम्मद जाकिर (सचिव, इकरा उर्दू शाळा) आणि. मोहम्मद नाजिम (सहसचिव, इकरा उर्दू शाळा) यांचा समावेश होता. कार्यक्रम ची सुरुवात वर्ग १० वी चा विध्यार्थी शाहीद खान नासिर खान ने तिलावत कुरआन ए पाक व तर्जुमा वर्ग ९ वी ची विध्यार्थीनी रुमेसा कदवी अहमद शाह ने सादर केले. नात ए पाक वर्ग १० वी ची सबीन अंबर दस्तगीर शाह ने सादर केली.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. पाहुण्यांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रम चे संचालन मोहम्मद जुनेद खान सर व आभार प्रदर्शन साऊद अहेमद खान सर यांनी केले. कार्यक्रमला यशस्वी करण्याकरिता मोहम्मद जाकीर मोहम्मद कासम (सचिव व मुख्यध्यापक इकरा उर्दु माध्यमिक शाळा अकोला) यांचे नेतृत्व सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## 'सात वर्षांची कार्तिकी - बालवयात उमललेली शब्दप्रतिभा'

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**अकोला, दि. १२ :** प्रतिभेला वयाचे बंधन नसते, याची प्रचिती सध्या साहित्यविश्व अनुभवत आहे, ती कार्तिकी मनोज सोनोने या अवघ्या सात वर्षांच्या बालकलाकारामधून. खेळ, शाळा आणि निरागस बालपणाच्या उंबरठ्यावर असतानाच कार्तिकी रंगमंचावर उभी राहून सजीव आणि प्रभावी अभिनय सादर करत आहे. तिचा हा प्रवास केवळ कौतुकास्पद नसून, मराठी साहित्यविश्वासाठी आश्वासक ठरत आहे. सन २०२५ हे वर्ष कार्तिकीसाठी विशेष महत्त्वाचे ठरले आहे.




१५ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या दोन दिवसीय शिवाजी महाविद्यालय अकोला येथे संपन्न झालेल्या सातव्या अकोला जिल्हा मराठी साहित्य संमेलनात तिच्या एकपात्री नाट्यछटा मधील अभिनयाने रसिकांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर १६ नोव्हेंबर २०२५ रोजी थिओसॉफील सोसायटी, अकोला येथे झालेल्या स्नेहमीलन कार्यक्रम मध्ये, २० डिसेंबर २०२५ रोजी प्रभात किड्स साचूळ मध्ये प्री-प्रायमरी स्नेह संमेलनात एकाच दिवशी दोन प्रयोग झालेत, २५ डिसेंबर २०२५ रोजी विदर्भ साहित्य संघ शाखा अकोला द्वारा आयोजित स्वर्गीय सीमा शेटे रोठे स्मृती लेखिका संमेलन, अकोला मध्ये सादरीकरण साहित्यिक रसिकांना खूप भावले. ह्यानंतर २७ डिसेंबर २०२५ रोजी दुसरे राज्यस्तरीय अक्षरक्रांती साहित्य संमेलन, नागपूर येथेही तिच्या सादरीककरणाने सर्वांची मते जिंकलीत, तसेच नाशिक आणि नागपूर येथील साहित्य संमेलनांमध्ये अशा एकूण सात ठिकाणी सात वर्षांची कार्तिकी '' माझा डेबू संत झाला रे ''.... ( सखुबाई झिंगराजी जानोरकर यांचे मनोगत ) ह्या गाडगेबाबांच्या आईचे या विषयावर अभिनय साकारत आहे. हा योगायोग जितका लक्षवेधी आहे, तितकीच तिची कामगिरी ठोस आणि परिणामकारक आहे. कार्तिकीचा अभिनय पाहताना तिचे बालपण कुठेही विस्कळीत झालेले जाणवत नाही. उलट तिच्या अभिनयामध्ये बालसुलभ निरागसता आणि आशयाची परिपक्वता यांचा सुंदर समतोल दिसतो. तिचे विचार ती केवळ पाठांतराच्या स्वरूपात मांडत नाही, तर ते शब्द तिच्या आवाजातून अनुभवासारखे उतरतात. तिच्या उच्चारांत स्पष्टता आहे, भावाभिव्यक्तीत सहजता आहे आणि संवादफेकीत नैसर्गिक ओघ आहे.

या चिमुकलीच्या जडणघडणीत तिच्या आई वडिलांचा आणि लेखक डॉ.विनय वसंतराव दांदळे यांच्या लेखनाचा मोलाचा वाटा आहे. तिचे वडील प्रभात किड्स स्कूल, अकोला येथे ग्रंथपाल म्हणून कार्यरत असून, पुस्तकांशी असलेली त्यांची जवळीक कार्तिकीच्या संस्कारांत प्रतिबिंबित होते. शब्द, विचार आणि साहित्य यांचे बीज तिच्या मनात अगदी लहान वयात रोवले गेले आहे. तिची आई गृहिणी असून, कुटुंब आणि मुलीच्या कलागुणांचा समतोल सांभाळत त्यांनी कार्तिकीच्या स्वप्नांना दिशा दिली आहे. सराव, संयम आणि प्रोत्साहन , या त्रिसूत्रीवर कार्तिकीची वाटचाल सुरू आहे. कार्तिकीची खरी ओळख ठरते, ती तिच्या धाडस, धैर्य आणि सभाधीटपणामुळे. मोठ्या व्यासपीठावर, असंख्य प्रेक्षकांसमोर उभे राहून आत्मविश्वासाने भूमिका साकारणे हे तिच्या वयाला सहजसाध्य नाही मात्र कार्तिकी मंचावर उभी राहते, तेव्हा तिच्या हालचालीत गोंधळ नसतो, शब्दांत अडखळणं नसते आणि चेहऱ्यावर आत्मविश्वास स्पष्टपणे दिसतो. सर्वत्र तिच्या या बालप्रतिभेचे मनापासून कौतुक होत आहे. साहित्यिक, शिक्षक, पालक आणि रसिक प्रेक्षक एकमुखाने सांगतात की, ही केवळ बालकलाकार नसून भविष्यातील सक्षम वक्ता आणि प्रभावी अभिव्यक्तीची वाहक ठरू शकते.

तिच्या अभिनयातून विचारांची स्पष्टता, भाषेवरचे प्रभुत्व आणि प्रेक्षकांशी संवाद साधण्याची क्षमता दिसून येते. आजच्या काळात जिथे बालपण अनेकदा स्पर्धेच्या ओझ्याखाली दबले जाते, तिथे कार्तिकीचा प्रवास वेगळा वाटतो. तिचा अभिनय बालपण हिरावून न घेता, ते अधिक समृद्ध करतो. सात वर्षांची कार्तिकी उद्याच्या मराठी साहित्यविश्वासाठी एक आशादायी किरण ठरत आहे. हेच तिच्या वाटचालीचे खरे यश आहे.

## शेतकरी संपर्कासह गोदरेज ॲग्रोव्हेटने जागतिक डाळ दिन साजरा केला

**मुंबई, दि. १२ वृत्तसंस्था**

भारतीय कुटुंबांची पोषण सुरक्षा, मातीचे आरोग्य आणि ग्रामीण उपजीविकेत डाळींची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, हवामान परिस्थिती, विखुरलेली जमीन, कीटक आणि रोगांचे सततचे त्रास आणि दर्जेदार बियाण्यांची मर्यादित उपलब्धता यामुळे डाळी उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादकतेच्या आव्हानांना तोंड द्यावे लागते आहे. यासाठी मुळापासून मजबूत पाठिंब्याची गरज अधोरेखित होते.




या आव्हानांना तोंड देण्यासाठी गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेडच्या पीक संरक्षण व्यवसायाने जागतिक डाळी दिनानिमित्त पाच लाखांहून अधिक डाळी उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवत शेतकरी संपर्क उपक्रम हाती घेतला. चांगल्या कृषी पद्धतींच्या (जीएपी) आधारे नियोजनबद्ध प्रशिक्षण कार्यक्रम या उपक्रमात आयोजित केले गेले, ज्यात दीर्घकालीन डाळींच्या लागवडीला पाठिंबा देण्यासाठी माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले.

प्रशिक्षण सत्रांमध्ये तुरीची डाळ, हरभरा आणि मुगाची डाळ यासारख्या प्रमुख कडधान्य पिकांचा समावेश होता, ज्यामध्ये भौगोलिक क्षेत्रांमध्ये आढळणाऱ्या पिकांशी संबंधित विशिष्ट कृषीविषयक आव्हानांवर चर्चा करण्यात आली. माती आणि हवामान परिस्थितीचा पिकांच्या कामगिरीवर होणारा प्रभाव, पीक विज्ञानाची मूलभूत तत्त्वे, शिफारस केलेल्या शेती पद्धती आणि हंगामात सामान्यतः येणाऱ्या प्रमुख कीटक आव्हानांचे व्यवस्थापन यासारख्या व्यावहारिक मुद्द्यांवरील चर्चेत शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्यात आले. या उपक्रमाबद्दल भाष्य करताना, गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेडच्या पीक संरक्षण व्यवसायाचे सीईओ राजवेलू एनके म्हणाले: ''डाळ उत्पादकता सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात यासंबंधीचे ज्ञान वेळेवर मिळणे आवश्यक आहे. मातीची गुणवत्ता, पिकांची संपूर्ण प्रक्रिया आणि कीटकांच्या गतिशीलतेबद्दल शेतकऱ्यांना महत्त्वाची माहिती दिल्याने त्यांना वेळेवर आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होऊ शकते, विशेषतः सतत बदलत्या कृषी परिस्थितीत. या जागतिक डाळी दिनाच्या उपक्रमाद्वारे, गोदरेज ॲग्रोव्हेटने शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवतानाच शाश्वत पीक व्यवस्थापन पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी शेतकऱ्यांशी संपर्क साधला. यामुळे देशातील डाळींची परिसंस्था अधिक भक्कम होण्यास मदत झाली.

# इम्रान खान यांची ८५ टक्के दृष्टी गेली

## सुप्रीम कोर्टातील माहितीने पाकिस्तानात खळबळ

इस्लामाबाद:, दि.१२ वृत्तसंस्था

**माजी पंतप्रधान आणि पीटीआय पक्षाचे संस्थापक इम्रान खान यांच्या प्रकृतीबाबत समोर आलेल्या एका धक्कादायक वृत्ताने पाकिस्तानात खळबळ उडाली आहे. दीर्घकाळापासून रावळपिंडीतील अदियाला तुरुंगात बंदिस्त असलेल्या इम्रान खान यांच्या उजव्या डोळ्याची दृष्टी ८५ टक्क्यांपर्यंत निकामी झाली आहे, असा दावा त्यांच्या पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे.**



पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने खान यांच्या डोळ्यांच्या तपासणीसाठी एक विशेष वैद्यकीय पथक स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात इम्रान खान यांच्या तुरुंगातील स्थितीबाबत सुनावणी पार पडली. यावेळी सादर करण्यात आलेल्या एका अहवालात धक्कादायक माहिती समोर आली. ऑक्टोबर २०२५ पर्यंत खान यांची दृष्टी सामान्य होती, मात्र त्यानंतर त्यांना धूसर दिसू लागले. उपचारांमधील दिरंगाईमुळे ही स्थिती अधिक खालावली. तपासणीदरम्यान डोळ्यात रक्ताची गुठळी झाल्याचे निदान झाले. इंजेक्शनद्वारे उपचार करूनही त्यांची दृष्टी पूर्ववत होऊ शकलेली नाही, असा दावा त्यांच्या पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. पाकिस्तानचे सरन्यायाधीश () याह्या आफ्रिदी आणि न्यायमूर्ती शाहिद बिलाल हसन यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी घेतली. ''कैद्याचे आरोग्य ही राज्याची सर्वोच्च प्राथमिकता आहे आणि त्याला योग्य उपचार मिळणे ही सरकारची जबाबदारी आहे,'' असे स्पष्ट मत सरन्यायाधीशांनी नोंदवले.

न्यायालयाने केवळ वैद्यकीय उपचारांचेच नव्हे, तर इम्रान खान यांना त्यांच्या मुलांशी दूरध्वनीवरून संवाद साधण्याची परवानगी देण्याचेही निर्देश दिले आहेत. हे दोन्ही आदेश १६ फेब्रुवारीपूर्वी (सोमवार) अंमलात आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अटॉर्नी जनरल मन्सूर उस्मान अवान यांनी न्यायालयात ग्वाही दिली की, ''वैद्यकीय सुविधा पुरवणे ही सरकारची जबाबदारी आहे आणि जर कैदी समाधानी नसेल, तर सरकार योग्य ती पावले उचलेल.''इम्रान खान यांनी वारंवार डोळ्यांच्या त्रासाची तक्रार करूनही तुरुंग प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप अहवालात करण्यात आला आहे. दुसरीकडे, पाकिस्तानचे माहिती मंत्री अताउल्लाह तरार यांनी मात्र खान यांच्या कुटुंबीयांकडून पसरवले जाणारे दावे खोटे असल्याचे म्हटले आहे.

# अमेरिकेत भारतीय विद्यार्थिनीचा मृत्यू

नवी दिल्ली, दि.१२ वृत्तसंस्था

अमेरिकेत २०२३ मध्ये रस्ता ओलांडताना एका वेगवान पोलिस वाहनाने धडक दिल्याने तिचा मृत्यू झाला होता. अमेरिकेतील सिएटल शहराने २३ वर्षीय भारतीय विद्यार्थिनी जान्हवी कंदुला हिच्या कुटुंबासोबत २९ दशलक्ष डॉलर्सच्या तडजोडीवर सहमती दर्शवली आहे.

याचा अर्थ पीडितेच्या कुटुंबाला अंदाजे ₹२६२ कोटींची भरपाई मिळेल. हे प्रकरण चांगलेच चर्चिले गेले होते,आता कायदेशीर तोडगा निघाला आहे. जान्हवी कंदुला यांना अधिकारी केविन डेव्ह यांनी धडक दिली. ती ड्रग ओव्हरडोज वरून जात होती आणि अंदाजे ११९ किमी/ताशी वेगाने प्रवास करत होती, तर त्या भागात वेग मर्यादा अंदाजे ४० किमी/ताशी होती. अहवालात असे दिसून आले आहे की वाहनाचे आपत्कालीन दिवे चालू होते आणि चौकात सायरन सुरू होता.

शहराच्या वकील एरिका इव्हान्स यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, ''जान्हवी कंदुलाचा मृत्यू अत्यंत दुःखद होता. शहराला आशा आहे की या आर्थिक तडजोडीमुळे कांडुला कुटुंबाला काही सांत्वन मिळेल.'' तिचे जीवन महत्त्वाचे होते तिच्या कुटुंबासाठी, मित्रांसाठी आणि आमच्या समुदायासाठी.जान्हवी सिएटलमधील नॉर्थईस्टर्न युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसमध्ये इन्फॉर्मेशन सिस्टीम्समध्ये पदव्युत्तर पदवी घेत होती. दुसऱ्या एका पोलिस अधिकाऱ्याचे बॉडी कॅमेरा रेकॉर्डिंग समोर आल्यानंतर या प्रकरणाला आणखी बळकटी मिळाली.त्यात, अधिकारी हसताना आणि कथितपणे असे म्हणत असल्याचे ऐकले गेले की जान्हवीच्या जीवनाचे ''मर्यादित मूल्य'' आहे आणि शहराने ''फक्त एक चेक लिहावा''.

## महत्त्वाचे

### सिरसा येथे प्रेमीयुगुलाचा मृत्यू

**हरियाणा:** हरियाणा येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका तरुणाने आपल्या प्रेयसीची हत्या करून स्वतः ने आत्महत्या केल्याचे धक्कयाक घटना समोर आली आहे. सुनील आणि सिमरन असे या मृत जोडप्याचे नाव आहे. ही घटना सोमवारी (९ फेब्रुवारी) ला रात्री घडली.सुनील आणि सिमरन यांची भेट हरियाणातील रतिया येथे एका कंस्ट्रक्शन कंपनीत काम करत असताना झाली होती. इथून त्यांच्या प्रेमसंबंधाला सुरुवात झाली. सुनीलने सहा महिन्यांपूर्वी आपल्या कुटुंबाला आपण नोकरीसाठी दुबईला जात असल्याचे खोटे सांगितले होते. मात्र तो प्रत्यक्षात रतियामध्येच काम करत होता. जेव्हा घरच्यांना त्याच्या प्रेमसंबंधाच्या बाबतीत समजले, त्यांनतर त्याला परत त्याच्या गावी जींद याठिकाणी घेऊन आले होते. दोन्ही कुटुंबांना त्यांच्या नात्याची माहिती झाल्यामुळे सिमरनने सुनीलशी बोलणे बंद केले होते.मात्र सुनील कोणालाही न सांगता जींदहून सिरसा येथे पोहोचला. त्याने रात्री उशिरा सिमरनची भेट घेतली आणि ते दोघेही इमारतीच्या तळमजल्यावरील खोलीत गेले. तिथे दोघांनी एकत्र मद्यप्राशन केले आणि त्यानंतर त्यांच्यात कडाक्याचे भांडण झाले.

### कोरेगाव भीमात पश्चिम बंगालच्या युवकाची हत्या

**पुणे :** जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील कोरेगाव भीमा इथं अज्ञात व्यक्तींनी पश्चिम बंगालच्या युवकाची हत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी एक्सवर पोस्ट केली. भाषेसाठी, ओळखीसाठी तरुणाची हत्या करण्यात आली. याप्रकरणातील गुन्हेगारांना तत्काळ अटक करून शिक्षा द्यावी, अशी मागणी एक्स पोस्टमधून केली आहे. त्यामुळं या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे. सुकेन महातो (वय ३०, मूळ रा. पश्चिम बंगाल) असं मृत युवकाचं नाव असून आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. याप्रकरणी तुळशीराम महातो यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून अज्ञात इसमांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर तालुक्यातील कोरेगाव भीमा इथं अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्रानं हल्ला करून सुकेन महातो या युवकाची हत्या केल्याची घटना घडली. कोरेगाव भीमा येथील सुकेनचा मृतदेह त्याच्या घराजवळ आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच शिक्रापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली.

### थान्या नाथन बनल्या भारतातील पहिल्या दृष्टिहीन महिला न्यायाधीश

**नवी दिल्ली** इच्छाशक्ती प्रबळ असेल तर शारीरिक अक्षमता ध्येय गाठण्यापासून रोखू शकत नाही', हे केरळच्या थान्या नाथन सी यांनी सिद्ध करून दाखवले आहे. जन्मजात अंधत्व असूनही, थान्या यांनी केरळ न्यायिक सेवा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून, त्या केरळच्या पहिल्या १००% दृष्टिहीन महिला जज बनल्या आहेत. त्यांच्या या यशाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे.कन्नूर जिल्ह्यातील तालिपरम्बा येथील रहिवासी असलेल्या २४ वर्षीय थान्या यांनी लहानपणापासूनच अनेक आव्हानांचा सामना केला. सुरुवातीचे शिक्षण विशेष शाळेत झाल्यानंतर, त्यांनी १० वी आणि १२ वीचे शिक्षण सामान्य शाळेतून पूर्ण केले. त्यानंतर कन्नूर विद्यापीठातून एलएलबीची पदवी मिळवली. विशेष म्हणजे, संपूर्ण लॉ कॉलेजमध्ये त्या एकमेव दृष्टिहीन विद्यार्थिनी होत्या, तरीही त्यांनी अभ्यासात नेहमीच अव्वल स्थान टिकवून ठेवले.

# रशिया की व्हेनेझुएला? अखेर सरकारने आदेश दिलाच

## भारताला हाताशी धरुन ट्रम्पनी बलाढ्य रशियाला अडकवले

नवी दिल्ली, दि.१२ वृत्तसंस्था

अमेरिकेसोबत ट्रेड डील नंतर भारताने सरकारी मालकीच्या रिफायनरीजना अमेरिका आणि व्हेनेझुएला येथून अधिक कच्चे तेल खरेदी करण्याचा विचार करायला सांगितले आहे. मात्र खर्च, तांत्रिक मर्यादा आणि स्वस्त पर्यायी स्रोत यामुळे व्हेनेझुएलाकडून तेल खरेदीचा विषय आव्हानात्मक असून अमेरिकेने भारताच्या व्यापार करारावर एक अट घातली आहे, ज्यामध्ये रशियन तेल खरेदी बंद करण्यास सांगितले.अमेरिकेने भारतासमोर ट्रेड डीलसाठी एक महत्त्वाची अट ठेवली आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की भारत रशियाकडून तेल खरेदी करणार नाहीत. याशिवाय डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या टास्क फोर्सला रशियाकडून भारताच्या तेल खरेदीवर लक्ष ठेवायला सांगितले आहे. व्यापार करारातील अटीप्रमाणे भारताने रशियाकडून तेल खरेदीला 'विराम' न लावल्यास भारतीय आयातींवर पुन्हा २५ टक्के टॅरिफचा भार लादला जाईल आणि संभाव्य कारवाईला सामोरे जावे लागेल.

या दरम्यान, आता भारत सरकारने सरकारी मालकीच्या तेल शुद्धीकरण कंपन्यांना अमेरिका आणि व्हेनेझुएला येथून अधिक कच्चे तेल खरेदीला प्राधान्य देण्याचे सांगितले आहे. अशाप्रकारे, आता अमेरिका आणि व्हेनेझुएला येथून टँकर भरून भारतात कच्चे तेल येऊ लागणार आहे.अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या कार्यकारी आदेशानुसार, भारताने रशियन कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही तर पुन्हा २५% शुल्क लादले जाऊ शकते. त्याचवेळी, भारत सरकारने म्हटले की देशाची ऊर्जा सुरक्षा खरेदी निर्णयांना चालना देईल आणि कच्च्या तेलाच्या स्रोतांमध्ये विविधता आणेल तसेच, आंतरराष्ट्रीय बाजारात सर्वोत्तम किमतीत तेल खरेदी करेल, ही त्यांची रणनीती राहील.सूत्रांच्या माहितीनुसार स्पॉट मार्केटमध्ये निविदा काढताना रिफायनरीजना अमेरिकन तेलाच्या ग्रेडला प्राधान्य देण्यास सांगण्यात आले असून व्हेनेझुएलन तेलाची खरेदी व्यापाऱ्यांशी खाजगी वाटाघाटीद्वारे केली जाईल. कोणत्याही एका देशावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकार आयात पर्यायांचा विस्तार करू इच्छित आहे.केवळ कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती किंवा शिपिंग खर्चच नाही तर व्हेनेझुएलाचे तेल खरेदी करणे देखील भारतीय तेल कंपन्यांसाठी एक मोठे आव्हान आहे.

# डोनाल्ड ट्रम्प-नेतन्याहू यांच्यात तीन तास चर्चा

वॉशिंग्टन :दि.१२ वृत्तसंस्था



बुधवारी (११ फेब्रुवारी) अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी वॉशिंग्टनच्या ओव्हल ऑफिसमध्ये नेत्यन्याहूंसोबत बंद दाराआड तीन तास चर्चा केली. या चर्चेत कोणातही करार झालेला नाही.ट्रम्प यांनी बैठकीनंतर सोशल मीडियावर पोस्ट केल्यानुसार, दोन्ही नेत्यांमध्ये कोणताही करार किंवा ठोस निर्णय झालेला नाही. ट्रम्प यांनी केवळ एवढेच सांगितले की, करार झाल्यास तो आमचा पहिला पर्याय असेल. तसे न झाल्यास पुढे काय कारायचे यावर चर्चा केली जाईल यावर नेतन्याहूंनी सहमती दर्शवली असल्याचे ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.तज्ज्ञांच्या मते, ट्रम्प यांच्या या विधानावरुन त्यांनी नेतन्याहूंशी इराणबाबत चर्चा केली असण्याची शक्यता आहे. कारण सध्या अमेरिका इराण () अणु करारावर वाटाघाटीची चर्चा करत आहे. ओमानमध्ये ही चर्चा सुरु असून यामध्ये अमेरिकेचे विशेष राजदूत स्टीव्ह वीटकॉफ यांचा समावेश आहे. ट्रम्प यांच्या विधानावरुन दिसून येते की, नेत्याहूंशी झालेल्या बैठकी इराणबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. परंतु दोन्ही देशांतील वाटाघाटीच्या चर्चा अपयशी ठरल्यास इराणवर मोठा हल्ला होण्याची शक्यता आहे.

यापूर्वी देखील ट्रम्प यांनी सातत्याने इराणला त्यांचा अणु कार्यक्रम बंद करण्याचा इशारा दिला आहे, असे न केल्यास लष्करी कारवाईचे संकेतही दिले आहे. परंतु इस्रायलच्या मते, गुप्त सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणची लष्करी ताकद प्रचंड वाढली असल्याने त्यांना प्रत्युत्तर देण्यास आणि सुरक्षा करण्यास समर्थ नसल्याने इस्रायलने म्हटले आहे. परंतु ट्रम्प आणि नेतन्याहू यांच्यातील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, मध्यपूर्वेत मोठे संकेट उभे राहण्याची शक्यता आहे.दोन्ही नेत्यांच्या बैठकीत गाझातील परिस्थितीबाबतही चर्चा झाली आहे. ट्रम्प यांनी युद्धबंदी आणि पुनर्बांधणीची योजना पुढे नेण्यावर नेतन्याहूंशी संवाद झाला आहे. परंतु हमासने शस्त्र न सोडल्याने इस्रायली सैन्यांची माघारी गाझा () सीमांवरुन थांबली आहे. ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, गाझा आणि संपूर्ण प्रदेशात शांतता आणि प्रगती आम्ही चर्चा केली आहे. नेतन्याहू ट्रम्प यांच्या शांतता मंडळात देखील सहभागी होणार असल्याचे अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी म्हटले आहे.

# मादागास्करला गेझानी वादळाचा तडाखा; ९ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली, दि.१२ वृत्तसंस्था



उष्णकटिबंधिय गेझानी वादळाने मादागास्करमधील महत्वाचे बंदर तोमासिना शहराताला तडाखा ( ) दिला असून घरे कोसळल्यामुळे किमान ९ जण ठार झाले आहेत. वादळामुळे वाऱ्याचा वेग ताशी १९५ किलोमीटर इतका असून मादागास्करच्या हवामान विभागाने काही भागांमध्ये पूर येण्याचा आणि दरडी कोसळण्याचा रेड अलर्ट दिला आहे.गेझानी वादळाचा फटका ३१ दशलक्ष लोकसंख्येला बसला आहे. दोनच आठवड्ंपुर्वी मादागास्करला अशाच मोठ्या वादळाचा फटका बसला होता. गेझानी वादळामुळे काही इमारती कोसळल्या असून ९ जण ठार झाले आहेत आणि किमान १९ जण जखमी झाले आहेत, असे राष्ट्रीय जोखीम आणि आपत्ती व्यवस्थापन कार्यालयाने म्हटले आहे.सुमारे ३ लाख रहिवासी असलेल्या तोमासिना या मुख्य बंदराला चक्रीवादळाचा सर्वाधिक फटका बसला, असे रहिवाशांनी सांगितले. मादागास्करचे अध्यक्ष मायकेल रँड्रियानिरिना यांनी ऑक्टोबरमध्ये लष्करी उठावाद्वारे सत्ता हाती घेतली आहे. त्यांनी नुकसानीची पाहणी करण्यासाठी टोमासिनाला भेट दिली. वादळामुळे आलेल्या मुसळधार पावसामुळे या भागात मोठा पूर आला असून घरे आणि दुकानांची छप्पर उडून गेले असून झाडे, भिंती कोसळल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे.मंगळवारपासून तोमासिनामध्ये वीज खंडित झाली आहे.गेझानी चक्रिवादळ बुधवारी मादागास्करमधून पूर्वे कडून पश्चिमेकडे सरकले आणि आत सरकताना ते कमकुवत झाले आणि त्याचे रुपांतर उष्णकटिबंधीय वादळात झाले. याच वर्षी ३१ जानेवारी रोजी फिटिया या उष्णकटिबंधीय चक्रीवादळाने मादागास्करमध्ये १४ लोकांचा बळी घेतला आणि ८५ हजारांहून अधिक लोक विस्थापित झाले होते.

# रागातून पोटच्या मुलीच्या छातीत थेट झाडली गोळी

नवी दिल्ली, दि.१२ वृत्तसंस्था

अमेरिकेत एक धक्कादायक घटना घडली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरुन झालेल्या वादात एका वडिलांनी आपल्या पोटच्या मुलीची थेट गोळी झाडून हत्या केली आहे. या घटनेने संपूर्ण अमेरिकेत खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसाप, २३ वर्षीय ब्रिटिश महिला लुसी हॅरिसन हिची गोळी झाडून हत्या करण्यात आली आहे. १० जानेवारी २०२५ रोजी टेक्सासच्या डलासजवळी प्रॉस्पर परिसरात ही घटना घडली होती. लुसी आणि तिचा प्रियकर सॅम लिटरसोबत टेक्सासला आले होते. ती आपल्या वडिल क्रिस हॅरिसन आणि इतर कुटुंबीयांसोबत राहत होती. सध्या हे प्रकरण न्यायालयात पोहोचले असून खटल्यादरम्यान तपशीला अनेक धक्कादायक खुलासे झाले आहेत.न्यायालयत लुसी हॅरिसनच्या प्रियकर सॅमन लिटरने दिलेल्या साक्षीनुसार, १० जानेवारी २०२५ रोजी सकाळी तो आणि लुसी विमानतळाकडे निघाले होते. यावेळी लुसी आणि तिच्या वडिलांमध्ये डोनाल्ड ट्रम्पवरुन जोरदार वाद झाला. वादादरम्यान लुसीने वडिलांना तिच्यासोबत झालेल्या लैंगिक अत्याचाराबाबत कसे वाटले असा अत्यंत संवेदनशील प्रश्न केला होता.

# नाटो आर्क्टिक सेंट्री मिशन सुरू करणार

नवी दिल्ली, दि.१२ वृत्तसंस्था

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युरोपियन मित्र राष्ट्रांमध्ये ग्रीनलँडवरून निर्माण झालेल्या तणावानंतर, उत्तर अटलांटिक करार संघटना अर्थात नाटो येत्या काही दिवसांत आर्क्टिकमध्ये त्यांची देखरेख आणि लष्करी मालमत्ता वाढवू शकेल अशी मोहीम सुरू करण्याची अपेक्षा आहे.तीन युरोपियन राजनयिक, एक लष्करी अधिकारी आणि या प्रकरणाची माहिती असलेल्या व्यक्तीच्या मते, या आठवड्यात, जेव्हा युतीचे संरक्षण मंत्री ब्रुसेल्समध्ये भेटतील तेव्हा आर्क्टिक सेंट्री मिशनची सुरुवात होऊ शकते. आर्क्टिक सेंट्रीमध्ये लष्करी सराव, वाढलेली देखरेख, ड्रोनसह अतिरिक्त जहाजे आणि हवाई मालमत्ता यांचा समावेश असू शकतो.तथापि, हे अभियान मोठ्या प्रमाणात नवीन सैन्य जोडण्याऐवजी या प्रदेशात नाटो संसाधनांचा अधिक प्रभावीपणे वापर करण्यावर लक्ष केंद्रित करेल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हे अभियान या प्रदेशात आमची प्रतिबंधकता आणि संरक्षण आणखी वाढवण्याच्या युतीच्या प्रयत्नांचा एक भाग होता, विशेषतः रशियाच्या लष्करी हालचाली आणि उच्च उत्तरेकडील चीनच्या वाढत्या स्वारस्याच्या पार्श्वभूमीवर, हे अभियान असेल.हे अभियान लवकरच कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. असे नाटोच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

ट्रम्प आणि नाटो प्रमुख मार्क रुट यांच्यात दावोस येथे झालेल्या चर्चेनंतर नाटोने गेल्या आठवड्यात या मोहिमेचे नियोजन सुरू केल्याचे सांगितले. ग्रीनलँड ताब्यात घेण्याच्या ट्रम्प यांच्या महत्त्वाकांक्षेवरील तीव्र ताण कमी झाला आहे.कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही आणि लष्करी नियोजक अजूनही पर्यायांवर काम करत आहेत. परंतु नियोजन ''अंतिम टप्प्यात'' आहे,असे नाटोचे सर्वोच्च सहयोगी कमांडर, यूएस एअर फोर्स जनरल अलेक्सस ग्रिनकेविच यांनी सोमवारी सांगितले.

**खुलासा** — व्हॉट्सअॅप, इंस्टाग्रामसह अनेक प्लॅटफॉर्मचे १० कोटी वापरकर्ते ब्लॉक

# रशियामध्ये सोशल मीडिया संप !

नवी दिल्ली, दि.१२ वृत्तसंस्था




रशियामध्ये सोशल मीडियावर मोठा हल्ला झाला आहे. पुतिन सरकारने व्हॉट्सअॅप, युट्यूब आणि इंस्टाग्रामसह अनेक परदेशी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बंदी घातली आहे. जवळपास १० कोटी वापरकर्ते ब्लॉक करण्यात आले आहेत.

नागरिकांना स्थानिक सोशल नेटवर्किंग साइट्स उपलब्ध करून देण्याची घोषणा करण्यात आली आहे. लोकांच्या गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी आणि गैरवापर होऊ शकणाऱ्या वैयक्तिक डेटाच्या लीक रोखण्यासाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.रशियातील पुतिन सरकारने स्थानिक सोशल नेटवर्किंग साइटच्या चाचण्या पूर्ण केल्या आहेत आणि लवकरच ती लाँच करणार आहेत. सरकारचा दावा आहे की स्थानिक मेसेजिंग आणि मनोरंजन अॅप्स अधिक सुरक्षित आणि स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित असतील.यामुळे वैयक्तिक डेटा लीक होण्यास प्रतिबंध होईल आणि गोपनीयता राखली जाईल. म्हणूनच, देशाच्या राष्ट्रीय डोमेन नेम सिस्टम () मधून परदेशी सोशल नेटवर्किंग साइट्सचे डोमेन काढून टाकण्यात आले आहेत.व्हॉट्सअॅप, युट्यूब आणि इंस्टाग्राम व्यतिरिक्त, रशियामध्ये बीबीसी, ड्यूश वेले, रेडिओ फ्री युरोप, रेडिओ लिबर्टी आणि अनामिक टॉर ब्राउझर देखील ब्लॉक करण्यात आले आहेत. सरकारने सर्व इंटरनेट प्रदात्यांना राष्ट्रीय डोमेन नेम सिस्टम वापरण्याचे आदेश दिले आहेत. देशाच्या ''सार्वभौम इंटरनेट'' कायद्यानुसार हे अनिवार्य आहे. २०२१ मध्ये, गुगल डीएनएससह इतर डीएनएस सिस्टमच्या वापरावर बंदी घालण्यात आली होती.

रशियातील पुतिन सरकारने सोशल मीडियावर पूर्णपणे बंदी घातली आहे, परंतु डेन्मार्क, फ्रान्स आणि ऑस्ट्रेलियानेही १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घातली आहे.

स्पॅनिश सरकारने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याची घोषणा देखील केली आहे. भारतातही, मुले आणि अल्पवयीन मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याची मागणी वाढत आहे, कारण यामुळे त्यांचे भविष्य अंधकारमय होण्याचा धोका आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी स्वतंत्र कृतिदल कितपत लाभदायक?

हवामान बदल, ओला व कोरडा दुष्काळ, प्रतिकूल आर्थिक परिस्थिती आणि कर्जबाजारीपणामुळे अनेक शेतकरी आपल्या आयुष्याचा शेवट करून घेतात, हे दुर्दैवी वास्तव. देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात (३८ टक्के) होत असून, ही बाब चिंताजनक आहेच, त्या रोखण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारीही आहे. २०२५ च्या पहिल्या आठ महिन्यांतच राज्यातील ११,१८३ शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली. या पार्श्वभूमीवर शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी स्वतंत्र कृतिदल निर्माण करण्याचा निर्णय राज्याच्या कृषी विभागाने घेतला. असे कृतिदल निर्माण करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले. दलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्याबरोबरच सामाजिक, आर्थिक आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींवर सर्वसमावेशक उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. तज्ज्ञांचा समावेश असल्यामुळे त्या प्रभावी आणि नेमक्या असतील, अशी अपेक्षा. शेतकऱ्यांच्या समस्या तांत्रिक, आर्थिक त्याचप्रमाणे मानसिक आहेत, याची जाण ठेवून तज्ज्ञांची निवड केल्याचे दिसते. हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान, आर्थिक अडचणी, सामाजिक ताणतणाव आणि मानसिक अस्थैर्याच्या समस्या निर्माण होतात. या अडचणींचा सामना करता यावा आणि नैराश्यातून बाहेर पडता यावे, यासाठी मार्गदर्शन आणि मानसिक आधाराची आवश्यकता असते. म्हणूनच आत्महत्या रोखण्यासाठीच्या प्रयत्नांबरोबरच आपत्तीपूर्व, आपत्तीकालीन आणि आपत्तीपश्चात शेती, आर्थिक, सामाजिक आणि मानसिक या चतुःसूत्री दृष्टिकोनातून एकात्मिक उपाययोजना राबवण्यासाठी कृतिदलाची स्थापना केली जात आहे. आता शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास व संशोधन करावे लागेल. हवामान बदलाच्या परिणामांवर अचूक उपाययोजना सुचवाव्या लागतील. आत्महत्या होऊच नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजावे लागतील. विभागीय आणि जिल्हास्तरावर अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करावा लागेल. शासकीय, निमशासकीय आणि स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधावा लागेल. नुकसानभरपाई दिली की संपले, असे मानण्याचा हा विषय नाही. शेतकऱ्याचे कशा पद्धतीने सक्षमीकरण करता येईल, हे पाहावे लागेल. कृषी विभागातील वेगवेगळ्या योजनांची सांगड सरकारच्या इतर विभागांच्या उपक्रमांशी घालून, उत्पादन आणि उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न करावे लागतील. आत्महत्या रोखण्यासाठी यापूर्वीच्या अनेक समित्यांनी आजवर सुचवलेल्या उपायांचा, अहवालांचा अभ्यास करून हे नवे कृतिदल बदलत्या काळानुसार गरजेच्या उपाययोजना अधिक व्यापकपणे राबवणार आहे. यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखावा लागेल. मराठवाडा आणि विदर्भात आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना सरकारकडून एक विशिष्ट आर्थिक रक्कम मिळते. 'वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन'अंतर्गत सर्व गरजू शेतकऱ्यांना अन्नसुरक्षा योजना, आरोग्यसुविधा तसेच 'राजीव गांधी जीवनदायी योजने'चा लाभ दिला जातो. जलयुक्त शिवार, मनरेगा अंतर्गत कामांचा शेतकऱ्यांना लाभ मिळत असतो; परंतु अनेकदा कर्ज वसुलीसाठी सावकार तसेच बँकांचा ससेमिरा सुरू होतो आणि दडपणातून शेतकरी तणावामुळे आत्महत्येकडे वळतो. या वाढत्या आत्महत्यांची अचूक माहिती पुढे येऊ न देण्याबरोबरच व्यसनाधीनतेमुळे शेतकरी आयुष्य संपवत आहेत, कर्ज घेऊन लग्नादी सोहळ्यांवर उधळपट्टी केली जाते, असे बेछूट आरोप काही जण करतात. माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी 'शेतकरी कर्ज घेतात आणि परतफेडीसाठी दहा वर्षांची वाट पाहतात,' तसेच 'भिकारी शासन आहे, शेतकरी नव्हे,' अशी वादग्रस्त वक्तव्ये केली होती. वास्तविक बळीराजा कष्टाळू आणि प्रामाणिक आहे. तो परिस्थितीची शिकार बनतो. अनेकदा तो सावकारी शोषणाचा बळी ठरतो. बँकेचे व सरकारी अधिकारी त्याला खेटे मारायला लावतात. मुळात सातत्याने तोट्याच्या शेतीतून होणारी आर्थिक कुचंबणा हे आत्महत्यांचे प्रमुख कारण आहे. शेतीला सिंचन, विजेचा अनुभव, निकृष्ट दर्जाच्या महागड्या निविष्ठा, पेरणी हंगामात संस्थात्मक कर्जपुरवठ्याचा अभाव, बेहिशेबी कर्जाचे सावकारी पाश व त्याच्या वसुलीसाठीचा तगादा, नैसर्गिक आपत्तींमुळे होणारी पीकहानी, सक्षम विमा संरक्षण देण्यात सरकारला आलेले अपयश, घटती उत्पादकता, बाजारात मिळणारा कमी भाव ही शेती आतबट्ट्यात असण्याची कारणे आहेत. शेतमालाच्या आयात-निर्यातीबाबत शेतकऱ्यांना मारक ठरणाऱ्या धोरणांचा अवलंब सरकारने करता कामा नये. वेगवेगळ्या प्रकल्पांमध्ये जमीन जाते आणि त्याची समाधानकारक नुकसानभरपाई वेळेवर मिळत नाही. खरे तर, पिकांची लागवड करण्यापासून काढणीपर्यंत जागतिक स्तरावरील प्रगत शेती तंत्र शेतकऱ्यांना मिळायला हवे. नैसर्गिक आपत्तीमुळे तसेच वन्यप्राण्यांकडून शेतीचे नुकसान झाल्यास त्वरित नुकसानभरपाई मिळायला हवी. शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेसे कर्ज बँकांकडून मिळाले पाहिजे. उत्पन्नाचे स्रोत वाढवण्यासाठी जोडव्यवसाय आणि प्रक्रिया उद्योगाची साथ मिळाली पाहिजे. तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था केवळ शेतीवर आधारित असून चालणार नाही. शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या कमी करून, तरुणांना इतर उद्योग-व्यवसायांत गुंतवावे लागेल. शेतमालास रास्त दर मिळणे, हा शेतकऱ्यांचा मूलभूत अधिकार आहे. शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी केवळ कर्जमाफी करून चालणार नाही, तर ठोस उपाय योजले पाहिजेत. त्यासाठी सरकारी पातळीवर सुरू असलेल्या प्रयत्नाला गती द्यावी लागेल. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत जबाबदारीची अधिक जाणीव निर्माण करावी लागेल. कृषी खात्यातील भ्रष्टाचाराचे निर्मूलन करावे लागेल. कुठल्याही परिस्थितीत शेतकरी एकटा नाही, जगाच्या पोशिंद्यामागे आम्ही उभे आहोत, असा दिलासा सरकारकडून दिला गेला पाहिजे. त्यादृष्टीने पाऊल उचलले जात आहे, ही स्तुत्य बाब. तसेच योजनांची अंमलबजावणीही चोख होणे आवश्यक आहे. नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, सयाजी शिंदे, आमिर खान यांच्यासारखे कलावंत शेतकऱ्यांसाठी धडपड करताना दिसतात. समाजातील अधिकाधिक स्वयंसेवी संस्थांनी आत्महत्या रोखण्याच्या कामात पुढे आले पाहिजे. ही सामूहिक जबाबदारी मानून काम झाले, तरच काही शेतकरी हिताचे घडू शकेल.

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

अडलाच तर
धरण बनावे
आणि फुलवावे
जीवन हो

जर झिजायचे
चंदन बनावे
सुगंधी करावे
चराचर

जर विरायचे
कापूर बनावे
जाता जाता द्यावे
प्रसन्नता

जर तुटायचे
आतून तुटावे
नवीन जन्मावे
पक्षापरी

# वेळेचे महत्व : आजची गरज उद्याचे भविष्य



विचारमंथन
प्रा. कोमल ब. आठवले
मो. 93731 91815



वेळ ही मानवाच्या जीवनातील सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. पैसा, संपत्ती, ज्ञान किंवा पद प्रतिष्ठा पुन्हा मिळवता येऊ शकते; पण गेलेली वेळ परत मिळवता येत नाही. म्हणूनच वेळेचे महत्त्व ओळखणे ही आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे. आजचा योग्य वापर केलेला वेळच उद्याचे उज्ज्वल भविष्य घडवतो आणि समाजाच्या प्रगतीचा पाया मजबूत करतो.

१) वेळ म्हणजे जीवन

वेळ म्हणजेच जीवन होय. आपण ज्या क्षणात जगतो तोच आपला खरा वेळ आहे. प्रत्येक सेकंद हा आपल्याला काहीतरी नवीन करण्याची संधी देतो. जर आपण वेळेचा अपव्यय केला, तर आपण आपल्या आयुष्याचाच अपव्यय करतो. म्हणून वेळेचे नियोजन, शिस्त आणि योग्य वापर हे जीवन यशस्वी करण्यासाठी आवश्यक आहे.

२) आजची गरज म्हणून वेळेचे महत्त्व

आजचा काळ हा स्पर्धेचा आणि वेगाचा काळ आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय, तंत्रज्ञान अशा सर्व क्षेत्रांमध्ये वेळेचे महत्त्व अधिक वाढले आहे. जो व्यक्ती वेळेचा आदर करतो, तोच प्रगतीच्या मार्गावर पुढे जातो.

विद्यार्थ्यांसाठी वेळेचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. अभ्यास, खेळ, विश्रांती यासाठी योग्य वेळेचे नियोजन केल्यास यश मिळते.

नोकरदार आणि व्यावसायिकांसाठी वेळ पाळणे म्हणजे विश्वासार्हता आणि प्रामाणिकपणा दर्शवणे होय.

गृहिणींसाठी घरकाम, मुलांचे संगोपन आणि इतर जबाबदाऱ्या वेळेवर पार पाडणे महत्त्वाचे आहे.

आजच्या डिजिटल युगात मोबाईल, सोशल मीडिया आणि मनोरंजनाच्या साधनांमुळे वेळ वाया जाण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे वेळेचे व्यवस्थापन अधिक आवश्यक झाले आहे.

३) उद्याचे भविष्य घडवणारा घटक

आज आपण जे करतो, त्यावरच आपले उद्याचे भविष्य अवलंबून असते. वेळेचा योग्य उपयोग करून केलेले प्रयत्न भविष्यात मोठे यश देतात. उदाहरणार्थ:

रोज नियमित अभ्यास करणारा विद्यार्थी परीक्षेत चांगले गुण मिळवतो.

वेळेचे नियोजन करून मेहनत करणारा युवक आपल्या करिअरमध्ये यशस्वी होतो.

शेतकरी योग्य वेळी पेरणी आणि कापणी केल्यास चांगले उत्पादन मिळवतो.

यावरून स्पष्ट होते की वेळेचे भान ठेवून केलेले कार्यच उज्ज्वल भविष्याची हमी देते. वेळेचा अपव्यय केल्यास पश्चात्तापाशिवाय काहीही हाती लागत नाही.

४) समाजासाठी वेळेचे महत्त्व

व्यक्तीप्रमाणेच समाजासाठीही वेळेचे महत्त्व तितकेच आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटक वेळेचे पालन करत असेल, तर समाजाची प्रगती वेगाने होते.

शासकीय कार्यालये वेळेवर काम करत असतील, तर नागरिकांची कामे वेळेवर पूर्ण होतात. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये वेळेचे पालन करत असतील, तर समाजात शिस्त निर्माण होते. उद्योगधंदे वेळेवर उत्पादन करत असतील, तर देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते. वेळेचा आदर करणारा समाज प्रगत, शिस्तबद्ध आणि यशस्वी असतो. जपान, जर्मनीसारख्या देशांनी वेळेचे काटेकोर पालन करूनच प्रगती साधली आहे.

५) वेळेचे व्यवस्थापन

वेळेचा योग्य उपयोग करण्यासाठी नियोजन आवश्यक आहे. वेळेचे व्यवस्थापन म्हणजे कामांना प्राधान्य देणे आणि योग्य क्रमाने पूर्ण करणे होय.

दिवसाचे वेळापत्रक तयार करणे

महत्त्वाच्या कामांना प्राधान्य देणे

अनावश्यक गोष्टींवर वेळ न घालवणे

विश्रांतीसाठीही वेळ राखून ठेवणे

यामुळे जीवनात संतुलन राहते आणि मानसिक ताण कमी होतो.

६) वेळ आणि शिस्त

वेळ पाळणे म्हणजे शिस्त पाळणे होय. शिस्तबद्ध जीवनात यश लवकर मिळते. वेळेवर शाळेत जाणे, वेळेवर काम पूर्ण करणे, वेळेवर झोपणे आणि उठणे या सवयी चांगले व्यक्तिमत्त्व घडवतात. अशा व्यक्ती समाजात आदरास पात्र ठरतात.

७) वेळेचा अपव्यय आणि त्याचे परिणाम

वेळ वाया घालवण्याचे परिणाम गंभीर असतात. अभ्यासाकडे दुर्लक्ष केल्यास शिक्षणात मागे पडतो. कामात ढिलाई केल्यास नोकरी किंवा व्यवसायात नुकसान होते. वेळेची किंमत न ओळखणारी व्यक्ती आयुष्यात संधी गमावते.

"काल करे सो आज कर, आज करे सो अब" हा संत कबीरांचा संदेश वेळेचे महत्त्व स्पष्ट करतो. उद्यावर ढकललेले काम अनेकदा अपूर्ण राहते.

८) तरुण पिढी आणि वेळ

आजची तरुण पिढी ही देशाचे भविष्य आहे. त्यांनी वेळेचे महत्त्व ओळखून आपले कौशल्य विकसित केले पाहिजे. शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा, संशोधन यासाठी वेळेचे नियोजन केल्यास देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल.

तरुणांनी सोशल मीडियावर जास्त वेळ घालवण्याऐवजी वाचन, व्यायाम, नवकल्पना आणि समाजसेवा यावर वेळ द्यावा. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होईल आणि समाजालाही फायदा होईल.

९) वेळ आणि नैतिक मूल्ये

वेळेचा आदर करणे म्हणजे इतरांच्या वेळेचाही आदर करणे होय. वेळेवर उपस्थित राहणे, दिलेले काम वेळेत पूर्ण करणे ही नैतिक जबाबदारी आहे. यामुळे विश्वास निर्माण होतो आणि नातेसंबंध मजबूत होतात.

१०) निष्कर्ष वेळ ही अमूल्य संपत्ती आहे.

आजच्या काळात वेळेचे महत्त्व अधिक वाढले आहे. योग्य नियोजन आणि शिस्त यामुळे वेळेचा सदुपयोग करता येतो. आजचा प्रत्येक क्षण योग्य रीतीने वापरला, तर उद्याचे भविष्य उज्ज्वल होईल. व्यक्ती, कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांच्या प्रगतीसाठी वेळेचे भान आवश्यक आहे. म्हणूनच आपण सर्वांनी वेळेचे महत्त्व ओळखून प्रत्येक क्षणाचा सदुपयोग केला पाहिजे. कारण आजची योग्य वेळ हीच उद्याच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

# सोशल मीडियाद्वारे तयार झालेला राजकारणी लोकांच्या मनात टिकेल का?



राजकारण
अमोल भारसाकळे
मो. 8446579182

आज अजितदादा पवार यांच्या जाण्याने एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते अजितदादा हे मातीतून जन्माला आलेले लोकनेते होते त्यांच्या सारखा व्यक्ती व्हायला चाळीस पन्नास वर्ष लागतील ते सहकार, शेती, माती ते शहर विकास याची सांगड घालून राजकारण करायचे त्यामुळे त्यांचा ठसा संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांच्या मनात कायम उमटलेला आहे व तो तसाच राहील आज अनेकांचा अजितदादा जाण्यावर विश्वासच बसत नाही कारण असा व्यक्ती अचानक जाण्याने महाराष्ट्राची जी हानी झालेली आहे ती कधीही भरून निघणारी नाही हे तो जाणतो,कधी हसणारा,आपल्या भाषणातून दुसऱ्याला हसवणारा,रोखठोक बोलणारा,कणखर बाणा असलेला राजकारणी म्हणजे अजितदादा त्यामुळे अजितदादा पवार काय होते व कसे घडले हे प्रत्येकाला माहिती असल्यामुळे अजितदादा जाण्यावर बऱ्याच लोकांचा विश्वास बसत नाही काही पत्रकार तर स्पष्टपणे सांगतात की आज राजकारणात अजितदादा नसल्याने काही रसच उरला नाही.

दुसरीकडे सोशल मीडियावार तयार झालेला राजकारणी समाजकारण कमी व सोशल मीडियाचा वापर जास्त करताना दिसतो कारण त्याने आजच्या समाजाची नाडी हेरली आहे म्हणून तो पेड पत्रकारितेच्या माध्यमातून आपली चांगली छवी(बनावट प्रतिमा) जनमांणसात निर्माण करण्याचा सतत प्रयत्न करतो कारण लोकांचं वृत्तपत्र व अवांतर वाचन नसल्यातच जमा आहे पण सोशल मीडियावर मात्र सतत ॲक्टिव्ह असतात त्यामुळे राजकीय व्यक्ती एकवेळ विकास करणार नाही पण सोशल मीडियावर नक्कीच असतो परंतु नियंत्रणाअभावी हे माध्यम कुणाचंच नाही. त्यामुळेच या माध्यमाची विश्वासार्हता अडगळीत सापडलेली आहे.तसे पहिले तर समविचारी माणसांमध्ये काहीशी आपुलकी हे माध्यम वाढवत आहे. पण त्यात आभासीपणा जास्त आहे व सत्यता कमी आहे ज्यावेळी व्यक्त होण्याचे माध्यम नव्हते तेव्हा माणसे संयमी होती त्यातील व्यक्ती म्हणजे अजितदादा पवार होय आता व्यक्त होण्याचे माध्यम मिळाल्याने माणसे काहीशी उतावीळ झालेली आहेत. हे माध्यम दुधारी तलवारीसारखे असले तरी त्याचा जसा वापर करू तसा परिणाम होत असतो.त्याचा विधायक वापर होतो की विघातक यावर काहीही आणि कुणाचेच नियंत्रण नसल्याने हे समाजासाठी व राजकारणासाठी घातक आहे हे माध्यम गतिशील असल्याने त्याची परिणामकारकता तितकीच गतिशील आहे. ज्या गतीने ते एखाद्याला उंचीवर घेऊन जाते, त्याच गतीने खाली खेचते. त्यामुळे ते आज ज्याच्या फायद्याचे असते, उद्या त्याच्या तोट्याचेही ठरू शकते.त्यामुळे सोशल मीडिया द्वारे तयार झालेले राजकारणी प्रदीर्घ काळ लोकांच्या मनावर राज्य करू शकीतील की नाही याबद्दल साशंकता आहे.

सोशल मीडियामुळे खरा समाजसेवक दूर होऊन ढोंगी राजकारणी पुढे यायला लागल्याने सर्वसामान्य लोकांच्या हातातून राजकारण निघून चाललंय असं एका पत्रकाराच विधान आहे व ते या घडीला खरं वाटायला लागलं आहे.कारण सर्वसामान्य लोकांसाठी झटणारा राजकारणी म्हणून अजितदादा पवार जनमांनसात आपली छाप सोडून गेले यामुळे सहकाराच, शेतीच, मातीच, बहुजनाच राजकारण याला फार मोठा धक्का आहे व या सोशल मीडियावर तयार झालेल्या राजकारण्यांमुळे ते भरून निघणार नाही कधीच नाही. सोशल मीडियाने अण्णा हजारेंसारख्या नेत्यांच्या आंदोलनाला मोठे स्वरूप दिले होते पण आज (पान ५ वर...)

# आर्या : वेळेच्या पलीकडचे हृदय...



लघुकथा
डॉ. विनय व. दांदळे
मो. ९८२२२ ३१७६९

रात्रीचा तिसरा प्रहर ओलांडून गेला होता. मुंबईचं आकाश निऑन दिव्यांच्या थंड उजेडात चमकत होतं. पण त्या प्रकाशाच्या मागे एक गडद, न बोललेला अंधार होता मानवतेचा, अपराधाचा आणि नियतीचा.

'सिटी हार्ट हॉस्पिटल'च्या आपत्कालीन विभागात त्या रात्री जीवन आणि मृत्यूची लढाई सुरू होती.

मॉनिटरवर हिरव्या रेषा वरखाली झर्ररकन धावत होत्या. त्या रेषांसोबतच धडधडत होतं एका लहानशा मुलीचं हृदय आर्या, वय फक्त आठ वर्षं. श्वासाच्या यंत्रांना जोडलेली ती निष्पाप मुलगी जणू स्वर्ग आणि पृथ्वीच्या सीमारेषेवर झुलत होती.

बाहेर प्रतीक्षालयात तिची आई अदिती देसाई आणि वडील विवेक देसाई बसले होते. विवेक शहरातील एक नामांकित उद्योगपती आणि एका प्रसिद्ध हॉस्पिटलचा ट्रस्टी. अदिती सौंदर्य आणि सामाजिक दर्जा दोन्ही जपणारी पण मनाने कोमल स्त्री. पण त्या रात्री त्या दोघांचं जग एका लहानशा बेडवर थांबलं होतं. ड्युटी डॉक्टरने फाईल बंद करत सांगितलं,

"आर्याचं हृदय खूप कमजोर आहे. ब्लॉकेज आहे आणि वेळ खूपच कमी आहे. आमचे मुख्य सर्जन डॉ. आर्यन मेहता यांना बोलावलं आहे. ते आले की लगेच ऑपरेशन सुरू करू." अदितीने विवेककडे नजर फिरवली. तिच्या डोळ्यांत राग आणि असहाय्यता दोन्ही होतं.

"तू म्हणाला होतास ना, सगळं कंट्रोलमध्ये आहे...? आता बघ, आपल्या मुलीचा जीव तळहातावर आला आहे...!" विवेकने हाताने कपाळ दाबलं.

"अदिती, शांत हो. डॉ. आर्यन आले की सगळं ठीक होईल." पण वेळ थांबत नव्हती. आर्याच्या श्वासांची लय मंदावत होती. नर्स धावत धावतच आली

"सर, सर , तिचं बी.पी. खूप कमी झालंय... लगेच काहीतरी करावं लागेल."

अदिती जवळपास किंचाळलीच,

"काहीही करा...! कितीही पैसे लागले तरी चालतील, डॉक्टर फक्त माझ्या आर्याला वाचवा...!"

विवेकने फोन उचलला. नंबर डायल केला.

"डॉ. आर्यन... कुठं आहात तुम्ही...?"

फोनच्या दुसऱ्या टोकाला थरथरता आवाज आला,

"मी निघालो होतो... पण मध्येच काही अडचण आली आहे." "अडचण...? अशी काय अडचण आली डॉक्टर...?" विवेक तडफडला.

"रस्त्यावर मधेच फ्लायओव्हरजवळ माझ्या गाडीचा अपघात घडवण्याचा प्रयत्न झालाय... काही गुंडांनी गाडी अडवली आहे... त्यांचं म्हणणं आहे की,

'विवेक देसाईच्या मुलीला वाचवायला जाऊ नकोस, नाहीतर तुझं आयुष्य संपवू...!'"

विवेकचा चेहरा पांढरा पडला. "काय म्हणताय तुम्ही...? कोण आहेत हे लोक...?" डॉक्टर आर्यनचा आवाज गंभीर झाला "तुमच्या जुन्या व्यवसायातील शत्रू... धनंजय सिंघानीया असं नाव घेताहेत ती गुंड... काहीतरी वैयक्तिक सूड आहे असं दिसतं. पण मी हार मानणार नाही. मी लवकरच पोहोचतो ."

त्याच क्षणी मुसळधार पाऊसही सुरू झाला.

आणि वीज कडाडली. भयंकर असा आवाज झाला.आणि त्या गोंधळात संधीचा फायदा घेत डॉक्टर आर्यनने गाडी सोडून थेट धावत रस्त्यावर निघाले. (पान ५ वर...)



# पुष्पांजली : कुटुंबासोबतच समाजासाठी समर्पित स्त्री जीवनाचे स्वकथन!



समीक्षण
डॉ. एम. आर. इंगळे
मो. 9423429060



पुष्पांजली हे पुस्तक एका धाडसी, करारी आणि संघर्षातून आपले जीवन व्यतीत करणाऱ्या आणि कुटुंबाला घडवितांना सामाजिक जाणिवेचे भान राखून जगणाऱ्या दिवंगत पुष्पाबाई वासनिक यांच्या जीवनाचे स्वकथन आहे. या स्वकथनाला शब्दांकित केले आहे दिवंगत पुष्पाबाई वासनिक यांचे सुपुत्र डॉ. के. पी. वासनिक यांनी, जे नवी दिल्ली येथून भारत सरकारच्या कृषि मंत्रालयातून अतिरिक्त आयुक्त म्हणून सेवानिवृत्त झालेले आहेत. डॉ. के.पी.वासनिक यांची यापूर्वी १८ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यांनी विविध उच्च पदांवर कार्य केलेले आहे. पुष्पांजली या पुस्तकाचे वाचन केल्यानंतर असे जाणवले की, या पुस्तकातील व्यक्तिरेखा पुष्पाबाई वासनिक यांचे जीवन आजच्या काळातही समाजाला प्रेरणादायी आहे.

**ग्रंथाची मांडणी :** पुष्पांजली संघर्षमय जीवनाची प्रेरक कहाणी हा ग्रंथ आराध्या प्रकाशन, नागपूर यांनी प्रकाशित केला असून मुखपृष्ठ सीवली ग्राफिक्स आणि मुद्रण वंश क्रिएशन यांनी केले आहे. या ग्रंथाची प्रस्तावना डॉ.अनिल सुर्या जे नामवंत लेखक, गीतकार, चिंतक, विचारवंत आणि कवी आहेत त्यांनी अत्यंत समर्पक शब्दात मांडली असून अर्पणपत्रिका लिहितांना डॉ. के. पी.वासनिक यांनी जे शेवटचे वाक्य लिहिले की, "आई कधीही मरत नाही; ती आठवणींमध्ये, संस्कारात आणि आपल्या श्वासात सदैव जिवंत असते." ते हृदयाला भिडून गेले आणि सहजच मराठीतील प्रसिद्ध कवी यशवंत दिनकर पेंढरकर यांनी आपल्या आई कवितेत लिहिलेल्या, "स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी" ही सुप्रसिद्ध ओळ आठवली. पुष्पांजली संघर्षमय जीवनाची प्रेरक कहाणी या ग्रंथात एकूण ४५ प्रकरणे असून ती दिवंगत पुष्पाबाई वासनिक यांचे स्वकथन आणि आमची आदरांजली या दोन भागात विभागलेली आहेत.

**ग्रंथातील भावस्पर्शी व प्रेरक अंतरंग :** १) कौटुंबिक पार्श्वभूमी: या ग्रंथात दिवंगत पुष्पाबाई वासनिक यांच्या स्वकथनामध्ये पहिल्या बारा प्रकरणात त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी मांडली आहे. त्यात त्यांचे आजोळ नागो वानखेडे आणि वडील दशरथ वानखेडे यांच्या कुटुंबाची माहिती असून त्यांच्या आई सारजाबाई ह्या कष्ट, करुणा आणि सहनशीलतेची मूर्ती होत्या आणि त्यामुळे नकळत या संस्काराची रुजवण आमच्यात कशी होत गेली यांचे प्रभावी वर्णन आहे. त्या काळात म्हणजे १९४५ मध्ये सरकारने प्राथमिक शिक्षणाची पायाभरणी सुरू केली होती. त्यामुळे बऱ्याच गावात शाळा नव्हत्या, पण त्यांच्या गोसे बुजरूक येथे समाजातील श्रीमती पोहरा मेश्राम यांनी आपल्या गावासाठी स्वतःच्या घराजवळच एक लहानशी शाळा उभी केली होती. तेव्हा पुष्पाबाईंनी वयाच्या सातव्या वर्षी शाळेच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवले पण सहा महिन्यातच त्यांना आपले शिक्षण सोडून द्यावे लागले होते. मात्र त्यांच्या मनात शिक्षणाची ओढ असल्यामुळे पुढे त्यांनी प्रौढ शिक्षण वर्गात जाऊन कसे लिहिणे वाचणे शिकले याचा अनुभव तसेच लग्न व त्यातील रूढी परंपरा यांचे वर्णन केले आहे. त्या काळात असलेल्या सामाजिक व आर्थिक परिस्थीचे चटके समाजाला कसे सहन करावे लागत, त्यामुळे आपले सासरे फत्तुजी वासनिक यांनी धानला गावावरून नागपूरला स्थलांतर करण्याचा घेतलेला निर्णय कुटुंबाच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी किती महत्त्वाचा होता याबद्दलचे कथनही त्यांनी केले आहे.

**२) सामाजिक योगदान :** पुष्पाबाईंचे सामाजिक योगदान जातीय भेदभावाविरुद्ध लढा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती व धार्मिक आणि सामाजिक कार्याचा उलगडा ग्रंथाच्या पुढील सात प्रकरणात गुंफला आहे. त्यामध्ये दिवंगत पुष्पाबाई ह्या लग्नानंतर धानला गावात आल्यानंतर त्यांनी ठरवले होते की, "लोकांमध्ये आपुलकी, मैत्री आणि करुणेने राहायचं" त्यांचं सासर थोडं सधन होते म्हणून समाजातील लोकं त्यांच्याकडे अडीअडचणीत मदत मागायला, कौटुंबिक अचडणी सांगायला येत. तेव्हा त्या मदत करत, भांडणात मध्यस्थी करत. त्यातली एक आठवण फार महत्त्वाची आहे. कारण त्या काळात समाजात शिक्षणाचे प्रमाण नगण्य होते. अशा परिस्थितीत समाजातील एखाद्याचा मुलगा मॅट्रिक होणे अभिमानाची बाब समजली जायची. असाच एक मुलगा मॅट्रिक पास झाला होता, त्याला औरंगाबाद येथे पुढील शिक्षणासाठी जायचं होत. पण पैशाची अडचण असल्यामुळे मुलाची आई सोनं घेऊन पुष्पाबाई कडे आल्या आणि म्हणाल्या ताई हे सोनं ठेवा पण मुलाच्या शिक्षणासाठी पैसे द्या. तेव्हा पुष्पाबाई त्या स्त्रीला म्हणाल्या तुझं सोनं तुझ्याजवळ ठेव मी पैसे देते मुलाला शिक्षणासाठी औरंगाबाला जाऊ दे. या मदतीमुळे त्या मुलाचे आयुष्य घडले, याबद्दल आपल्या मदतीचे सार्थक झाल्याचं समाधान मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. दिवंगत पुष्पाबाईंनी अनेकांना मदत तर केलीच पण स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात म्हणून भिशी काढणे तसेच समाजात जागृती व्हावी, समाजाने जुन्या रूढी सोडून द्याव्या, त्यांच्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची रुजवण व्हावी म्हणून दर पौर्णिमेला आणि तथागत बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला कार्यक्रम साजरे करणे, बुद्धविहार उभे करण्यासाठी पुढाकार घेणे इत्यादी कार्य करून आपली सामाजिक बांधिलकी जपून समाज सेवा केली, बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर ठाम राहून कार्य केलं त्याचं समाधान त्यांनी व्यक्त केलं. त्याकाळात जातीवाद होता, त्यामुळे सहसा इतर समाजातील लोकं तत्कालीन महार जातीच्या लोकांना पिण्यासाठी पाणी देत नव्हते आणि काहीजण द्यायचे तर ग्लासात न देता वेगळ्या भांड्यात देऊन अपमानित करत असत. दिवंगत पुष्पाबाई यांनी सन्मानाने पाणी पिण्यासाठी संघर्ष केला. प्रतिष्ठेचा आणि समानतेचा लढा दिला. समाजातील रूढी परंपरा झुगारून स्वाभिमानाचे जीवन जगण्यासाठी पुढाकार घेऊन समाजात जागृती केली.

**३) १९९१ नंतरच्या आयुष्याचा नवा प्रवास :** १९ जानेवारी, १९९१ रोजी पुष्पाबाई यांचे यजमान प्रल्हाद वासनिक यांचे निधन झाल्यानंतर त्या धानल्यातच राहत होत्या. मात्र त्यांचा मोठा मुलगा कृपाकर म्हणजे डॉ. के.पी.वासनिक जेव्हा १९९३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वर्ग १ चे अधिकारी झाले आणि त्यांची पोस्टिंग नागपूरला झाली. तेव्हा काही दिवसांनी पुष्पाबाई नागपूरला आल्या. इथून त्यांच्या नवीन जीवन प्रवासाला प्रारंभ झाला. नंतर डॉ.के.पी.वासनिक युपीएससी मार्फत उच्च पदावर दिल्ली येथे रुजू झाले. त्यांनी आपल्या आईला दिल्ली येथे वास्तव्यास नेले. त्यांनी आपल्या आई पुष्पाबाई यांना अनेक ठिकाणी फिरायला नेले, त्यामुळे पुष्पाबाईंनी धानला ते अंदमान आणि महाराष्ट्र व देशातील प्रसिद्ध व प्रेक्षणीय स्थळांचा पर्यटक म्हणून प्रवास केल्याचे आणि अविस्मरणीय आठवणींचे वर्णन पुस्तकात मांडले आहे, ते वाचून आपणही त्या स्थळांना भेटी दिल्यासारखे वाटते.

**४) कृतार्थ जीवन संघर्षाला भावभिनी आदरांजली :** पुष्पाबाईंनी कष्ट व संघर्ष करत, सामाजिक कार्यात अग्रेसर राहून समाजाची सेवा करत, जातीय भेदभावाविरुद्ध आवाज उठवत, जुन्या नव्या विचारांची शिदोरी सोबत घेत, कुटुंबाचा भक्कम आधार होऊन मुलांना उच्च शिक्षण देऊन मोठमोठ्या पदांवर जाण्यासाठी कष्ट करून त्यांना प्रेरणा देत, रूढी, परंपरांचा ठाम प्रतिकार करत, पतीच्या निधनानंतर न खचता कुटुंबाचा भक्कम आधार होत, स्वप्नवत वाटावा असा पर्यटन प्रवास करत एक कृतार्थ जीवन जगत वयाच्या ८६ व्या वर्षी २७ डिसेंबर, २०२४ रोजी या जगाचा निरोप घेतला. त्यांचा त्याग व संघर्षमय जीवनामुळे ज्या पिढ्यांना चांगलं जीवन मिळालं, मोठमोठी पदे भूषविण्याचा सन्मान मिळाला, आनंदी, सुखी, समाधानी जीवन जगण्याचा मार्ग मिळाला अशा त्यांच्या तीन पिढ्यांनी "आमची आदरांजली" या भागातील १९ प्रकरणात आपल्या माऊलीप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता व स्नेह म्हणजे त्यांना शब्दसुमनांनी वाहिलेली भावभिनी आदरांजलीपर मनोगते होत. या मनोगतांनी पुष्पाबाईंच्या जीवनाचे सार्थक झाल्याचे आणि त्यामुळे या ग्रंथाची उंची वाढली असल्याची जाणीव वाचकांना झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून हा ग्रंथ वाचनीय तर आहेच पण अनुकरणीय सुद्धा आहे. समस्त स्त्रियांनी आणि विशेषत: ज्या स्त्रिया फक्त गाडी, बंगला व आपलं छोटं कुटुंब यासाठीच जीवन जगण्यात धन्यता मानतात त्या स्त्रियांनी या ग्रंथाच्या नायिका दिवंगत पुष्पाबाई वासनिक यांच्या जीवनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन त्यांनी जसे आपले जीवन कुटुंब व समाजासाठी समर्पित केले तसेच जीवन जगण्याचा संकल्प करून कुटुंबासोबत समाजाच्या उत्थानासाठी सामाजिक क्रांतीच्या लढ्याला गतिमान करण्यासाठी सक्रिय योगदान द्यावे हीच अपेक्षा. पुष्पांजली या चरित्रमय ग्रंथाचे समीक्षण करण्याची संधी डॉ. के.पी.वासनिक यांनी मला दिली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो आणि ग्रंथाच्या नायिका दिवंगत पुष्पाबाईंच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करतो. जयभीम, जयबुद्ध, जयभारत...!

# सोशल मीडियाद्वारे तयार झालेला राजकारणी...

अण्णा हजारें कुठे आहेत ?त्यामुळे सोशल मीडिया जेवढा प्रभावी तेवढा तरुणांना भरकटवणाराही आहे आताच्या काळात सोशल मीडियावर असणे ही काळाची गरज बनली असली तरी वाचन शून्य असल्यामुळे घातक आहे अर्थात फक्त तरुणच नाही तर सगळ्याच वयोगटातील माणसे सोशल मीडियाचा वापर करताना दिसतात. तुम्ही सोशल मीडियावर नसाल तर तुमचा वर्तमानाशी संबंध तुटेल हा काहींचा भ्रम आहे.ते समाजाशी जोडण्याचे माध्यम असू शकते पण ते चिरकाल टिकणारे नाही हे सुद्धा तपासून पाहावे लागेल खासकरून तरुनांणी याबाबींकडे गांभीर्याने बघितलं पाहिजे कारण त्यांचं भविष्य त्यावर अवलंबून आहे कारण सोशल मीडिया हे लोकांपर्यंत पोहोचण्याचे माध्यम आहे, पण लोकप्रियतेचे अंतिम व्यासपीठ केवळ काम हेच असू शकते जे अजितदादा सारख्या व्यक्तीने महाराष्ट्राला दाखवून दिले.

# आर्या वेळेच्या पलीकडचं हृदय....

त्या मुसळधार पावसात भिजत, थकलेले, पण एका मुलीचं आयुष्य वाचवायचं म्हणून जिद्दीने पुढे धावत चालले होते.
पाठीमागून दोन बाईकवरचे माणसं त्यांचा पाठलाग करत होती.
फ्लायओव्हरखाली त्यांनी आर्यनला घेरलं.
धक्काबुक्की झाली. एका गुंडाने त्यांना जमिनीवर ढकललं. पण आर्यन उठले, आणि पुन्हा त्यांना चकमा देऊन धावायला लागलेत. चेहरा रक्ताळलेला, तरी डोळ्यात फक्त एकच आशेची आणि कर्तव्याची ठिणगी
''ती मुलगी वाचली पाहिजे.'' ''तिला माझं आयुष्य द्यावं लागलं तरी देईन,''
असं पुटपुटत ते पावसातून झगडत हॉस्पिटलकडे धावत निघाले. इकडे हॉस्पिटलमध्ये तोपर्यंत आर्याच्या मॉनिटरवरची हिरवी रेषा थांबली होती.
बीप... बीप... आणि मग लांबचा, थरकाप उडवणारा आवाज
बीईईईईईप...! अदिती धावत जाऊन आर्याला कवेत घेत होती.
''आर्या... आर्या ,,, उठ बाळा... बघ ना, आई आली आहे बघ...!''
आर्याला कवेत घेऊन ती ओक्साबोक्सी रडत होती.
त्या वेळी धाडकन दरवाजा ढकलत, पावसात ओले झालेले, चेहऱ्यावर वेदनांचा आणि निर्धाराचा प्रकाश घेऊन डॉ. आर्यन आत आले.
''लेट्स स्टार्ट...! तिचं हृदय जरी थांबलंय,
पण मेंदू जिवंत आहे. आपण पूर्णपणे प्रयत्न करायचा...!''
सगळी टीम आधीच सज्ज होती, ऑपरेशन थिएटरमध्ये ऑपरेशन सुरू झालं. बाहेर विवेक आणि अदिती एकमेकांच्या कुशीत रडत बसले. वेळ जणू थांबली होती. प्रत्येक मिनिट प्रायश्चित्ताचं वजन घेऊन ओघळत होता.
आज आर्या तिच्या आजोबा बरोबर घरच्या परिसरातील गार्डन मध्ये खेळत होती. खेळता खेळता अचानक धावताना ती पडली आणि नंतर ती उठलीच नाही . सगळे नोकरचाकर धावलेत आणि तिला उचलून गाडीत टाकलं आणि हॉस्पिटलमध्ये आणलं. विवेक आणि आदिती ही सोबतच होते .
दोन तासांच्या प्रतिक्षेनंतर ऑपरेशन थिएटरचा दरवाजा उघडला.
डॉ. आर्यन बाहेर आले. चेहऱ्यावर थकवा होता, पण डोळ्यांत एक सौम्य सकारात्मक आत्मविश्वास आणि प्रकाश.
''ती... ती , परत आली आहे. आता तिच्यावरचा धोका टळलाय .''
अदिती देवाच्या मूर्तीसमोर हात जोडून रडत होती. विवेक सुटकेचा श्वास घेत होता. पण डॉक्टर आर्यन पुढे म्हणाले,
''विवेक... मला एक गोष्ट सांगायची आहे.''
''काय...?'' विवेकने थरथरत विचारलं.
डॉक्टर थोडं शांत झाले. ''तुम्हाला पंधरा वर्षांपूर्वीचं काही घडलेलं।आठवतं का...? 'ग्लोबल केअर हॉस्पिटल' मध्ये तुम्ही ट्रस्टी होता.''
विवेक चकित झाले. ''हो, पण त्याचा या इथे आणि या क्षणी काय संबंध...?''
डॉक्टरच्या नजरेत वेदना होत्या.
''त्या हॉस्पिटलमध्ये माझी बहीण सिया मेहता नर्स म्हणून काम करत होती. गरीब घरातली पण प्रामाणिक आणि आपल्या कर्तव्याप्रती समर्पित होती. तिच्यावर एक भयंकर आरोप ठेवला गेला होता त्यावेळी की तिच्या गर्भातील बाळाचे वडील तुम्ही आहात म्हणून...''
अदितीचा चेहरा पांढरा फटक पडला आणि ती फटकाऱ्याने म्हणाली.
''काय...? हे खोटं आहे ....खोटं आहे ना विवेक...?''
विवेक गोंधळून गेला.
''मी... मी काही चुकीचं केलं नव्हतं, अदिती...! ती सगळं अफवा होती. पण त्या अफवांनी माझं आणि हॉस्पिटलचं नाव बुडेल , खराब होईल , प्रतिष्ठा जाईल म्हणून मी... मी तिला नोकरीतून काढलं.''
आर्यनचा आवाज कडक झाला.
''तुम्ही फक्त नोकरीतून काढलं नाही, तर तिच्या जीवावर उठला होता विवेक...! त्या रात्री हॉस्पिटलच्या स्टोअर रूममध्ये तिला बंद करून ठेवण्यात आलं, जेणेकरून ती पोलिसात तक्रार करू शकणार नाही. परंतु तेथून ती कशीबशी पळाली... पण त्या घटनेनी तिचं आयुष्य उद्ध्वस्त झालं.''
विवेकचा श्वास अडकला.
''मी... मला माहित नव्हतं की असं काही घडलं.''
''माहित नव्हतं...?'' आर्यनने संतापाने म्हटलं.
''ती जेव्हा पळाली तेव्हा ती गर्भवती होती. आणि त्या बाळाचा जन्म झाल्यानंतर प्रसूतीदरम्यान तीचं निधन झालं. मी तिच्या मृत्यूपूर्वी दिलेलं वचन पाळलं की मी त्या बाळाला वाढवेन.''
अदितीने रडत विचारलं,
''म्हणजे... ते बाळ म्हणजे...?''
आर्यनने तिच्या डोळ्यांत पाहत उत्तर दिलं
'' हो ते बाळ म्हणजे ... ती... तीच आर्या.''
संपूर्ण खोली थरारली. विवेकच्या हातून फाईल खाली पडली.
''आर्या... म्हणजे माझीच मुलगी...?''
''हो,'' आर्यन म्हणाले. ''नियतीचं चक्र कधी कधी असं फिरतं. तुम्ही ज्याचं आयुष्य हिरावून घेतलंत, तेच बाळ आज तुमचं हृदय बनून जगतं आहे.''

विवेकच मन त्याही परिस्थितीत भूतकाळाचा प्रवास करायला लागलं.
पंधरा वर्षांपूर्वीचं दृश्य त्याच्या डोळ्यासमोर जिवंत उभं झालं.
त्या वेळी विवेक आणि अदिती दोघेही प्रतिष्ठित , समाजात नावारुपास आलेले होते. आणि एक नामांकित हॉस्पिटलचे दोघेही ट्रस्टी होते.
त्या काळात सिया नर्स म्हणून त्याच्या त्या हॉस्पिटलमध्ये काम करत होती गरीब, पण अत्यंत प्रामाणिक.
एका रात्री विवेकच्या एका मित्राने अफवा पसरवली की, विवेक आणि सियामध्ये ''जवळीक'' आहे. ती अफवा समाजात वेगाने पसरली.
हॉस्पिटलच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह आलं. विवेकने घाबरून सियाला तातडीने कामावरून काढलं. ती गर्भवती होती पण कोणाचं मूल आहे, हे कोणी विचारायलाही तयार नव्हतं.
विवेकच्या माणसांनी तिच्या मागे लागून तिला धमकावलं,
''तू तोंड उघडलंस तर संपवू तुला.''
ती पळून गेली. तिच्या पोटातलं बाळ म्हणजे आर्या वाचली.
प्रसूतीदरम्यान सिया मरण पावली, पण तिच्या शेवटच्या क्षणी ती म्हणाली,
''भाऊ, माझ्या मुलीला तू जप... तिला मोठं कर...तिचं नाव आर्या ठेव.''
आर्यनने ती मुलगी बालगृहात ठेवली आणि स्वतः परदेशात शिक्षणासाठी गेला. पण नियतीने तिथेही खेळ खेळला. त्या बालगृहात शॉर्टसर्किटने आग लागली. अनेक मुलं मरण पावली.
आर्या मात्र चमत्काराने वाचली. तिला दुसऱ्या दत्तक संस्थेकडे पाठवण्यात आलं. त्याच संस्थेत काही वर्षांनी विवेक आणि अदिती आले कारण त्यांना मूल होत नव्हतं., अदितीला प्रत्येक प्रेग्नन्सीमध्ये गर्भपात होत होता. त्यामुळे विवेक आतून तुटला होता. म्हणून त्यांनी एक बाळ दत्तक घेण्याचे ठरविले. त्यांनी आर्याला पाहिलं आणि त्यांना ती प्रथमदर्शनीच आवडली म्हणून तिला दत्तक घेतलं. कोणालाही माहीत नव्हतं तीच मुलगी त्यांच्या भूतकाळाचा प्रायश्चित्त घेऊन परत आली आहे.
आज या क्षणी वर्तमानात आर्या आता रुग्णालयात झोपलेली होती. तिच्या हातावर मॉनिटरचा हिरवा प्रकाश टिक-टिक करत होता पडत होता जणू नियतीचं हृदय धडधडत होतं. अदिती रडत होती. ''आपण तिला जन्म दिला नाही, पण तिनं आपल्याला माणूस बनवलं.''
विवेकने हात जोडले. ''मी तिला हरवलं होतं, पण ती परत आली... वेळेच्या पलीकडून.'' डॉ. आर्यनने खिडकीतून सकाळचा प्रकाश पाहिला.
सूर्यकिरण पावसाच्या थेंबांत चमकत होते.
ते म्हणाले ''हृदय विकत मिळत नाही. ते फक्त प्रेमानं धडधडतं. आणि आर्या म्हणजे त्या प्रेमाचं रूप आहे जी काळाच्या पलीकडून आली, एक पाप धुण्यासाठी.'' बाहेर आकाश स्वच्छ झालं होतं, पण ढग अजूनही रडत होते जणू कालच्या अपराधांची राख धुवायला आलेले.
आर्या झोपेत कुजबुजली,
''आई...''अदिती तिचा हात धरून म्हणाली,
''हो ग बाळा, आई आहे तुझ्याजवळच... कायमची.''
आणि त्या क्षणी, एक निष्पाप हृदय वेळेच्या पलीकडे जाऊन माणुसकीला पुन्हा जिवंत करून गेलं.
''आर्या वेळेच्या पलीकडचं हृदय'' ही केवळ एका मुलीची कथा नाही, तर अपराध, प्रायश्चित्त आणि प्रेमाचं धडधडणारं रूप आहे.

# ओळख पक्ष्यांची : चष्मेवाला



चित्रातील पक्षी हा भारतीय पांढऱ्या डोळ्याचा (झोस्टेरॉप्स पॅल्पेब्रोसस) आहे. हा एक लहान, सक्रिय पक्षी आहे जो त्याच्या डोळ्यांभोवती असलेल्या विशिष्ट पांढऱ्या पंखांच्या वलयासाठी ओळखला जातो. या प्रजातीमध्ये सामान्यतः ऑलिव्ह-हिरव्या रंगाचा वरचा भाग आणि चमकदार पिवळा घसा आणि छाती असते. ते भारतीय उपखंड आणि आग्नेय आशियातील खुल्या जंगलात, बागांमध्ये आणि खारफुटीच्या जंगलात सामान्य रहिवासी आहेत. हे सामाजिक पक्षी बहुतेकदा लहान कळपांमध्ये प्रवास करतात, अमृत, फळे आणि लहान कीटकांसाठी चारा शोधतात.

(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)

# तमन्नाचा 'रागिनी एमएमएस ३' अडचणीत?



तमन्ना भाटिया मुख्य भूमिकेत असलेल्या एकता कपूरच्या 'रागिनी एमएमएस ३' या चित्रपटाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. २०२५ मध्ये तमन्ना या फ्रँचायझीच्या तिसऱ्या भागात झळकणार असल्याची घोषणा होताच चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र, चित्रपटाचे शूटिंग सुरू होण्याआधीच तो अडचणीत सापडल्याची माहिती मिळत आहे.'रागिनी एमएमएस ३'चे दिग्दर्शन साहिर रजा करणार होते. मात्र, आता त्यांना प्रकल्पातून वगळण्यात आले आहे. साहिर रजा सध्या नेटफ्लिक्सवरील एका मालिकेत शो-रनर म्हणून कार्यरत आहेत. स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मच्या नव्या नियमांनुसार शो-रनरने दररोज सेटवर उपस्थित राहणे आवश्यक असल्याने 'रागिनी एमएमएस ३'च्या शूटिंगवर त्याचा परिणाम झाला. या कारणामुळे निर्मात्यांनी रजांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे.एकता कपूर या चित्रपटात पारंपरिक हॉरर-एरोटिका शैलीपासून दूर जात अधिक सुपरनॅचरल घटकांवर भर देण्याच्या तयारीत आहेत.'रागिनी एमएमएस'ची सुरुवात २०११ मध्ये राजकुमार राव आणि काइनाज मोटिवाला यांच्या चित्रपटातून झाली. त्यानंतर २०१४ मध्ये सनी लिओनीचा 'रागिनी एमएमएस २' प्रदर्शित झाला. यातील 'बेबी डॉल' हे गाणे प्रचंड गाजले होते. दरम्यान, तमन्ना आगामी काळात सिद्धार्थ मल्होत्रासोबतचा 'व्हॅन', तसेच मुंबईचे माजी पोलिस आयुक्त राकेश मारिया यांच्या बायोपिकमध्ये दिसणार आहे.


# केवायसी

'' हॅलो सोहमचे पप्पा, कुठी हा तुमी.''
'' आलो ना बॅंकेत आताच.''
'' काळले काय मंग पैसे.''
'' थाबनं जरा. दम तं घे. आताच तं आलो.''
'' तुमाले पयलेच म्हनो. लवकर काळा म्हनून.''
'' तुले तं वाटते मी निरा रिकामाच हाव मी.''
'' तसं नाई . पन पर्वावर लगन आलं ना.''
'' तुले काय वाटते . तुलेच कायजी हाये सगळी .''
'' बयनीचं लगन म्हटल्यावर कायजी रायनारच हाये .''
'' तुले तं म्हनो, घिऊन टाक्याले लाव तुया भावाले.''
'' बिना पैस्येईचं कसं म्हनाव त्याले आपून .''
'' जाता बरोबर ठेवलेच असते ना त्याच्या हातावर .''
'' त्याचच तं त्याले पळलं .मोठे गेले हातावर ठेवणारे .''
'' मी तं म्हनो , पाच सात हजारात अटप म्हनून .''
'' हाव. कायतं. बयनीचं लगन हाये ना माल्या.''
'' मंग येवळा खर्च केलाच पायजे काय ?''
'' झालं ना आता . शेवटचच तं हाये .''
'' किती लोग होईल आंदन . सांग पटकन .''
'' दाहा - पंधरा लोगू तं घ्याच लागन .''
'' डोक्स्यावर काई केसं ठेवतं की नाई माल्या..''
'' एकुलत्या एक सायीसाठी येवळा विचार''
'' अन् अहीर तं रायलाच जोळ्याचा त्यात .''
'' दाहाक हजार ते पकळा. तीसक काळा .''
'' पुस्तकात ठेवतं की नाई काही शिल्लक''
'' कापसाच्या दोन गाळ्या इकल्याना . झालेई काय .''
'' दोन दिवसात शिऊन होतील कपळे ? ''
'' आठ दिवस झाले शिऊन तयार हायेत .''

विंध्यान
चंद्रशेखर अ. महाजन
९६२३२३८०९६

'' बाप्पा . म्हनजे मले तं काहीच ठावूक नाही .''
'' तुमाले मयन्यापासून म्हनून रायली होती..पन् तुमी?''
'' मंग कसं केलं तुया ते तं सांग .''
'' तुमच्या पसंदनं घ्या बाबाले.पैसे सांगजा फक्त.''
'' मंग आंदनाचही तसच करती तं''
'' ऊस गोळ लागला तं काय मुयासकट खाव''
''जाऊ दे. करू दे बरं मले विड्रॉल लवकर.नंबर आला.''
'' पैसे काळून लवकर या घरी. पटकन निंगू .''
'' सायेब, हं घ्या बरं स्लिप. द्या बरं विड्रॉल .''
'' आधार कार्ड आहे का सोबत ?
'' हाव . हाये ना . हे काय . हे पा .''
'' मला नका दाखवू हो. ते फॉर्म ला लावा लागते .''
'' म्हनजे . मले नाई समजलं .''
'' आधी केवायसी करा लागते. मगच विड्रॉल मिळनार.''
'' असं कसं काय.. ऐन वक्तावर केवायसी .''
'' तो सिस्टीमचा भाग आहे भाऊ .ती कराच लागते.''
'' मंग त्याले काय करा लागते आता .''
'' दोन नंबर कऊंटर वरून फॉर्म घ्या व भरा पटकन.''
'' त्याले काय काय लावा लागते मंग.''
'' आधारकार्ड अन् फोटो. अर्ध्या तासात द्या.''
'' फोटो तं नाही हो सायेब , मंग कसं ?''
'' मग काढून घ्या. आधी केवायसी करा मगच विड्रॉल.''
'' हॅलोसोहम ची मम्मी.. घोरच झाला ना वं सगळा .''
'' काय झालं आता..? कॅश सरली की काय..?''
''नाई.केवायसी करा लागते पयले.मंगच विड्रॉल म्हनते.''
'' करा न मंग लवकर . या घरी पटकन .''
'' फारम भरा लागते..आधार कार्ड अन् फोटो पायजे.''
'' भराना मंग . कायची वाट पाहून रायले..''
'' अर्धाच घंटा रायला बॅंक बंद होयले ,काय करू..''
'' मी एक घंटा देतो तुमाले.आले तं ठिक. नाही तं ..''
'' ऑ.. घेन्न व्वं !''

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 307



रजस्वला
रमजान
वरमाय
समशेर
सवलत

**पाच अक्षरी**
अजरामर
अवलोकन
अंतरपाट
कवटाळणे
डळमळीत
नरकपाल

नावाजलेला
परिचारिका
पुनर्विवाह
रोमहर्षक
समजदार

**सहा अक्षरी**
अहमहमिका
सिंहावलोकन

**अन्य अक्षरी**
अथक परिश्रम
नरोवाकुंजरोवा
(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्दः–**

**दोन अक्षरी**
कल, काक, कात, काम, कुंती, खवा, गत, गीत, चाम, जस्त, जास्त, तमा, तर, तव, धूर, नाव, पाव, बला, मका, मस, माला, याग, रथ, रण, राधा, लक, वाय, शस्त्र, सर, सिंह

**तीन अक्षरी**
हर्ष, हल, हाल, हेर, श्रम, उधार, अंतरा, कनव, कपात, कमाई, कमाल, गणेश, जतन, जनक, जबर, जवान, टणक, डालडा, नवरा, नायक, पावन, पोंगल, बावटा, महती, मिरगी, यातना, रवाना, राजस्व, रोमन, लकवा, लावण्य, वाकडा, सतत, सवड, सालस, साहस


**चार अक्षरी**
अहवाल, कलरव, कलेवर, कष्टसाध्य, कसरत, खडाष्टक, खकारणे, जमानत, नातलग, पुण्यवान

मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 688



**–: आडवी विधाने :–**

1) भारतातील पहिली महिला राज्यपाल
5) जळते लाकूड
6) दिवाळीमध्ये नरक चतुर्दशीला पहाटे उठून करावयाचे स्नान
9) जर चा सोबती
10) रयत, जनता
11) मुस्लिमांनी केलेली अल्लाची प्रार्थना
14) मूल्य, भाव, प्रत्येक
16) यज्ञाच्या शेवटी सर्व देवतांना अर्पण करण्यात येणारी आहूती
18) बेबंदशाही, राजाचे नियंत्रण नसलेल्या देशाची होणारी स्थिती
20) थंडी, गारवा, सौम्यपणा
22) वृक्षाच्याभोवती बांधलेला ओटा
23) चिमटा, घट्ट धरुन ठेवण्याचे हत्यार
25) महिना
26) पातक, अपराध
27) शीतलता
30) एक ऋतु
32) दाट, निबीड, मेघ
33) कलंक, बट्टा
34) सौभाग्यवती स्त्रीने कपाळभर लावलेले कुंकू
37) अनेक पायांचा एक जीवाणू, दोष, खुबी
38) याप्रमाणे असलेला
39) डोंगरावरील वळणदार रस्ता
41) तबल्याचा सोबती
42) शिजवून पातळ केलेली डाळ
43) महिन्याकाठी मिळणारे वेतन
44) आपला सुंदर पिसारा फूलवून थुयथुय नाचणारा एक पक्षी
45) मोठा हातोडा
46) महिरप
48) लोक, जनता
50) शंकराचे एक नाव, मोडके तोडके घर
52) साधु, स्वच्छंदी माणूस
54) चांदणे, व्याकरण ग्रंथ
55) महात्मा गांधीजींचा आश्रम असलेले सेवाग्राम महाराष्ट्रातील या जिल्ह्यात आहे.
56) कोरड्या अन्नाचा शिधा वाटणारी संस्था
58) प्रखर, जहाल, तीक्ष्ण
59) सावत्र
60) उत्पत्ती, निर्माण
61) आवृत्ती, जपाची पुनरावृत्ती
63) चांगले वाईट, सारासार
67) विश्वासघात
69) कान व डोळे यामधील जागा
70) दृष्ट लागू नये म्हणून लहान मुलाच्या गालावर लावलेला काजळाचा ठिपका
72) द्रव पदार्थ मोजण्याचे एक परिमाण
75) तप करण्याची जागा
78) कलिंगड
80) गवाक्षातून येणारी प्रकाशाची तिरीप
81) पैसा
82) एखाद्या कृत्याबद्दल व्यक्त केलेला आनंद आणि संबंधित व्यक्तिचे केले जाणारे कौतुक
85) कचेरीची जागा, मजलस
86) चुलता 87) पूर्णपणे भरलेले
88) निर्लज्जपणाची चेष्टा, महाराष्ट्रातील एक लोकनृत्य प्रकार

**–: उभी विधाने:–**

1) सोशीक, सहन करणारा
2) योग्य, नीती
3) त्रिभुवनात भ्रमण करणारा देवलोकीचा एक देवर्षी
4) स्त्रियांचे एक कर्णभूषण
5) देवी अंबाबाईचे महाराष्ट्रातील एक जागृत देवस्थान
6) बकरी, शेळी
7) स्त्रियांनी केसात माळावयाची फुलांची वेणी
8) विश्वासघात करणारा (हिं)
10) चिन्ह, निशाण
12) बुद्धिकौशल्याने प्रतिपक्षाला जिंकणे
13) फराळ करुन पाणी पिणे
15) युद्धातील एक अग्रणी वाहन
17) माकडाचे ओरडणे
19) संग्रह, संचय
21) ज्वर, उष्णता
22) वेणू, अलगुजा
24) लाकडी डाव, करवंटीचे पात्र
28) आडदांडपणाने केलेले कार्य
29) बिदागी देऊन केलेली रवानगी
31) पालन पोषण, सांभाळ
32) गळा, नरडे 35) नवरदेव
36) कठीण, कडक, निबर
37) सायंकाळी गायी घरी येण्याची वेळ, ही घटिका लग्नासाठी फार मंगलकारक समजल्या जाते.
38) अष्टमीचा चंद्र, गचांडी, हाकलून देणे
39) गरमीमुळे अंगावर उठणारे पूरळ
40) टिंगल, उपहास
45) कुलीन 47) आईची बहिण
49) वसुंधरेची जीवनदायी जलवाहिनी
51) काही मुदतीपर्यंत न बोलण्याचा नियम, गप्प राहणे
52) वाढता (दिवस)
53) कापणे 55) अंगिकारलेले व्रत
57) जंगलाचे संरक्षण करणारा
58) बाण, शर
61) वाफेने चालणारे जहाज 62) नृत्याची देवता
63) त्या काळचे, निकडीचे
64) माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळातून स्त्रवणारा द्रव
65) मुख, तोंड
66) दंगल, मोठा हल्लकल्लोळ
68) खाट किंवा पलंग यांच्या चौकटीच्या लाकडांपैकी एक
69) कावळ्याचे ओरडणे
71) फळावरची साल
73) पृष्ठभागावरचा लहानसा तुकडा
74) सदोदित रडणारा
76) पायाच्यामागचा मांसल भाग
77) असंख्य, अनगणित, अमर्याद
79) वस्तुचा तळ 82) आठ (सं.)
83) एक श्वास रोग
84) धुंदी, कैफ (उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# वाळू माफियांचा एसडीओ चव्हाण यांच्यावर हल्ला

**महत्त्वाचे**

## समुपदेशन कक्षाचे उद्घाटन



**बुलढाणा:** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा येथे आज दुपारी २.०० वाजता समुपदेशन कक्षाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एन. रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या हस्ते कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.
नवीन समुपदेशन कक्षाच्या माध्यमातून न्यायालयात प्रलंबित असलेले कौटुंबिक वाद तसेच इतर दिवाणी प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यास मदत होणार आहे. यामुळे न्यायप्रक्रियेला गती मिळून संबंधित पक्षांना सुलभ, वेगवान व सौहार्दपूर्ण मार्गाने न्याय मिळण्यास हातभार लागेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.
या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक निलेश तांबे, वकिल संघाचे अध्यक्ष विजय सावळे, सर्व न्यायाधीश, डॉ. लता बाहेकर, विधीज्ञ तसेच न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.
कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव. नितीन एन. पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कुही : दि. १२ :**बेकायदेशीर वाळू वाहतुकीवर कारवाई करत असताना उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण यांच्या सरकारी वाहनाला ट्रकने धडक देत हल्ला केल्याची धक्कादायक घटना उमरेड-भिवापूर मार्गावर घडली. सरकारी कर्तव्य बजावत असलेल्या अधिकाऱ्यावरच हल्ला झाल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी उमरेड पोलिसांनी रजत दिलीप रोहणकर. (२९, रा. खरबी, नागपूर) याला अटक केली असून दुसरा आरोपी तुषार धावडे (३०, रा. खरबी, नागपूर) हा फरार आहे.
पोलिसांच्या माहितीनुसार, बुधवारी (ता.११) दुपारी विद्यासागर चव्हाण. हे सरकारी वाहनातून भिवापूरकडे जात होते. उमरेड-भिवापूर मार्गावर त्यांना वाळूने भरलेला .४० .९४०५ या



नंबरचा
ट्रक संशयास्पदरीत्या जाताना दिसला. तपासणीसाठी ट्रक थांबवण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वेग कमी न करता सरकारी वाहनालाच जोरदारत्याचबरोबर याचा व ट्रक अंगावर घालण्याचा प्रयत्न करुन घटनास्थळावरून पळ काढला.
उमरेड पोलीस ने जप्त करण्यात आलेला विनापरवाना ट्रकवर आणी विना नंबर क्रेटा कारवाई गरजेची
घटनेदरम्यान ट्रक आणि सरकारी वाहनाच्या दरम्यान विना नंबरची क्रेटा गाडी ट्रकला बचाव करत असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणात तुषार धावडे हा क्रेटा चालक फरार असून त्याचा शोध सुरू आहे. पोलिसांनी ट्रक क्रमांक एमएच ४० सीटी ९४०५ जप्त केला आहे.

> शासकीय कामात अडथळा आणून अधिकाऱ्यांवर हल्ले करणाऱ्या माफियांची गय केली जाणार नाही. अवैध वाहतूक आणि माफिया राज विरोधात प्रशासन आता अधिक ताकदीने आणि आक्रमकपणे मैदानात उतरेल. अशा भ्याड हल्ल्यांनी आमचे मनोधैर्य खचणार नाही, तर उलट आम्ही अधिक कठोर कारवाई करू. कायद्याचा धाक निर्माण करून या सर्व प्रवृत्तींचा बीमोड करणे, हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.''
>
> **-बुद्धभूषण निकाळजे**

सुदैवाने या हल्ल्यात विद्यासागर चव्हाण बचावले. आरोपींविरुद्ध सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला केल्याप्रकरणी बीएनएसच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिस अधीक्षक डॉ. हर्ष पोद्दार. यांनी लिहेपर्यंत पुढील कारवाई सुरू होती.
घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक धनाजी जळक यांच्या पोलीस पथकाने तारणा शिवारात पळून जाणारा ट्रक अडवून चालक रजत दिलीप रोहणकरक याला अटक करण्यात आली. त्याचबरोबर ट्रक चा शोध घेण्यासाठी निघालेल्या नायब तहसीलदार बुद्धभुषन निकाळजे. ग्राम महसूल अधिकारी अविनाश जाधव यांच्या महसूल पथकाला तारणा ते आंबोली या रस्त्यावर् सदर ट्रकने खाली केलेली १० ते १२ ब्रास रेतीचा साठा सापडला. सदर साठा मोका पंचनामा करून जप्त करण्यात आला अनि पुढील कारवाई होईपर्यंत उमरेड पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आला.

## काजळेश्वरमध्ये माकडांचा हैदोस; ग्रामस्थांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**काजळेश्वर : दि. १२ :** कारंजा तालुक्यातील काजळेश्वर गावात गेल्या अनेक महिन्यांपासून माकडांच्या टोळक्याने प्रचंड उच्छाद मांडला असून, आता ही माकडे थेट ग्रामस्थांवर हल्ले करत असल्याच्या घटना समोर येत आहेत. या वाढत्या उपद्रवामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, वनविभागाने या वानरांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी समर्पित युवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. हर्षल पवार यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.काजळेश्वरमध्ये सध्या २५ ते ३० माकडांचे टोळके वास्तव्यास असून, घरांच्या छतांवरून उड्या मारताना टिनपत्र्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. माकडांना हाकलण्याचा प्रयत्न केल्यास ती अंगावर धावून येतात. या हल्ल्यांत काही ग्रामस्थ जखमी झाले असून, लहान मुले आणि वृद्ध घराबाहेर पडण्यास घाबरत आहेत. वारंवार होणाऱ्या या नुकसानीमुळे आणि धोक्यामुळे ग्रामस्थ हवालदिल झाले आहेत.
नागरिकांची सुरक्षा आणि मालमत्तेचे होणारे नुकसान टाळण्यासाठी वनविभागाने या माकडांना जेरबंद करून नैसर्गिक अधिवासात सोडावे, अशी विनंती डॉ. हर्षल पवार यांनी ११ फेब्रुवारी रोजी वनविभागाला दिलेल्या लेखी निवेदनात केली आहे. या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र पाठपुरावा करण्याचा इशाराही फाउंडेशनच्या वतीने देण्यात आला आहे.

> गावात माकडांचा हैदोस वाढला असून काही नागरिक जखमी झाले आहेत. ग्रामस्थांचे संरक्षण व्हावे आणि घरांचे नुकसान थांबावे, यासाठी वनविभागाने या टोळक्याचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी आम्ही प्रत्यक्ष भेटीद्वारे केली आहे.
>
> **डॉ. हर्षल पवार, (अध्यक्ष, समर्पित युवा फाउंडेशन, काजळेश्वर)**

## इंस्टाग्रामवरून ओळख; अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**भिवापूर :** भिसी (ता. चिमूर, जि. चंद्रपूर) येथील अल्पवयीन पीडितेशी पुण्यातील अनिकेत डाहाके (वय २४, रा. अंतरगाव, ता. समुद्रपूर, जि. वर्धा) याने इंस्टाग्रामवर मैत्री करून लग्नाचे आमिष दाखविल्याचा प्रकार उघड झाला आहे. पीडितेच्या अज्ञानाचा फायदा घेत आरोपीने तिला भिवापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हॉटेल अर्णव गोल्ड ओयो लॉज येथे नेऊन वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले. या संबंधांमधून पीडितेला गर्भधारणा झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तिच्या तक्रारीवरून भिवापूर पोलीस ठाण्यात बुधवारी (ता.११) गुन्हा नोंद करण्यात आला. पोलीस ठाणे भिसी व भिवापूर यांनी संयुक्त मोहीम राबवून आरोपीला तात्काळ ताब्यात घेतले. न्यायालयात हजर केले असता आरोपीस तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या मार्गदर्शनाखाली व भिवापूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन उरकुडे करीत आहेत.

## दोन दिवसांपासून पाणीपुरवठा खंडित; नागरिकांचा संताप



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भिवापूर: दि. १२:** नगरपंचायतींतर्गत प्रभाग क्र. ३ मध्ये मागील दोन दिवसांपासून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा बंद असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. उन्हाळ्याची चाहूल लागण्यापूर्वीच पाणीटंचाईची समस्या निर्माण झाल्याने पुढील काळात परिस्थिती अधिक बिकट होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.
स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पाणीपुरवठा खंडित झाल्यानंतरही नगरपंचायतीकडून कोणतीही तातडीची पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे ज्या भागात समस्या निर्माण झाली आहे, त्याच वार्डात नगराध्यक्षा वास्तव्यास असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. नगराध्यक्षांनी स्वतःच्या घरासाठी टँकरद्वारे पाण्याची सोय केल्याची चर्चा असून, मात्र सर्वसामान्य नागरिकांसाठी अशी कोणतीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.नागरिक नियमितपणे पाणीपुरवठा कर भरत असताना, पुरवठा खंडित झाल्यास पर्यायी व्यवस्था करणे ही नगरपंचायतीची जबाबदारी नाही काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे. तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत करावा किंवा तोपर्यंत टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी वार्डातील नागरिकांकडून होत आहे.

> प्रभाग ३ व ४ मध्ये पाण्याची टंचाई असल्याने टॅकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.माझे घर रोडलगत असल्याने टॅकर मागे जाऊ शकत नाही.म्हणून रस्त्यावर उभा करून मागील कुटुंबांना पाणी दिले जाते.यामागे कोणताही वैयक्तिक स्वार्थ नाही.काहींकडून होत असलेला अपप्रचार निराधार आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सहकार्य करावे.
>
> **-सुषमा श्रीरामे, नगराध्यक्ष नगरपंचायत भिवापूर.**

## अमरावती एक्सप्रेसमधील स्लीपर डबे आता पूर्णत: आरक्षित

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अमरावती: दि. १२ :**प्रवाशांच्या सोयी-सुविधांचा विचार रून मध्य रेल्वेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ट्रेन क्रमां १२११९/१२१२० अमरावती-अजनी-अमरावती एक्सप्रेसमधील स्लीपर श्रेणीचे डबे यापुढे पूर्णत: आरक्षित स्वरूपात चालविण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे अनारक्षित प्रवाशांची गर्दी टाळण्यास मदत होणार असून नियमित प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.
या गाडीतील वातानुलित (एसी) डबे सध्या बंद (लॉ) ठेवण्यात येतील. याशिवाय, स्लीपर श्रेणीतून प्रवास रण्यासाठी ेवळ वैध आरक्षित तिीट असलेल्या प्रवाशांनाच प्रवेश देण्यात येणार आहे. यापूर्वी ाही वेळा स्लीपर डब्यांमध्ये अनारक्षित प्रवाशांची गर्दी होत असल्याच्या तक्रारी होत्या. त्यामुळे आरक्षित तिीट असलेल्या प्रवाशांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे अधिाऱ्यांनी स्पष्ट ेले.
स्लीपर श्रेणीसाठी तिीट बिंग सेवा निश्चित होताच ती तातळ प्रभावाने आरक्षण प्रणालीद्वारे उपलब्ध रून देण्यात येणार आहे. प्रवासी सर्व पीआरएस (क्ष्ठ्ठह्यद्गठ्ठद्दद्गह्य् क द्रह्यद्गह्म१ड्ड ह्लद्वशठ्ठ स्४ह्यह्लद्गद्ध) ाउंटरवर तसेच आयआरसीटीसीच्या अधिृत संेतस्थळावरून स्लीपर तिीटांची आगाऊ नोंदणी रू शतील. त्यामुळे प्रवाशांना नियोजनपूर्व प्रवास रणे सुलभ होणार आहे.
ही नवी व्यवस्था दिनां १४ फ ेब्रुवारी २०२६ पासून लागू होणार असून सर्व पीआरएस ेंद्रांवरून स्लीपर श्रेणीचे आरक्षण उपलब्ध राहील. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना प्रवास सुरू रण्यापूर्वी वैध आरक्षण असल्याची खात्री रून घेण्याचे आवाहन ेले आहे. तसेच तिीट तपासणीदरम्यान अडचणी टाळण्यासाठी नियमांचे पालन रावे, असेही सूचित रण्यात आले आहे. या निर्णयामुळे स्लीपर डब्यांमधील प्रवास अधि सुरक्षित, सुव्यवस्थित आणि आरामदायी होईल, असा विश्वास रेल्वे अधिाऱ्यांनी व्यक्त ेला आहे.
विशेषत: रोजंदारी ामानिमित्त िंवा शैक्षणि ारणांमुळे या मार्गावर नियमित प्रवास रणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा लाभ होण्याची शक्यता आहे. गर्दीमुळे होणारा गोंधळ, जागेवरील वाद आणि अनधिृत प्रवास यावर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने हा उपाय महत्त्वाचा ठरणार आहे.
दरम्यान, प्रवाशांनी ेवळ अधिृत माध्यमांतूनच तिीटे आरक्षित रावीत आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही रेल्वे प्रशासनाने ेले आहे. आगामी ाळात प्रवाशांच्या प्रतिसादानुसार इतर गाड्यांमध्येही अशा प्रारची व्यवस्था लागू रण्याबाबत विचार ेला जाऊ शतो, अशी माहिती सूत्रांनी दिली.

## खामगावात अपर जिल्हाधिकारी तर लाखनवाड्यात अपर तहसील कार्यालय मंजूर

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**खामगाव : दि. १२ :** खामगाव व परिसरातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. खामगाव येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय तसेच लाखनवाडा येथे अपर तहसील कार्यालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. कामगार मंत्री ना. आकाशदादा फुंडकर यांनी यासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. जिल्ह्यातील महसूल प्रशासनावर वाढत चाललेला कामाचा ताण, तालुक्यांचा मोठा भौगोलिक विस्तार, वाढती लोकसंख्या तसेच नागरिकांना शासकीय कामांसाठी वारंवार जिल्हा व तालुका मुख्यालयात जावे लागण्याची गैरसोय लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रशासन अधिक सक्षम, प्रभावी आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने ही पावले उचलण्यात आली आहेत.अपर जिल्हाधिकारी कार्यालयांच्या निर्मितीसाठी शासनाने काही निकष निश्चित केले होते. त्यामध्ये तालुक्यांची संख्या, लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रफळ, दुर्गम व आदिवासी भागांची उपस्थिती, जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावरील कामकाजाचा व्याप यांचा विचार करण्यात आला. या निकषांच्या आधारे खामगावची निवड करण्यात आली आहे.
नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू झाल्यानंतर महसूल वसुली, जमाबंदी, जमीन सुधारणा कायदे, अपील प्रकरणे, गौण खनिज विषयक कामे आदी प्रकरणांचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. निर्णयप्रक्रिया अधिक वेगवान होऊन प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली काढता येणार आहेत. परिणामी नागरिकांना शासकीय दालनांमध्ये वारंवार हेलपाटे मारावे लागणार नाहीत.राज्यात एकूण ११ नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालयांना मंजुरी देण्यात आली आहे. अमरावती विभागात खामगाव, अचलपूर आणि पुसद येथे, नागपूर विभागात १, कोकण विभागात २, संभाजीनगर विभागात १, पुणे विभागात ३ तर नाशिक विभागात १ अशा कार्यालयांचा समावेश आहे. यासोबतच राज्यात ६९ अपर तहसील कार्यालयांची निर्मिती करण्यात येणार असून त्यामध्ये खामगाव तालुक्यातील लाखनवाडा कार्यालयाचाही समावेश आहे.लाखनवाडा, साखरखेर्डा आणि डोणगाव येथे अपर तहसील कार्यालयांची निर्मिती झाल्याने महसूलविषयक कामे स्थानिक पातळीवरच पूर्ण होऊ शकतील. सातबारा उतारे, वारस नोंद, जमीन मोजणी, विविध दाखले आदी कामांसाठी नागरिकांना दूरवर जावे लागणार नाही. ग्रामीण व घाटाखालील भागातील नागरिकांना याचा विशेष लाभ होणार आहे. खामगाव येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय प्रस्तावित झाल्याने बुलढाणा जिल्ह्याच्या प्रशासकीय कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होणार असून विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयाबद्दल नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून ना. आकाशदादा फुंडकर यांच्या प्रयत्नांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## उमरखेड आगाराची बस पलटी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पुसद : दि. १२ :** अनसिंग-पुसद मार्गावरील सापळी फाटा येथे बुधवारी (दि.११) दुपारी ३:३० वाजता उमरखेड आगाराची बस चालकाचे नियंत्रण सुटल्याने पलटी झाली. शेगाववरून उमरखेडकडे जाणाऱ्या या बसमधील प्रवाशांना स्थानिक नागरिकांनी तातडीने बाहेर काढल्यामुळे मोठी जीवितहानी टळली आहे.उमरखेड आगाराची बस (एमएच १४ बीटी ४३६२) शेगाव येथून अकोला, वाशीम, पुसद मार्गे उमरखेडला जात होती. सापळी फाटा परिसरात पोहोचताच चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस रस्त्याच्या कडेला उलटली. अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले.

**CHANGE IN NAME**
I have changed my name from
MOHD. TAUSIF MOHD. HABEEB to MOHAMMAD TAUSIF MOHAMMAD HABEEB
Address :- R/o Near Qureshi Masjid, Juni Basti, Murtizapur, Tq. Murtizapur, Dist. Akola

**CHANGE IN NAME**
I have changed my name from RAZIYA KHATUN SAMSHER KHAN to RAZIYA BI MOHAMMAD HABIB
Address :- R/o Nalsabpura, Juni Basti, Murtizapur, Tq. Murtizapur, Dist. Akola

**CHANGE IN NAME**
PASSPORT NO
J8891974
FILE NO
NGPZ05098611
OLD NAME
NAZEMA BEGUM
NEW NAME
NAZEMA BEGUM MOHAMMAD HANIF RANGARI
ADDRESS
RANGARI MOHALLA, NEAR ANJUMAN SCHOOL, BALAPUR, DIST AKOLA MAHARASHTRA – 444001

**CHANGE IN NAME**
PASSPORT NO
R5383820
FILE NO
NG1061509873817
OLD NAME
ALMAS TABASSUM
NEW NAME
ALMAS TABASSUM NAJMUDDIN RANGARI
ADDRESS
BADA MOMINPURA, ANJUMAN ROAD, BALAPUR, DIST AKOLA MAHARASHTRA – 444001

**CHANGE IN NAME**
PASSPORT NO
J8891974
FILE NO
NGPZ05098611
OLD NAME
MOHAMMAD HANIF
NEW NAME
MOHAMMAD HANIF SABUDDIN RANGARI
ADDRESS
RANGARI MOHALLA, NEAR ANJUMAN SCHOOL, BALAPUR, DIST AKOLA MAHARASHTRA – 444001

**CHANGE IN NAME**
PASSPORT NO
R5383820
FILE NO
NG1061509873817
OLD NAME
NAJMODDIN RANGARI
NEW NAME
NAJMUDDIN SABUDDIN RANGARI
ADDRESS
BADA MOMINPURA, ANJUMAN ROAD, BALAPUR, DIST AKOLA MAHARASHTRA – 444001

**CHANGE IN NAME**
PASSPORT NO
R5383820
FILE NO
NG1061509873817
OLD NAME
MOHAMMAD FAIZ
NEW NAME
MOHAMMAD FAIZ NAJMUDDIN RANGARI
ADDRESS
BADA MOMINPURA, ANJUMAN ROAD, BALAPUR, DIST AKOLA MAHARASHTRA – 444001

# जिल्हा परिषद विभागीय क्रीडा व सांस्कृतिक महाकुंभ

## खेळाडूंच्या पथसंचालनात आकर्षक देखाव्यांचा सामाजिक संदेश

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**बुलढाणा दि. १२ :** जिल्हा क्रीडा संकुल येथे आजपासून सुरू झालेल्या तीन दिवसीय जिल्हा परिषद विभागीय क्रीडा व सांस्कृतिक महाकुंभाच्या पहिल्या दिवशी उद्घाटन समारंभास उपस्थित असलेल्या मान्यवरांना मानवंदना देण्यासाठी सहभागी खेळाडूंच्या पथकांनी केलेले पथसंचलन सामाजिक संदेशाच्या आकर्षक देखाव्यांनी लक्षवेधक ठरले.
अकोला, बुलढाणा, वाशिम, अमरावती व यवतमाळ या जिल्हा परिषद मधील सुमारे ११५० खेळाडूंनी आपल्या पथसंचालनात विविध सामाजिक आशयाधारित विषयांवर अनुरूप वेशभूषा, रंगभूषा, संगीत व संवाद या माध्यमातून केलेले सादरीकरण उपस्थितांच्या मनाचा ठाव घेणारे ठरले.
जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते शानदार उद्घाटन समारंभ पार पडल्यानंतर पाच ही जिल्ह्यांच्या सहभागी स्पर्धकांनी उपस्थितांना मानवंदना दिली.
सर्वप्रथम जिल्हा परिषद अकोल्याच्या सहभागी खेळाडू स्पर्धकांनी आपल्या पथसंचालनात लोककलांचा जागर केला. महाराष्ट्रातील विविध भौगोलिक क्षेत्रात लोकप्रिय असलेल्या कीर्तन, पोवाडा, भारुड, लावणी, कोळी नृत्य, वारली नृत्य, वाघ्या मुरळी इत्यादी वैविध्यपूर्ण लोककलांचे सादरीकरण या चमूने उपस्थितांसमोर केले. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीशी जुळलेली या लोककलांची नाळ या माध्यमातून अधोरेखित करण्यास अकोला जिल्हा परिषदेची चमू यशस्वी ठरली.
महाराष्ट्राची मायबोली असलेल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा मिळालेला दर्जा लक्षात घेता शासनाचे आभार व्यक्त करण्यासोबतच मराठी भाषेचे साहित्याचे व संस्कृतीचे संवर्धन झाले पाहिजेत. त्यासाठी मराठी शाळांची आवश्यकता व भूमिका सादर करणारे प्रदर्शन बुलढाणा जिल्हा परिषदेच्या चमूने केले.
अमरावती जिल्हा परिषदेने श्री संत गजानन महाराजांची भूमी असलेल्या बुलढाणा जिल्ह्यात होत असलेल्या या विभागीय महोत्सवाच्या अनुषंगाने अमरावती ते बुलढाणा ही संत श्री गजाननाची शेगावीची वारी काढली. वारकरी संप्रदाय , वारीची परंपरा यासोबतच श्रीक्षेत्र शेगाव येथील संत गजानन महाराज संस्थांच्या वतीने सर्व स्तरातील यात्रेकरूंसाठी उपलब्ध विनामूल्य अन्नछत्र, यात्रेकरू निवास, सेवाधारी वृत्ती, स्वच्छता व स्वयंशिस्त इत्यादी विविध गुणवैशिष्ट्ये दर्शविणारे प्रासंगिक सादर केले.हे सगळे अनुभवत असतांना मान्यवरांचा मंच देखील नतमस्तक झाला. उपस्थितांनी हात जोडुन गजानन महाराजांना अभिवादन केले.
मन के जीते जीत है, मन के हारे हार।
हार गए जो बिन लड़े। उन पर है धिक्कार ।। हा ज्वाज्वल्य मराठी अभिमान व स्वाभिमान दर्शविणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज व कवी कलश यांच्यातील संवादाचा तसेच त्याग व बलिदानाचा ऐतिहासिक देखावा वाशिमच्या जिल्हा परिषद चमुनी सादर केला.
सामाजिक विषमतेचे विदारक दृश्य दर्शवित संत गाडगेबाबांचा भुकेल्याला अन्न द्या हा संदेश रुजविणारी भुकेची कहाणी अतिशय संवेदनशीलतेने जिल्हा परिषद यवतमाळच्या चमूने सादर केली. या अतिशय संवेदनशील व हृदयस्पर्शी सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा पणावल्या.पाच ही जिल्ह्यांच्या संघांनी सादर केलेल्या या आकर्षक व सामाजिक संदेश देणाऱ्या देखाव्यांमुळे उद्घाटन समारंभाचे पथसंचलन आकर्षक, लक्षवेधक व हृदयस्पर्शी ठरले.

# लंकन वाघांची गर्जना!

## ओमानवर १०५ धावांनी मिळविला 'महाविजय'

**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**



यजमान श्रीलंकेने टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये आपला दबदबा निर्माण करत ओमानवर १०५ धावांनी ऐतिहासिक विजय नोंदवला आहे. पल्लेकलेच्या मैदानावर श्रीलंकेच्या फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडत ओमानच्या गोलंदाजांना हतबल केले. श्रीलंकेने उभारलेल्या २२५ धावांच्या डोंगरासमोर ओमानचा संघ केवळ १२० धावांपर्यंतच मजल मारू शकला. या विजयासह श्रीलंकेने गुणतालिकेत मोठी झेप घेत सुपर-८ मधील आपले स्थान जवळपास निश्चित केले आहे.नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या श्रीलंकेची सुरुवात काहीशी खराब झाली होती. दोन्ही सलामीवीर स्वस्तात बाद झाल्यानंतर अनुभवी कुसल मेंडिस (६१ धावा) आणि पवन रत्नायके यांनी डावाची सूत्रे हाती घेतली. पवनने अवघ्या २८ चेंडूत ८ चौकार आणि १ षटकारासह ६० धावांची तुफानी खेळी केली. माजी कर्णधार दासुन शनाकाने मैदानावर येताच ओमानच्या गोलंदाजांची धुलाई केली. त्याने केवळ १९ चेंडूत अर्धशतक पूर्ण करत २० चेंडूत ५० धावा (२ चौकार, ५ षटकार) कुटल्या. या फटकेबाजीमुळे श्रीलंकेने २० षटकांत २२५ धावांचे विशाल लक्ष्य उभे केले. प्रत्युत्तरात २२६ धावांच्या कठीण लक्षाचा पाठलाग करताना ओमानची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. कर्णधार जतिंदर सिंग केवळ १ धाव करून तंबूत परतला. श्रीलंकेच्या अचूक माऱ्यासमोर ओमानचा एकही फलंदाज फार काळ तग धरू शकला नाही. संपूर्ण संघ अपयशी ठरत असताना मोहम्मद नदीमने एका बाजूने किल्ला लढवला. त्याने ५६ चेंडूत ५३ धावा करत आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले अर्धशतक साजरे केले.

श्रीलंकेकडून दुष्मंथा चमीरा आणि महेश तीक्ष्णा यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या, तर वेलाल्गे, कुसल मेंडिस आणि दुशान हेमंता यांनी १-१ विकेट्स घेत ओमानला ९ बाद १२० धावांत रोखले.सलग दुसऱ्या विजयामुळे श्रीलंकेचा आत्मविश्वास उंचावला असून त्यांच्या नेट रनरेटमध्येही प्रचंड सुधारणा झाली आहे. दुसरीकडे, सलग दोन पराभवांमुळे ओमानचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले असून त्यांचे सुपर-८ मध्ये पोहोचण्याचे स्वप्न धुळीस मिळाले आहे.

### कॅरेबियन वादळाचा इंग्लंडला तडाखा



**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**

शेरफेन रुदरफोर्डची नाबाद ७६ धावांची वादळी खेळी आणि फिरकीपटू गुडाकेश मोटीचा (३/३२) भेदक मारा यांच्या जोरावर वेस्ट इंडिजने टी-२० विश्वचषकाच्या गट 'क'मधील अटीतटीच्या सामन्यात इंग्लंडला ३० धावांनी धूळ चारली. बुधवारी वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात विंडीजने फलंदाजी आणि गोलंदाजी अशा दोन्ही आघाड्यांवर वर्चस्व राखत इंग्लंडला जेरीस आणले. विंडीजने २० षटकांत ६ बाद १९६ धावा फटकावल्यानंतर इंग्लंडला सर्वबाद १६६ धावांवर समाधान मानावे लागले.रुदरफोर्डने खऱ्या अर्थाने 'कॅरेबियन फ्लेव्हर' दाखवत वानखेडेवर उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. त्याने अवघ्या ४२ चेंडूंत ५ षटकार आणि २ चौकारांसह नाबाद ७६ धावांची आतषबाजी केली. त्यानंतर धावांचा पाठलाग करताना इंग्लंडच्या फलंदाजांना गुडाकेश मोटीच्या फिरकीने चांगलेच जाळ्यात अडकवले. खेळपट्टीवर मिळणाऱ्या 'ग्रीप'चा अचूक फायदा घेत विंडीजच्या फिरकीपटूंनी इंग्लंडच्या धावगतीला लगाम घातला.१९७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. ठरावीक अंतराने विकेटस् पडत गेल्याने इंग्लंडचा डाव १९ षटकांत अवघ्या १६६ धावांवर आटोपला. इंग्लंडकडून सॅम करणने सर्वाधिक नाबाद ४३ धावा केल्या; परंतु तो संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला.

महत्त्वाचे

### पाकिस्तानी फिरकीपटूच्या ॲक्शनवरून वाद!

**नवी दिल्ली :** १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या भारत-पाकिस्तान हाय-व्होल्टेज सामन्यापूर्वी मैदानाबाहेरील वाकयुद्ध रंगू लागले आहे. पाकिस्तानचा नवा फिरकीपटू उस्मान तारिक याच्या गोलंदाजीच्या विचित्र शैलीवरून सध्या क्रिकेट विश्वात दोन गट पडले आहेत. अनेक माजी खेळाडूंनी या ॲक्शनवर आक्षेप घेतला असताना, भारताचा अनुभवी फिरकीपटू रविचंद्रन अश्विन मात्र पाकिस्तानच्या या खेळाडूच्या समर्थनार्थ धावून आला आहे.उस्मान तारिक चेंडू रिलीज करण्यापूर्वी क्षणभर थांबतो , ज्यामुळे फलंदाजाची एकाग्रता भंग पावते. माजी भारतीय क्रिकेटपटू श्रीवत्स गोस्वामी यांनी यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. ''फुटबॉलमध्ये पेनल्टी घेताना मध्येच थांबण्याची परवानगी नाही, मग क्रिकेटमध्ये चेंडू टाकण्यापूर्वी असं थांबणं कसं काय स्वीकारलं जाऊ शकतं? हे क्रिकेटमध्ये चालू शकत नाही,'' असे गोस्वामी यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले होते.

### नामिबियाच्या कर्णधाराने केले गंभीर आरोप!

**मुंबई:** नामिबियाचा कर्णधार गेरहार्ड इरास्मस प्रशिक्षण सत्रांवर: नामिबिया क्रिकेट संघाचा कर्णधार गेरहार्ड इरास्मस यांनी बुधवार, ११ फब्रुवारी रोजी भारताविरुद्धच्या टी विश्वचषक २०२६ सामन्यापूर्वी रात्रीच्या प्रशिक्षण सत्राचे नियोजन न केल्याबद्दल आयोजकांवर टीका केली. संघाने सोमवार, ९ फेब्रुवारी रोजी नेदरलँड्सविरुद्ध एक दिवसाचा सामना खेळला आणि पुढील दोन दिवसांचे त्यांचे दोन्ही प्रशिक्षण सत्र दिवसाच्या प्रकाशात झाले. दुसरीकडे, भारताने सामन्यापूर्वी रात्री दोनदा प्रशिक्षण घेतले.गेरहार्ड इरास्मस म्हणाला, ''हो, या सामन्यापूर्वी आमचे रात्रीचे प्रशिक्षण सत्र झाले नाही, मला माहित नाही का. मला वाटते की भारताचे दोन रात्रीचे प्रशिक्षण सत्र आहेत आणि मी आता कॅनडामध्ये रात्रीचे प्रशिक्षण घेण्याचा विचार करत आहे, म्हणून तुम्ही जसे इच्छिता तसे त्याचा अर्थ लावा, परंतु आम्ही फक्त येऊन आमच्या नामिबियन पद्धतीने, म्हणजे लढण्यासाठी येऊ.'

## दुसऱ्या देशासाठी खेळलेले ५ खेळाडू आता टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये




**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्ड कप २०२६ विषयी तुम्ही रोज वेगवेगळ्या बातम्या वाचतात. यामध्ये कोण जिंकलं-कोण हरलं, सामनावीर वगैरे वगैरे. पण, आज आम्ही तुम्हाला एक अशी खास माहिती देणार आहोत, की जी या विश्वचषकात थोडी वेगळी आहे. आज आम्ही अशा ५ खेळाडूंविषयी माहिती देणार आहोत, जे २०२६ टी-२० विश्वचषकात खेळत आहेत, परंतु यापूर्वी आयसीसी स्पर्धेत दुसऱ्या देशासाठी खेळले आहेत. टी-२० वर्ल्ड कप २०२६ चा पहिला आठवडा चांगला सुरू आहे. अनेक छोट्या संघांनी दमदार कामगिरी करत विश्वविजेत्यांना चकित केले आहे. यावेळी २० देश या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत असे अनेक खेळाडू आहेत जे प्रथमच आयसीसी स्पर्धा खेळत आहेत. त्याच वेळी, असे काही खेळाडू आहेत जे यापूर्वी दुसऱ्या देशासाठी आयसीसी स्पर्धा खेळले आहेत आणि या स्पर्धेत दुसऱ्या देशासाठी खेळत आहेत. एक खेळाडूही भारतीय वंशाचा आहे. हा खेळाडू भारताकडून अंडर-१९ वर्ल्ड कपमध्ये खेळला आहे. चला तर मग जाणून घेऊया अशा ५ खेळाडू जे २०२६ टी-२० विश्वचषकात खेळत आहेत, परंतु यापूर्वी आयसीसी स्पर्धेत दुसऱ्या देशासाठी खेळले आहेत.या यादीत नेदरलँड्सचा अष्टपैलू खेळाडू रोलोफ वान डेर मर्वेचे नाव मोठे आहे. कारकिर्दीच्या सुरुवातीलाच दक्षिण आफ्रिकेकडून खेळून त्याने स्वत:चे नाव कमावले. २००० च्या अखेरीस त्याने दक्षिण आफ्रिकेकडून २६ सामने खेळले. रॉयलॉफने २००९ चॅम्पियन्स ट्रॉफी आणि २००९, २०१० टी-२० विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेचे प्रतिनिधित्व केले.२००९ च्या टी-२० विश्वचषकात त्याचा संघ उपांत्य फेरीपर्यंत पोहोचला होता. यानंतर, त्याने नेदरलँड्सकडून खेळण्यास सुरुवात केली आणि शेवटच्या चार टी-२० विश्वचषक (२०२६ सह) आणि २०२३ एकदिवसीय विश्वचषकात नेदरलँड्सकडून खेळला आहे.

अमेरिकेचा वेगवान गोलंदाज एहसान आदिलने सध्याच्या स्पर्धेत पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात अमेरिकेकडून पदार्पण केले. ३२ वर्षीय हा खेळाडू २०१० च्या दशकाच्या सुरुवातीला पाकिस्तानकडून खेळला होता. त्याने पाकिस्तानकडून कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये एकूण ९ सामने खेळले आहेत.

### अनाया बांगर थायलंडमध्ये करणार नवी सर्जरी

**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**

माजी क्रिकेटपटू संजय बांगर यांचा मुलगा आर्यन बांगर आता अनाया बांगर म्हणून ओळखला जातो. अनाया बांगरने आता तिच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे, ती १४ मार्च रोजी बँकॉकमध्ये करणार आहे. अनायाने ही माहिती एका व्हिडिओमार्फत शेअर केली. अनायाने सांगितले की या शस्त्रक्रियेमुळे तिच्यासारख्या अनेक



ट्रान्सजेंडरना कन्फर्मटेबल वाटण्यास मदत होते. तिने इंस्टाग्रामवर याबद्दल पोस्ट करून तिच्या निर्णयाचे स्पष्टीकरण दिले आहे.तिने या निर्णयाबद्दल सविस्तरपणे सांगितले की हा अचानक किंवा भावनिक निर्णय नव्हता, तर अनेक वर्षांच्या सुव्यवस्थित आणि वैद्यकीयदृष्ट्या मार्गदर्शन केलेल्या प्रक्रियेचा परिणाम होता. अनायाच्या मते, गेल्या अनेक वर्षांपासून तिने या टप्प्यावर पोहोचण्यासाठी मानसिक मूल्यांकन, नियमित थेरपी, हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी (), व्यापक वैद्यकीय मूल्यांकन आणि दोन पूर्वीच्या शस्त्रक्रिया पार पाडून इथवर आली. प्रत्येक टप्पा कायदेशीर चौकटीत आणि वैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात आला.अनायाने स्पष्ट केले की तिची शस्त्रक्रिया बँकॉकमधील प्रसिद्ध सर्जन डॉ. चेट्टावुत यांच्याकडून केली जाईल आणि ही एक स्किन ग्राफ्ट वॅजिनोप्लास्टी प्रक्रिया असेल.

## आयसीसीने नबीच्या खिशाला लावली कात्री

**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**



टी-२० वर्ल्ड कपमध्ये अफगाणिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झालेल्या सामन्यात कल्पनेपलिकडचा थरार रंगला. दोन सुपर ओव्हरपर्यंत गेलेल्या या लढतीत अखेर दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानला रोखत नाट्यमय विजय मिळवला. मात्र या पराभवानंतर अफगाणिस्तानचा अष्टपैलू मोहम्मद नबी याच्यावर आयसीसीने दंडात्मक कारवाई केली आहे.अफगाणिस्तानचा अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नबी याच्यावर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं सामना शुल्काच्या १५ टक्के रक्कम कपात करण्याचा दंड ठोठावला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मधील ड सामन्यात आयसीसी आचारसंहितेच्या लेव्हल १ नियमांचे उल्लंघन केल्यामुळे त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली. नबी याने आयसीसीच्या खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसंदर्भातील आचारसंहितेतील कलम २.४ चे उल्लंघन केले. आंतरराष्ट्रीय सामन्यात पंचांच्या सूचनांचे पालन न करणे, असा या कलमाचा संबंध आहे.दोन सुपर ओव्हरच्या थरार पाहायला मिळण्याआधी अफगाणिस्तानच्या डावातील १४व्या षटकात मैदानात उतरल्यावर मोहम्मद नबी अंपायरसोबत हुज्जत घालताना दिसला होता. दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज लुंगी एन्गिडी दोन्ही हातांना रिस्ट बँड ( ) घालून गोलंदाजी करत होता. नबीने यावर नाराजी व्यक्त करताना पंचांशी वाद घातल्याचे पाहायला मिळाले होते. नबीच्या आक्षेपानंतर पंचांनी दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजाला गोलंदाजी करत असलेल्या हातातील व्हाइट रिस्ट बँड काढून गोलंदाजी करण्याच्या सूचना केल्या. त्यानेही पंचाचे ऐकले. हे सगळं घडण्याआधी नबीचं मैदानातील पंचाशी केलेले वर्तन हे अयोग्य होते.

# अमेरिकेच्या कृषी उत्पादनांना भारतात प्रवेश बंदी

## भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय अंतरिम व्यापार करारावर शिक्कामोर्तब

**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**



भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने शनिवारी एका ऐतिहासिक अंतरिम व्यापार करारावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या नवीन करारामुळे दोन्ही देशांमधील आयात-निर्यात शुल्क मोठ्या प्रमाणावर कमी होणार असून, ग्राहकांना याचा थेट फायदा मिळणार आहे.

अमेरिकेने भारतावरील आयात कर पूर्वीच्या ५० टक्क्यांवरून थेट १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची घोषणा केली आहे. करारानुसार भारत सर्व अमेरिकन औद्योगिक वस्तू, सोयाबीन तेल, काजू, ताजे व प्रक्रिया केलेले अन्न, वाइन आणि स्पिरिट्स यांसारख्या उत्पादनांवरील कर पूर्णपणे काढून टाकेल किंवा कमी करेल.जनावरांच्या चाऱ्यासाठी लागणारी लाल ज्वारी आणि सुक्या धान्यावरील कर कमी केल्यामुळे कृषी व्यापाराला मोठी चालना मिळणार आहे.१३ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात एका व्यापक द्विपक्षीय व्यापार करारासाठी वाटाघाटी झाल्या. या कराराच्या चौकटीत अतिरिक्त बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि पुरवठा साखळी अधिक मजबूत करणे यावर भर दिला जाणार आहे. कराराच्या प्रमुख अटींनुसार, अमेरिका भारतीय उत्पादनांवरील कर १८ टक्क्यांपर्यंत कमी करणार आहे.

गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये भारताने रशियाकडून केलेल्या तेल खरेदीमुळे अमेरिकेने २५ टक्के प्रत्युत्तरात्मक कर आणि अतिरिक्त २५ टक्के शुल्क असे एकूण ५० टक्के कर लादले होते. अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा निर्यातदार देश असल्याने, या भरमसाठ करामुळे भारतीय निर्यातदारांचे मोठे आर्थिक नुकसान होत होते.करारानुसार, भारत पुढील पाच वर्षांत अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलर्सच्या वस्तू खरेदी करण्याचीदेखील योजना आखली जात आहे. यामध्ये ऊर्जा उत्पादने, विमाने आणि विमानांचे घटक, मौल्यवान धातू, तंत्रज्ञान उत्पादने आणि कोकिंग कोळसा यांचा समावेश आहे.




### औषधनिर्माण क्षेत्रात वानबरीची दमदार प्रगती

**नवी दिल्ली :** जागतिक एपीआय बाजारपेठेत उपस्थिती असलेली आणि देशांतर्गत ब्रँडेड औषधनिर्मिती क्षेत्रात कार्यरत असलेली वानबरी लिमिटेड या औषधनिर्माण कंपनीने ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांचे आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. यामध्ये कंपनीचा महसूल १६२.४ कोटी रुपये झाला, जो आर्थिक वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत १३३.५ कोटी रुपये होता. यामध्ये वार्षिक २१.७ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. ही वाढ प्रामुख्याने एपीआय विक्रीत वाढलेले प्रमाण, प्रमुख उत्पादन केंद्रांमधील क्षमतेचा अधिक परिणामकारक वापर आणि फॉर्म्युलेशन व्यवसायातील स्थिर कामगिरी यामुळे झाली आहे. ईबीआयटीडीए २६.९ कोटी रुपये राहिला, जो आर्थिक वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत १४.८ कोटी रुपये होता. म्हणजेच ८१.७ टक्क्यांची उल्लेखनीय वाढ झाली आहे. कार्यक्षम खर्च व्यवस्थापन, कच्च्या मालाच्या खरेदीतील सुधारित धोरणे, उत्पादन प्रक्रियेत वाढलेली कार्यक्षमता आणि सॉल्व्हेंट रिकव्हरी प्रणालीतील सुधारणा याचा या वाढीत मोठा वाटा आहे. करोत्तर नफा () १५.८ कोटी रुपये झाला, तर आर्थिक वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत १.२ कोटी रुपये होता. म्हणजेच तब्बल १,१९४.३ टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. मजबूत ऑपरेशनल कामगिरी, वाढलेले मार्जिन, खर्चातील कार्यक्षमता आणि वित्तीय खर्चात झालेली घट यामुळे नफ्यात ही झपाट्याने वाढ झाली.

## आयटी शेअर्समध्ये जोरदार विक्री; निफ्टी १२० अंकांनी खाली

**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**

चार दिवसांच्या तेजीला आज ब्रेक लागला. जागतिक बाजारातून कमकुवत संकेत मिळाल्यामुळे गुरुवारी सकाळी भारतीय शेअर बाजाराची सुरुवात घसरणीसह झाली. विशेषतः आयटी शेअर्समध्ये मोठ्या प्रमाणात विक्री दिसून आली.सकाळी बाजार उघडताच सेन्सेक्स सुमारे ३७० अंकांनी घसरून ८३.८५० च्या आसपास आला, तर निफ्टी जवळपास १२० अंकांनी घसरून २५,८४० च्या खाली ट्रेड करत होता. बँक निफ्टीतही घसरण झाली होती.आज आयटी इंडेक्स जवळपास २ टक्क्यांनी घसरला. त्याचबरोबर मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्येही विक्रीचा जोर दिसला.

मिडकॅप इंडेक्स सुमारे ४५० पॉइंट्सने, तर स्मॉलकॅप जवळपास १६० पॉइंट्सने खाली आला. प्रायव्हेट बँकेचे शेअर्स सोडल्यास जवळपास सर्वच सेक्टर लाल रंगात होते.परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनीसलग चौथ्या दिवशी खरेदी केली. त्यांनी सुमारे ४२९ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. मात्र देशांतर्गत म्युच्युअल फंडांनी दोन दिवसांच्या खरेदीनंतर आज सुमारे १२५ कोटी रुपयांची विक्री केली.

अमेरिकन बाजारात काल घसरण झाली. डाओ आणि नॅस्डॅक दोन्ही निर्देशांक खाली बंद झाले. त्यामुळे आज भारतीय बाजारावरही त्याचा परिणाम झाला. जपानचा निक्केई मात्र थोडा मजबूत दिसत होता, तर निफ्टी सपाट स्थितीत होता.कमोडिटी मार्केटमध्ये पुन्हा तेजी परतली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोनं ५.१०० डॉलरच्या वर गेलं, तर चांदीत सुमारे ५ टक्क्यांची वाढ पाहायला मिळाली. देशांतर्गत बाजारात सोन्याचा दर जवळपास २,००० रुपयांनी वाढला, तर चांदी १० हजार रुपयांपेक्षा जास्त महागली. इराण-अमेरिका तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीही वाढल्या आहेत.आज काही मोठ्या कंपन्यांचे तिमाही निकाल येणार आहेत. त्यामुळे , , आणि सारख्या शेअर्सकडे गुंतवणूकदारांचं लक्ष आहे.

## भारताच्या निर्यातीत मोठी झेप; जागतिक व्यापार ८०० अब्ज डॉलरचा टप्पा गाठणार

**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**



जानेवारी महिन्यात आतापर्यंत भारताची निर्यात सकारात्मक पातळीवर आहे आणि आगामी महिन्यात जास्त प्रमाणात वाढणार असल्याचे वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले. आतापर्यंत युरोप आणि अमेरिकेबरोबर व्यापार करार झाला असला तरी त्याची अंमलबजावणी झालेली नाही. अशा परिस्थितीतही जानेवारी महिन्यातील निर्यात वाढली आहे. कराराच्या अंमलबजावणीनंतर ही निर्यात जास्त प्रमाणात वाढू शकेल असे ते म्हणाले. जानेवारी महिन्यासंदर्भातील आकडेवारी लवकरच उपलब्ध होणार आहे. यामध्ये निर्यात वाढल्याची बाब दिसून येईल असे ते म्हणाले. भारताच्या सेवा क्षेत्राच्या निर्यातीबरोबरच वस्तू क्षेत्राची निर्यातही वाढली आहे. कारण भारताने या अगोदरच अनेक देशाबरोबर व्यापार करार केलेले आहेत. त्याचबरोबर एकूणच निर्यात वाढावी यासाठी गेल्या दहा वर्षापासून प्रयत्न करण्यात आले आहेत. त्यामुळे भारताची निर्यात वाढत आहे. वर्षाच्या अखेरीस भारताचा एकूण जागतिक व्यापार ८०० अब्ज डॉलरच्या जवळपास जाईल असे ते म्हणाले.जर्मनीत सेंद्रिय अन्नपदार्थांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात भारतातील २० राज्यातील १०० उत्पादकांनी भाग घेतला आहे. या उत्पादनांना जर्मनीसह युरोपियन बाजारपेठेतून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. डिसेंबर महिन्यात भारताची निर्यात १.८७ टक्क्यांनी वाढून ३८.५ अब्ज डॉलर झाली. तर आयात ८.७ टक्क्यांनी वाढून ६३.५ अब्ज डॉलर झाली आहे. त्यामुळे व्यापारातील तूट अजूनही काही प्रमाणात शिल्लक आहे. ही तूट कमी करण्याचा भारत सरकारचा प्रयत्न आहे. तो आगामी एक दोन वर्षांमध्ये निश्चित यशस्वी होईल. एप्रिल -डिसेंबर या कालावधीत भारताची निर्यात २.४४ टक्क्यांनी वाढून ३३०.२९ अब्ज डॉलर झाली आहे.

## थोडक्यात

### नागपुरात अ.भा. पॉवरलिफ्टिंग स्पर्धा

**नागपूर :** महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग फेडरेशन च्या मार्गदर्शनाखाली आयोजित ३२ वी अखिल भारतीय पॉवरलिफ्टिंग व बेंचप्रेस चॅम्पियनशिप १२ ते १५ फेब्रुवारी दरम्यान सदर येथील महावीर प्रसारक परिसरात खेळविण्यात येत आहे. चार दिवस चालणारी ही स्पर्धा १८ वर्षांखालील सबज्युनिअर व २३ वर्षांखालील ज्युनिअर मुला-मुलींच्या गटात तसेच पुरुष व महिलांच्या वरिष्ठ आणि प्रौढांच्या गटात होणार आहे. स्पर्धेत एकूण २१ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील जवळपास ३०० नामवंत पुरुष व महिला पॉवरलिफ्टर्स सहभागी होणार आहेत. पॉवरलिफ्टर्स स्ट्रॉंग मॅन, स्ट्रॉंग वुमन, सुपर मॅन आणि सुपर वुमन या किताबांसाठी झुंज देणार आहेत. या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारावर स्वित्झर्लंडमध्ये नियोजित आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड करण्यात येणार असल्याची माहिती फेडरेशनचे महासचिव लिओ पीटर यांनी दिली.

### लिपिक टंकलेखक परीक्षा १४ मार्चला

**नागपूर :** सैनिक कल्याण विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक टंकलेखक (गट-क) या सरळसेवेतील पदांची परीक्षा टि.सी.एस. आयओएन यांच्या मार्फत १४ मार्च रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत घेण्यात येणार आहे. त्याची माहिती सैनिक कल्याण विभागाच्या www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात आली आहे, असे सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### रोजगार मेळावा आज

**नागपूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नागपूर, मॉडेल करीअर सेंटर, नागपूर तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नरखेड यांचे संयुक्त विद्यमाने १३ फेब्रुवारी रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नरखेड येथे रोजगार मेळावा (प्लेसमेंट ड्राईव्ह) चे आयोजन करण्यात आलेले आहे. रोजगार मेळाव्यामध्ये Effiman Services. Stop Cancer Mission, Shriram Finance Limited, Bigbasket, Vaibhav Enterprises इत्यादी कंपन्या मार्फत १०० पेक्षा जास्त जागांसाठी दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, डिप्लोमा इत्यादी पात्रताधारक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून उमेदवारांची प्राथमिक निवड केली जाणार आहे.

### महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन

**नागपूर :** श्री संत शंकर महाराज आश्रम नागपूर भोगे ले आउट भामटी नागपूर येथे शनिवार दिनांक १४ फरवरीपासून तर सोमवार दिनांक १६ फरवरी पर्यंत तीन दिवसीय महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. भोगे ले आऊट भामटी येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही परमहंस समर्थ सद्गुरू श्री संत शंकर महाराज यांच्या पावन उपस्थितीत महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन केले असून सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे समाजसेवक संजय सातपुते यांनी प्रसिद्धी पत्रकात कळविले आहे. शनिवारी तीर्थ स्थापना, रविवारी रुद्र अभिषेक, आणि सोमवारी हभप श्री बाळासाहेब वाल्हेकर पुणे, गोपाल काल्यानंतर कीर्तन त्यानंतर आरती व भव्य महाप्रसादाचे वितरण केले जाईल.

# फुटपाथ अतिक्रमण, दूषित पाण्यासंदर्भात निर्देश

## महापौरांनी घेतला विकास प्रकल्पांचा विभाग निहाय आढावा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १२ : नागपूरकरांना आगामी काळात फुटपाथवरील अतिक्रमण आणि दूषित पाण्याच्या समस्येतून कायमस्वरूपी मुक्ती मिळण्याची चिन्हे आहेत. महापौर निता ठाकरे यांनी महानगरपालिकेच्या सर्व विभाग प्रमुखांची तीन तासांची प्रदीर्घ बैठक घेऊन शहरातील सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांच्या सद्यस्थितीचा सविस्तर विभागनिहाय आढावा घेतला.**




या बैठकीत महापौरांनी प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले की, शहराच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासोबतच सामान्य नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अधिक प्रयत्नशील राहावे. त्यांनी विशेषतः शहरातील सर्व प्रमुख बाजारपेठांमध्ये रात्रीच्या वेळी स्वच्छता मोहीम राबविणे, दूषित पाण्याच्या तक्रारींवर तातडीने उपाययोजना करणे आणि पादचाऱ्यांच्या सुलभ वावरासाठी फुटपाथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी अत्यंत कडक पावले उचलण्याचे आदेश संबंधित विभागांना दिले. नागरिकांना उत्तम नागरी सुविधा देण्यासाठी मालमत्ता कर आणि इतर कायदेशीर माध्यमातून मनपाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना सुचविण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. याशिवाय शहरातील उद्यानांमध्ये नवीन सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, घनकचरा व्यवस्थापनाची योग्य अंमलबजावणी करणे आणि शहराच्या सौंदर्यीकरणात भर घालण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण

### बैठकीतील मुद्दे

- रेन हार्वेस्टिंगचा अधिकाधिक नागरिकांनी वापर व्हा
- मोकाट श्वानांच्या बंदोबस्त करावा
- विधान सभा क्षेत्र निहाय प्रत्येकी दोन इंग्रजी शाळा
- अंबाझरी तलावातून जलपर्णी कशी हटवावी

संकल्पना राबवण्यावरही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या महत्त्वपूर्ण बैठकीला उपमहापौर लीला हाथीबेड, सत्तापक्षनेता नरेंद्र बोरकर, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत आणि वैष्णवी बी. यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबतच मुख्य अभियंता मनोज तालेवार, मुख्य वित्त आणि लेखा अधिकारी सदाशिव शेळके, उपायुक्त तथा निगम सचिव डॉ. रंजना लाडे, उपायुक्त निर्भय जैन, उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त गणेश राठोड, उपायुक्त अशोक गराटे, उपायुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर आणि उपायुक्त राजेश भगत उपस्थित होते. तसेच नगररचना विभागाचे उपसंचालक गिरीश गोडबोले, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, अधीक्षक अभियंता लीना उपाध्ये यांच्यासह सर्व दहा झोनचे सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता व इतर वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उमेदवारांना रोजगाराची संधी

**नागपूर, दि.१२ :**जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अधिपत्याखालील सैनिकी मुलांचे-मुलींचे वसतीगृह तसेच सैनिकी विश्रामगृह, हिस्लॉप कॉलेज समोर, सिव्हील लाईन्स नागपूर येथे अशासकीय माळी तसेच माजी सैनिकी विश्रामगृहाकरिता अशासकीय सफाई कामगार पदासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात १३ हजार २७१ रुपये एवढ्या एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने पद भरावयाचे आहे. इच्छूक उमेदवारांनी १८ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, प्रशासकीय इमारत क्रं. १, तिसरा माळा, सिव्हील लाईन, नागपूर येथे अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा सैनिक अधिकारी, नागपूर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांकावर ०७१२-२५६११३३ संपर्क साधावा. माजी सैनिक/माजी सैनिक विधवा तसेच त्यांच्या पाल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

# मदन मंजिरी, चटक चांदणी चमकते अंबरी...

## सुरेख लावण्यांनी भरला 'युवारंगा'त रसिक रंग

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १२ :** मदन मंजिरी, चटक चांदणी चमकते अंबरी... अशा एकापेक्षा एक सरस लावण्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित युवक महोत्सवात रंग भरला. गुरुनानक भवन येथे 'युवारंग' या आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात बुधवार, दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारच्या सत्रात विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लोककला असलेली लावणी सादर केली.




महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोककला असलेला लावणी या नृत्यप्रकारात विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. नागपूर शहरासह ग्रामीण भागातून युवक महोत्सवात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक अशी सरस लावणी सादर केली. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सादरीकरणास उपस्थित प्रेक्षकांनी भरभरून साद दिली. बघल कुणीतरी, आम्ही नाही जा..., लाही लाही होते माझ्या अंगाची..., मदनाचा वनवा..., ढोलकीच्या नादात घुंगरू झालं बेभान..., शौकिनांचा मेळा भरला-नाद खुळा...., अप्सरा आली... अशा लावण्यांनी गुरुनानक भवन येथे उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी उपस्थित व्यवस्थापन परिषद सदस्य श्री वामन तुर्के यांनी लावणी नृत्य कला प्रकाराचे परीक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाळ यांची उपस्थिती होती. लावणी नृत्य प्रकारात विविध महाविद्यालयातील ६५ विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. विद्यार्थिनींप्रमाणे विद्यार्थ्यांनी देखील सुरेख लावणे सादर केली. लावणी नृत्याचे परीक्षक असलेले आंतरराष्ट्रीय लावणी कलावंत श्री आकाश तायडे यांनी देखील त्यांची प्रस्तुती सादर केली. त्यांच्या प्रस्तुतीवर उपस्थित प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.

# किरण मेश्राम यांचे 'मन की बात' प्रश्नमंजुषेत राष्ट्रीय स्तरावर यश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १२ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रेडिओ कार्यक्रम 'मन की बात' अंतर्गत आयोजित प्रश्नमंजुषेत नागपूर जिल्ह्यातील कामठी येथील किरण पुष्पराज मेश्राम यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. देशभरातील हजारो नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी होत असतात. या उपक्रमाचा उद्देश राष्ट्रउभारणीसाठी कार्य करणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन देणे व त्यांच्या कार्याचा सन्मान करणे हा आहे.




'मन की बात' कार्यक्रमाच्या प्रत्येक भागानंतर 'नमो ॲप'वर आयोजित करण्यात येणाऱ्या प्रश्नमंजुषेत विचारण्यात आलेल्या १० पैकी १० प्रश्नांची अचूक उत्तरे देत संपूर्ण भारतातून निवडल्या गेलेल्या पहिल्या ३० सर्वोत्तम सहभागींमध्ये स्थान मिळवले आहे. प्रश्नमंजुषेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्यांना 'मन की बात @१०० - इग्नाइटिंग कलेक्टिव्ह गुडनेस' हे ब्लूकाफ्ट फाउंडेशन द्वारा संकलित पुस्तक व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येते. हे पुस्तक पंतप्रधान मोदी यांच्या विचारसरणी, मूल्ये आणि 'मन की बात' द्वारे निर्माण झालेल्या सकारात्मक जन चळवळीचे दर्शन घडवते. किरण मेश्राम यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पार्टी नागपूर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष आनंद राऊत यांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाठवलेले प्रशस्तीपत्र व 'मन की बात' पुस्तक त्यांना प्रदान करण्यात आले, अशी माहिती किरण मेश्राम आणि पुष्पराज मेश्राम यांनी दिली. पत्रकार परिषदेमध्ये मीनाक्षी मेश्राम, शिल्पा मांडवकर, निषाद मेश्राम, अभिज्ञ मेश्राम यांची उपस्थिती होती.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या ५० 'पी.एम. ई-बसेस'चे लोकार्पण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १२ :** केंद्र सरकारच्या 'पी.एम. ई-बस' योजनेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या ताफ्यात ५० अत्याधुनिक वातानुकूलित इलेक्ट्रिक बसेस दाखल होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२:३० वाजता कोराडी आगार येथे आभासी पद्धतीने या बसेसचे लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.




या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मनोहर लाल, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, माधुरी मिसाळ, महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेता नरेंद्र बोरकर, विरोधी पक्षनेता संजय महाकाळकर आणि प्रभारी आयुक्त वसुमना पंत उपस्थित राहणार आहेत. या ९ मीटर लांब बसेसमध्ये '२५+१' प्रवाशांची क्षमता असून दिव्यांगांसाठी 'हायड्रोलिक ई-रॅम्प'ची सोय आहे. अवघ्या ३० मिनिटांच्या चार्जिंगवर या बसेस २२५ किमी धावू शकतात. पहिल्या टप्प्यातील या ५० बसेस शहरातील ११ मार्गांवर धावणार असून, एकूण १५० बसेस नागपूरकरांच्या सेवेत येणार आहेत. यामुळे शहराच्या सार्वजनिक वाहतुकीचे आधुनिकीकरण होऊन 'ग्रीन मोबिलिटी'ला चालना मिळेल.

# महावितरणचा 'सुरक्षा मंत्र' प्रत्येक सोमवारी

## तांत्रिक कर्मचारी घेताहेत विद्युत सुरक्षेची शपथ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १२ :** 'शून्य विद्युत अपघात' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि विद्युत सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी महावितरणने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता राज्यातील सर्व उपविभाग व शाखा कार्यालयांमध्ये प्रत्येक सोमवारी किंवा आठवड्याच्या पहिल्या कामाच्या दिवशी कामकाजाची सुरुवात 'विद्युत सुरक्षा शपथे'ने करण्याचे निर्देश एका परिपत्रकाद्वारे देण्यात आले आहेत. कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेत विद्युत सुरक्षेचे महत्त्व रुजवण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.



महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी या उद्दिष्टाच्या प्रभावी अंमलबजावणीची सूचना केली आहे. त्यानुसार, संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी सुरक्षा उपाययोजना आणि लोकसहभागाच्या उपक्रमांना विशेष गती दिली आहे. याविषयी बोलताना श्री. लोकेश चंद्र यांनी स्पष्ट केले की, 'अभियंते व कर्मचाऱ्यांसाठी विद्युत सुरक्षा ही केवळ नियमावली नसून तो दैनंदिन कामाचा अविभाज्य भाग आहे. प्रत्येक जीव अत्यंत मौल्यवान असल्याने 'शून्य विद्युत अपघात' हेच महावितरणचे ध्येय आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी विद्युत सुरक्षेचे कायम तंतोतंत पालन करावे.' या निर्णयानुसार, महावितरणच्या ६६४ उपविभाग व ३२९१ शाखा कार्यालयांमध्ये सोमवार हा 'सुरक्षा दिवस' मानला जाईल. शपथेनंतर सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक सुरक्षा उपकरणांची आणि साधनांची कसून तपासणी केली जाईल. ती सुस्थितीत असल्याची खात्री केल्यानंतरच क्षेत्रीय कामांना सुरुवात होईल. तसेच, कर्मचाऱ्यांच्या बैठकींची सुरुवातही शपथेनेच होणार आहे. या उपक्रमावर देखरेख ठेवण्यासाठी कार्यकारी अभियंता (प्रशासन) आणि अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या तत्त्वांनुसार महावितरणने सुरक्षेसाठी विविध पावले उचलली आहेत. जून २०२५ मध्ये २० व्या वर्धापन दिनानिमित्त राबवलेल्या अभियानात तब्बल २ लाख ११ हजार नागरिक व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच २ कोटी ८५ लाख ग्राहकांपर्यंत सुरक्षेचा थेट संदेश पोहोचवण्यात आला, ज्याची जागतिक दखल घेतली गेली. कर्मचाऱ्यांना २० ते २५ प्रकारची सुरक्षा साधने वेळेवर मिळावीत यासाठी 'टी अँड पी रजिस्टर मॉड्यूल' कार्यान्वित केले आहे.

फिटॅथॉन २.० ... 'फिटनेस' जीवनशैली स्वीकारण्याचा संकल्प

# आरोग्यासाठी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १२ : विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनच्या लेडी एंटरप्रेन्युअर्स विंग (VIA-LEW) द्वारे 'फिटॅथॉन २.० – वॉक, रन अँड सेलिब्रेट फिटनेस' या विशेष मॅरेथॉनचे यशस्वी आयोजन करण्यात आले. धरमपेठ सायन्स कॉलेज ग्राउंड येथे पार पडलेल्या या उपक्रमात नागपूरच्या महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत 'फिटनेस' ही जीवनशैली म्हणून स्वीकारण्याचा संकल्प केला.**




कार्यक्रमाची सुरुवात स्वाती चौधरी यांनी घेतलेल्या वॉर्म-अप सेशनने झाली. त्यानंतर ५ किमी मॅरेथॉन आणि ३ किमी वॉकेथॉनला हिरवी झेंडी दाखवण्यात आली. अनमोल खत्री यांनी घेतलेल्या झुंबा सत्रामुळे वातावरणात एक वेगळाच उत्साह संचारला होता. संगीताच्या तालावर महिलांनी व्यायामाचा आनंद लुटला. प्रसिद्ध आहारतज्ज्ञ डॉ. मेघना कुमारे यांनी संतुलित आहार आणि शाश्वत जीवनशैलीवर मार्गदर्शन केले. 'रेड ॲपल वेलनेस डाएट सेंटर'च्या संस्थापक असलेल्या डॉ. कुमारे यांनी क्रीडा पोषण आहाराचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी प्रसिद्ध एन्ड्युरन्स ॲथलीट आणि नागपूरचे 'बायसिकल मेयर' डॉ. अमित समर्थ यांनी महिलांना शिस्त आणि मानसिक लवचिकता जोपासण्याचे आवाहन केले. यावेळी मान्यवरांना 'विको' (Vicco) तर्फे प्रायोजित भेटवस्तू आणि पर्यावरणपूरक रोपे देऊन सन्मानित करण्यात आले. मितेश नांबियार यांचाही विशेष सहकार्य केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. विवेक हॉस्पिटल कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक होते, तर 'इंडोहर्बल'ने सहभागी महिलांना भेटवस्तू देऊन सहकार्य केले. VIA-LEW च्या कार्यकारिणी समितीमधील सरिता पवार, मधुबाला सिंग, नीलम बोवडे, अंजली गुप्ता, शची मल्लिक, मनीषा बावणकर, अमनदीप कौर सहमी, तेजल रक्षांवार आणि मीनल खेडकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. VIA-LEW च्या अध्यक्षा योगिता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याला चालना देणे हा होता.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात प्रकल्प संचालक दिशा डूंबरे, श्रीगौरी घटाटे आणि शिखा खारे यांचा मोलाचा वाटा होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूनम लाला आणि शिखा खारे यांनी केले.

**विजेतांची नावे**

| गट | विजेते |
|---|---|
| ५ किमी मॅरेथॉन | निकिता शाहू, श्रुती ओझा, ममता मेश्राम, लता पारधी, सुलोचना खोब्रागडे, डॉ. प्रीती कुलकर्णी |
| ३ किमी वॉकेथॉन | सुचिता वडमे, रोशनी नबीक, माया यादव, खुशबू अग्रवाल गुप्ता, मृणाल भाकरे, देवयानी देशमुख |

# अंभोरा दिशेने जाणाऱ्या वाहतूक व्यवस्थेत बदल

## महाशिवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नियोजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १२ :** श्री चैतन्येश्वर देवस्थान, आंभोरा येथे महाशिवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर होणारी भाविकांची गर्दी आणि सुरक्षितता लक्षात घेऊन नागपूर जिल्हा ग्रामीण वाहतूक पोलिसांनी वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाचे बदल केले आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी हे निर्बंध १४ फेब्रुवारी २०२६ (रात्री ११ वाजतापासून) ते १७ फेब्रुवारी २०२६ (रात्री ११ वाजेपर्यंत) या कालावधीत लागू राहतील.

उत्सवाच्या काळात मंदिर परिसरात अवजड वाहनांना प्रवेश बंदी असेल. यानुसार, नागपूर ते कुहीमार्गे भंडारा जाणारी वाहतूक आता कुही-वडोदा-मौदा मार्गाने भंडाराकडे वळवण्यात आली आहे. भाविकांनी आपली वाहने केवळ पार्किंगच्या ठिकाणीच उभी करावीत. विशेष म्हणजे, केबल पुलावर थांबण्यास व मोबाईल सेल्फी काढण्यास मनाई करण्यात आली आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ आणि ११७ अन्वये कडक कारवाई केली जाईल. नागरिकांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा व बदलांची नोंद घेऊन पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार यांनी केले आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com

## चारित्र्याच्या संशयातून पत्नीचा खून; पतीला जन्मठेप

**अकोला :** चारित्र्यावर संशय घेत पत्नीचा निर्घृण खून करणाऱ्या पतीस जिल्हा व सत्र न्यायालय क्र. ०३, अकोला यांनी आज जन्मठेपेची शिक्षा व ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास सहा महिन्यांचा अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस स्टेशन चान्नी येथे फिर्यादी संजय बबनराव देवकर (२६), रा. भौरद ह.मु. आलेगाव) यांनी दि. ११ मे २०२० रोजी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार, दि. १० मे २०२० रोजी पहाटे सुमारे ३ वाजताच्या सुमारास आरोपी मनोहर भिका मेटांगे (४०), रा. माळेगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा) याने पत्नी सौ. जिजाबाई मनोहर मेटांगे हिच्या चारित्र्यावर संशय घेत भांडण केले. या वादातून त्याने स्वयंपाकघरातील चुलीजवळ ठेवलेल्या दगडी खलबत्याने तिच्या डोक्यावर वार करून तिचा खून केला. घटनेवेळी घरातच असलेली आरोपीची लहान मुलगा व मुलगी घाबरलेल्या अवस्थेत होती. दरम्यान, साक्षीदार कैलास राठोड यांनी आरोपी घराचा दरवाजा उघडत नसल्याचे पाहून त्यांचे नातेवाईक संजय देवकर यांना बोलावून आणले. मात्र आरोपीने दरवाजा उघडला नाही. याचवेळी आरोपीने पत्नीच्या साडीने स्वतःच्या गळ्याला फास लावून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहितीही समोर आली.

**महत्त्वाचे**

## आ. पठाण यांनी अधिकाऱ्यांना भरवले रुग्णांचे निकृष्ट जेवण

**अकोला:** अकोला पश्चिम विधानसभा क्षेत्राचे आमदार साजिद खान पठाण यांनी गुरुवारी सर्वोपचार रुग्णालयातील अस्वच्छता, निकृष्ट जेवण आणि कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तवणुकीवरून प्रशासनाला धारेवर धरले. अधिष्ठाता डॉ. सोनुने यांच्यासोबत झालेल्या बैठकीत त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. विशेष म्हणजे, रुग्णांना दिले जाणारे जेवण अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे पाहून त्यांनी स्वतः ते जेवण खाल्ले आणि अधिष्ठातांसह वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही ते खाण्यास लावले. ''कैद्यांना दिले जाते तसे जेवण रुग्णांना देणे लाजीरवाणे आहे,'' अशा शब्दांत त्यांनी कंत्राटदारावर कारवाईची मागणी केली. निरीक्षणादरम्यान वॉर्डबॉय उपलब्ध नसल्याने नातेवाईकांनाच रुग्ण स्ट्रेचरवरून न्यावे लागत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले. तसेच कर्मचाऱ्यांच्या उद्धट वर्तणुकीबाबतही त्यांनी कडक ताकीद दिली. १६ जानेवारीच्या शासन निर्णयानुसार आरोग्य यंत्रणा गरिबांसाठी असतानाही शुल्क का वसूल केले जात आहे, असा सवाल उपस्थित करत हा मुद्दा अधिवेशनात मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## क्षमतेपेक्षा जास्त शाळकरी विद्यार्थ्यांची वाहतूक

**अकोला :** शाळकरी विद्यार्थ्यांना क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात ऑटोमध्ये बसवून वाहतूक करणाऱ्या चालकांविरुद्ध शहर वाहतूक शाखा, अकोला यांनी धडक कारवाई करत ८६ ऑटोचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली. या कारवाईत एकूण १७ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला असून त्यापैकी ७ हजार ४०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार शहर वाहतूक शाखेमार्फत ही विशेष मोहीम राबविण्यात आली. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शहरातील प्रमुख चौक तसेच विविध शाळांच्या परिसरासमोर तपासणी नाके उभारून वाहनांची तपासणी करण्यात आली. या मोहिमेदरम्यान क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना वाहनामध्ये बसवून वाहतूक करणाऱ्या ऑटोचालकांवर मोटार वाहन कायदा कलम १९४ (अ) अन्वये कारवाई करण्यात आली. संबंधित चालकांना वाहतूक नियमांची जाणीव करून देत समुपदेशनही करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर असल्याने अशा प्रकारच्या नियमभंगाला कोणतीही सूट दिली जाणार नसल्याचा इशारा वाहतूक शाखेकडून देण्यात आला आहे. तसेच सर्व ऑटोचालकांनी वाहनात निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी न बसवता वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अडगाव बु. येथे गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट; दोन ठार, एक गंभीर



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. १२ :** तालुक्यातील अडगाव बुद्रुक येथे गुरुवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास घरगुती गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट होवून लागलेल्या भीषण आगीत होरपळून दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे. जखमी महिलेला पुढील उपचारासाठी तातडीने अकोला येथे हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अनिल चव्हाण व चिमुकली स्वरा चव्हाण यांचा या आगीत होरपळून जागीच मृत्यू झाला. तर रत्ना चव्हाण या भीषण आगीत गंभीर जखमी झाल्या असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांना तातडीने अकोला येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सिलिंडरचा स्फोट झाला त्यावेळी घरात असलेल्या कॅन मधील डिझेलचा भडका उडून आगीने रौद्ररूप धारण केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या भीषण स्फोटात दोन निष्पाप जीवांचा बळी गेल्याने अडगाव परिसरासह संपूर्ण अकोट तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून सर्वत्र शोककळा पसरली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी धाव घेतली असून पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

## शास्ती अभय योजना व अतिक्रमण निर्मूलन संदर्भात आ. सावरकर यांच्या सूचना

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. १२ :** महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या वसुलीला गती देण्यासाठी आणि शहरातील अतिक्रमण समस्या निकाली काढण्यासाठी आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखाली मनपा आयुक्तांसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत थकीत मालमत्ता करधारकांसाठी शास्ती अभय योजना लागू करण्यासोबतच शहरातील वाढत्या अतिक्रमणावर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

महापालिका क्षेत्रातील मुख्य बाजारपेठ आणि मुख्य रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिक्रमणामुळे शहरात सतत वाहतुकीची कोंडी निर्माण होत असून, नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन आमदार सावरकर यांनी महापौर शारदा खेडकर, माजी महापौर विजय अग्रवाल, शहराध्यक्ष जयंत मसने, उपमहापौर अमोल गोगे, गटनेता पवन महल्ले आणि नगरसेवक शरद तुरकर यांच्या उपस्थितीत मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या दालनात बैठक घेतली.

यावेळी बैठकीत प्रामुख्याने थकीत मालमत्ता करधारकांना दिलासा देण्यासाठी आणि पालिकेची वसुली वाढवण्यासाठी शास्ती अभय योजना प्रभावीपणे राबविण्यावर चर्चा झाली. तसेच, शहरातील मुख्य मार्गावरील अतिक्रमणांवर विशेष लक्ष केंद्रित करून संबंधित विक्रेत्यांना मनपाने निश्चित केलेल्या हॉकर्स झोन मध्ये तातडीने स्थलांतरित करावे, जेणेकरून रस्ते मोकळे होतील, असे निर्देश आमदार सावरकरांनी दिले. यासोबतच महापालिकेच्या आवार भिंतींलगतचे अतिक्रमण काढून त्या भागाचे सौंदर्यीकरण करणे आणि अतिक्रमण निर्मूलनासाठी झोननिहाय स्वतंत्र पथके तयार करून नियमित कारवाई सुरू ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. या बैठकीला मनपा उपायुक्त विजय पारतवार, सहाय्यक आयुक्त देविदास निकाळजे, राजेश सरप, मालमत्ता अधिकारी संदीप गावंडे आणि विधी अधिकारी शाम ठाकूर यांच्यासह इतर पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

## इसाफ स्मॉल फायनान्स बँक कर्मचाऱ्याचा अटकपूर्व जामीन फेटाळला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** अकोट येथील वि. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी अकोट शहर पोलीस स्टेशन येथे दाखल अप. क्र. १२७/२०२५, कलम ३१६(५), ३१८(४), ३(५) भा.न्या.सं. अंतर्गत गुन्ह्यातील आरोपी दिपक शांतीराम कांबळे (२६), रा. कळंबा महाली, ता. जि. वाशिम) याचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला आहे.

सदर प्रकरण इसाफ स्मॉल फायनान्स बँक, अकोट शाखेशी संबंधित असून तब्बल ४३५ महिला ग्राहकांची आणि बँकेची एकूण १९ लक्ष ८४ हजार ८९१ रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणात बँकेचे एरिया मॅनेजर मनोज खंडारे यांनी अकोट शहर पोलीस स्टेशनमध्ये लेखी फिर्याद दाखल केली. त्यानुसार बँकेचे कर्मचारी राहुल बाजीप्रभू देशपांडे (रा. साईनगर, अमरावती), दिपक शांतीराम कांबळे (रा. कळंबा महाली, ता. जि. वाशिम) आणि यश श्रीकृष्ण मनोहर (रा. वनोजा, पो. शेलूबाजार, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) या तिघांनी संगनमत करून महिला बचत गटांना कर्ज देण्याच्या प्रक्रियेत बँकेचे नियम डावलले.

फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, आरोपींनी कर्जासाठी आवश्यक कागदपत्रांवर महिला ग्राहकांकडून सही व अंगठे घेतले; मात्र काहींना कर्जच दिले नाही. काही महिलांना कर्ज दिले असले तरी त्यांच्याकडून वसूल केलेली रक्कम बँकेत जमा केली नाही. काही ग्राहकांकडून कर्ज खाते बंद करण्याच्या नावाखाली पैसे घेऊन तेही बँकेत जमा करण्यात आले नाहीत.या गैरप्रकाराबाबत काही महिलांनी बँककडे तक्रारी केल्या होत्या.

# महापालिकेत जन्म-मृत्यू दाखल्यांचा खेळखंडोबा

## सावळागोंधळ! कार्यालयांचे स्थलांतर अन् प्रभारींचा खेळ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** महापालिकेत जन्म आणि मृत्यू दाखल्यांचा गुंता सुटण्याऐवजी दिवसेंदिवस अधिकच जटील होत चालला आहे. प्रशासनाच्या धरसोड वृत्तीच्या आणि उफराट्या धोरणांचा थेट फटका सामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. कधी झोन स्तरावर कामाचे विकेंद्रीकरण, तर कधी कार्यालयांचे वारंवार होणारे स्थलांतर; अशा प्रयोगांमुळे या विभागाची घडी पूर्णपणे विस्कटली असून, दाखले मिळवण्यासाठी नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

जन्म-मृत्यू विभागाचा घोळ इतका वाढला आहे की, या विभागाचा निबंधक म्हणून प्रभार स्वीकारण्यास एकही अधिकारी धजावत नसल्याची धक्कादायक परिस्थिती आहे. गेल्या चार ते पाच महिन्यात तब्बल चार ते पाचवेळा या पदाचा प्रभार बदलण्यात आला. हे काम आपल्या अंगावर येईल या भीतीने तीन वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी लेखी पत्र देऊन माझ्याकडून हा प्रभार काढून घ्या अशी विनंती प्रशासनाला केली. सध्या डॉ. रुची पहूरकर यांच्याकडे या पदाची जबाबदारी सोपवण्यात आली असली, तरी वारंवार बदलणाऱ्या जबाबदाऱ्यांमुळे कामात सुसूत्रता राहिलेली नाही. प्रशासनाने नागरिकांच्या सोयीपेक्षा कार्यालये हलवण्यातच धन्यता मानल्याचे चित्र आहे. सुरुवातीला महापालिका मुख्यालयात असलेला हा विभाग नेहरू चौक येथील कार्यालयात हलवण्यात आला. तिथून पुन्हा हा विभाग आता भरतीया रुग्णालय येथे स्थानांतरित करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, कार्यालय भरतीया रुग्णालयात असले तरी, या विभागाची महत्वाची रेकॉर्ड रूम अजूनही महापालिका मुख्यालयातच अडकून पडली आहे. आता ही रेकॉर्ड रूमदेखील भरतीया रुग्णालयात नेण्याच्या हालचाली सुरू आहेत. या तांत्रिक आणि भौतिक स्थलांतराच्या खेळात नागरिकांना मात्र एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात खेटे मारावे लागत आहेत.

एकूणच, प्रशासनातील समन्वयशून्य कारभारामुळे अकोला महापालिकेचा जन्म-मृत्यू विभाग सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला असून, सर्वसामान्य जनतेला मात्र विनाकारण वेठीस धरले जात आहे.

**महापौरांचे प्रशासनाला निर्देश**

या सर्व सावळागोंधळाची दखल घेत महापौर शारदा खेडकर यांनी प्रशासनाला पत्र दिले आहे. नागरिकांची होणारी गैरसोय थांबवण्यासाठी जन्म-मृत्यू दाखल्यांची व्यवस्था तातडीने झोननिहाय कार्यान्वित करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महापौरांनी आता या प्रकरणी आक्रमक पवित्रा घेतला असून, विस्कटलेली ही प्रशासकीय घडी कधी बसणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सहा महिन्यांचा वेटिंग पिरीयड; विद्यार्थी अडचणीत

सध्या शाळा-महाविद्यालयीन प्रवेशाचा काळ असून विविध नोकरभरतीसाठी जन्म दाखला हा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज आहे. मात्र, महापालिकेच्या ढिसाळ नियोजनामुळे नागरिकांना दाखल्यासाठी चक्क दोन ते सहा महिन्यांचा वेटिंग पिरेड दिला जात आहे. तातडीने दाखला मिळणे तर दूरच, साध्या चौकशीसाठीही नागरिकांना ताटकळत उभे राहावे लागत आहे. प्रशासनाच्या या निष्क्रीयतेमुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# कचरा संकलन ठप्प; महापालिकेने बजावली नोटीस

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. १२ :** शहरात कचरा संकलनाचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर झाला असून, कंत्राटदाराच्या अडवणुकीमुळे सलग दुसऱ्या दिवशीही कचरा संकलन ठप्प पडले आहे. महापालिका आयुक्त आणि घंटागाडी चालकांमध्ये झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर चालक गुरुवारी सकाळी कामावर परतले होते; मात्र कंत्राटदाराने गाड्यांच्या चाव्या देण्यास नकार दिल्याने पेच अधिकच वाढला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत महापालिका प्रशासनाने संबंधित कंत्राटदाराला नोटीस बजावली आहे.

महापालिकेने शहरातील कचरा संकलनाचे कंत्राट अर्बन एनव्हायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड या कंपनीला दिले आहे. गेल्या काही महिन्यांपासून या कंपनीने घंटागाडी चालकांचे वेतन थकविल्यामुळे चालकांनी संपाचे हत्यार उपसले होते. यावर तोडगा काढण्यासाठी महापालिका आयुक्तांनी मध्यस्थी केली आणि चालकांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन दिले. प्रशासनाच्या या भूमिकेवर विश्वास ठेवून घंटागाडी चालकांनी गुरुवारी ड्युटीवर हजेरी लावली.

मात्र, गुरुवारी सकाळी चालक जेव्हा डम्पिंग ग्राउंडवर गाड्यांची चावी घेण्यासाठी गेले, तेव्हा कंत्राटदाराने त्यांना गाड्या देण्यास स्पष्ट नकार दिला. कंत्राटदाराच्या या अनपेक्षित भूमिकेमुळे चालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जोपर्यंत आमच्या सर्व मागण्या पूर्ण होत नाहीत आणि कंत्राटदार सहकार्य करत नाही, तोपर्यंत आम्ही कामावर येणार नाही, असा पवित्रा आता चालकांनी घेतला आहे. कंत्राटदाराच्या या आडमुठ्या धोरणामुळे गुरुवारीही शहरातील कचरा उचलला गेला नाही, परिणामी मुख्य रस्ते आणि वस्त्यांमध्ये कचरा डंप झाला आहे.

महापालिका प्रशासनाने या संपूर्ण प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आयुक्तांच्या सूचनेनंतरही कचरा संकलन सुरळीत न झाल्याने प्रशासनाने कंत्राटदाराला नोटीस बजावली आहे.

- संबंधित कंपनीला नोटीस बजावण्यात आली असली, तरीही काही भागांतील घंटागाड्या अद्याप बंद आहेत. याप्रकरणी दोन्ही बाजूंच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करून तातडीने मार्ग काढला जाईल.
  
  **- प्रशांत राजूरकर,** प्रमुख, स्वच्छता विभाग

- आम्ही संप मागे घेऊन गुरुवारी कामावर हजर झालो होतो, मात्र कंपनीच्या सुपरवायझरने आम्हाला गाड्यांच्या चाव्या देण्यास नकार दिला. व्यवस्थापनाची ही भूमिका पाहता, आता आमच्या सर्व मागण्या पूर्ण झाल्याशिवाय आम्ही कामावर परतणार नाही.
  
  **- गणेश शेंडोकार,** अध्यक्ष, स्वच्छतादूत वाहन चालक संघ

## पोलीस भरतीच्या दुसऱ्या दिवशी १२०० पैकी ९८१ उमेदवारांची उपस्थिती



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२४-२०२५ मधील पोलीस शिपाई भरती प्रक्रियेस ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ५ वाजल्यापासून पोलीस मुख्यालय, अकोला येथे प्रारंभ करण्यात आला आहे. एकूण १६१ पोलीस शिपाई पदांसाठी तब्बल ११ हजार ७८४ अर्ज प्राप्त झाले असून भरती प्रक्रियेबाबत उमेदवारांमध्ये उत्सुकता दिसून येत आहे. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी १२०० उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी बोलावण्यात आले होते. त्यापैकी ९८१ उमेदवारांनी हजेरी लावली. त्यातील ९२३ उमेदवार शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरले आणि परीक्षेला सामोरे गेले. २५ पेक्षा जास्त गुण प्राप्त करून ६७० उमेदवार पुढील टप्प्यासाठी पात्र ठरले आहेत.

भरती प्रक्रियेत शारीरिक मोजमाप, मैदानी चाचणी आणि कागदपत्र पडताळणीचा समावेश असून ही संपूर्ण प्रक्रिया महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ नुसार पारदर्शक, सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने राबविण्यात येत आहे. उमेदवारांची ओळख पटविण्यासाठी डिजिटल फोटो, बायोमेट्रिक प्रणाली आणि आरएफआयडी तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. तसेच संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्ही व व्हिडिओ चित्रीकरणाखाली पार पडत आहे.

उमेदवारांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका, मोबाइल टॉयलेट, पी.ए. सिस्टीम आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. बाहेरगावाहून आलेल्या उमेदवारांसाठी निमवाडी पोलीस वसाहत येथील मल्टिपर्पज हॉलमध्ये निवास व्यवस्था करण्यात आली आहे. प्रक्रिये दरम्यान उमेदवारांना केळी, बिस्कीट आणि ग्लुकोजचे वाटपही करण्यात आले.

भरती प्रक्रियेदरम्यान कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे २ अधिकारी व २० अंमलदार तैनात ठेवण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार सूक्ष्म अंगझडती घेतली जाणार आहे. स्टेरॉईड किंवा अन्य उत्तेजक द्रव्ये आढळल्यास संबंधित उमेदवाराविरुद्ध वैद्यकीय तपासणीनंतर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. मैदानी चाचणीसाठी सामान्य स्पोर्ट्स शूजला परवानगी देण्यात आली असून स्पाईक किंवा विशेष प्रकारचे शूज वापरण्यास मनाई आहे. दरम्यान, काही फसवणूक करणारे इसम ''पोलीस भरती करून देतो'' अशा खोट्या आश्वासनांद्वारे उमेदवारांकडून पैशांची मागणी करण्याचा प्रयत्न करू शकतात. उमेदवारांनी अशा कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असून कोणत्याही प्रकारे पैसे देण्याची आवश्यकता नाही. कोणीही पैशांची मागणी केल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यात किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला (मदत क्रमांक १०६४) येथे संपर्क साधावा.

**आयोजन** ‘एक पाऊल जिद्दीचे, आरोग्य माझे सिद्धीचे’: विविध गटांत रंगणार आरोग्याचा उत्सव

# अकोल्यात रविवारी आरोग्यासाठी ‘वॉकेथॉन’

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अकोला, दि. १२ :** भारतीय वैद्यकीय संघटना (आयएमए) आणि जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच तिक्ष्णगत मुख्य फाउंडर म्हणून पुढाकार घेत असलेली तिक्ष्णगत आयएमए वॉकेथॉन२०२६ येत्या रविवारी, १५ फब्रुवारी रोजी शास्त्री स्टेडियम, टॉवर चौक येथे आयोजित करण्यात आली आहे. गेल्या १९ वर्षांची परंपरा लाभलेला हा उपक्रम यंदाही उत्साहात पार पडणार असल्याची माहिती आयएमएचे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार सोमानी, प्रकल्प प्रमुख डॉ. राजेंद्रकुमार सोनोने व प्रकल्प सचिव डॉ. राम हेडा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदा ''एक पाऊल जिद्दीचे, आरोग्य माझे सिद्धीचे'' ही प्रेरणादायी थीम निश्चित करण्यात आली आहे. ही स्पर्धा नसून निरोगी जीवनशैलीचा उत्सव असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय पॅराॲथलीट संगीता विश्नोई यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभणार असून, त्यांच्या हस्ते आयएमएच्या नवीन इमारतीतील मेडिटेशन हॉलचे उद्घाटनही होणार आहे. त्यानंतर डॉ. प्रवीण देशमुख त्यांची प्रकट मुलाखत घेतील.

नोंदणीसाठी शनिवार, १४ फेब्रुवारीपर्यंत आयएमए हॉल (सिव्हिल लाईन) येथे सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत वेळ देण्यात आली आहे. नोंदणी शुल्क १०० रुपये असून सहभागींना बीब नंबर व विशेष मेडल दिले जाईल. रविवारी सकाळी ५:३० वाजता झुंबा व वॉर्मअप सत्राने कार्यक्रमाची सुरुवात होईल, तर ६:४५ वाजता १० किमी गटाला हिरवी झेंडी दाखवण्यात येईल.

### असे असेल गटांचे नियोजन

वॉकेथॉन एकूण चार गटांत विभागली असून त्याचे अंतर खालीलप्रमाणे आहे:

- **१० किमी :** १५ वर्षांवरील सर्वांसाठी.
- **५ किमी :** १२ वर्षांवरील नागरिकांसाठी.
- **३ किमी :** ६ वर्षांवरील मुलांसाठी.
- **१.५ किमी :** केवळ दिव्यांग बांधवांसाठी.

यावेळी आयएमए सचिव डॉ. प्रदीप अग्रवाल, डॉ. सागर भुईभार, डॉ. किशोर पाचकोर, डॉ. अनुप कोठारी, राजेश्वर पाठक, चंद्रशेखर कडू, आशिष बेलोकार यांच्यासह तिक्ष्णगत मल्टी फेयर वेल्फेअर सोसायटी चे पदाधिकारी नियोजनात कार्यरत आहेत.



महत्त्वाचे

## वेदिका जायले हिची राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदकाची कामगिरी



**अकोट :** येथील सेंट पॉल्स अकॅडमीची विद्यार्थिनी वेदिका विक्रम जायले हिने ६९ व्या राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. बिलासपूर (छत्तीसगड) येथे पार पडलेल्या स्पर्धेत अंडर-१७ गटात वेदिकाने उत्कृष्ट खेळ करत कांस्यपदक पटकावले. मुलींच्या संघानेही तिसरा क्रमांक मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. तिच्या यशाबद्दल शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातून कौतुक होत आहे. वेदिकाने आपल्या यशाचे श्रेय संस्थाध्यक्ष नवनीत लखोटिया, उपाध्यक्ष लुनकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सारिका रेळे, वैशाली गावत्रे, क्रीडा प्रशिक्षक नलिनी जाधव, स्वप्निल चांदेकर, प्रणव देंडव, क्रीडा शिक्षक अभिलाष काळमेघ, नारायण वानखडे तसेच आई-वडिलांना दिले.

## मुंडगावच्या जिल्हा परिषद उर्दू शाळेत आनंद मेळावा उत्साहात

**मुंडगाव :** तालुक्यातील संतनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कारी शेख साजिद यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बळेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख बाबाराव बोरोकार प्रामुख्याने उपस्थित होते. मेळाव्यात इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे दर्शन घडवले. विद्यार्थ्यांच्या पालकांनी या उपक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती लावून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व समाधान व्यक्त केले. मेळाव्यानंतर शाळेत समग्र शिक्षा अभियानांतर्गत उभारण्यात आलेल्या सुसज्ज आयसीटी लॅबचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. या लॅबमध्ये १० अत्याधुनिक संगणकांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या डिजिटल शिक्षणाला मोठी मदत होणार आहे. याप्रसंगी मुख्याध्यापक (उच्च श्रेणी) मोहम्मद शफीक, शिक्षक एजाज अली, आसिम अली, मो. अनसार, आसिफ खान, मोहम्मद जावेद, वासिक अली यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेल्या या उपक्रमाचे मुंडगाव परिसरातून कौतुक होत आहे.

## निधन वार्ता

### महादेव बिजेवार



**उमरा :** येथील सेवानिवृत्त शिक्षक तथा जय ब्रम्हांडनायक फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव पांडुरंग बिजेवार (८३) यांचे गुरुवारी सकाळी ९ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते उमरा येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत होते. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनामुळे उमरा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# वाडेगावात अन्न सुरक्षा विभागाची धडक कारवाई; मुदतबाह्य ८ वस्तू जप्त

## अमरावती न्यायालयात खटला दाखल करण्याची प्रक्रिया सुरू; ग्राहकांमध्ये खळबळ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बाळापूर, दि. १२ :** वाडेगाव येथील बसस्थानकाजवळील एका होलसेल किराणा दुकानात मुदत संपलेल्या खाद्यपदार्थांची विक्री होत असल्याच्या तक्रारीची दखल घेत, अन्न व औषध प्रशासन विभागाने धडक कारवाई केली. या तपासणीत विविध कंपन्यांच्या मुदतबाह्य ८ खाद्यवस्तू आढळून आल्याने त्या जप्त करण्यात आल्या आहेत. एका जागरूक ग्राहकाने २० जानेवारी रोजी या संदर्भात विभागाकडे तक्रार नोंदवली होती. त्यानुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या पथकाने ३० जानेवारी रोजी संबंधित दुकानाची झाडाझडती घेतली. यावेळी अन्न सुरक्षा मानकांचे उल्लंघन होत असल्याचे समोर आले. जप्त करण्यात आलेल्या वस्तूंमध्ये रवा, मैदा, बेसन यांसह विविध नामांकित कंपन्यांच्या नूडल्स आणि




स्नॅक्सचा समावेश आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

ग्राहकांनी कोणतीही वस्तू खरेदी करताना त्यावर तयार झालेली तारीख आणि मुदत संपण्याची तारीख तपासावी. तसेच खरेदीचे पक्के बिल घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. या प्रकरणातील पुढील कायदेशीर प्रक्रिया आणि खटल्याची तयारी विभागामार्फत सुरू आहे.

> वाडेगाव बसस्थानक परिसरातील किराणा दुकानात तपासणी केली असता ८ मुदतबाह्य वस्तू आढळून आल्या. याप्रकरणी न्यायनिर्णयासाठी खटला अमरावती येथील न्यायालयात दाखल करण्यात येत आहे. ग्राहकांनी खरेदीनंतर पक्के बिल घ्यावे, तसेच दुकानदारांनी बिल देणे अनिवार्य आहे.
>
> **रवींद्र सोळंके,**
> अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, अकोला.

**मुदतबाह्य आढळलेल्या वस्तू:**
विभागाने जप्त केलेल्या वस्तूंमध्ये कमांडर कंपनीचा रवा व मैदा, बटर पोहा, छत्री हळद पावडर, गोपाल बेसन, शेगी नूडल्स आणि हल्दीराम कंपनीचे आलू चिप्स व कुरकुरे यांचा समावेश आहे.

## ‘ऑपरेशन प्रहार’अंतर्गत माना पोलिसांची गावठी हातभट्टीवर धाड



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. १२ :** माना पोलीस स्टेशन हद्दीतील ग्राम कुरुम येथे अवैध गावठी दारू निर्मितीवर पोलिसांनी कारवाई करत एकास अटक केली. ही कारवाई ‘ऑपरेशन प्रहार’अंतर्गत करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास मिळालेल्या गुप्त माहितीनुसार ग्राम कुरुम येथे धाड टाकण्यात आली. यावेळी आरोपी राहुल अवधूत गवई (वय ३६, रा. कुरुम, ता. मूर्तिजापूर) याच्या ताब्यातून १० लिटर गावठी हातभट्टी दारू (किंमत रु. २,०००) तसेच ३६० लिटर सडवा मोहामाच (किंमत रु. ७२,०००) असा एकूण रु. ७४,००० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र प्रोहिबिशन अॅक्टच्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकार, पो. हे. कॉ. भड, पो. हे. कॉ. उमेश हरमकर आणि पो. कॉ. आकाश काळे यांनी सहभाग घेतला. पुढील तपास सुरू आहे.

## ब्रह्माकुमारीज केंद्रात महाशिवरात्रीनिमित्त बारा ज्योतिर्लिंग दर्शन



**अकोट : ब्रह्माकुमारीज गीतानगर, अकोट येथील स्थानिक सेवा केंद्रात महाशिवरात्रीनिमित्त भव्य बारा शिवज्योतिर्लिंग दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता ज्योतिर्लिंगांची स्थापना करण्यात येणार आहे. तसेच दि. १४ ते १६ फेब्रुवारीदरम्यान सकाळी ७ ते सायंकाळी ८ या वेळेत भाविकांना दर्शन घेता येणार आहे.महाशिवरात्री हा परमपिता परमात्मा ज्योतिर्स्वरूप शिवाच्या अवतरणाचा पावन उत्सव असल्याने भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्रसंचालिका जयश्री दीदी यांनी केले आहे.**

## मूर्तिजापुरात पाणी भरण्याच्या वादातून तुंबळ हाणामारी; लोखंडी पाईपने तरुण जखमी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. १२ :** शहरातील मोचीपुरा भागात नळावर पाणी भरण्याच्या किरकोळ कारणावरून दोन गटांत हाणामारी झाल्याची घटना बुधवारी रात्री घडली. या वादात मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या तरुणावर लोखंडी पाईपने हल्ला करण्यात आला असून, याप्रकरणी पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास फिर्यादी लक्ष्मी लखन पचारे (वय ४०) यांची पुतणी नळावर पाणी भरण्यासाठी गेली होती. यावेळी तिचे एका महिलेसोबत शाब्दिक भांडण झाले. हा वाद मिटवण्यासाठी फिर्यादीचे नातेवाईक गेले असता, दुसऱ्या गटातील व्यक्तींनी त्यांच्याशी वाद वाढवला.

वाद अधिक चिघळल्याने काही जणांनी मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. यावेळी आरोपी करण अनभोरे याने लोखंडी पाईपने अविनाश पचारे (लक्ष्मी पचारे यांचा मुलगा) याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात अविनाशच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली असून, त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. फिर्यादी लक्ष्मी पचारे यांच्या तक्रारीवरून मूर्तिजापूर शहर पोलिसांनी सागर पचारे (६०), शिवा शिवरकर (२५), आशिष अनभोरे (२२) आणि करण अनभोरे (२२), सर्व राहणार मोचीपुरा यांच्याविरुद्ध नोंदवला आहे. ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल प्रभाकर नागे या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

## देशव्यापी संपात तेल्हारा तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी सहभागी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. १२ :** केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या अकरा प्रमुख संघटना आणि अखिल भारतीय राज्य सरकारी महासंघाच्या आवाहनानुसार, विविध प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवार, १२ फ ब्रुवारी रोजी देशव्यापी संपाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनात अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले असून, यासंदर्भात प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे.




केंद्र व राज्य सरकारविरोधात पुकारलेल्या या संपात प्रामुख्याने चार कामगार संहिता रद्द करणे, पिएफआरडीए कायदा मागे घेणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणे, आठवा वेतन आयोग तातडीने लागू करणे, विविध विभागांतील रिक्त पदे भरणे आणि सर्व कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे या मागण्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या या आंदोलनात महाराष्ट्र ग्रामसेवक युनियन सहभागी होत आहे. तालुक्यातील कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी वगळता, सर्व नियमित ग्रामपंचायत अधिकारी या संपात सहभागी राहतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन, तालुका तेल्हारा यांच्या वतीने गटविकास अधिकारी आणि तहसीलदार यांना या संपाबाबतचे अधिकृत निवेदन सादर करण्यात आले आहे.

## पीक विमा प्रकरणी किसान संघाचा कृषी विभागाला जाब

### १० दिवसांत १००% भरपाईचे आश्वासन; अमरावतीत विभागीय कृषी संचालकांसोबत बैठक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. १२ :** तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पीक विमा तक्रारींच्या पार्श्वभूमीवर, बुधवारी (११ फेब्रुवारी) अमरावती येथे विभागीय कृषी संचालक डॉ. घोरपडे यांच्या दालनात भारतीय किसान संघ व शेतकरी प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत विमा दावे, प्रलंबित पंचनामे आणि शेतकऱ्यांना मिळालेली अपुरी भरपाई या मुद्द्यांवरून प्रशासनाला धारेवर धरण्यात आले.



सन २०२३ च्या खरीप व रब्बी हंगामातील ज्या शेतकऱ्यांचे पंचनामे अद्याप प्रलंबित आहेत किंवा ज्यांना अत्यंत कमी भरपाई मिळाली आहे, अशा सर्व प्रकरणांचा निपटारा करून पुढील १० दिवसांत १०० टक्के नुकसानभरपाई देण्याचे लेखी आश्वासन विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी यावेळी दिले. तसेच सन २०२४ च्या खरीप हंगामातील व्हाईट स्प्रेड संदर्भातील तक्रारींचा अहवाल तातडीने वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात येईल, असे कृषी विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

अकोला जिल्ह्यातील हजारो शेतकरी अद्यापही विमा लाभापासून वंचित असल्याचा मुद्दा किसान संघाने आक्रमकपणे मांडला. प्रशासनाने दिलेल्या १० दिवसांच्या मुदतीत जर आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भारतीय किसान संघाने दिला आहे. बैठकीस कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, विमा कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी आणि किसान संघाचे पदाधिकारी यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

आदर्श | वरपक्षाने उचलला लग्नाचा सर्व खर्च

## आदर्श हुंडामुक्त विवाह सोहळा; पद्मश्री शंकरबाबा पापडकरांची उपस्थिती

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. १२ :** हुंडाबळी आणि लग्नावरील भरमसाठ खर्चाच्या जमान्यात, मूर्तिजापूर येथे पार पडलेल्या एका आगळ्यावेगळ्या विवाह सोहळ्याने समाजासमोर नवा आदर्श उभा केला आहे. स्थानिक मंगल कार्यालयात बुधवारी सागर नारायण चहाकर यांचा विवाह अमरावती येथील कु. सायली सविताबाई तिडके यांच्याशी कोणतीही देवाणघेवाण न करता आणि हुंडामुक्त पद्धतीने संपन्न झाला.



वधू सायली तिडके यांची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने, मुलीच्या विवाहाचा मोठा प्रश्न त्यांच्या आईसमोर उभा होता. ही बाब समजताच वरपक्षाने समाजाप्रति आपली बांधिलकी जपत हुंडा तर नाकारलाच, शिवाय विवाहाचा संपूर्ण खर्चही स्वतः उचलत सामाजिक संदेश दिला. या विवाह सोहळ्याने उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तर आणलेच, पण माणुसकीचे दर्शनही घडवले.

या मंगल सोहळ्याला पद्मश्री शंकरबाबा पापडकर, आमदार हरीश मारोतीआप्पा पिंपळे, माजी नगराध्यक्ष हर्षल साबळे तसेच उपविभागीय अधिकारी संदीप अपार प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांनी नवदांपत्याचे औक्षण करून त्यांना सुखी संसारासाठी शुभेच्छा दिल्या.

विवाह सोहळ्यादरम्यान उपविभागीय अधिकारी संदीप अपार यांनी पद्मश्री शंकरबाबा पापडकर यांचे आपल्या कार्यालयात स्वागत केले. यावेळी शंकरबाबांनी समाजातील अशा विधायक उपक्रमांचे कौतुक केले. हुंडामुक्त विवाहासारख्या धाडसी कृतींमुळेच तरुण पिढीसमोर खऱ्या अर्थाने आदर्श निर्माण होतो, असे मत शंकरबाबांनी यावेळी व्यक्त केले.

## बाळापुरात बस अन् कारची समोरासमोर धडक; सुदैवाने मोठी जीवितहानी टळली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बाळापूर, दि. १२ :** शहरात गुरुवारी, १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजेच्या सुमारास राज्य परिवहन महामंडळाच्या बसला एका कारने जोराची धडक दिली. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असले, तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोला/बाळापूरहून खामगावकडे निघालेली एमएच-२० बीएल-१८२२ क्रमांकाची बस महामार्गावरून जात असताना, समोरून येणाऱ्या एमएच-१२ डीएस-४१८८ क्रमांकाच्या कारने बसला धडक दिली. धडक बसताच बसमधील प्रवासी आणि परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ गोंधळ निर्माण झाला होता. सुदैवाने, या अपघातात दोन्ही वाहनांचे चालक व प्रवासी सुखरूप बचावले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच बाळापूर वाहतूक शाखेचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहोचले. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती, मात्र पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून रस्ता मोकळा केला. संबंधित वाहनचालकांविरुद्ध कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. वाहनचालकांनी विशेषतः सायंकाळच्या वेळी रस्त्यावरून वाहन चालवताना वेगावर नियंत्रण ठेवावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# बाजारात तुरीचा ओघ वाढला; महिन्याभरात ३०० रुपयांची घसरण

## ८,४०० वरून दर ८,१५० वर; नवीन तुरीच्या हमीभावाबाबत संभ्रम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १२ :** हवामानातील चढ-उताराचा सामना करून कष्टाने पिकवलेला माल जेव्हा बाजारपेठेत येतो, तेव्हा दराची अनिश्चितता शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेली असते. वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सध्या नेमकी हीच स्थिती पाहायला मिळत आहे. जानेवारी महिन्याच्या मध्यावर जोमात असलेले तुरीचे दर नवीन आवक वाढताच कोसळू लागले आहेत. अवघ्या सव्वा महिन्यात तुरीच्या आवकीत तब्बल १७ पट वाढ झाली असून, परिणामी कमाल दरात प्रति क्विंटल ३०० ते ४०० रुपयांची घसरण झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितात मोठी तूट निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत.

जानेवारीच्या प्रारंभी बाजार समितीत तुरीचा हंगाम संथ गतीने सुरू होता. १ जानेवारी रोजी तुरीची आवक केवळ २०० क्विंटल इतकी नाममात्र होती, तर दर ६,८१० रुपयांपर्यंत होते. मात्र, जानेवारीच्या उत्तरार्धात नवीन तुरीचा ओघ वाढू लागला. २७ जानेवारी रोजी ही आवक २,५०० क्विंटलवर पोहोचली आणि दराने ८,४४० रुपयांचा उच्चांकी टप्पा गाठला. परंतु, हा आनंद अल्पजीवी ठरला. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत, म्हणजेच ११ फेब्रुवारीपर्यंत आवक ३,५०० क्विंटलवर पोहोचताच बाजार कोसळला आणि कमाल दर ८,१५० रुपयांपर्यंत खाली आले. आवक वाढल्यामुळे बाजारात मालाचा साठा वाढला असून, याचा थेट फटका दरांना बसला आहे.

### जुन्या व नवीन तुरीच्या दरातील तफावत

बाजारात सध्या नवीन तुरीसोबतच साठवणुकीतील जुनी तूरही विक्रीसाठी येत आहे. नवीन तुरीचे दर ८,१५० रुपयांच्या दरम्यान असले तरी जुन्या तुरीचे दर ७,२७० ते ७,८०० रुपयांच्या आसपास स्थिरावले आहेत. नवीन तुरीमध्ये आर्द्रतेचे (ओलावा) प्रमाण अधिक असल्याने आणि पुरवठा मोठ्या प्रमाणात होत असल्याने व्यापाऱ्यांनी दर कमी करण्यास सुरुवात केली आहे. सण-उत्सवाच्या काळात डाळींची मागणी वाढण्याची शक्यता असतानाही, स्थानिक बाजारपेठेत मात्र दर दबावाखाली असल्याचे चित्र आहे.

वाशिम जिल्हा हा तुरीच्या उत्पादनात महत्त्वाचा मानला जातो. मात्र, ऐन हंगामात दर कमी होत असल्याने उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. पीक काढणीचा खर्च, वाहतूक आणि मजुरी पाहता किमान ९,००० रुपयांचा दर मिळणे अपेक्षित असल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. आगामी काळात आवक आणखी वाढण्याची शक्यता असल्याने, शासनाने हस्तक्षेप करून हमीभावाचे संरक्षण द्यावे किंवा खरेदी केंद्रांची गती वाढवावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

**बाजारपेठेतील विश्लेषकांच्या मते, जागतिक बाजारपेठेतील कडधान्यांचे आयात धोरण आणि देशांतर्गत वाढलेली आवक यामुळे व्यापाऱ्यांनी थांबा आणि पहा ही भूमिका घेतली आहे. मोठे खरेदीदार आणि डाळ मिल मालक सध्या गरजेपुरतीच खरेदी करत आहेत. बाजारात मालाचा ओघ वाढत असताना मोठ्या बोली लावण्यास व्यापारी कचरत आहेत. दुसरीकडे, सोयाबीनच्या दराने ५,६०० रुपयांची पातळी गाठली असताना, तुरीच्या दरातील या घसरणीमुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.**

# वाशिममध्ये १५ फेब्रुवारीला खुली जलद बुद्धीबळ स्पर्धा



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १२ :** जिल्ह्यातील बुद्धीबळपटूंच्या गुणांना वाव देण्यासाठी चेस असोसिएशन वाशिम आणि पॉवर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १५ फेब्रुवारी रोजी एकदिवसीय खुल्या जलद बुद्धीबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. लाखाळा येथील रामा इंटरनॅशनल स्कूलमध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत ही स्पर्धा रंगणार आहे.

माजी आमदार तथा रामा इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे नियोजन करण्यात आले आहे. आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासासाठी आणि मेंदूला चालना देण्यासाठी बुद्धीबळ हा खेळ अत्यंत प्रभावी ठरतो. ही बाब विचारात घेऊन आंतरराष्ट्रीय नियमांनुसार या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांसाठी एकूण ६० हजार रुपयांची रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त ६१ चषक आणि ६० पदके देऊन खेळाडूंचा गौरव करण्यात येणार आहे. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व विशेष बक्षिसे राखीव ठेवण्यात आली आहेत.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त बुद्धीबळपटू आणि शालेय विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शाळेच्या मुख्याध्यापिका, चेस असोसिएशन वाशिम व पॉवर चेस अकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे. इच्छुकांनी आपली नोंदणी लवकरात लवकर पूर्ण करावी, असेही संयोजकांनी स्पष्ट केले आहे.

## महत्त्वाचे

### आप्पास्वामी मठावर १५ फेब्रुवारीला पंकज पाल महाराजांचे कीर्तन

**इंझोरी :** येथून जवळच असलेल्या जामदरा-तोरणाळा शेतशिवारातील निसर्गरम्य आप्पास्वामी मठ व महादेव मंदिर परिसरात महाशिवरात्रीनिमित्त जाहीर कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे कीर्तन शनिवार, १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११:०० वाजता संपन्न होणार आहे. याप्रसंगी सप्तखंजिरी वादक सत्यपाल महाराजांचे परम शिष्य ह.भ.प. पंकज पाल महाराज यांचे समाजप्रबोधनपर कीर्तन होईल. हास्य आणि प्रबोधनाचा मेळ घालत समाजातील अनिष्ट रूढी-परंपरांवर प्रहार करणाऱ्या या कीर्तनाचा लाभ जामदरा-तोरणाळा पंचक्रोशीतील सर्व महिला, पुरुष व नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आप्पास्वामी सेवा समितीने केले आहे.

### बारावीच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यात २० कॉपीबहाद्दर ताब्यात

**वाशिम :** राज्य मंडळाच्या बारावी परीक्षेच्या पहिल्याच दिवशी इंग्रजी विषयाच्या पेपरमध्ये जिल्ह्यात २० विद्यार्थी कॉपी करताना पकडले गेले. मानोरा तालुक्यातील दोन केंद्रांवर १९, तर किन्हीराजा येथे एका विद्यार्थ्यावर कारवाई करण्यात आली. सीसीटीव्ही असूनही कॉपीचे प्रकार घडल्याने आश्चर्य व्यक्त होत असून, खबरदारी म्हणून दोन केंद्रांवरील सर्व कर्मचाऱ्यांची तातडीने अदलाबदल करण्यात आली आहे.

### शिरपूर-रिसोड रस्त्यावरील पुलाखाली अनोळखी मृतदेह

**शिरपूर :** पोलिस ठाण्याच्या हद्दीतील किन्ही घोडमोड फाट्याजवळ १० फेब्रुवारी रोजी सकाळी एका ३५ ते ४० वर्षीय अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. मृताच्या शरीरावर मारहाणीच्या खुणा असल्याने घातपाताचा संशय व्यक्त होत आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी वाशिम जिल्हा रुग्णालयात पाठवला असून, मृताची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

### दोन किलो गांजासह युवकाला अटक

**शेलूबाजार :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शेलूबाजार परिसरात धाड टाकून दोन किलो गांजासह सोनू ऊर्फ शेख राजिक (२६) याला अटक केली. त्याच्याकडून ४० हजार रुपये किमतीचा अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ही कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणी मंगरूळपीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# परळीतील महा पशुधन एक्स्पोच्या लोगोचे अनावरण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**वाशिम, दि. १२ :** पशुसंवर्धन विभागाच्या वतीने परळी वैजनाथ (जि. बीड) येथे आगामी १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्स्पो २०२६ या भव्य प्रदर्शनाच्या अधिकृत लोगोचे अनावरण करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या सोहळ्याला जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि अर्पित चौहान यांची प्रमुख उपस्थिती होती.

पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असल्याचे नमूद करत जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर म्हणाले की, ''हे प्रदर्शन देशातील जातिवंत पशुधन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा एक आगळावेगळा संगम ठरणार आहे. दुग्ध व्यवसायातील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आणि आधुनिक व्यवस्थापन एकाच छताखाली पाहण्याची ही मोठी संधी असून, जिल्ह्यातील पशुपालक व तरुण उद्योजकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा.'' या प्रदर्शनात राज्यातील आणि परराज्यातील जातिवंत गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या तसेच पक्ष्यांच्या विविध प्रजातींचे दर्शन घडणार आहे. याशिवाय, आधुनिक डेअरी फार्मिंग, चारा व्यवस्थापन आणि प्रक्रिया उद्योगांचे भव्य स्टॉल्स हे या महोत्सवाचे आकर्षण असतील. पशुधनाचे आरोग्य, लसीकरण आणि वैज्ञानिक संगोपन या विषयावर तज्ज्ञ डॉक्टरांची व्याख्यानेही आयोजित करण्यात आली आहेत.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. तुषार बावणे, सहाय्यक आयुक्त डॉ. विलास पावडे आणि डॉ. राजेश निचळ यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या प्रदर्शनाची माहिती जिल्ह्यातील शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया आणि विविध माध्यमांतून व्यापक मोहीम राबवण्यात येत आहे. वाशिम जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या महोत्सवात सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# घरकुलांचे हप्ते तत्काळ द्या, अन्यथा तीव्र आंदोलन!

## राष्ट्रवादी काँग्रेसचा मालेगाव गटविकास अधिकाऱ्यांना इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मालेगाव, दि. १२ :** तालुक्यातील घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांचे गेल्या अनेक दिवसांपासून रखडलेले हप्ते तत्काळ अदा करावेत, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार) वतीने पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. येत्या आठ दिवसांत लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पक्षाने दिला आहे.

तालुक्यात अनेक गरीब व गरजू कुटुंबांची घरकुले प्रलंबित हप्त्यांमुळे अपूर्ण अवस्थेत आहेत. हप्ते वेळेवर मिळत नसल्याने बांधकाम साहित्याच्या वाढत्या किमती आणि मजुरीचा खर्च भागवताना लाभार्थ्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक कुटुंबांनी जुनी घरे पाडली असून हप्त्याअभावी नवीन घराचे काम रखडल्याने त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन आठ दिवसांच्या आत ठोस कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सतीश पाटील जाधव, ज्ञानेश्वर पाटील सावले, बंडू नवघरे, कार्याध्यक्ष उमेश आंधळे, शेषराव वाझुळकर, राजू कुटे, विजय घोडे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महात्मा फुले पुतळा विटंबना प्रकरण: इंझोरीत उमटले तीव्र पडसाद



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**इंझोरी, दि. १२ :** तेलंगणा राज्यात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्याची घटना समोर येताच, याचे तीव्र पडसाद इंझोरी येथे उमटले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता स्थानिक गांधी चौकात ग्रामस्थांच्या वतीने जाहीर निषेध सभा घेण्यात आली. स्त्री शिक्षणाचे प्रणेते आणि बहुजन समाजाचे उद्धारकर्ते महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना होणे, ही लोकशाहीला काळिमा फासणारी घटना असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. अशा समाजकंटकांमुळे सामाजिक सलोखा धोक्यात येत असून, तेलंगणा सरकार आणि संबंधित प्रशासनाने दोषींचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या निषेध आंदोलनात गावातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते, महिला आणि तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महापुरुषांचा अवमान करणाऱ्या प्रवृत्तींचा वेळीच बंदोबस्त न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी ग्रामस्थांनी दिला आहे.

# शिंगणापूर-सिंगडोह येथे सती सामकी माता यात्रेची सांगता

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**साखरडोह, दि. १२ :** येथून जवळच असलेल्या शिंगणापूर-सिंगडोह येथे सती सामकी माता संस्थानच्या वतीने आयोजित भव्य यात्रा महोत्सव आणि श्रीमद भागवत गीता कथा वाचन सोहळ्याची आज, १३ फेब्रुवारी रोजी सांगता होत आहे. यानिमित्त दुपारी १ वाजेपासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

गेल्या ३१ वर्षांपासून सुरू असलेल्या या परंपरेमुळे शिंगणापूर आणि सिंगडोह परिसरात धार्मिक चैतन्य पसरले आहे. ७ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या सोहळ्यात ह.भ.प. प्रल्हाद महाराज राठोड (जनुना, वाशिम) यांच्या मधुर वाणीतून भागवत कथेचे निरूपण करण्यात आले. त्यांना लक्ष्मण चौधरी (हार्मोनियम), पुंडलिक पांडे (तबला) आणि गायक श्रीकृष्ण ठाकरे यांनी संगीत साथ दिली.

भजनी मंडळांची रंगली मैफल सप्ताहादरम्यान रात्रीच्या सत्रात शिवलाल महाराज, चरण महाराज, अनिल महाराज (काजळेश्वर) आणि जय गुरुदेव भजनी मंडळ (कवठळ) यांनी बंजारा भजने सादर केली. अमोल महाराज (उंबरठा) यांनी सेवालाल महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित भजने सादर करून भाविकांची मने जिंकली. गुरुवारी तारासिंग महाराज आणि बाळू महाराज यांनी पारंपरिक बंजारा भजनांचे सादरीकरण केले.

सकाळी सती सामकी माता यांना भोग चढवल्यानंतर सोहळ्याची सांगता होईल. दुपारी १ वाजेपासून महाप्रसादाचे वाटप सुरू होईल. रात्री ८ वाजेनंतर बंजारा भजनी मंडळांचा सार्वत्रिक भजनाचा कार्यक्रम होणार असून, सहभागी प्रत्येक मंडळाला संस्थानतर्फे शाल, श्रीफळ आणि २५१ रुपये देऊन गौरविण्यात येणार आहे.

या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी रामराव नाईक, रमेश नाईक, रामधन नाईक, पप्पू कारभारी, तारासिंग कारभारी, प्रल्हाद कारभारी आणि संस्थानचे स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत.

## संत सेवालाल जयंती

## नियोजनात त्रुटी राहू नये; जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

# भाविकांच्या सोयीसाठी 'मास्टर प्लॅन' तयार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १२ :** बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पोहरादेवी (ता. मानोरा) येथे १४ फेब्रुवारी रोजी साजरा होणारा श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव २०२६ हा जिल्ह्याच्या सांस्कृतिक वैभवाचा मानबिंदू आहे. या महोत्सवात लाखो भाविकांची उपस्थिती लक्षात घेता, प्रशासकीय नियोजनात कोणतीही त्रुटी राहू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रत्यक्ष पोहरादेवी येथे भेट देऊन विविध विकासकामांची आणि सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली.

जिल्हाधिकारी कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या आढावा बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे आणि पर्यटन विभागाचे उपसंचालक विजय जाधव यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी सर्व विभागांनी परस्परांशी समन्वय राखून जबाबदारीने काम करावे, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

जिल्हाधिकारी म्हणाले की, ''हा केवळ एक उत्सव नसून जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. त्यामुळे किरकोळ उणिवांकडेही दुर्लक्ष न करता त्या तातडीने पूर्ण कराव्यात. भाविकांना सुरक्षित आणि सुसह्य वातावरण उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे.'' महोत्सवाच्या काळात गर्दीचे नियंत्रण करणे हे मोठे आव्हान असते. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी मास्टर प्लॅन आणि नकाशाद्वारे (मॅप) सखोल पाहणी केली. वाहनतळाचे (पार्किंग) नियोजन, पर्यायी मार्गांची निश्चिती आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाला विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. उपप्रादेशिक परिवहन विभागाने वाहतूक सुरळीत राहील, याची खबरदारी घ्यावी, असेही त्यांनी नमूद केले. लाखो भाविकांच्या सोयीसाठी आरोग्य विभागाने चोवीस तास वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका आणि प्राथमिक उपचार केंद्रे सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यक्रमस्थळ आणि संपर्क रस्त्यांची दुरुस्ती वेळेत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, महावितरणने अखंडित वीज पुरवठा सुनिश्चित करावा आणि पाणीपुरवठा विभागाने पिण्याच्या पाण्याची पुरेशी सोय करावी, असे नियोजन करण्यात आले आहे.

महोत्सव परिसरात स्वच्छतेला प्राधान्य दिले जाणार असून, नगरपालिका प्रशासनाने विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, असे निर्देश डॉ. बाबुराव बिक्कड यांना देण्यात आले. तीर्थक्षेत्राचे पावित्र्य राखण्यासाठी आणि प्लॅस्टिकमुक्त परिसर ठेवण्यासाठी प्रशासनाकडून विशेष पावले उचलली जात आहेत.

या बैठकीला उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, कार्यकारी अभियंता जीवन चव्हाण, शुभम जोशी, संग्राम जगताप यांच्यासह मंदिर ट्रस्टचे विश्वस्त आणि नोडल अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. काही अधिकाऱ्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) सहभाग नोंदवून आपल्या विभागाचा प्रगती अहवाल सादर केला.

# वैष्णवी दीदींच्या अमृतवाणीतून कथा श्रवणासाठी भाविकांची गर्दी



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**इंझोरी, दि. १२ :** येथील निसर्गरम्य श्री क्षेत्र गोमुखेश्वर महादेव संस्थानवर १० फेब्रुवारीपासून संगीतमय शिवमहापुराण कथेला मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. अकोट येथील प्रख्यात प्रवचनकार ह.भ.प. वैष्णवी किशोरी दीदी (अबोडाकर) यांच्या अमृतवाणीतून ही कथा रंगत आहे. कथेच्या पहिल्या दिवशी दुपारी १२ वाजता ग्रंथपूजन सोहळा पार पडला. यामध्ये इंझोरीसह वाघोळा, वाकी, उंबरडा, अजनी, जामदरा, तोरणाळा, म्हसनी, चौसाळा, दापुरा व गिरडा येथील २५ दांपत्यांनी सपत्नीक सहभाग घेऊन पोथीचे पूजन केले. या संगीतमय कथेला गायनाचार्य प्रवीण महाराज सोनोने, प्रद्युम महाराज राऊत (तबला), वैभव महाराज नवले (कीबोर्ड), जयेश महाराज भुस्कट (पॅड) आणि सुनील महाराज बुटे (वेशभूषा) यांची उत्कृष्ट साथ लाभत आहे. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या आध्यात्मिक सोहळ्याला इंझोरी पंचक्रोशीतील भाविक, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असून संपूर्ण परिसर शिवमय झाला आहे.

# अकोट - अकोला महामार्गावर मृत्यूचे सापळे; रेल्वे पूल ते पैलवान बाबा मंदिरापर्यंत खड्ड्यांचे साम्राज्य

## रस्त्याच्या कडेला अनधिकृत खोदकामामुळे धोका वाढला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. १२ :** अकोट ते अकोला या महत्त्वाच्या महामार्गावर सध्या खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून, प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः रेल्वे उड्डाणपुलापासून ते पैलवान बाबा मंदिर परिसरापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या साईड शोल्डरची अत्यंत दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी डांबरी रस्त्याला लागूनच मोठमोठे चर पडल्याने अपघातांची मालिका सुरूच असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.



या परिसरात काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे खोदकाम करण्यात आल्याचे धक्कादायक वास्तव निदर्शनास येत आहे. काही घटकांनी स्वतःच्या सोयीसाठी रस्त्याचा कडेचा भाग जेसीबीच्या साहाय्याने उखडल्यामुळे महामार्गाची मूळ रचनाच खराब झाली आहे. यामुळे मुख्य रस्त्याची उंची आणि बाजूचा कच्चा भाग यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. परिणामी, समोरून येणाऱ्या वाहनाला जागा देताना दुचाकी व चारचाकी वाहने खाली उतरवल्यास ती थेट घसरून भीषण अपघात घडत आहेत. अशा प्रकारे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी सुज्ञ नागरिक करत आहेत.

हा मार्ग अकोला जिल्ह्याला जोडणारा प्रमुख दुवा असल्याने येथे २४ तास जड वाहनांची मोठी वर्दळ असते. रात्रीच्या वेळी हे खड्डे आणि साईड शोल्डरमधील खोल चर वाहनचालकांच्या लक्षात येत नाहीत. यामुळे चालकांचे नियंत्रण सुटून वाहन उलटण्याच्या घटना वाढल्या आहेत. स्थानिक नागरिकांच्या मते, या रस्त्याची तातडीने डागडुजी न केल्यास मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रस्त्याच्या या गंभीर दुरवस्थेबाबत वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून केवळ तात्पुरती मलमपट्टी केली जात असल्याचा आरोप वाहनचालक करत आहेत. साईड शोल्डरमध्ये तातडीने मुरूम भरून रस्ता समतोल करावा आणि अनधिकृत खोदकाम करून रस्ता खराब करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी केली आहे.

# परी बिंदी घर घटनेचा नारी शक्ती फाउंडेशनतर्फे निषेध

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. १२ :** गांधी रोडवरील 'परी बिंदी घर' येथे नुकत्याच घडलेल्या घटनेचा नारी शक्ती सेवा फाउंडेशनच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि महिला आयोगाकडे निवेदनाद्वारे दाद मागण्यात आली आहे.

**सखोल चौकशीची मागणी**

या संदर्भात बोलताना फाउंडेशनच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुमय्या अली यांनी सांगितले की, प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून खरी सत्यता जनतेसमोर आणली पाहिजे.अपराध्याची सुटका होऊ नये आणि कोणत्याही निरपराध्याला विनाकारण शिक्षा होऊ नये, याची दक्षता घेणे ही काळाची गरज आहे, अशी आग्रही भूमिका त्यांनी मांडली. कोणत्याही घटनेचे राजकारण करणे किंवा तिला जातीय रंग देण्यापेक्षा, सर्वांनी एकत्र येऊन पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. महिलांनी अशा प्रसंगी धैर्याने पुढे यावे; त्यांच्यावर अन्याय झाल्यास नारी शक्ती सेवा फाउंडेशनच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी नमूद केले. पीडित महिलांना कायद्याच्या चौकटीत राहून सर्वतोपरी मदत आणि मार्गदर्शन केले जाईल, असा विश्वासही सुमय्या अली यांनी दिला.

## महत्त्वाचे

### श्री शिवाजी महाविद्यालयाची खेळाडू राज्यस्तरावर तृतीय



**अकोट** : सातारा येथील श्रीमंत छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलात दि. २ व ३ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय पावरलिफ्टिंग स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालय, अकोटच्या कु. वेदिका तेलगोटे हिने उल्लेखनीय यश संपादन केले. ४७ किलो वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत तिने राज्यस्तरावर तिसरा क्रमांक पटकावला. स्पर्धेत महाविद्यालयातील खेळाडूंनी विविध गटांत सहभाग नोंदविला. १९ वर्षीय गटात कु. वेदिका लाखे, ५२ किलो वजन गटात कु. वेदिका तेलगोटे आणि ६६ किलो वजन गटात प्रथमेश अस्वार यांनी आपली क्षमता आजमावली. यापैकी कु. वेदिका तेलगोटे हिच्या यशामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य डॉ. सुनील पांडे, उपप्राचार्य डॉ. संजय कोल्हे, शारीरिक शिक्षण संचालक प्रफुल्ल देशमुख, प्रशिक्षक नयन करवते तसेच प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### वीरभद्र तीर्थक्षेत्र कासोद-अमोना येथे महाशिवरात्री निमित्त यात्रा महोत्सव

**अकोट** : श्री वीरभद्र तीर्थक्षेत्र, कासोद-अमोना येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्री निमित्त भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेनिमित्त सकाळी ८ वाजता श्री वीरभद्र स्वामी पूजन व रुद्राभिषेक होणार आहे. सकाळी ११ वाजता भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ५ वाजता प्रा. डॉ. सचितानंद बिचेवार यांचे 'समाज उन्नतीसाठी महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची गरज' या विषयावर व्याख्यान होईल. सायंकाळी ६ वाजता संस्थानतर्फे मान्यवरांचा सत्कार सोहळा पार पडणार आहे. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र वीरशैव सभेचे अध्यक्ष प्रा. विश्वनाथ हजारे राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून आ. प्रकाश भारसाकळे, आ. हरीश आप्पा पिंपळे, उपविभागीय पोलिस अधिकारी निखिल पाटील, ठाणेदार किशोर जुनघरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रात्री ८ वाजता डॉ. रामपाल धारकर महाराज यांचा समाज प्रबोधन व व्यसनमुक्ती कार्यक्रम होईल. रात्री १० वाजता श. ब्र. १०८ गुरु शिवशंकर शिवाचार्य महाराज यांचे प्रवचन व आशीर्वचन होणार आहे. सोमवारी (दि. १६) सकाळी १० वाजता वीरफळी महोत्सव व ११ वाजता नैवेद्य अर्पणाने कार्यक्रमाची सांगता होईल.

# वाडेगावच्या एल. एन. कला महाविद्यालयात बारावीची परीक्षा सीसीटीव्हीच्या निगराणीत

## केंद्र प्रशासनाकडून कॉपीमुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दिग्रस बु., दि. १२ :** बाळापूर तालुक्यातील वाडेगाव येथील एल. एन. कला महाविद्यालयात बारावीच्या परीक्षेला शिस्तबद्ध वातावरणात सुरुवात झाली. गुरुवारी पार पडलेला इंग्रजी विषयाचा पेपर केंद्रातील सर्व वर्गांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या कडक निगराणीखाली आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडला.

राज्य मंडळाने जाहीर केलेले 'कॉपीमुक्त' अभियान या केंद्रावर प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. परीक्षेदरम्यान कोणताही गोंधळ किंवा गैरप्रकार घडू नये, यासाठी केंद्र प्रशासनाने चोख व्यवस्था केली होती. विद्यार्थ्यांनीही कोणत्याही दबावाशिवाय आणि शिस्तबद्ध पद्धतीने पेपर दिल्याने केंद्र संचालकांनी समाधान व्यक्त केले आहे. ग्रामीण भागातील या परीक्षा केंद्रावर राबविण्यात आलेल्या पारदर्शक प्रक्रियेचे पालकांमधून कौतुक होत आहे.




# डॉ. राठोड महाविद्यालयात वारली चित्रातून साकारले निसर्ग-मानव नाते!

## वनस्पतीशास्त्र विभागाचा उपक्रम; पृथ्वी, वन आणि सामंजस्य प्रदर्शनाला प्रतिसाद

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर , दि. १२ :** निसर्ग, वन आणि मानवी जीवन यांच्यातील दृढ नाते अधोरेखित करण्यासाठी स्थानिक श्री डॉ. आर. जी. राठोड कला व विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाने पृथ्वी, वन आणि सामंजस्य : एक वारली अभिव्यक्ती या आगळ्यावेगळ्या चित्रप्रदर्शनाचे आयोजन केले होते. भारतीय ज्ञानपरंपरेचा वारसा जपणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कलात्मक अभिव्यक्तीने न्हाऊन निघाला.



पारंपरिक वारली लोककलेच्या माध्यमातून पर्यावरणाविषयी जनजागृती करणे, हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांनी वारली शैलीत चित्रे काढून वनसंपदा, जैवविविधता, शाश्वत जीवनशैली आणि आदिवासी जीवनातील पर्यावरणीय समतोल अतिशय प्रभावीपणे मांडला. भारतीय ज्ञानपरंपरेतील पर्यावरणस्नेही जीवनदृष्टी आणि लोकज्ञानाचे महत्त्व या प्रदर्शनातून अधोरेखित झाले.

या प्रदर्शनाचे परीक्षण विजय पवार, डॉ. तृप्ती तट्टे आणि डॉ. पूनम गुल्हाने यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतीतील मौलिकता आणि विषयाच्या मांडणीचे विशेष कौतुक केले. वारली कलेचा सांस्कृतिक व पर्यावरणीय संदर्भही परीक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या यशस्वी उपक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती दमयंतीबाई राठोड व सचिव डॉ. ए. आर. राठोड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. रुपाली शिरसाट यांनी केले. त्यांनी प्राचार्य, परीक्षक मंडळ, प्राध्यापक सहकारी व सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानले. कला, संस्कृती आणि विज्ञान यांचा सुंदर संगम साधणारे हे प्रदर्शन शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून अत्यंत यशस्वी ठरले.



बाळापूर: शाळेकरी मुलांच्या जिवाशी खेळत आहेत वहान चालक . (छाया: चंदन जंजाळ)

# सहा वर्षीय मुलगा गंभीर जखमी; उपचारासाठी मदतीची गरज

**अकोट** : परतवाडाबहिरम मार्गावर दि. २ फेब्रुवारी रोजी झालेल्या दुर्दैवी अपघातात अकोट तालुक्यातील जनुना येथील जीवन पांडुरंग बेलसरे यांचा मृत्यू झाला, तर त्यांची पत्नी व सहा वर्षीय मुलगा अमर गंभीर जखमी झाले. समोरून येणाऱ्या मोटरसायकलची जोरदार धडक बसल्याने हा अपघात घडला. अपघातात दोन्ही वाहनचालकांचा घटनास्थळी मृत्यू झाल्याची माहिती मिळाली.

जखमी अमरवर प्रारंभी अमरावती येथील खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. आतापर्यंत सुमारे दीड लाख रुपयांचा खर्च झाला असून पुढील उपचारासाठी मोठ्या आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. अमरच्या आईच्या दोन्ही पायांवर शस्त्रक्रिया करण्यात आली असून मुलगा अद्याप उपचाराधीन आहे.

दरम्यान, काही सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने अमरला पंजाबराव देशमुख रुग्णालय व अनुसंधान केंद्र, अमरावती येथे दाखल करण्यात आले आहे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने दानशूर व्यक्ती व सामाजिक संस्थांनी मदतीचा हात द्यावा, लोकेश शामराव खोटे फोन पे नं.९५२९१४२५८२ या नंबर वर पाठवून सहकार्य करण्यात यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# अकोल्याच्या नभात खगोलीय घटनांची पर्वणी; वसंतात बहरतोय आसमंत




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** ऋतूराज वसंताच्या आगमनाने निसर्गासोबतच आता आसमंतही सज्ज झाला असून, आकाशात विविध मनोहारी खगोलीय घटनांची साथ लाभत आहे. या मनमोहक दृश्यांचा खगोलप्रेमींनी मनसोक्त आनंद घ्यावा, असे आवाहन विश्वभारती विज्ञान केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

**१७ फेब्रुवारीला वर्षातील पहिले सूर्यग्रहण**

येत्या १७ फेब्रुवारी रोजी माघी अमावस्येच्या निमित्ताने यंदाच्या वर्षातील पहिले सूर्यग्रहण होणार आहे. हे ग्रहण अंटार्क्टिका परिसरात कंकणाकृती, तर प्रशांत व हिंदी महासागरालगतच्या काही भागांत खंडग्रास स्वरूपात दिसेल. मात्र, हे सूर्यग्रहण भारतातून दिसणार नसल्याची माहिती खगोल अभ्यासकांनी दिली आहे.

**ग्रहांची मांदियाळी**

याच दरम्यान मीन राशीत शनी ग्रहासोबतच बुध आणि शुक्र ग्रहांचेही मनोहारी दर्शन घडत आहे.

हे तिन्ही ग्रह साध्या डोळ्यांनी पाहता येतात. तसेच, पूर्व आकाशात गुरु ग्रह आपल्या तेजस्वी रूपाने खगोलप्रेमींचे लक्ष वेधून घेत आहे.

### आकाशात नव्या पाहुण्याचे आगमन

सध्या दक्षिण-पश्चिम आकाशात सायंकाळी २२४ अंशांवर सी/२०२४ ई१' हा नवा धूमकेतू पाहता येत आहे. उर्ट क्लाऊडमधून आलेला हा धूमकेतू दीर्घ कालावधीनंतर सूर्याभोवतीची प्रदक्षिणा पूर्ण करत आहे. पोलंडचे खगोल अभ्यासक कॅस्पर विअर्सचोस यांनी गेल्या वर्षी मार्च महिन्यात याचा शोध लावला होता. आकार लहान असल्याने हा धूमकेतू पाहण्यासाठी मोठ्या दुर्बिणीची आवश्यकता भासणार आहे.

**स्नेहसंमेलन** विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी शिवर नगरी मंत्रमुग्ध; मान्यवरांची उपस्थिती

# शिवरच्या एल. एन. पी. कॉन्व्हेंटमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचा धडाका

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शिवर, दि. १२ :** येथील एल. एन. पी. कॉन्व्हेंटमध्ये गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या सोहळ्याचे उद्घाटन गजानन महाराज संस्थानचे ह. भ. प. धनंजय मोरखडे महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. एका छोट्या गावातील इंग्रजी शाळेचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले.




कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दत्तात्रय मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जगदीशभाऊ मुरूमकर, बालहक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य ॲड. संजय सेंगर, बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा अनिता शिंदे, केंद्रप्रमुख किशोर वानखेडे, प्रा. श्रीराम पालकर, डॉ. गणेश थोरात, सुरेंद्र हुंडीवाले, रवींद्र हुंडीवाले, संस्थेच्या उपाध्यक्षा आशाताई पिंजरकर, सचिव श्रीकांत पिंजरकर, सदस्य प्रशांत पिंजरकर, सदस्या शुभांगी पिंजरकर, उमेश शिरसाठ, स्वेता शिरसाठ व करण पळसपगार उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल करण पळसपगार आणि ऋतिका देशमुख यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. शुभांगी घुगरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ४ थी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लेझीमच्या चित्तथरारक मनोऱ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.



सरस्वती वंदनेने सुरू झालेल्या या मैफलीत विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, कोळी गीत, शेतकरी नृत्य, विनोदी गीते आणि देवीचा गोंधळ अशा विविध कलाकृती सादर केल्या. मुख्याध्यापक नरेंद्र पाटोळे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन श्रुती टापरे व नीलिमा देशमुख यांनी, तर आभार प्रदर्शन साक्षी उपासे यांनी केले. कार्यक्रमासाठी निखिलेश ढोरे, विशाल इंगळे, शुभांगी घुगरे, अपेक्षा भोलवणकर, सरिता बढे, प्रणाली हुंडीवाले, अंकिता यमगवळी, अश्विनी भोलवणकर, सोनिया विश्वकर्मा, गौरी भागवत, माधुरी चंद्रे आणि सपना राऊत यांनी परिश्रम घेतले. सोहळ्याला पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, शुक्रवार, दि.१३,फेब्रुवारी २०२६



## महत्वाचे

### रेतीची अवैध वाहतूक; वाहन पकडले

**खामगाव :** ११ फेब्रुवारी रोजी गुन्हे शाखेचे पोहेकों राजेंद्र टेकाळे यांनी शेगावच्या सातपुडा कॉलेजसमोर वाहन क्रमांक एम. एच. २८ बी.बी. ३४५९ पकडले. त्यामध्ये विनापरवाना रेतीची वाहतूक अवैधरित्या होत असल्याचे समोर आले. याप्रकरणी शेगाव पोलिसात भास्कर शिवराम बघे रा. मानेगाव याचेविरुद्ध गुन्हा दाखल करुन वाहनासह १५ लाख १० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### वडोदा येथील तरुणी बेपत्ता

**मलकापूर :** तालुक्यातील वडोदा येथील २० वर्षीय मुलगी आसमी ही मावशीकडे राहत होती. मध्यप्रदेशातील रामपूर जि. शिंदी येथील कमलेश कौल, गणपत कौल यांनी ग्रामीण पोलिसात तक्रार दिली की, त्यांची मुलगी आसमी ही ८ फेब्रुवारी रोजी बडोदा येथून कुणाला काही न सांगता घरुन निघून गेली. पोलिसांनी याप्रकरणी काल ११ फेब्रुवारी रोजी हरविल्याची नोंद घेतली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक उल्हास मुके हे करीत आहेत.

### संशयित युवकाविरुद्ध पोलिसांची कारवाई

**खामगाव :** १२ फेब्रुवारीच्या रात्री ३ वाजताच्या दरम्यान पोकों अंकुश गुरुदेव हे टिमसह पेट्रोलिंग करीत असतांना, चांदमारी येथील गणपती मंदिरासमोर तरुणाला अटक केली. शिवा कैलास ईटे वय २० रा. बाळापूर फैल हा पोलिसांना पाहून पळत सुटला. पोलिसांनी पाठलाग केला असता, तो अंधारात लपला. त्यास पकडल्यानंतर चुकीचे नाव सांगितले. याप्रकरणी शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम १२२ मपोका कायद्यान्वये कारवाई केली.

### गळफास घेवून मोताळा येथे इसमाची आत्महत्या

**खामगाव :** मोताळा तालुक्यातील खरबडी येथे निना वासुदेव किनगे या ४५ वर्षीय इसमाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी ९ वाजता दरम्यान उघडकीस आली. पीठ गिरणीच्या खोलीमध्ये पंख्याला दोरी बांधून गळफास घेवून आत्महत्या केल्याची फिर्याद विजय नारायण किनगे यांनी पोलिसात दिली. बोराखेडी पोलिसांनी मर्ग दाखल केला असून पुढील तपास पोहेकों अमोल खराडे हे करीत आहे.

### वंचितच्या ग्रामशाखा फलकाचे अनावरण

**नांदुरा :** तालुक्यातील फुली येथे रमाबाई आंबेडकर जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडीच्या नामफलकाचे अनावरण ८ फेब्रुवारी रोजी जिल्हाध्यक्षा विशाखा सावंग यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेची स्थानिक विहार ते बस थांब्यापर्यंत मिरवणूकही काढण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिराचाही अनेकांनी लाभ घेतला. तसेच जिल्हाध्यक्षा विशाखा सावंग, छाया बांगर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी नलिनी इंगळे, अनिल धुंदळे, मोहन पाटील, डॉ. मोहम्मद जमीर, भगवान इंगळे, अजाबराव गाढे, इंदुबाई मेढे, सुगंधा इंगळे, माया मेढे, अंजना इंगळे या व इतरांची उपस्थिती होती.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | २०२५ - २०९६ |
| गहू | २२५० - २८५० |
| तुर | ५००० - ८३०० |
| हरभरा | ५३०० - ५४५० |
| सोयाबीन | ४१०० - ६३७५ |
| उडीद | ४००० - ६३५० |
| मुग | ५५०० - ५५०० |
| मका | १६०० - १६०० |

# शिवरायांच्या विवाहस्मृतीचा देशातील पहिला उत्सव होणार जल्लोषात

## वाढीव निधीसाठी पाठपुरावा करणार - पालकमंत्री पाटील

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१२ :** छत्रपती शिवाजी महाराजांविषयी देशभरात अनेक प्रकारचे स्मरणोत्सव, जयंती सोहळे, विजय दिन, गडकोट संवर्धन मोहीमा आणि ऐतिहासिक व्याख्याने होत असतात. परंतु शिवरायांच्या जीवनातील अत्यंत महत्वाच्या आणि भावनिक घटनेशी निगडित असा बुलडाणा जिल्ह्यातील ''विवाह स्मृती सोहळा'' अर्थात करवंड महोत्सव , करवंड या गावी मोठ्या जल्लोषात साजरा होत आहे. ही अभिमानाची आणि ऐतिहासिक अशी घटना ठरत आहे.या महोत्सवाच्या तयारीला वेग आला आहे.

तयारीसाठी महोत्सवाचे संकल्पक व बावन बुरजी बचाव कृती समितीचे अध्यक्ष सुनील जावंजाळ पाटील,अरविंद बापू देशमुख,हरीरुद्र राजे इंगळे आणि सर्वच सहकाऱ्यांसह ग्रामस्थ कामाला लागले आहे. इ.स. १५ एप्रिल १६५६ हा दिवस स्वराज्याच्या इतिहासातील एक विशेष दिवस ठरला. याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराज आणि गुणवंताबाई इंगळे करवंड यांचा विवाह पार पडला होता. या विवाह तिथीचा धागा पकडत शिवरायांच्या सासुरवाडी असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील करवंड या ऐतिहासिक गावात येत्या १५ एप्रिल २०२६ रोजी भव्य ''करवं ड महोत्सव'' आयोजित करण्यात आला आहे.



### बुलडाणा जिल्हा शिवरायांचे आजोळ आणि सासर

करवंड हे गाव फक्त भौगोलिक स्थान नाही, तर ते स्वराज्याच्या इतिहासाशी जोडलेले एक भावनिक केंद्र आहे. याच गावातील स्वराज्याचे निष्ठावंत सरदार श्री शिवाजीराव इंगळे हे शिवाजी महाराजांचे सासरे होते. स्वराज्य उभारणीच्या कार्यात त्यांनी दिलेले योगदान मोठे होते. त्यांच्या कन्या गुणवंताबाई इंगळे यांचा विवाह शिवरायांशी होऊन या गावाला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले. म्हणूनच करवंड ही केवळ सासुरवाडी नाही तर ती शिवस्मृतींची पवित्र भूमी आहे. येथे प्रत्येक कणात शिवभक्ती आणि इतिहासाची साक्ष दडलेली आहे.आजपर्यंत देशभरात शिवाजी महाराजांशी संबंधित अनेक कार्यक्रम झाले, पण त्यांच्या विवाह तिथीवर आधारित असा राष्ट्रीय स्तरावरील सोहळा प्रथमच आयोजित होत आहे. या अनोख्या संकल्पनेमुळे शिवभक्तांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. देशभरातून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत चौकशीचे फोन येत असून अनेक शिवप्रेमी या सोहळ्यास साक्षी राहण्यासाठी उत्सुक आहेत.

### गावकऱ्यांचा श्रमपरिहार गढी पुन्हा उजळतेय

करवंड गावात सध्या उत्साहाचे लाट उसळल्या आहेत. गावकरी स्वतःहून पुढे येऊन गढी परिसर स्वच्छता व संवर्धन मोहिमेत सहभागी झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून श्रमदानातून गढीची साफसफाई, परिसर सुशोभीकरण आणि तयारीचे काम जोमाने सुरू आहे. हा उपक्रम फक्त कार्यक्रमापुरता मर्यादित नसून तो इतिहास जपण्याच्या सामूहिक जाणीवेचा जागर आहे. सरपंच, पोलीस पाटील, हे स्वतः जातीने दिवसभर गढी स्थळी उभे राहून जातीने लक्षपूर्वीत आहेत.या गावाला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले.म्हणूनच करवंड ही केवळ सासुरवाडी नाही तर ती शिवस्मृतींची पवित्र भूमी आहे. येथे प्रत्येक कणात शिवभक्ती आणि इतिहासाची साक्ष दडलेली आहे. आजपर्यंत देशभरात शिवाजी महाराजांशी संबंधित अनेक कार्यक्रम झाले, पण त्यांच्या विवाह तिथीवर आधारित असा राष्ट्रीय स्तरावरील सोहळा प्रथमच आयोजित होत आहे. या अनोख्या संकल्पनेमुळे शिवभक्तांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. देशभरातून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत चौकशीचे फोन येत असून अनेक शिवप्रेमी या सोहळ्यास साक्षी राहण्यासाठी उत्सुक आहेत.

### प्रशासनाची दखल आणि सहकार्य

या ऐतिहासिक उपक्रमाची शासन स्तरावरही दखल घेण्यात आली आहे. या महोत्सवाच्या यशासाठी अनेक मान्यवरांनी सहकार्याचा हात पुढे केला आहे. विशेषतः विद्याधर महल्ले यांनी या महोत्सवासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. माधवराव जपे यांच्या शेतात झालेल्या चर्चेतून त्यांनी महोत्सवासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या पुढाकारातूनच स्वच्छता मोहीम आणि तयारीचे काम गतीने सुरू झाले. तहसीलदारसाहेब विजय सवडे, नायब तहसीलदार मुरलीधर गायकवाड यांनी कामाला फार मोठी गती आणलेली आहे.

# महेश आयडॉल स्पर्धेत तुषार डोडिया भारतात दुसरे



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि. १२ :** अर्थशास्त्र आणि शिक्षणशास्त्राचे अभ्यासक तुषार डोडिया यांनी महेश आयडॉल स्पर्धेत देशातून दुसरा क्रमांक पटकावला आहे. सर्वोत्तम कामगिरीच्या बळावर मिळवलेल्या यशाने त्यांनी बुलढाण्याची मान उंचावली आहे.

पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरमध्ये महेश प्रोफेशनल फोरमद्वारे रविवार ८ फेब्रुवारी रोजी महेश आयडॉल सीझन १४ स्पर्धा संपन्न झाली. स्व.रामेश्वर आसाराम मंत्री यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रीय पातळीवर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेमध्ये देशभरातील विविध राज्यांमधून स्पर्धकांनी सहभाग घेतला. कठीण स्वरूपाच्या परिचय फेरी, प्रोफाइल स्क्रीनिंग व प्रश्न-उत्तर फेरी अशा टप्प्यांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. तुषार डोडीया यांना उपविजेता पुरस्कार प्रदान करण्यात आला. चांदीचे मूळ पदक, ट्रॉफी, स्मृतिचिन्ह आणि भेटवस्तु असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल तुषार डोडीया यांच्यावर सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यांनी यशाचे श्रेय आई-वडील, गुरुजन, मित्र व समाजबांधवांना दिले आहे.

# शिल्पा डाबेराव शास्त्रीय गायन विषयात प्रथम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.११ :** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई अंतर्गत घेण्यात आलेल्या नोव्हेंबर-डिसेंबर २०२५ या सत्रातील गायन,वादन व नृत्या या विषयांचा निकाल नुकताच घोषित झाला असून यामध्ये स्वरविहार संगीत विद्यालयाच्या विद्यार्थीनी शिल्पा डाबेराव शास्त्रीय गायन विषयात मध्यमा पूर्ण परीक्षेत प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्या आहेत.

शिल्पा डाबेराव ह्या बुलढाण्यातील एडेड हायस्कुल येथे सहाय्यक शिक्षिका म्हणून कार्यरत असून त्या एक मधुर व दमदार आवाजाच्या गायिका तसेच उत्कृष्ठ निवेदिका म्हणून सुपरिचित आहेत. त्या सध्या स्वरविहार संगीत विद्यालयांमध्ये



नियमित शास्त्रीय गायनाचे धडे घेत असून त्यांना या परीक्षेसाठी स्वरविहार संगीत विद्यालयाचे संचालक प्रा.रविकिरण मोरे यांनी मार्गदर्शन केले असून त्यांच्या या यशाबद्दल एडेड हायस्कुलचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच संगीत क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# दसरखेड येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.११ :** दि.१२ फेब्रुवारी २०२६ रोजी मलकापूर तालुक्यातील नरवेल मंडळातील मौजे दसरखेड येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास समाधान सोनवणे तहसीलदार मलकापूर, प्रवीण घोटकर नायब तहसीलदार मलकापूर धनश्री हरणे निरीक्षण अधिकारी मलकापूर सूर्यवंशी तालुका कृषी अधिकारी, चेतन शेंबेकर पशुधन विकास अधिकारी दसरखेड शशिकांत वानखडे मंडळ अधिकारी, कुलवंतसिंग राजपूत मंडळ



अधिकारी मलकापूर राहुल खर्चे तलाठी सुपे मॅडम पर्यवेक्षक एकात्मिक बालविकास प्रकल्प, निंबोळे मॅडम ग्रामसेवक दसरखेड, विजय साठे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती मलकापूर, श्रावण पाटील रास्त भाव दुकानदार दसरखेड तसेच इतर संबंधित विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते सदर शिबिरामध्ये विविध संबंधित विभागाचे योजनांची माहिती देण्यात आली तसेच महसूल विभाग व इतर विभागाचे दाखले वितरण करण्यात आले. दसरखेड येथील शेतकरी पंढरी डोसे यांना कृषी विभागाकडून प्राप्त झालेले ट्रॅक्टरची चावी तहसीलदार मलकापूर यांची हस्ते देण्यात आली. सदर शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला

# वृध्दाचे अल्पवयीन मुलासोबत अश्लिल चाळे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**वडनेर भोलजी दि. १२ :** वडनेर भोलजी येथील रहिवासी असलेल्या एका ६० वर्षीय वृद्धाने एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलासोबत अश्लील चाळे करून त्याच्यावर अनैसर्गिक कृत्य करण्याचा प्रयत्न केला. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे सर्वत्र संताप व्यक्त होत असून नांदुरा पोलिसांनी उपरोक्त आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

नांदुरा पोस्टे हद्दीतील रहिवासी असलेला एक सोळा वर्षीय अल्पवयीन मुलगा १० फेब्रुवारी रोजी सकाळी ९.१५ वाजता दरम्यान वडनेर भोलजी येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर असलेल्या एका मंदिराजवळ बसलेला होता. त्यावेळी आरोपी सुनील सातव वय ६० रा. वडनेर भोलजी याने पीडित मुलासोबत अश्लील वर्तन करून अनैसर्गिक कृत्य करण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे घाबरलेल्या मुलाने घडलेला प्रकार आपल्या कुटुंबीयांना सांगितला. घटनेची माहिती मिळताच वडनेर भोलजी पोलीस चौकीचे पोलीस अंमलदार अजय सुरडकर यांनी घटनास्थळ गाठले. याप्रकरणी पीडित मुलाच्या तक्रारीवरुन पोलिसांत आरोपी सुनील सातव याच्या विरुद्ध बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ चे कलम ८, १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# कुसुम अभियानाचा सखोल आढावा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१२ :** सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), पुणे कार्यालयाचे मा. वैद्यकीय अधिकारी डॉ. उत्तम कांबळे यांनी बुलढाणा जिल्ह्याचा विशेष दौरा करून 'कुसुम कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अभियान' तसेच आरोग्य विभागाच्या विविध राष्ट्रीय कार्यक्रमांचा आढावा घेतला. दौऱ्यादरम्यान डॉ. कांबळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांची सदिच्छा भेट घेतली.

यावेळी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध आरोग्य उपक्रमांची सविस्तर माहिती त्यांनी जाणून घेतली. त्यानंतर सहाय्यक संचालक, कुष्ठरोग कार्यालय येथे कुसुम अभियानाचा सखोल



आढावा घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी बुलढाणा बसस्थानक येथे उभारण्यात आलेल्या कुसुम जनजागृती स्टॉलला भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. जनजागृती उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी या प्रयतांचे कौतुक केले. पुढे जिल्हा क्षयरोग कार्यालयास भेट देऊन राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाची पाहणीही त्यांनी केली. या प्रसंगी डॉ.के.व्ही.राठोड (सहाय्यक संचालक, कुष्ठरोग), वैद्यकीय सहाय्यक तिटकारे, मदणे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, सांख्यिकी अधिकारी तसेच कुष्ठरोग कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी आणि राज्यस्तरीय पथक उपस्थित होते.

# सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये चिमुकल्यांनी सादर केले कलागुण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**डोणगाव दि.१२ :** स्थानिक जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन थाटात संपन्न झाले असून स्नेहसंमेलन यांच्या माध्यमातून मुलांच्या सुप्त गुणांना चालना व वाव मिळतो असे मत माजी सभापती राजेंद्र पळसकर यांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले १० फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सभापती राजेंद्र पाटील पळसकर तर उदघाटक म्हणून जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष शैलेश सावजी तर अतिथी



म्हणून सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व अध्यक्ष तसेच पालक हजर होते.

यावेळी प्रथम दिपप्रज्वलन करून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून मान्यवरांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून शिक्षकवृंदानी स्वागत केले. प्रास्ताविक मनोगतातून मुख्याध्यापिका सौ.वर्षा लांभाडे यांनी शाळेच्या प्रगतीचा अहवाल सादर करुन विद्यार्थ्यांसाठी राबवित असलेल्या विविध शालेय उपक्रमाची विस्तृत माहिती दिली. यावेळी विद्यार्थीनी देशभक्तीपर, धार्मिक व जनप्रबोधनात्मक गिते सादर करुन उपस्थीतांचे मनोरंजन केले. याप्रसंगी मान्यवरानी आपल्या मनोगतातून या शाळेचे आम्ही माजी विद्यार्थी असल्याने या शाळेचे आमच्यावर खुप उपकार असुन विद्यामान शिक्षकांनी ते उपकार फेडण्याची संधी उपलब्ध करून द्यावी असे आवाहन केले. या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन राहुल डोंगरदिवे तर आभार बाला प्रसाद आखाडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी सौ.वर्षा लांभाडे शिक्षिका सुनीता भुसारी, संगीता काळे, मालती अंभोरे, छाया बोरुडे, लता जामकर, वैशाली चव्हाण सह सहा शिक्षक राहुल डोगरदिवे, पवन गायकवाड आदिनी अथक परिश्रम घेतले.

**महोत्सव**

## लोणारमध्ये प.पू. चैतन्यश्रीजी मारासा यांचे आगमन

# २५ वा दीक्षा दिवस महोत्सव २४-२५ फेब्रुवारीला

अंजिक्य भारत / प्रतिनिधी

**लोणार दि.१२:** ११ फेब्रुवारी २०२६ गावात गुरुभगवंतांचे आगमन होण्यासाठी पुण्यसंचय लागतो. लोणारकर हे पुण्यवान आहेत, म्हणूनच लोणार येथे जैन समुदायाच्या साधू संतांना येण्याची संधी मिळत असल्याचे साध्वी प.पू.चैतन्यश्रीजी मारासा म्हणाल्या. पुढे त्यांनी सांगितले की, धार्मिक कार्य करताना केवळ परंपरा जपणे पुरेसे नाही, तर समर्थन भाव वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. समाजात एकोप्याची आणि सकारात्मकतेची भावना निर्माण झाली तरच खरी धर्मआराधना वाढीस लागेल. तरुण पिढीने आधुनिकते सोबत आध्यात्मिक मूल्ये जपली पाहिजेत, असे आवाहनही त्यांनी धर्मसभेत केले. संयम, सदाचार आणि सेवाभाव या गुणांच्या आधारे समाजाची उन्नती साधता येते, असा



संदेश जैन साध्वी प.पू. चैतन्यश्रीजी मा सा यांनी स्थानिक गेलडा भवन मध्ये दिला. पारंपरिक विचारधारा सोडून समाजातील नवतरुणांना नवचेतना देण्यासाठी लोणार येथे आलो असल्याचे सांगत प.पू. श्री चैतन्यश्रीजी मारासा, प.पू. श्रीप पुजिग्याजी मासा, प.पू. सुबोधीजी मासा ,प.पू.निर्मितीजी मासा आदी ठाणा-४ यांचे सहा वर्षांनंतर आज सकाळी ८.३० वाजता कीन्ही मार्गे लोणार शहरात भव्य आगमन झाले. त्यांच्या स्वागतासाठी शहरातील सकल जैन समाज बांधवांसह विविध समाजातील नागरिक, नगरपालिकेचे नगराध्यक्ष आणि नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. साध्वी महाराजांच्या आगमनाने शहरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. शहरात प्रवेश करताच ठिकठिकाणी फुलांची उधळण, मंगलवाद्ये आणि जयघोषात त्यांचे भावपूर्ण स्वागत करण्यात आले. यानंतर स्थानिक गेलडा भवन येथे त्यांचे आगमन झाले. होळी चाततुर्मास निमित्त प.पू. साध्वी महाराज दीड महिना लोणार येथे वास्तव्यास राहणार असून या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रम, प्रवचने आणि आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. प.पू. चैतन्यश्रीजी मारासा या लोणार येथील तिलोकचंद रूनवाल यांच्या धाकट्या कन्या आहेत. सुमारे २५ वर्षांपूर्वी त्यांनी स्थानकवासी जैन समुदायात दीक्षा घेतली. दिवंगत प.पू.साध्वी प्रभाकंवरजी मारासा आणि प.पू. प्रकाशकंवरजी मारासा यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सांसारिक जीवनाचा त्याग करून धर्ममार्ग स्वीकारला. त्यानंतर त्यांनी देशभरात विविध ठिकाणी प्रवास करत जैन धर्माचे ततत्वज्ञान, संयम आणि साधना यांचा प्रसार केला आहे. येत्या २४ आणि २५ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांच्या २५ व्या दीक्षा दिवसानिमित्त रौप्य महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या दोन दिवसांत भव्य धार्मिक कार्यक्रम, विशेष प्रवचने, गुरुभक्ती, सामूहिक उपासना आणि विविध आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले .

# बुलडाणा येथे परीक्षा देण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा भीषण अपघातात जागीच मृत्यू

अंजिक्य भारत / प्रतिनिधी

**चिखली दि.१२ :** बुलढाणा येथे बिएस्सी च्या परीक्षेसाठी जाणाऱ्या एकलारा येथील २३ वर्षीय विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना तालुक्यातील मालगणी येथे गुरुवार दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. या भीषण अपघातात एकलारा येथील शंतनू नारायण अंभोरे ( वय २३ वर्ष ) यांचा करुण अंत झाला.

एकलारा येथील रहिवासी असलेला शंतनू अंभोरे हा बुलढाणा येथील डॉ. गोडे कॉलेजमध्ये बीएससी द्वितीय वर्षाचे शिक्षण घेत होता. अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी तो त्याच्या स्वतःच्या ( एमएच-२८-एजी-५४७१ ) दुचाकीने एकलारा येथून चिखलीमार्गे बुलढाण्याकडे निघाला होता.



मालगणी जवळील जामवाडी परिसरात तो रस्त्याच्या कडेला दुचाकी उभी करून लघुशंकेसाठी थांबला असता बुलढाण्याकडून भरधाव वेगाने येणाऱ्या ( एमएच-१९-झेड-५६८६ ) क्रमांकाच्या ट्रकने शंतनूला जोरदार धडक देऊन चिरडले. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात मोठी गर्दी जमली. या अपघाताची माहिती चिखली पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा करून अपघातास कारणीभूत ट्रक ताब्यात घेतला, असून मृतदेह चिखली उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला. या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृतकाचे काका समाधान अंभोरे यांच्या तक्रारीवरून चिखली पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून अपघातानंतर पसार झालेल्या चालकाचा शोध सुरू आहे.

अजिंक्य भारत •
आपलं खामगांव
खामगाव, शुक्रवार, दि.१३फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com


## महत्त्वाचे

### म.फुले पुतळा विटंबनेचा निषेध

**नांदुरा :** तेलंगणा राज्यातील तेल्लापूर येथे क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्याची समाजकंटकांनी विटंबना केल्याच्या घटनेचा नांदुरा येथे सकल माळी समाजाच्या वतीने तीव्र निषेध नोंदविण्यात आला. या निंदनीय घटनेमुळे संपूर्ण बहुजन समाजात संतापाची लाट असून, आज तहसीलदारांमार्फत सरकारला मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. महात्मा महात्मा फुले पुतळा विटंबनेचा नांदुऱ्यात निषेध फुले हे देशाचे प्रेरणास्थान असून त्यांच्या स्मारकाचा अवमान होणे ही लोकशाहीसाठी शरमेची बाब आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा आणि हा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपींना कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच, महापुरुषांच्या स्मारकांना चोख सुरक्षा पुरवण्याची आग्रही मागणीही करण्यात आली असून, दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या प्रसंगी सकल माळी समाजाचे अनेक निवेदक आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एका संशयीतास पकडले

**खामगाव :** शहर पोस्टेचे कर्मचारी आज १२ फेब्रुवारी २६ रोजी मध्यरात्री गस्त घालीत असतांना ३.१० वाजताच्या सुमारास चांदमारी भागात चिंतामणी गणपती मंदिरासमोर शिवा कैलास ईटे (२० रा. बाळापुर फैल) उभा असलेला पोलिसांना दिसुन आला. मात्र पोलिसांना पाहताच शिवा इंटे याने तेथून पळ काढला. पोलीसांनी त्याचा पाठलाग केला असता तो गल्लीमधील एका टपरीच्या अंधारात स्वतःचे अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने लपून बसला होता. याप्रकरणी पोकों, अंकुश गुरूदेव यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त संशयीताविरूध्द मपोका कलम १२२ नुसार कारवाई करण्यात आली आहे.

### पुलाच्या कामादरम्यान पाईपलाईन फुटली

**खामगाव :** मागील काही दिवसांपासून शहराचा पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत होत असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. एखाद्यावेळी पाईपलाईन फुटून शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. तर कधी कमी होल्टेजच्या विज पुरवठ्यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. शहरात विकास कामे होत असतांना सुध्दा अनेकवेळा पाणीपुरवठा पाईपलाईन फुटत आहे. त्याचाही परिणाम शहराच्या पाणीपुरवठ्यावर होत आहे. तर आता शहर पोलिस स्टेशन जवळील जीर्ण पुल पाहून नव्याने बांधकाम करण्यात येत आहे. कामादरम्यान मोठी पाईपलाईन फुटल्यामुळे त्याचा परिणाम शहराच्या पाणीपुरवठ्यावर झाला असून शहरातील काही भागांचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही भागांना तर दिड-दिड महिन्यापर्यंत पाणीपुरवठा करण्यात आला नव्हता. अशी परिस्थिती असतांना पाणीपट्टी करात ५० टक्के वाढ करण्यात आली आहे. तर लवकरच उन्हाळा सुरू होणार असुन नागरिकांचा पाण्याचा वापर वाढणार आहे. त्यादृष्टीने न.प.ने उपाययोजना करून नागरिकांना नियमित पाणी पुरवठा करावा, अशी मागणी होत आहे.

### मधोमध प्रवासी वाहन उभे केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**खामगाव :** शहरातील ॲटो स्टॉप परिसरात रस्त्याच्या मधोमध प्रवाशी वाहन उभे करून सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी खामगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ११ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास घडली. या प्रकरणी मोहम्मद जावेद प्यार मोहम्मद (४६) रा. गोंधनापूर, ता. खामगाव याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम २८५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस सूत्रांनुसार, आरोपीने त्याच्या ताब्यातील एम. एच. २८ आर ३१३६ हे प्रवाशी वाहन रस्त्याच्या मधोमध उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण केला. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता होती. फिर्यादीच्या अहवालावरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, वरिष्ठांच्या आदेशानुसार पुढील तपास पोलीस कर्मचारी राहुल इंगळे करीत आहेत.

# सिने कलाकारांसाठी स्वतंत्र नियमावली- कामगार मंत्री फुंडकर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**खामगाव दि.१२:** सिने कलाकारांसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्यात येणार असून, नियमावलीचा मसूदा तयार झाल्यानंतर कला क्षेत्रातील अभ्यासू व संबंधित घटकांकडून सूचना मागविण्यात येतील. प्राप्त सूचनांचा सकारात्मक विचार करून अंतिम नियमावली तयार केली जाईल, अशी माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिली.

कामगार मंत्री फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कामगार संहिताच्या अनुषंगाने सिने कलाकारांसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याबाबत मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस कामगार विभागाचे अपर मुख्य सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त एच. पी. तुन्मोड, उपसचिव रोशनी पाटील, प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे, पुनम ढिल्लो यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सिने क्षेत्रातील कलाकार, तंत्रज्ञ व कामगारांच्या सामाजिक सुरक्षा, वेतन, विमा, कामाचे तास, कल्याणकारी योजना तसेच कामगार संहितेतील तरतुदींची अंमलबजावणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सिने कलाकारांच्या हितासाठी स्वतंत्र नियमावली तयार करून त्यांना कायदेशीर संरक्षण देण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले की, नवीन कामगार संहितेच्या चौकटीत सिने क्षेत्रातील कलाकार व संबंधित कामगारांच्या हितासाठी स्पष्ट व प्रभावी नियमावली तयार करण्यात येईल. त्यांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. यावेळी (सिंटा) सिने एंड टेलीविज़न आर्टिस्ट एसोसिएशन वतीने अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे आणि पुनम ढिल्लो यांनी चित्रपटसृष्टीतील कलाकार, तंत्रज्ञ, सहाय्यक व विविध विभागांतील कामगारांना भेडसावणाऱ्या समस्या मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिल्या.

# सेवालाल महाराज जयंतीनिमित्त रक्तदान

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी




**मलकापूर दि. १२ :** तालुक्यातील शिरला नेमाने येथे श्री संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेनेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिवसेना नेते ॲड. अमोल अंधारे यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समाजोपयोगी कार्यातून जयंती साजरी करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा उपक्रम राबविण्यात आला.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे यासाठी अशा शिबिरांची आवश्यकता असल्याचे यावेळी मान्यवरांनी प्रतिपादन केले. शिवसेना शाखा शिरला नेमाने येथे पार पडलेल्या या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक निळकंठ पाचपोर, माजी सरपंच देविदास चव्हाण, शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे, शहरप्रमुख चेतन ठोंबरे, प्रभाकर जाधव, डॉ. गोविंद चव्हाण, उपतालुका प्रमुख विष्णू कदम, विभागप्रमुख अनुप गायकवाड, उपशहरप्रमुख बिडकर, युवा सेना कार्यकर्ते सुशील पाटील व साहिल गव्हाळ आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय हेमराज चव्हाण, जीवन चव्हाण, प्रशांत चव्हाण, जयेश चव्हाण, प्रफुल्ल चव्हाण, लक्ष्मण राठोड, कल्पेश राठोड, ओम राठोड, अभिषेक जाधव, अभिषेक पाचपोर, वैभव धुरंधर, संदीप राठोड, दीपक बंड, जीवन राठोड (वैद्यकीय अधिकारी, शिरला नेमाने), जया खंडेराव (आशा सेविका), अमोल चव्हाण तसेच शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरादरम्यान युवकांनी उत्साहाने रक्तदान केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तसंकलनाची प्रक्रिया पार पडली. रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. समाजात रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी व तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले. श्री संत सेवालाल महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित या रक्तदान शिबिरामुळे सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला असून, गरजू रुग्णांना याचा निश्चितच लाभ होणार आहे.

## श्री शंकरराव चव्हाण माध्यमिक विद्यालयामध्ये निरोप समारंभ

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**डोणगाव दि.१२:**माहूर तालुक्यातीलमौजे आष्टा येथील श्री शंकरराव चव्हाण विद्यालयात विद्यालयातील १२वी कला व विज्ञान च्या विध्यार्थ्यांना निरोप म्हणून निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला होता. इ. ११ वी कला व विज्ञान चे सर्व विध्यार्थी विध्यार्थिनी व शिक्षक वृंद यांनी मिळून हा कार्यक्रम आयोजित केला. असून या कार्यक्रमचे अध्यक्ष म्हणून तुकाराम केशवे शिक्षण संस्था आष्टा चे अध्यक्ष बाबाराव केशवे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शंकरराव चव्हाण विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र केशवे, सिंदखेड पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पो.णी.मा. रमेश जाधवर, जगदंबा हायस्कुल चे प्राचार्य मा.विश्वास जाधव, निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ माहूर चे युवा आघाडी तालुकाध्यक्ष पत्रकार आदेश बेहेरे व आष्टा येथील उपसरपंच जितेश जाधव शाळेचे पर्यव्यक्षक अशोक सोळंके व कोथळकर आदी मंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम महापुरुषयांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. आणी प्रजासत्ताक दिणानिमित्त घेण्यात आलेल्या शालेय क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात प्रथम आलेल्या विध्यार्थ्यांचा व त्यांच्या चमू चे प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आले. आणी विध्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले त्यानंतर बाबाराव केशवे यांनी अध्यक्षीय भाषण करून विध्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तर प्राचार्य राजेंद्र केशवे यांनी आपल्या व्यक्तव्यातून बारावी नंतर काय करायचे काय नाही आणी आम्ही तुमच्या पाठीशी आहोत शाळा सोडली म्हणजे नाते सुटत नाहीत असे विध्यार्थ्यांना आश्वासन दिले.

## जंगी शंकरपट बैलगाडा शर्यतीचा थरार; प्रथमच ऐतिहासिक आयोजन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**शेगाव दि.१२ :**शेगाव तालुक्यातील मौजे भोनगाव येथे पारंपरिक ग्रामीण क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करणारी भव्य 'शंकरपट' बैलगाडा शर्यत मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडली. तालुक्यात प्रथमच एवढ्या व्यापक स्वरूपात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याने परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थांनी एकजुटीने पुढाकार घेत कार्यक्रमाला जत्रेचे स्वरूप दिले. कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना तालुका अध्यक्ष रामा पाटील थारकर, माजी सभापती सुरेशभाऊ शेळके तसेच लक्ष्मण गवळी यांच्या हस्ते दिमाखदार पद्धतीने करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने नारळ फोडून आणि बैलांची पूजा करून शर्यतीचा शुभारंभ करण्यात आला. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेला प्रारंभ होताच मैदानावर टाळ्यांचा कडकडाट झाला.

उद्घाटनावेळी रामा पाटील थारकर यांनी ग्रामीण संस्कृती जपण्याची गरज अधोरेखित करत अशा स्पर्धा गावांमधील एकोपा, क्रीडाभावना आणि शेतकरी परंपरेला बळ देतात, असे प्रतिपादन केले. सामाजिक व संघटनात्मक कार्यात सक्रिय असलेले त्यांचे योगदानही यावेळी उपस्थितांनी गौरवले. तसेच सुरेश शेळके यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये उमेश शेळके(युवता प्रमुख), अजयभाऊ अहिर, रामदास शेळके, प्रवीणभाऊ कोल्हे, भीमराव शेळके, अनंता शेळके, प्रभाकरभाऊ पहुरकर, सागरभाऊ दहिभात, अतुल शेळके, पूर्णाजी भारसाकडे, संजयभाऊ गुरुजी शेळके, पांडुरंग शेळके, राजू जमाव, संतोष आप्तुरकर, ज्योती भारसाकडे (पोलीस पाटील), सागर भारसाकळे, गणेश दाभाडे, गजानन रताळे, तुळशीराम रताळे, महादेवराव मुंडे, सुरेशभाऊ वर्गे तसेच पंचकमिटी सदस्य आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. स्पर्धेत तालुक्यातील व परिसरातील नामांकित बैलगाडा मालकांनी सहभाग घेतला. शिस्तबद्ध नियोजन आणि सुरक्षिततेची काळजी घेत कार्यक्रम सुरळीत पार पडला.

## व्हॅलेंटाईन डेच्या पार्श्वभूमीवर हिंदू जनजागृती समितीचे निवेदन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**चिखली दि.१२ :** १४ फेब्रुवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या व्हॅलेंटाईन डेच्या पार्श्वभूमीवर हिंदू जनजागृती समिती आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांनी प्रशासनाला निवेदन देत शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. बुधवारी तहसीलदार विजय सवडे व चिखली पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार भूषण गावंडे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात व्हॅलेंटाईन डेच्या नावाखाली खासगी पार्ट्यांमध्ये मद्य व अमली पदार्थांचा वापर, महिलांची छेडछाड आणि सार्वजनिक ठिकाणी होणारे गैरप्रकार रोखण्याची मागणी करण्यात आली. तसेच पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण टाळण्यासाठी शाळा-महाविद्यालयांमध्ये 'मात-पितृ पूजन दिन' साजरा करण्यास प्रशासनाने प्रोत्साहन द्यावे, अशी सूचना करण्यात आली. महिलांच्या सुरक्षेसाठी महाविद्यालय परिसर, उद्याने व मुख्य चौकांमध्ये साध्या वेशातील पोलीस तसेच दामिनी व निर्भया पथकांची गस्त वाढवावी, अशी मागणीही करण्यात आली. कर्णकर्कश सायलेन्सर लावून वेगाने वाहन चालविणाऱ्यांवर कारवाई करावी, असेही नमूद आहे. तहसीलदारांनी निवेदनाची दखल घेत संबंधित विभागांना सतर्क राहण्याचे आश्वासन दिले. यावेळी प्रसाद येवले यांच्या नेतृत्वाखाली अनेक नागरिक उपस्थित होते.

## अप्पर तहसीलदार कार्यालय होणार: भाजप सरकारचा निर्णय

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.१२:** तालुका व्हावा यासाठी अनेक वर्षांपासून मागणी असताना नविन तालुका निर्मिती एवजी शासनाने अप्पर तहसीलदार कार्यालय मंजूर केल्याची माहिती एका शासकीय आदेशानुसार समजते . त्यामुळे साखरखेर्डा भागातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे. साखरखेर्डा ते सिंदखेडराजा हे अंतर ६० किलोमीटर असून जाण्यासाठी व परत येण्यासाठी पाहिजे ती वाहातूक सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे साखरखेर्डा भागातील नागरिकांना तहसील कार्यालयात कामासाठी येरझारा माराव्या लागत असे . गेल्या ३५ वर्षांपासून साखरखेर्डा नवीन तालुका करण्यात यावा अशी मागणी सर्वपक्षीय नेत्यांनी केली होती . परंतू प्रत्येक वेळी राजकारण आडवे आल्याने साखरखेर्डा तालुका मागणी रेंगाळत पडली होती. आमदार मनोज कायंदे यांनी सुध्दा नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात साखरखेर्डा तालुका निर्मितीचा प्रश्न उपस्थित करुन शासनाचे लक्ष वेधले होते . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जी गावे जिल्ह्यापासून दुर आहेत अशा ठिकाणी अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय आणि तालुक्यापासून दुर आहेत अशा गावात अप्पर तहसीलदार कार्यालय प्रस्तावित असल्याचे जाहीर केले आहे . साखरखेर्डा, शेंदुर्जन, मलकापूर पांग्रा ही महसूल मंडळ तालुक्यापासून दुर आहेत . या मंडळातील शेतकरी, विद्यार्थी , ग्राहक सेवा केंद्र यांची कामे तत्पर व्हावी यासाठी नव्याने अस्तित्वत येत असलेल्या ६९ अप्पर तहसीलदार कार्यालयात साखरखेर्डा गावाचा समावेश आहे . त्यामुळे साखरखेर्डा तालुका जरी झाला नसला तरी महसूल विभागाशी संबंधित कामे यामुळे मार्गी लागणार आहेत .साखरखेर्डा तालुका मागणीसाठी तत्कालीन आ. तथा माजीमंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन केले होते . अनेकांनी उपोषण केले होते . आमची मागणी ही तालुका निर्मितीची होती . ती मागणी आम्ही सातत्याने लावून धरणार आहे. आज अप्पर तहसीलदार

## अभ्यासिका इमारतीला सावित्रीबाई फुले यांचे नाव ; न.प.एकमताने मंजुरी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**मलकापूर दि.१२:** नगर परिषदेच्या अखत्यारीतील चाळिबिघा परिसरात नव्याने उभारण्यात येत असलेल्या अभ्यासिका इमारतीला ज्ञानज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले हे यांचे नाव देण्याच्या प्रस्तावास नप सदस्यांनी सर्वानुमते मंजुरी दिली. छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात दि.१२ फेब्रुवारी रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

बहुजन उद्धारक सेवा समितीच्या वतीने मागील तीन वर्षांपासून सातत्याने करण्यात येत होती. यासाठी दि. ११ एप्रिल २०२४ रोजी तत्कालीन नप मुख्याधिकारी डॉ. आशिष बोबडे तसेच तहसीलदार तथा न.प.प्रशासक राहुल तायडे यांना निवेदन देण्यात आले होते. याशिवाय मंत्री ना. छगन भुजबळ, जिल्हाधिकारी तसेच पालकमंत्री ना.दिलीप वळसे पाटील यांनाही निवेदन सादर करण्यात आले होते. दरम्यान, नगर परिषदेत लोकनियुक्त प्रतिनिधींचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे या मागणीवर प्रशासकीय स्तरावर निर्णय होऊ शकला नव्हता. त्यानंतर डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या नगर परिषद निवडणुकीनंतर नव्याने निवडून आलेल्या नगराध्यक्ष अतिक जवारिवाले यांना पुन्हा निवेदन देण्यात आले. त्यावेळी हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडून ठराव मंजूर केला जाईल, अशी ग्वाही देण्यात आली होती. झालेल्या सभेत भाजप नगरसेविका जयश्री संतोष बोंबटकर यांनी न.प.अभ्यासिका इमारतीला ज्ञानज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांचे नाव देण्याविषयीचा प्रस्ताव मांडला. यावर सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी देत ठराव संमत केला. या मागणीसाठी बहुजन उद्धारक सेवा समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ.नितीन भुजबळ, उपाध्यक्ष किशोर राऊत, सचिव संतोष बोंबटकार, मंगेश सातव, दिपक बावस्कर, अत्ल सपकाळ आदींनी सातत्याने विविध स्तरावर याबाबत केला.

**तक्रार** जि.प. अधिकारी अनभिज्ञ की त्यांची डोळेझाक

# जि. प. शाळेतील कथित बोगस विद्यार्थी व अनुदान घोटाळा उघड

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**चिखली दि.१२:** पंचायत समिती चिखली अंतर्गत जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा, वैदुवाडी, मुख्याध्यापक यांनी शाळेत बोगस विद्यार्थी दाखवून शासनाचे अनुदानात भ्रष्टाचार केल्या प्रकरणी तात्काळ गुन्हे दाखल करणे, तसेच मुख्याध्यापक जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा, वैदुवाडी यांनी त्यांच्या सेवाकाळात अनेक अर्जित रजा, आजारी रजा, घेवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान केल्याप्रकरणी त्यांना वैद्यकिय मंडळापुढे शारिरीक तपासणीसाठी हजर करणे, या सर्व विषयी चे तक्रार निवेदन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांना भारतीय मानवाधिकार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष प्रशांत डोंगरदिवे यांनी देऊन कारवाईची मागणी केली आहे.

सविस्तर असे की माहिती अधिकारातून प्राप्त माहितीनुसार चिखली पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, वैदुवाडी येथे गंभीर स्वरूपाच्या अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे सदर घोळ हा दाबण्यात आला आहे की जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकरणी डोळेझाक करीत आहेत. यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. शाळेतील घटलेली विद्यार्थी पटसंख्या व पालकांनी




मुलांना अन्य शाळेत हलविल्याच्या पार्श्वभूमीवर, यापूर्वी मुख्यकार्यकारी अधिकारी खरात यांनी १० पेक्षा कमी विद्यार्थी पटसंख्या असलेल्या शाळांतील शिक्षकांना शैक्षणिक कामकाज असमाधानकारक ठरवून निलंबित करण्याचा ठोस निर्णय घेतला होता. या निर्णयाची संपूर्ण शासनस्तरावर प्रशंसा झाली होती. असे असतानाच वैदुवाडी येथील जि. प. शाळेत नव्याने रुजू झालेले मुख्याध्यापक रामेश्वर गणपत मिसाळ यांनी वर्ग १ ते ४ साठी कागदोपत्री ८ विद्यार्थी दाखवले; मात्र प्रत्याक्षात हे विद्यार्थी शाळेत उपस्थित नसल्याचे उघड झाले आहे. संबंधित विद्यार्थी हे नियमितपणे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, शेळगाव आटोळ येथे शिक्षण घेत असल्याचा आरोप आहे. प्रत्याक्ष शाळेत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या नावावर गणवेश, बूट-सॉक्स, शालेय पोषण आहार व पुस्तके यांची अनुदाने उचलून, वाटप झाल्याचे दाखवून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. चौकशी अधिकारी यांनी दि. ०२ जाने २०२६ रोजी अहवाल गटशिक्षणाधिकारी प स चिखली यांच्याकडे सादर केला होता.. मात्र, शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी हा चौकशी अहवाल मा. मुख्यकार्यकारी अधिकारी खरात यांच्याकडे सादर न करता आर्थिक देवाणघेवाण करून प्रकरण दाबल्याची चर्चा चिखली परिसरात सुरू असल्याचा आरोप तक्रारदारांकडून करण्यात आला आहे. त. या सर्व बाबी माहिती असूनही शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी संबंधित मुख्याध्यापकांना पाठीशी घातल्याचा आरोप आहे. आरोप तक्रारीत नमूद करण्यात आला आहे. दरम्यान, संदर्भीय कागदपत्रांनुसार रामेश्वर गणपत मिसाळ तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करून भा.दं. वि. कलम ४२० सह अन्य कलमान्वये गुन्हे दाखल करून सेवेतून निलंबित करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागण्या मान्य न झाल्यास दि. २३/०२/२०२६ पासून चिखली पंचायत समिती समोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, तसेच त्यानंतर दिवाणी व जिल्हा सत्र न्यायालयात खाजगी फौजदारी प्रकरण दाखल करण्यात येईल, असा इशाराही तक्रार निवेदनत भारतीय मानवाधिकार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष प्रशांत डोंगरदिवे यांच्या वतीने देण्यात आला आहे.

# चोरांचे राज्य; पोलीस प्रशासन झोपेत?

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**मलकापूर दि. १२ :** शहरात दिवसाढवळ्या १ लाख ७० हजारांची रोकड दुचाकीची डिक्की फोडून चोर उचलतात आणि पोलीस प्रशासन नेहमीचा डायलॉग वाजवते "गुन्हा दाखल झाला आहे, तपास सुरू आहे!" हा तपास नेमका कुठपर्यंत पोहोचतो? की फाईलवर धूळ बसण्यापर्यंतच? भरदुपारी, गजबजलेल्या नांदुरा रोडवर, मातोश्री हॉलसमोर अशी धाडसी चोरी होते म्हणजे चोरांना कायद्याची भीती उरलेली नाही, हे स्पष्ट आहे. प्रश्न सरळ आहे शहरात पोलीस गस्त आहे की नाही? की गस्त फक्त कागदावर आणि अहवालातच दाखवली जाते?

व्यावसायिक बँकेतून पैसे काढतो, काही क्षणात रक्कम गायब होते याचा अर्थ चोरट्यांना हालचालींची माहिती होती. मग बँक परिसरात पोलीस यंत्रणा काय करत होती? सीसीटीव्ही कॅमेरे आहेत म्हणे! पण ते फक्त शोभेचे दिवे आहेत का? किती गुन्हेगार सीसीटीव्हीतून पकडले गेले आणि किती शिक्षा भोगत आहेत याचा हिशेब प्रशासन देणार का? शहरात चोरी, घरफोडी, दुचाकी चोऱ्या वाढत आहेत. नागरिक भीतीत आहेत. पण पोलीस मात्र "कायद्याचे राज्य आहे" असा आत्मसंतोष व्यक्त करतात. जर कायद्याचे राज्य असते, तर चोर दिवसाढवळ्या डिक्की फोडण्याचे धाडस केले असते. काही नागरिकांच्या मनात कुजबुज सुरू आहे इतक्या अचूक पद्धतीने होणाऱ्या चोऱ्यांमागे कोणाचा आशीर्वाद आहे का? हा प्रश्न प्रशासनाला अस्वस्थ करेल, पण विचारला जाणारच! कारण जेव्हा गुन्हे वाढतात आणि पकड कमी होते, तेव्हा संशयाची सुई सरळ व्यवस्थेकडेच वळते. गुन्हा दाखल करणे ही औपचारिकता आहे; गुन्हे थांबवणे ही जबाबदारी आहे. नागरिकांना सल्ले देणे सोपे आहे "सावध रहा, पैसे उघड्यावर ठेवू नका." पण शहर सुरक्षित ठेवणे ही जबाबदारी कोणाची? मलकापूरात सध्या एकच चित्र आहे चोर मोकाट आणि प्रशासन निवांत! आता वेळ आली आहे पोलीस प्रशासनाने फक्त प्रेसनोट न देता ठोस कारवाई दाखवावी. अन्यथा नागरिकांचा संयम सुटला, तर प्रश्न विचारले जातील आणि उत्तरं द्यावीच लागतील!

## महत्त्वाचे

### घरगुती वादातून वडिलांवर काठीने हल्ला

**मंगरूळ नवघरे :** घरगुती कारणावरून झालेल्या वादातून मुलाने वडिलांच्या डोक्यात काठीने मारहाण केल्याची घटना ११ फेब्रुवारी रोजी रात्री ९ ते ९.३० वाजण्याच्या सुमारास मंगरूळ नवघरे येथे घडली. या प्रकरणी अमडापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मधुकर गणपत जाधव (वय ५५, रा. मंगरूळ नवघरे) यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी विशाल मधुकर जाधव व पल्लवी विशाल जाधव (दोन्ही रा. मंगरूळ नवघरे) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता () कलम ११८(१), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारीनुसार, नमूद दिवशी घरगुती कारणावरून वाद झाला असता आरोपी क्र.१ विशाल जाधव याने काठीने फिर्यादींच्या डोक्यात मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी जखमी होऊन त्यांच्या डोक्यातून रक्तस्राव झाला. तसेच आरोपी क्र. २ पल्लवी जाधव हिने शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. ही घटना ११ फेब्रुवारी रोजी घडली असून १२ फेब्रुवारी रोजी दुपारी १.४२ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा जीपीएसआय अच्युतराव शिरसाट यांनी नोंदविला असून, ठाणेदार राजपुत यांच्या आदेशानुसार पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिलीप तोंडे करत आहेत. गजानन गावंडे करीत आहे.

### भरधाव जेसीबीची दुचाकीला धडक

**मलकापूर :** मलकापूर-नांदुरा मार्गावरील वडनेर भोलजी शिवारात ठाकूर पेट्रोलपंपाजवळ भरधाव जेसीबीने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ६८ वर्षीय दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले आहेत. शेषराव नामदेवराव सोनुने (रा. बन्सीलाल नगर, मलकापूर) असे जखमींचे नाव असून त्यांच्यावर सध्या अकोला येथे उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सोनुने हे मोटारसायकल (एमएच-२८-बीएच-२५४५) ने मलकापूरहून लांजुळकडे जात असताना समोरून येणाऱ्या जेसीबी (एमपी-०९-जीएफ ४९७२) चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याच्या मागील भागाला गंभीर दुखापत झाली असून डाव्या पायाच्या गुडघा व घोट्याला फॅक्चर झाले आहे. अपघातानंतर नागरिकांनी त्यांना मलकापूर येथील आस्था रुग्णालयात दाखल केले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी अकोला येथे हलवण्यात आले. सध्या वत्सल हॉस्पिटल व डॉ. सोनुने हॉस्पिटल, अकोला येथे उपचार सुरू आहेत. या प्रकरणी अकोला सिव्हिल लाईन पोलिसांनी जबाब नोंदवून नांदुरा पोलिसांकडे पाठवला असून भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१, १२५ (ब), ३२४ (४) अन्वये जेसीबी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार जयवंत सातव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार प्रमोद चिखलकर करीत आहेत.

### वृद्धाचा मृत्यू

**शेगाव :** मृतक उत्तम खुशाल पहूरकर (६३) रा. तिव्हाण खु., ता. शेगाव यांना पोटदुखी व धाप लागण्याच्या तक्रारीमुळे त्यांच्या नातेवाईकांनी २२ जानेवारी रोजी दुपारी ३.१८ वाजता शासकीय वैद्यकीय रुग्णालय, अकोला येथे उपचारासाठी दाखल केले होते. उपचार सुरू असतानाच त्याच दिवशी सकाळी ९ वाजताच्या सुमारास त्यांची प्रकृती खालावून मृत्यू झाला. रुग्णालय प्रशासनाने मृत्यूची नोंद करून प्रेतविच्छेदनासाठी मृतदेह शवगृहात ठेवला. या घटनेची खबर डॉ. अमित शेख यांच्या वतीने वार्डबॉय आशिष विधोत यांनी दिली. त्यानंतर खामगाव पथकातील होमगार्ड पांडुरंग तुळशीराम पांडे यांनी अकोला येथून आवश्यक कागदपत्रे शेगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात आणून सादर केली. त्यानंतर या प्रकरणी दाखल अधिकारी मपोहेका यांनी ११ फेब्रुवारी रोजी बीएनएसएसअंतर्गत आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीच्या प्रयत्नांना यश

## *कंत्राटी कर्मचारी होणार सेवेत कायम * काम बंद आंदोलनाची शासनाने घेतली दखल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१२:** राज्यातील शासकीय व निमशासकीय आस्थापनांमध्ये तात्पुरत्या (कंत्राटी) स्वरूपात नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या संदर्भातील विविध प्रकरणांचा सखोल अभ्यास करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्यासाठी शासनाने उच्चस्तरीय अभ्यास गट स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.
याबाबतचा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय १० फेब्रुवारी रोजी निघालेला आहे. हे महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा स्वच्छता शासकीय कंत्राटी कृती समितीचे यश आहे. अशी माहिती कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड यांनी दिली आहे.
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत जलजीवन मिशन स्वच्छ भारत मिशन योजनेत काम करणारे जिल्हा व तालुका स्तरावरील कर्मचारी यांनी ४ ते ६ फेब्रुवारी दरम्यान जिल्हास्तरावरून काम बंद आंदोलनाला सुरुवात केली होती. तसेच ९ फेब्रुवारी पासून मुंबईतील आझाद मैदान येथे सदर कर्मचाऱ्यांनी सेवेत कायम करण्यासोबतच इतरही काही मागण्या घेऊन बेमुदत काम बंधन सुरू असतानाच शासनाने याची दखल घेतली आहे. आणि हा शासन निर्णय काढून सदर कर्मचाऱ्यांना दिलासा दिला आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार, संबंधित प्रशासकीय विभागांमध्ये प्रलंबित असलेल्या प्रस्तावांचा तसेच न्यायालयीन बाबींचा विचार करून पुढील कार्यवाही ठरविण्यात येणार आहे. या अभ्यास गटामार्फत विविध विभागांकडून माहिती मागवून कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरण संदर्भातील आर्थिक, कायदेशीर व प्रशासकीय बाबींचा सर्वंकष आढावा घेतला जाणार आहे. अभ्यास गटाच्या अध्यक्षपदी मुख्य सचिव यांची नियुक्ती करण्यात आली असून अपर मुख्य सचिव (वित्त), अपर मुख्य सचिव (सेवा), प्रधान सचिव (नियोजन) तसेच विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. आवश्यकतेनुसार तज्ज्ञ व अन्य अधिकाऱ्यांना निमंत्रित सदस्य म्हणून सहभागी करून घेण्याची तरतूदही करण्यात आली आहे. शालेय शिक्षण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण आदी विभागांनी आपल्या विभागातील कंत्राटी नियुक्त्यांची सद्यस्थिती, आर्थिक परिणाम आणि न्यायालयीन प्रकरणांची माहिती अभ्यास गटासमोर सादर करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाअंतर्गत संघटनेच्या माध्यमातून याचा चांगला पाठपुरावा केलेला आहे. आणि त्याला या शासन निर्णयामुळेमुळे यशही प्राप्त झाले असे म्हणावे लागेल. तसेच ग्रामविकास संघटनेच्या न्यायालयीन लढ्यामुळे या कर्मचाऱ्यांबाबत महाराष्ट्र न्याय प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांनीही ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दहा वर्षे पूर्ण झालेले आहेत. त्यांना सेवेत कायम करण्याबाबत निर्णय दिलेला आहे. याची दखल घेऊन शासनाने कंत्राटी कर्मचारीसाठी हा खूप चांगला शासन निर्णय करून यांना दिलासा दिला आहे. अभ्यास गटाच्या शिफारशींनंतर शासनाकडून पुढील निर्णय घेतला जाणार असून राज्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय महत्वाचा मानला जात आहे. सदर शासन निर्णयावर तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी संबंधित कंत्राटी कर्मचारी यांच्याकडून करण्यात येत आहे.

# महाशिवरात्री निमित्त भव्य कथेचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**साखरखेर्डा दि.१२ :** सकळाशी येथे आहे अधिकार । कलियुगे उध्दार हरिनामे ।। '' हरि कथा श्रवण केल्यानंतर जीवनातील व्यथा दूर झाल्याशिवाय राहणार नाही, हरिनामस्मरणाने वाणी पवित्र होते,देह पवित्र होतो. मानवाचा उध्दार होतो,
'असा हितोपदेश ह.भ.प.कैलाश महाराज निर्मल चिंचपूरकर यांनी भाविकांना केला. हभप.निर्मळ महाराज हे परिसरातील मौजे पेनटाकळी येथे महाशिवरात्री निमित्ताने आयोजित शिवमहापुराणकथा सोहळ्यात शिवपूराणकथेव्दारे भाविकांना प्रबोधन करीत होते.सद्गुरू सोपानकाका महाराज देहूकर फड श्री क्षेत्र पंढरपूर परंपरा लाभलेल्या पेनटाकळी येथे शिवपुराण कथा सोहळा आयोजित करण्यात आला असून या सोबतच अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. माघ कृ.८ सोमवारी ता.८ पासून सुरू झालेल्या या धार्मिक सोहळ्याची सांगता माघ कृ. चतुर्दशी ता.१६ फेब्रुवारी महाप्रसादाचे वाटपाने होणार आहे.दैनंदिन कार्यक्रमात रोज सकाळी ४.०० ते ५.०० काकडा भजन, सकाळी ११.०० ते ४.०० शिवमहापुराणकथा, सायंकाळी ६.०० ते ७.०० हरिपाठ आणि रात्री ८.३० ते १०.३० श्री हरि किर्तन असा भाव भक्ती पूर्ण कार्यक्रम होणार आहे. जिल्ह्यातील प्रसिद्ध कथा वाचक ह.भ.प.कैलाश महाराज निर्मल हे आपल्या अमृतसर वाणीतून संगीतमय शिवपुराण कथा ऐकविणार आहेत.त्यांना श्रवणीय मधुर संगीताची साथ हभप.रामेश्वर महाराज सोळंकी (पाटोदा), हभप.प्रमोद महाराज नरवाडे (शेलोडी), अनंता वाघमारे (कवठळ) ह्यांची लागणार आहे. किर्तनकारांमध्ये ता.९ रोजी हभप. आंबा महाराज देशमुख यांनी किर्तन सेवा अर्पण केली असून ता.१० रोजी हभप. भिमराव महाराज वाघ यांचे किर्तन झाले आहे. आज ता.११ रोजी हभप .ओम महाराज क्षिरसागर यांचे किर्तन होणार असून ता.१२ रोजी हभप .सतीश मिश्रा यांचे किर्तन होणार आहे. ता.१२ रोजी हभप.डिगांबर महाराज साडे हे किर्तन सेवा अर्पण करणार असून ता.१४ रोजी हभप.रा महाराज गुंड यांचे किर्तन होणार आहे. ता.१५ रोजी राहूल महाराज गाडेकर यांच्या किर्तनाचा लाभ मिळणार आहे. या सोहळ्याची सांगता हभप. कैलाश महाराज निर्मल यांच्या काल्याच्या किर्तनाचे होणार असून महाप्रसादाचे वितरण करून सोहळ्याची सांगता होणार आहे. तरी या भाव भक्ती पूर्ण सोहळ्याला परिसरातील भाविकांनी हजेरी लावावी असे आवाहन हभप. गणेश महाराज इंगळे यांनी केले आहे.

# महाराजस्व समाधान शिबिराचे नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन: तहसीलदार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेंदुर्जन दि.१२ :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'चे आयोजन आज, शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे.
हे शिबिर सकाळी ९:०० वाजता मौजे गोरेगाव आणि मौजे राजेगाव या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी पार पडणार आहे. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती मिळवणे, प्रलंबित दाखले मिळवणे आणि आपल्या तक्रारींचे जागेवरच निराकरण करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. प्रशासकीय कामे जलद गतीने व्हावीत आणि सर्वसामान्यांचे प्रश्न सुटावेत, हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. तरी परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी आणि गरजू लाभार्थ्यांनी या समाधान शिबिरासाठी उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे तहसीलदार अजित दिवटे यांनी प्रशासनाच्या वतीने केले आहे

# जंगी शंकरपट बैलगाडा शर्यतीचा थरार; तालुक्यात प्रथमच आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.१२ :** तालुक्यातील मौजे भोनगाव येथे पारंपरिक ग्रामीण क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करणारी भव्य 'शंकरपट' बैलगाडा शर्यत मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडली. तालुक्यात प्रथमच एवढ्या व्यापक स्वरूपात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याने परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थांनी एकजुटीने पुढाकार घेत कार्यक्रमाला जत्रेचे स्वरूप दिले.
कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना तालुका अध्यक्ष रामा पाटील थारकर, माजी सभापती सुरेश शेळके तसेच लक्ष्मण गवई पत्रकार नारायण दाभाडे शेगाव यांच्या हस्ते दिमाखदार पद्धतीने करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने नारळ फोडून आणि बैलांची पूजा करून शर्यतीचा शुभारंभ करण्यात आला. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेला प्रारंभ होताच मैदानावर टाळ्यांचा कडकडाट झाला. उद्घाटनावेळी रामा पाटील थारकर यांनी ग्रामीण संस्कृती जपण्याची गरज अधोरेखित करत अशा स्पर्धा गावांमधील एकोपा, क्रीडाभावना आणि शेतकरी परंपरेला बळ देतात, असे प्रतिपादन केले. सामाजिक व संघटनात्मक कार्यात सक्रिय असलेले त्यांचे योगदानही यावेळी उपस्थितांनी गौरवले. तसेच सुरेश शेळके यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये उमेश शेळके (युवा ता.प्रमुख), अजय अहिर, रामदास शेळके, प्रवीण कोल्हे, भीमराव शेळके, अनंता शेळके, प्रभाकर पहुरकर, सागर दहिभात, अतुल शेळके, पूर्णाजी भारसाकडे, संजय गुरुजी शेळके, पांडुरंग शेळके, राजू जमाव, संतोष आप्तुरकर, ज्योती भारसाकडे (पोलीस पाटील), सागर भारसाकळे, गणेश दाभाडे, गजानन रताळे, तुळशीराम रताळे, महादेवराव मुंडे, सुरेश वर्गे तसेच पंचकमिटी सदस्य आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. स्पर्धेत तालुक्यातील व परिसरातील नामांकित बैलगाडा मालकांनी सहभाग घेतला. बैलांचा वेग, चालकांचे कौशल्य आणि प्रेक्षकांचा जल्लोष यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. शिस्तबद्ध नियोजन आणि सुरक्षिततेची काळजी घेत कार्यक्रम सुरळीत पार पडला. भोनगावमध्ये प्रथमच झालेल्या या भव्य आयोजनामुळे शेगाव तालुक्यातील पारंपरिक क्रीडा संस्कृतीला नवे व्यासपीठ मिळाले असून भविष्यातही अशा स्पर्धांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# गटई कामगारांसाठी पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना; अर्ज सादर करण्याचे आवाहन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि. १२ :** गटई काम (कातडी सोलणे व त्यापासून चपला-जोडे तयार करणे) करणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करून देण्यासाठी समाज कल्याण विभागामार्फत सन २०२५२६ या वर्षासाठी योजना राबविण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांनी आपले अर्ज दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत प्रत्यक्ष सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.
पात्रतेच्या अटी व शर्ती: १.अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज पूर्ण भरून त्यावर पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटविलेला असावा. २. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा. ३.अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागासाठी ₹८०,००० पेक्षा अधिक नसावे शहरी भागासाठी ₹१,००,००० पेक्षा अधिक नसावे (तहसीलदाराने निर्गमित केलेले उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक) किंवा अर्जदार दारिद्र्य रेषेखालील असावा. ४.अर्जदाराचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावे. ५.ज्या जागेसाठी स्टॉल मागितला आहे ती जागा ग्रामपंचायत, नगर परिषद/नगरपालिका, छावनी बोर्ड (कटक मंडळ) किंवा महानगरपालिका यांच्याकडून भाडेकराराने/खरेदीने/मोफत अधिकृत ताब्यात दिलेली असावी किंवा अर्जदाराची स्वतः ची मालकीची असावी. यासंबंधी कागदपत्र जोडणे आवश्यक. ६.अर्जदाराचा अधिकृत जातीचा दाखला जोडणे बंधनकारक. ७. शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड प्रत, आधार कार्ड प्रत, अधिवास प्रमाणपत्र इत्यादींच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक.
**अर्ज सादर करण्याबाबत सूचना:** विहित नमुना अर्ज विनामूल्य सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातून प्राप्त करून घ्यावा. आवश्यक सर्व कागदपत्रांसह पूर्ण अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे दि. २०/०२/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत सादर करावा. उशीरा अथवा अपूर्ण अर्जांचा विचार केला जाणार नाही. अर्जातील त्रटीपुर्ततेबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही. विहित नमुन्याव्यतिरिक्त इतर अर्ज नमुने स्वीकारले जाणार नाहीत. असे मनोज मेरत, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा यांनी कळविले आहे.

# भारतीय टपाल विभागाकडून आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

Padm. Dr. V.B. Kolte College of Engineering, Malkapur
2010
॥ तंत्रशिक्षणम् सर्वश्रेष्ठ ॥
EST.2010

**बुलडाणा दि.१२ :** भारतीय टपाल विभागातर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही (युनिव्हर्सल पोस्टल युनियन) आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना मित्र किंवा मैत्रिणीला पत्र लिहून आपल्या भावना व विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेचा विषय ''डिजिटल जगात मानवी संबंध का महत्वाचे आहेत'' असा ठेवण्यात आला असून, विद्यार्थ्यांनी या विषयावर पत्रलेखन करायचे आहे. ९ ते १५ वयोगटातील सर्व विद्यार्थी या स्पर्धेसाठी पात्र आहेत. ही स्पर्धा ०८ मार्च २०२६ (रविवार) रोजी आयोजित करण्यात येणार आहे. तसेच शालेय स्तरावरील स्पर्धा ०७ मार्च २०२६ (शनिवार) रोजी होणार आहे. पत्र इंग्लिश किंवा भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचित असलेल्या कोणत्याही भारतीय भाषेत लिहिता येईल. विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या भाषेत आपले मत मांडण्याची मुभा असून, कमाल शब्दमर्यादा ८०० शब्द इतकी आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले अर्ज २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अधीक्षक डाकघर, बुलडाणा विभाग, बुलडाणा येथे जमा करावेत. अंतिम दिनांकानंतर प्राप्त होणारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
सर्कल स्तरावरील बक्षिसे:
प्रथम रु.२५,००० व प्रमाणपत्र,
द्वितीय रु.१०,००० व प्रमाणपत्र,,
तृतीय रु. ५,००० व प्रमाणपत्र,
राष्ट्रीय स्तरावरील बक्षिसे:
प्रथम रु. ५०,००० व प्रमाणपत्र, द्वितीय रु. २५,००० व प्रमाणपत्र, तृतीय रु. १०,००० व प्रमाणपत्र, विद्यार्थ्यांमध्ये पत्रलेखनाची आवड निर्माण व्हावी व सर्जनशील लेखनाला चालना मिळावी, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

## आवाहन | ॲनिमिया मुक्त बालपण

# पालकांनी विशेष लक्ष द्याव्यात अशा काही खास बाबी- डॉ. नागरे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**अंढेरा दि. १२:** १३ फेब्रुवारी हा दिवस जागतिक ॲनिमिया जनजागृती दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यासाठी सुरुवात ही एका प्रसंगाने करूया, रवी (नाव बदललेले आहे) हा पाचवीत शिकणारा मुलगा. हुशार, पण गेल्या काही महिन्यांपासून त्याला शाळेतून आल्यावर प्रचंड थकवा जाणवायचा. अभ्यासाला बसले की झोप यायची आणि छोटी गोष्ट म नासारखी झाली नाही की तो रडायचा. पालकांना वाटले, ''मुलगा आळशी झालाय.'' पण जेव्हा बालरोगतज्ज्ञांनी त्याची तपासणी केली, तेव्हा कळले की त्याच्या शरीरात रक्ताचे प्रमाण अवघे ७ ग्रॅम होते! रवी आळशी नव्हता, तो ॲनिमिक (रक्तक्षय ग्रस्त ) होता.ॲनिमिया ही कथा फक्त रवीची नाही, तर आपल्या शहरातील अनेक मुलांची आहे. आज १३ फेब्रुवारी - जागतिक ॲनिमिया जनजागृती दिनानिमित्त जागतिक आरोग्य संघटनेने ही संकल्पना मांडली आहे. या निमित्ताने ॲनिमियाचा हा ''छुपा शत्रू'' ओळखणे गरजेचे आहे. रक्त म्हणजे शरीराचे पेट्रोल सोप्या भाषेत सांगायचे तर, जसे गाडी पेट्रोलशिवाय धावू शकत नाही, तसेच ऑक्सिजन शिवाय शरीर चालू शकत नाही. फुफ्फुसातून घेतलेला ऑक्सिजन मेंदूपर्यंत पोहोचवण्याचे काम रक्तातील हिमोग्लोबिन करते. जर हे पेट्रोल कमी झाले, तर मेंदूला पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही आणि म्हणूनच मुले वर्गात लक्ष देऊ शकत नाहीत किंवा त्यांना सतत थकवा जाणवतो. भारतातील वास्तव: आकडे काय सांगतात? नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाचे (-५) आकडे डोळ्यात अंजन घालणारे आहेत. * भारतात ६ महिने ते ५ वर्षे वयोगटातील ६७% मुले ॲनिमियाने ग्रस्त आहेत. सोप्या भाषेत सांगायचे तर, १० पैकी ७ मुलांना रक्ताची कम तरता आहे. १५ ते ४९ वयोगटातील ५७% महिला ॲनिमियाच्या शिकार आहेत.प्रमाण कमी होण्याऐवजी मागील काही वर्षांत वाढले आहे, ही चिंतेची बाब आहे. **शासकीय प्रयत्न:** ॲनिमिया मुक्त भारत या समस्येचे गांभीर्य ओळखून भारत सरकारनेॲनिमिया मुक्त भारत हे महत्वाकांक्षी अभियान हाती घेतलेआहे. यासाठी ६६६ हे खास धोरण राबवलेजात आहे: १. -३ फॉर्म्युला: , आणि (तपासा, उपचार करा आणि संवाद साधा) यावर भर वाढत आहे २. .२. शाळा व अंगणवाडी: मुलांसाठी वयानुसार गुलाबी आणि निळ्या गोळ्यांच्या माध्यमातून मोफत लोह व फॉलिक ॲसिडचा पुरवठा केला जातो. ३. **जंतनाशक मोहीम:** वर्षातून दोनदा नॅशनल डिवॉर्मिंग डे द्वारे मुलांना जंतूनाशक गोळ्या दिल्या जातात. ४. फोर्टिफाईड तांदूळ: शिधापत्रिका धारकांना आता लोहयुक्त तांदूळ देण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे. **धोक्याची घंटा:** ॲनिमिया फक्त लोहाच्या कमतरतेमुळे होत नाही! बहुतेक पालक आणि काही वेळा डॉक्टरही ॲनिमिया म्हणजे फक्त '' '' असे मानतात आणि मुलांना लोहयुक्त टॉनिक चालू करतात. पण एक बालकर्क रोग तज्ञ म्हणून आम्ही याकडे अधिक गांभीर्याने पाहतो. जर टॉनिक घेऊनही हिम ोग्लोबिन वाढत नसेल, तर त्यामागे इतर गंभीर कारणे असू शकतात: १. जीवनसत्वांचा अभाव केवळ लोह पुरेसे नसते. भारतीय शाकाहारी आहारात व्हिटॅमिन बी-१२ ची मोठी कमतरता आढळते. बी-१२ आणि फॉलिक ॲसिडच्या अभावामुळे तयार होणाऱ्या रक्तपेशी आकारम ानाने मोठ्या पण कमकुवत असतात.

# श्री.औंढेश्वर विद्यालय अंढेरा येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**अंढेरा दि.१२ :** स्थानिक श्री.औंढेश्वर विद्यालय अंढेरा येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. नववीच्या विद्यार्थ्यांकडून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.
यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य संजीव सानप हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र अंढेराचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवानंद शिंगाडे, दैनिक दिव्य मराठीचे पत्रकार राधेश्याम ढाकणे, शाळेचे पर्यवेक्षक संजय सरोदे, राजीव तेजनकर, प्रा.राजेश पाटील प्रा.पुरुषोत्तम आघाव हे होते.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामेश्वर चेके यांनी केले. यावेळी अनुष्का पवार, वैष्णवी कापसे, गौरी दांडगे, सृजल सानप, राणी इंगळे या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी डॉ. शिवानंद शिंगाडे यांनी जीवनात यश मिळवायचे असेल तर वाईट व्यसनांपासून दूर रहा या स्पर्धेच्या युगात टिकून राहायचे असेल तर सातत्याने अभ्यास करणे गरजेचे आहे असे मार्गदर्शन केले तसेच मोबाईलच्या दुष्परिणामा बाबत माहिती दिली. पत्रकार राधेश्याम ढाकणे यांनी जीवनात शिस्त खूप महत्वाची आहे आपल्या मधील गुण ओळखून पुढील क्षेत्र निवडा असे म ार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य संजीव सानप यांनी जीवनात जर यशस्वी व्हायचे असेल तर शॉर्टकट न वापरता कठोर परिश्रमाशिवाय दुसरा कोणताच पर्याय नाही आणि केव्हाही तुम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी आम्ही तत्पर आहोत अशी ग्वाही सुद्धा दिली. यावेळी सखाराम नाडे, संजय हुसे, आश्रुबा कोकाटे, मनोज सानप, सोनकांबळे मॅडम, योगेश घुगे, कारभारी सानप व नववी दहावीचे विद्यार्थी विद्यार्थिनीं ची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संदीप वनवे यांनी केले.

अजिंक्य भारत •
# आपलं जालना
जालना, शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com


महत्त्वाचे

### परीक्षा केंद्रावर सुविधांचा अभाव

**जालना :** जिल्ह्यात सुरू असलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी मंठा तालूक्यातील ढोकसाळ परीक्षा केंद्रास अचानक भेट दिली. याठिकाणी सुविधा बाबत त्रुटी निदर्शनास आल्याने संबंधित अधिकाऱ्यांना खुलासा सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. यावेळी परिक्षा केंद्रावर परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठींची बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह यामध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्या. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या नियमांनुसार परीक्षा केंद्रावर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना यावेळी संबंधीतांना दिल्या. जिल्हाधिकारी यांच्या या भेटीमुळे परीक्षा व्यवस्थापनाबाबत प्रशासन अधिक सतर्क झाले असून, विद्यार्थ्यांच्या हितासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यात येणार आहे. यावेळी परतुर उपविभागीय अधिकारी पदमाकर गायकवाड यांच्यासह मंठा तहसिलदार, अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थित होती.

### अपघातात पतीचा मृत्यू;पत्नी जखमी

**जालना :** ट्रक व दुचाकीमध्ये झालेल्या अपघातात पतीचा मृत्यू झाला तर पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना बदनापूर परिसरात दुधना नदीच्या पुलाजवळ घडली. बदनापूर तालुक्यातील कुसळी येथील विवाहित जोडपे लग्नासाठी जालना येथे जात होते. यावेळी बदनापूर जवळील दुधना नदीच्या पुलाजवळ अपघात झाला. त्या अपघातात सुखदेव उर्फ बंडू लक्ष्मण वैद्य (३८) हे ठार झाले तर त्यांच्या पत्नी वर्षा वैद्य गंभीर जखमी झाल्या. त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहे. पोलिस निरीक्षक मच्छिन्द्र सुरवसे, पोलिस उपनिरीक्षक ए. जी. जैस्वाल यांनी घटनास्थळी भेट देऊन तातडीने अपघातग्रस्तांना जालना येथील शासकीय रुग्णालयात पाठवले.

### सैनिक कल्याण विभागाची ऑनलाईन परीक्षा

**जालना :** महाराष्ट्र राज्य सैनिक कल्याण विभाग आणि त्याअंतर्गत असलेल्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील रिक्त पदांच्या भरतीसाठी अर्ज मागविण्यात आले होते. या विभागातील लिपीक टंकलेखक (गट-क) या संवर्गातील एकूण ७२ पदांसाठी ऑनलाईन परीक्षा टीसीएसमार्फत दि.१४ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# जिल्ह्यासाठी २४० कोटी रुपयांच्या वाढीव निधीची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. १२ :** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत २०२६-२७ चा प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठी मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी जालना जिल्ह्यासाठी जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत रु. २४० कोटी रुपयांचा वाढीव निधी देण्याची मागणी केली.

पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी जालना जिल्हा जिल्हा वार्षिक योजनेच्या (डीपीडीसी) खर्चात आघाडीवर असल्याचे नमूद करत, मुख्यमंत्री १५० दिवस सुधारणा कार्यक्रम आणि १०० दिवसांच्या मूल्यमापनातही जिल्ह्याने अव्वल कामगिरी केल्याचे सांगितले. जालना ड्रायपोर्ट लवकरात-लवकर सुरु करण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सादरीकरणात सांगितले की, २०२६-२७ साठी जालना जिल्ह्यास शासनाकडून रु. ३५९.२४ कोटी रुपयांची निधी मर्यादा कळविण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२६-२७ यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या रु. ३५९ कोटी २४ लाखांच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. मात्र, जिल्ह्यातील विविध कार्यान्वयीन यंत्रणांकडून प्राप्त झालेल्या मागणी नुसार ६०० कोटी रुपयांचा प्रस्तावित आराखडा राज्यस्तरीय बैठकीत ठेवण्यात आला आहे. त्यामुळे सुमारे रु. २४०.७६ कोटी रुपये अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. चालू आर्थिक वर्षात राबविण्यात येत असलेले विशेष प्रकल्प तसेच जिल्हा विकास आराखड्यानुसार प्रस्तावित योजनांची माहिती दिली.

तसेच वाढीव निधीतून आपले सरकार सेवा केंद्र अद्ययावतीकरण, वाळू घाटांवर नियंत्रण व देखरेखीसाठी एआय कॅमेरे



बसविणे, पर्यटन विकास व गड किल्ले संवर्धन, इतर जिल्हा व ग्रामीण रस्ते डांबरीकरण व मजबुतीकरण, महसुल विभाग मंडळ अधिकारी कार्यालय अद्ययावतीकरण, पशुवैद्यकीय दवाखाने चिकित्सालये बांधकाम बळकटीकरण, शासकीय कार्यालयावर सोलार, महाराष्ट्र नगरोत्थान व नागरी दलित वस्ती मध्ये पायाभुत सुविधा, रस्ते सुरक्षा बळकटीकरण, जालना शहर व ग्रामीण भागात स्ट्रीट लाईट बसविणे, स्पर्धात्मक परिक्षा, ग्रंथालय आणि उद्यान, सेरिकल्चर, ग्लो गार्डन आणि चौपाटीचा विकास आदी विकास कामे, तसेच दृष्टीहिन दिव्यांगसाठी नॅव्हीनॉट हे उपकरण देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी मित्तल यांनी दिली.

या बैठकीस मुंबई येथुन मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा जालना पालकमंत्री पंकजा मुंडे, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जैसवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाच्या सचिव शैला ए. उपस्थित होते. तर जालना येथून आमदार हिकमत उढाण, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी.एम.मिन्नु, पोलिस अधिक्षक अजयकुमार बंन्सल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते.

## महापौर व उपमहापौरांनी घेतला कामकाजाचा आढावा



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. १२ :** शहर महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारताच विभागप्रमुखांची महत्त्वाची आढावा बैठक घेतली. महापौर यांच्या कक्षात पार पडलेल्या या बैठकीत शहराचा विकास, महसूल वाढ आणि प्रलंबित प्रकल्पांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रलंबित असणारी कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश - महापौर वंदना मगरे व उपमहापौर राजेश राऊत यांनी दिले.

या बैठकीत फुलंब्रीकर नाट्यगृह, भोकरदन नाका गोडाऊन, अग्निशमन कार्यालयासमोरील जागेत आणि गेस्ट हाऊस परिसरात नवीन शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्याचे नियोजन करणे, वीर सावरकर जलतरण तलाव तातडीने सुरू करणे, मोती तलावातील तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्याचे काम लवकरात लवकर सुरू करण्याबाबत आवश्यक ती कारवाई करावी, रस्त्यांच्या कडेला व नाल्यावरील धापे करावेत, यासह इतर बाबींवर महापौर व उपमहापौर यांनी सूचना केल्या.

तसेच कामात हलगर्जीपणा केला तर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी भाजप गटनेते महेश निकम, नगरसेवक लक्ष्मीकांत पांगारकर, अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपायुक्त नंदा गायकवाड यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

## प्रधानमंत्री आवास योजनेचे हप्ते रखडले

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अंबड, दि. १२ :** तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत मंजूर लाभार्थ्यांचे हप्ते स्पर्श प्रणाली नुसार वितरित होत नसल्याचा आरोप शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानने केला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री आणि ग्रामविकास मंत्री यांना ईमेलद्वारे निवेदन पाठवण्यात आले आहे.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजू छल्लारे यांनी निवेदनात म्हटले आहे की, २९ नोव्हेंबर २०२५ पासून अनेक पात्र लाभार्थ्यांचे हप्ते थांबले आहेत. जियो टॅग फोटो अपलोड, क्षेत्रीय पडताळणी आणि डी.एस.सी. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही प्रस्ताव राज्यस्तरावर होल्ड ठेवले जात आहेत. काही दिवसांनी कोणतेही लेखी कारण न देता हे प्रस्ताव रिजेक्ट केले जात आहे. वर्ष २०२४-२५ आणि २०२५-२६ साठी अंबड तालुक्याला १६,७८६ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी १६,३४२ घरे मंजूर झाली.

मात्र, केवळ ९६२ घरे पूर्ण झाली असून पूर्णता टक्केवारी फक्त ५.८९ टक्के आहे. मंजूर घरांच्या तुलनेत पूर्ण झालेल्या घरांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. हप्ते वेळेवर न मिळाल्यामुळेच ही स्थिती निर्माण झाली आहे.

## कॉपी प्रकरणात सहा शिक्षकांचे निलंबन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. १२ :** बारावीच्या इंग्रजी पेपरला विविध केंद्रांवर सहा कॉपीबहाद्दरांना पकडण्यात आले होते. संबंधित केंद्रावर कर्तव्यावर असलेल्या सहा शिक्षकांना निलंबित करण्याचे आदेश शिक्षणाधिकाऱ्यांनी काढले आहेत. या आदेशामुळे शिक्षकांमध्ये खळबळ उडाली आहे. दुसरीकडे जिल्हाधिकाऱ्यांनी बुधवारी केलेल्या पाहणीत ढोकसाळ परीक्षा केंद्रावर असुविधा आढळून आल्या. शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित केंद्रचालकांना त्याबाबत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

शिक्षणाधिकाऱ्यांनी काढलेल्या आदेशानुसार वाकुळणी येथील छत्रपती संभाजी विद्यालयातील सहशिक्षक बी.ई. राव, रोहिलागड येथील राजे शिवाजी विद्यालयातील सहशिक्षक एस. आर. जाधव, अंकुशनगर येथील छत्रपती शिवाजी कनिष्ठ विद्यालयातील सहशिक्षक आर.के.भालेराव, पी.बी. वाघ, गोंदी येथील सिद्धेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील सहशिक्षिका पी.ए. सोळुंके, शहागड येथील प्रबोधनकार ठाकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सहशिक्षिका एन.एम. जायभाये यांना निलंबित करण्याबाबतचे आदेश संबंधित मुख्याध्यापक, संस्थाचालक, सचिवांना दिले आहेत. कारवाईचा अहवाल तातडीने सादर करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

## न्यायालयात हिरकणी कक्षाची स्थापना

**जालना :** न्यायालयीन महिला अधिकारी, महिला कर्मचारी व न्यायालयात कामानिमित्त येणाऱ्या महिला, विशेषतः लहान बालकांसह येणाऱ्या मातांसाठी सुरक्षित व सुसज्ज जागेची गरज ओळखून हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हिरकणी कक्षामध्ये स्तनपानासाठी स्वतंत्र जागा, बसण्याच्या योग्य सुविधा, स्वच्छता व्यवस्था तसेच मुलांसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे न्यायालयात येणाऱ्या महिलांना दिलासा मिळणार असून त्यांच्या अडचणी कमी होणार आहेत. जालना न्यायालयाच्या प्रांगणातील हिरकणी कक्षाचे उद्घाटन काही दिवसापूर्वी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले होते.

## साष्ट पिंपळगावच्या पार्थ शिंदेची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

**अंबड :** तालुक्यातील साष्ट पिंपळगाव येथील क्रिकेट खेळाडू पार्थ शिंदे याची महाराष्ट्राच्या १६ वर्षाखालील क्रिकेट संघात निवड झाली आहे.



पार्थचा बालपणापासूनच क्रिकेटकडे ओढा राहिलेला आहे. त्यात त्याला त्याच्या वडिलांकडून वेळोवेळी प्रोत्साहन मिळत गेल्याने त्याला यश मिळत गेले. पार्थने दहावी मध्ये असताना एलोरा इंग्लिश स्कूल यांच्यामार्फत जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत भाग घेतला होता. त्या स्पर्धेत त्याने उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे त्याच्या खेळाची दखल घेऊन महाराष्ट्र क्रिकेट संघात शाळेतर्फे शिफारस करण्यात आली होती. त्या अनुषंगाने आज गुजरात व हैदराबाद या संघाशी छत्रपती संभाजीनगर येथे खेळून उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे पार्थ याची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे. ज्यांच्या पाठबळाने पार्थला हे यश मिळाले आहे ते नामदेव कचरू शिंदे हे त्याचे वडील तीर्थपुरी येथे एका सहकारी बँकेत मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत.

## बालविवाहमुक्त जालना जिल्ह्यासाठी प्रशासनाचे पाऊल

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. १२ :** जिल्ह्यात बालविवाहाची प्रथा समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी कंबर कसली आहे. जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय आणि इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या बालविवाह निर्मूलन चित्ररथाला जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी मित्तल यांनी स्वतः चित्ररथावर स्वाक्षरी करून मोहिमेला शुभेच्छा दिल्या आणि महिला व बाल विकास विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. हा चित्ररथ संपूर्ण जिल्ह्यात, विशेषतः जालना शहर आणि




८ तालुक्यांमध्ये फिरणार आहे. ज्या गावांमध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक आहे, तिथे या चित्ररथाच्या माध्यमातून विशेष लक्ष दिले जाईल. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन तरुण पिढीला बालविवाहाच्या दुष्परिणामांची माहिती दिली जाणार आहे. चित्ररथावर लावलेले माहितीपूर्ण पोस्टर्स, बालविवाह रोखण्यासाठीची शपथ आणि जनजागृतीपर गाणी याद्वारे नागरिकांचे प्रबोधन केले जाईल. बालविवाह हा कायद्याने गुन्हा असून, असा प्रकार घडत असल्यास तातडीने १०९८ या क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

या प्रसंगी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. व्ही. कड, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन इंगळे, सुभाष कुलकर्णी, अमोल राठोड, उमेश कुटे, उद्धव खरात, कवीश्वर नेरे, सचिन चव्हाण आणि विनोद दाभाडे उपस्थित होते. तसेच इंडियन सोशल वेलफेअर सोसायटीचे जिल्हा समन्वयक नितीन जह्राड, संस्थेचे कर्मचारी आणि चाईल्ड हेल्पलाईनचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बालरंगभूमी परिषदेकडून आरोग्य शिबिराचे आयोजन

**जालना :** बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबई आणि जालना शाखेच्या वतीने जीवनरंग आरोग्य तपासणी शिबिर झाले. जिल्हा शासकीय रुग्णालयात झालेल्या या शिबिराचा अनेकांनी लाभ घेतला. बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबईच्या अध्यक्षा ॲड. नीलम शिर्के यांच्या संकल्पनेतून सभासद आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्रात २७ जिल्ह्यांमध्ये बालरंगभूमी परिषदेच्यावतीने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, अति जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र गाढेकर, स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रज्ञा कुलकर्णी, डॉ. स्वप्नाली परमेश्वर, डॉ. स्मिता पंडित यांच्या मार्गदर्शनात सर्व सभासदांचे आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिराप्रसंगी बाल रंगभूमी परिषद शाखा जालना अध्यक्षा वैशाली शालिग्राम दाभाडे, कार्याध्यक्ष डॉ. अमजद सय्यद, कोषाध्यक्ष राजेश राऊत, कार्यकारिणी सदस्य विशाल दाभाडे, राणी परदेशी, पुष्पलता दाभाडे, सुमित्रा दांडगे आदी सभासद उपस्थित होते.

प्रश्न | विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर

# कर्मचाऱ्यांचा दोन तासांच्या धरणे आंदोलनास चांगला प्रतिसाद

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि.१२ : देशातील कामगार व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात गुरुवारी सकाळी १० ते १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दोन तासांचे धरणे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.**

आंदोलनास जिल्ह्यातील सर्व सरकारी, निमसरकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व त्यानंतर सर्व संघटनेच्या पदाधिकारी यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्फत दिले.

देशातील ११ प्रमुख केंद्रीय कामगार संघटना व अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघ यांच्या आदेशानुसार देशभरात सुमारे ५ कोटी कामगार-कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. जालन्यातील आंदोलनात आयटक, सिटू यांच्यासह विविध कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी, बँक व एलआयसी कर्मचारी, अंगणवाडी व बालवाडी सेविका, आशा वर्कर्स, शालेय पोषण आहार कर्मचारी, बांधकाम कामगार, किसान सभा तसेच शेतमजूर संघटनांचे पदाधिकारी मोठ्या



संख्येने सहभागी झाले होते.

देशव्यापी संपामागील प्रमुख मागण्यांमध्ये चारही कामगार संहिता रद्द करणे, पीएफआरडीए कायदा रद्द करून जुनी पेन्शन योजना लागू करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करणे, सर्व कामगारांना किमान ३० हजार रुपये वेतन देणे, ईपीएस-९५ पेन्शनधारकांना किमान १५ हजार रुपये पेन्शन देणे, आशा-अंगणवाडी व पोषण आहार कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा देणे, तसेच शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेऊन कर्जमाफी जाहीर करणे या मागण्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील सुमारे १७ लाख कर्मचारी-शिक्षकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध कर्मचारी समन्वय समितीच्या निर्णयानुसार या आंदोलनास प्रातिनिधिक स्वरूपात सक्रिय पाठिंबा देण्यात आला. राज्यस्तरावरील मागण्यांमध्ये सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेबाबत अधिसूचना जाहीर करणे, वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करणे, चतुर्थ श्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, १०-२०-३० आश्वासित प्रगती योजना लागू करणे, तसेच शिक्षक, आरोग्य व इतर विभागांतील प्रलंबित प्रश्न निकाली काढणे यांचा समावेश आहे. आंदोलनानंतर संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष पी. बी. मते, सरचिटणीस याह्या पठाण, महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या राज्य उपाध्यक्ष दुर्गा भालके, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे विभागीय उपाध्यक्ष पी.बी.पवार जिल्हा अध्यक्ष डी. बी. काळे, सरचिटणीस संजय चव्हाण, महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र शिंदे, सचिव अरुण डुकरे, महाराष्ट्र राज्य तलाठी संघाचे अध्यक्ष संदीप नरुटे, सचिव बाळासाहेब कळकुंबे, ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे अध्यक्ष डी. बी. काळे, सचिव व्ही.ए.भगत कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद भगत, जिल्हा परिषद लेखा कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय तपासे, संगीता खिल्लारे यांच्या सर्व संघटनांचे पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६

## थोडक्यात

### लाखनवाडी येथून दुचाकी लंपास

चांदूर बाजार : तालुक्यातील लाखनवाडी येथील गुणवंत महाराज मंदिरात फिर्यादी अंकुश भागवतराव इंगळे (३१, रा. शेगाव नाका) हे परिवारासह दर्शनासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी दुचाकी मंदिर परिसरात उभी केली होती. तासभराने दर्शन घेवून ते परत दुचाकीजवळ आले असता, ती चोरीला गेल्याचे दिसले. तिची अंदाजे किंमत २५ हजार रुपये आहे. त्यांच्या तक्रारीवरून शिरजगाव कसबा पोलिसांनी अज्ञात दुचाकी चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### बसमधून महिलेची सोनसाखळी लंपास

अचलपूर : ३३ वर्षीय विवाहिता सासूसह नातेवाईकाच्या लग्नाला जाण्यासाठी परतवाडा बसस्थानकावर आल्या. बसमध्ये बसल्यावर पर्समध्ये ठेवेली साडेसहा ग्रॅमची सोनसाखळी चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. तिची अंदाजे किंमत १५ हजार रुपये आहे. या प्रकरणी परतवाडा पोलिसांनी प्राप्त तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

### घर विकून वृध्दाची फसवणूक

अंजनगाव सुर्जी : घरावर आर्धीच कर्ज असताना चौघांनी संगणमत करीत कर्जाबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता ते घर वृद्धाला विकून त्याची फसवणूक केली. अब्दुल गफ्फार मोहम्मद इब्राहिम (६२, रा. अंजनगाव सुर्जी) असे फसवणूक झालेल्या वृद्धाचे नाव आहे. ही बाब वृद्धाला कळताच त्याने पोलिसात फिर्याद दिली. पोलिसांनी शहरातीलच फसवणूक करणाऱ्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### बारमध्ये युवकाला मारहाण

मोर्शी : बारमधील काऊंटरवर उभ्या असलेल्या तिघांपैकी एकाला युवकाचा धक्का लागला. त्याचा राग आल्याने त्यापैकी दोघांनी युवकाला शिवीगाळ करीत काचेचा ग्लास त्याच्या कपाळावर मारत डोळ्याला इजा केली. इतकेच नव्हे, तर त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना सिंभोरा मार्गावरील बारमध्ये घडली. यात आयुष शिवकुमार शेळके (२२, रा. मोर्शी) हा जखमी झाला. त्याच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी अक्षय नरेंद्र ठाकरे (३०, रा. लिंगापूर, ता. आष्टी, जि. वर्धा) व अचल शरद पोहकार (३०, रा. अंतोरा, जि. वर्धा) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### अल्पवयीन मुलीला पळविले

वरुड : १६ वर्षीय मुलीला अज्ञाताने फूस लावून पळवून नेले. याबाबत नातेवाईकांच्या तक्रारीवरून बनोडा पोलिसांनी अज्ञात अपहरणकर्त्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### नांदगाव खंडेश्वर येथे घरफोडी

नांदगाच खंडेश्वर : शहरात दोन दिवसात दोन घरफोड्या करीत अज्ञात चोरट्यांनी एकूण १ लाख १९ हजार ६०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटना शहरातील न्यू गणेश कॉलनी, शिवाजी शाळेच्या मागे व प्रमोद नगर येथे घडल्यात. प्राप्त माहितीनुसार, न्यू गणेश कॉलनी येथील घटनेतील फिर्यादीचे पती हे वर्धा येथे शेती असल्याने तेथेच राहतात. ती मुलासह शहरात राहते. घटनेच्या वेळी ती उपचारासाठी मुलासह पतीकडे गेली होती. दरम्यान तिची आई गजानन महाराज प्रकट दिवसासाठी येणस येथे आली होती. तिने मुलीकडे चक्कर टाकला असता, तिला घराच्या समोरील दरवाजाचा कुलूप कोंडा तुटलेला दिसला, तर मागील दरवाजाचीही अवस्था तिच होती. घरातील सामान अस्ताव्यस्त पडले होते.

# हत्येनंतर मृतदेह कालव्यात फेकला

## ६ आरोपी पथ्रोट पोलिसांच्या ताब्यात

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१२ :** वर्धा जिल्ह्यात मटका (सट्टेबाजी-पट्टी) शी संबंधित पैशाच्या वादातून ३० ते ३५ वर्षीय तरुणाची हत्या केल्यानंतर, पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह गाडीत ठेवून अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तहसीलमध्ये आणण्यात आला. नातेवाईकांच्या मदतीने मौजा जहांपूर शिवार संकुलातील शाहनूर प्रकल्पाच्या कालव्यात मृतदेह जाळून टाकण्यात आला. परंतु एसडीपीओ मनीष ठाकरे, पथरोत पोलिस आणि ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने २४ तासांत ही घटना उघडकीस आणली आणि वर्धा जिल्ह्यातील ३ आरोपींसह एकूण ७ जणांना अटक केली आणि गुन्ह्यात वापरलेली गाडी जप्त केली. मृत तरुणाचे नाव शाहरुख असल्याचे सांगितले जात आहे. अटक केलेल्या आरोपींमध्ये प्रशांत हरिश्चंद्र महाजन (५९), विकास प्रशांत महाजन (२८), आणि अली अजगर सद्दाम हुसेन (२८) हे वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरातील रहिवासी आहेत आणि अमरावती जिल्ह्यातील राजना गावातील इतर चार जण आहेत.

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तहसील अंतर्गत येणाऱ्या पन्नोट पोलिस स्टेशन परिसरातील वाघडोह-जहानपूर संकुलातील हनुमान मंदिरासमोरील शाहनूर प्रकल्पाच्या कालव्यात बुधवारी सकाळी एका अज्ञात पुरूषाचा मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत आढळला. कालव्यालगतच्या शेतात काम करणाऱ्या गबणे नावाच्या चौकीदाराला कालव्यातून धूर येत असल्याचे दिसले. कालव्याला एक दुर्गंधी येत होती आणि तो कालव्याजवळ गेला आणि तो धक्का बसला. कालव्यात एका पुरूषाचा जळालेला मृतदेह त्याला आढळला. त्याने तात्काळ खोडगावच्या सरपंचाला घटनेची माहिती दिली. सरपंचाने तात्काळ





### मृताची ओळख पटली

उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांनी अजिंक्य भारतला सांगितले की मृताचे नाव शेख शाहरुख शेख रौफ आहे. फक्त एकच नाव ओळखता आले आहे. तो वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरातील रहिवासी आहे. सहा महिन्यांपूर्वी तो एका खून प्रकरणातून सुटला आणि नंतर गुन्हेगार बनला.

पथ्रोट पोलिसांना कळवले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. घटनेची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि वाघडोह पोलीस पाटील यांच्यासह हजारो नागरिक घटनास्थळी जमले. ग्रामीण गुन्हे शाखेचे उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्यासह एक पथकही घटनास्थळी पोहोचले. जळालेला मृतदेह कालव्यातून बाहेर काढण्यात आला, पंचनामा तयार करण्यात आला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. पोलिसांनी फॉरेन्सिक टीमचीही मदत घेतली. त्यानंतर, पोलिसांना संशय आला की मृताची हत्या करण्यात आली आणि नंतर पुरावा नष्ट करण्यासाठी जाळून टाकण्यात आला आणि नंतर कालव्यात फेकण्यात आला. गुन्हेगारांना शोधण्यासाठी पोलिसांनी तपास अधिक तीव्र केला.अर्धवट जळालेला मृतदेह बाहेर काढला आणि तपासणी केली असता तो पुरूष असल्याचे स्पष्ट झाले. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती आणि पोलिसांनी सुरुवातीला गृहीत धरले की त्याला हात आणि पाय बांधून कालव्यात फेकण्यात आले आहे. टायरच्या खुणा सापडल्यानंतर, पोलिसांनी आरोपींचा माग काढला. खुन्यांनी गुन्हा केल्यानंतर, मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी वापरलेली चारचाकी गाडी घटनास्थळी दिसत होती. कालव्याच्या सर्व बाजूंनी आर्वीमध्ये ही हत्या झाल्याचे पोलिसांनी निश्चित केले. पोलिस सूत्रांनी सांगितले की आर्वी शहरात शाहरुखची हत्या करण्यात आली. प्रशांत हरिश्चंद्र महाजन, त्याचा मुलगा विकास महाजन आणि अली अजगर सद्दाम हुसेन यांनी आर्वीमध्ये त्याची हत्या केली. त्यानंतर, पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने त्यांनी मृतदेह एका कारमध्ये भरला आणि अमरावती जिल्ह्यातील मौजा जहांपूर शिवारात आणला. तेथे, शुभम मोहनलाल रॉय (२८), हर्षित प्रकाश गौर (१९), निखिल दीपचंद गौर (३२) आणि अंजनगाव सुर्जी येथील आणखी एक रहिवासी यांच्या मदतीने, मृतदेह जाळून कालव्यात फेकून देण्यात आला.मार्गाचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. मौजा जहांपूर शिवारात एक कार दोन-तीन वेळा ये-जा करताना दिसली आणि घटनास्थळी तेलाचे डागही दिसत होते. परिणामी, असे गृहीत धरण्यात आले की आरोपींनी मृतदेहावर डिझेल ओतून नंतर जाळले होते.या खळबळजनक खून प्रकरणात, ग्रामीण गुन्हे शाखेचे निरीक्षक किरण वानखडे, पथ्रोट पोलिस स्टेशनचे अधिकारी अभय चौथणकर आणि उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी पथकाने मृताची ओळख पटवल्यानंतर काही तासांतच एका अल्पवयीन मुलासह सात आरोपींना अटक केली आणि गुन्ह्यात वापरलेली कार जप्त केली.

# ट्रकने तरुणाला चिरडले

## जमील कॉलनी चौकातील घटना



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१२ :** जमील कॉलनी चौक वालगाव आज दुपारी १ वाजता रस्त्यावर एक भीषण अपघात घडला. टिपर ट्रकने धडक दिल्याने दुचाकीस्वार तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्याचे नाव मोहम्मद झीशान मोहम्मद झाकीर (२५, अपनी बेकरी वालगाव रोड, शरीफा मशीद) असे आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या अपघातामुळे काही काळ घटनास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. गेल्या काही दिवसांत या मार्गावर दोन-तीन जीवघेणे अपघात झाले आहेत. आजच्या अपघाताबाबत असे वृत्त आहे की, मागून एका टिपर ट्रकने झीशानच्या दुचाकीला धडक दिली. मिळालेल्या माहितीनुसार, खडी भरलेला टिपर वालगावहून नागपूर गेटकडे येत होता. अझीझ वेडिंग हॉलजवळ, उतारावर एका टिपर ट्रकने झीशानच्या एमएच २७ टीम २४६६ या दुचाकीला धडक दिली. घटनास्थळी जमलेल्या लोकांनी गंभीर जखमी झालेल्या झीशानला इर्विन येथील जिल्हा रुग्णालयात नेण्यात यश मिळवले. तथापि, त्याचा आधीच मृत्यू झाला होता, ज्यामुळे गर्दीत काही प्रमाणात संताप निर्माण झाला होता. या मार्गावर यापूर्वीही अपघात झाले आहेत, ज्यात अनेकांचा मृत्यू झाला आहे. परिणामी, वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांसह सिग्नल यंत्रणेची मागणी होत आहे.

### कृउबा समितीच्या संचालकाचा अपघातात मृत्यू

धामणगाव रेल्वे : उत्पादन बाजार संचालक आणि वाठोडा बु. चे माजी सरपंच यांचा धामणगाव रेल्वे तिवासा कुऱ्हा रोडवरील कौंडण्यपूर वाय-पॉइंटवर झालेल्या भीषण अपघातात जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा साथीदार गंभीर जखमी झाला. जखमींना उपचारासाठी इर्विन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृताचे नाव प्रशांत हुडे (४०) असे आहे, जो वाढोणा येथील रहिवासी आहे.

# एपीएल लाभार्थी दोन वर्षांपासून डीबीटीपासून वंचित

## वरुड नायब तहसीलदार पंकज चव्हाण यांना निवेदन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बेनोडा ( शहीद ), दि.१२ :**

महाराष्ट्र सरकारने अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग अंतर्गत एपीएल शेतकरी डीबीटी पासून वंचित आहे व दोन वर्षापासून शेतकऱ्याच्या खात्यात पैसे जमा झाले नाही एपीएल धारकाचे राशन बंद करून शेतकऱ्यांना घरातील प्रत्येक व्यक्तींना १५० रुपये प्रमाणे शेतकऱ्यांच्या बँक पासबुक खात्यात जमा होईल अशी योजना सरकारने सुरू केली होती .मात्र ही योजना २०२३ पर्यंत सुरळीत सुरू होती. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १५० रुपये प्रमाणे पैसे जमा होत पर्यंत २०२३ ते २४ आणि २५ पर्यंत दोन वर्षापासून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा करणे बंद झाले. शेतकरी कुटुंबाला एका महिन्याला दीडशे रुपये एक आधारस्तंभ होता .एकीकडे राशन बंद करायचे आणि दुसरीकडे दोन वर्षांपासून बँक खात्यात पैसे जमा करायचे नाही हा एक प्रकारचा शेतकऱ्यावर अन्याय होत आहे . तरी सरकारने ही योजना सुरळीत सुरू करावी व महिन्याला शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा करावे. अशी मागणी घेऊन तहसील कार्यालय वरुड येथे मा.नायब तहसीलदार पंकज चव्हाण याच्या मार्फत मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,मा.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,मा.चंद्रशेखर बावनकुळे ,पालकमंत्री , आमदार चंदू उर्फ उमेशभाऊ यावलकर व मा ,जिल्हाधिकारी ,अमरावती यांना निवेदन देण्यात आले.निवेदन देते वेळी पुरुषोत्तम पोटोडे ,सुखदेव चरपे ,अरुणा फरकाडे, दुर्गा परतेती ,किशोर धनोडे ,धीरज बारस्कर ,लीलाधर बारस्कर व इतर शेतकरी व नागरिक उपस्थित होते.




नायब तहसीलदार पंकज चव्हाण यांच्या सोबत प्रत्यक्ष भेट घेऊन माहिती घेतली असता त्यांनी सांगितले कि २०२३ पर्यंत डीबीटी शेतकऱ्यांच्या खात्यात नियमित जमा झाले.पण २०२३ ते २०२५ पर्यंत शासनाकडून निधी प्राप्त न झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले नाही.अशी माहित त्यांच्या कडून मिळाली.
**-पुरुषोत्तम पोटोडे, बेनोडा ( शहीद )**

# चार कामगार संहिताला विरोध : जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१२ :** केंद्रीय कामगार संघटनेच्या संयुक्त कृती समितीने आज चार कामगारविरोधी कामगार संहितांच्या निषेधार्थ देशव्यापी संपाची हाक दिली. समितीच्या आवाहनानंतर अमरावतीमध्येही मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यात आली. महिलांसह हजारो कर्मचाऱ्यांनी प्रत्येक अत्याचाराविरुद्ध संघर्ष हाच आमचा नारा असा जयघोष करत सहभाग घेतला. त्यांच्या मागण्यांचे बॅनर आणि पोस्टर्स फडकावत हे निदर्शने जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या कार्यालयात पोहोचली.

तेथे, पंतप्रधानांना उद्देशून चार पानांचे सविस्तर निवेदन जिल्हा दंडाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले. मोर्चाचे नेतृत्व सर्वश्री कॉम्रेड चंदू बानुबाकोडे, डी.एस.पवार, सुभाष पांडे, पी.बी.उके, तुकाराम भस्मे, सुनील देशमुख, ह.भ.घोम, कमलाकर वनवे, प्रशांत धर्माळे, पंकज गावंडे, मयूर सोनवाल, विजय भुयार, अशोक सोनारकर, महादेव रावकर, ओमदेव रावते, महादेव रावते, जोशीकर आदींनी केले. गरपवार, चंद्रकांत वडस्कर, श्याम शिंदे, रामदास करमोरे, सुनील घाटाळे, रमेश सोनुले, चंदाताई वानखडे, अभय देव, वंदना बुराडे, राजेंद्र भांबोरे, अंकुश वाघ, ओमप्रकाश वाघमारे, महेंद्र बूब, आकाश बावणे, ज्ञानेश्वर गायकवाड, कॉ. जे. एम. कोठारी, नीलकंठ ढोके, मीरा कैथवास, रविकांत गवई, महेश जाधव, अमोल काकडे, रेखाताई मोहोड, प्रफुल्ल देशमुख, मोनाली खांडेकर, किशोर शिंदे, प्रीती पवार, संजय हाडके, रसूल शाह बिस्मिल्ला शाह, हिम्मत गवई, अर्चना भांडवलकर, संजय मांडवधरे, ज्ञानेश्वर मेश्राम, इंदुबाई बोके, अफ्राझ बी, बाली हर्ले, इत्यादी. जिल्हाधिकाऱ्यांना केलेल्या याचिकेत चारही कामगार संहिता रद्द करणे, दोन महिन्यांची कंत्राटी पद्धत रद्द करणे, सर्व कामगारांना मासिक २६००० रुपये वेतन आणि १०००० रुपये पेन्शन लागू करणे, अंगणवाडी आणि पोषण आहार कर्मचाऱ्यांसाठी न्यायालयाने आदेश दिलेली ग्रॅच्युइटी लागू करणे, शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणे, जिरामजी कायदा रद्द करणे, वीज बिल रद्द करणे आणि भारत-अमेरिका शेतकरीविरोधी व्यापार करार रद्द करणे या मागण्यांचा समावेश होता.




# वाघाच्या मृत्यूप्रकरणी चौघांना अटक

**वरूड, दि.१२ :** तालुक्यातील वाई वर्तुळातील पंढरी बिटमध्ये ३ फेब्रुवारी रोजी एका पट्टेदार वाघाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला होता. या प्रकरणी वन विभागाने ४ आरोपींना अटक केली. न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली.अनिल अजमिरे (४६), मुन्ना अजमिरे (५६), प्रेमलाल उईके (४२) व सुभाष सलामे (४६) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. महेंद्री वनसंवर्धन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या वाई वर्तुळातील पंढरी विटमध्ये ३ फेब्रुवारी रोजी सकाळी एका पट्टेदार वाघाचा कुजलेला अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली होती.

वन विभागाचे कर्मचारी गस्तीवर असताना त्यांना जंगलातील एका भागातून दुर्गंधी आल्याने हा प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर वरिष्ठ वनाधिकाऱ्यांसह स्थानिक कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती.

### आज डॉ.श्रीपाद जोशी यांचे व्याख्यान



अमरावती, दि.१२ : : स्थानिक श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय येथे उद्या शुक्रवार दि.१३ फेब्रुवारीला सकाळी ८.३० वाजता प्रसिद्ध साहित्यिक, जनसंवादक व व्याख्याते डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे 'सद्यस्थिती आणि प्रसार माध्यमे'या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.महाविद्यालयाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित या व्याख्यानाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.अंबादास कुलट हे भूषविणार असून हे व्याख्यान विद्यार्थी, पत्रकार आणि सर्व नागरिकांसाठी खुले आहे. या व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा, अशी विनंती जनसंवाद विभागप्रमुख प्रा.डॉ.कुमार बोबडे यांनी केली आहे.

### विदर्भ साहित्य संघ बचाव पॅनलतर्फे आज सहविचार बैठकीचे आयोजन

अमरावती : विदर्भ साहित्य संघ नागपूर कार्यकारणीच्या निवडणुकीच्या निमित्ताने विदर्भ साहित्य संघ बचाव पॅनलतर्फे उद्या शुक्रवार दि.१३ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता स्थानिक नगर वाचनालय, श्याम चौक येथे आजीव सदस्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या निवडणुकीमध्ये अध्यक्षपदासाठी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी आणि त्यांच्या विदर्भ साहित्य संघ बचाव पॅनलचे २२ उमेदवार उभे आहेत. सदर पॅनलच्या भूमिकेबाबत आपणाशी चर्चा करण्यासाठी ही सहविचार बैठक आयोजित करण्यात आली असून डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी आणि उमेदवार, पदाधिकारी या बैठकीला मार्गदर्शन करतील. विदर्भ साहित्य संघाच्या आजीव सदस्यांनी या बैठकीला उपस्थित राहावे अशी विनंती, प्रदीप देशपांडे, मधुभाऊ घारड, डॉ.कुमार बोबडे, विष्णू सोळंके यांनी केली आहे.

**अभियान** — अमरावती विभागात पहिल्याच दिवशी कारवाई


# २२ कॉपी बहाद्दर विद्यार्थी रस्टिकेट

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१२ :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात येणारी बारावीची परीक्षा सोमवार, १० फेब्रुवारीपासून सुरू झाली. अमरावती विभागात परीक्षेच्या पहिल्याच दिवशी गैरप्रकारांवर कडक कारवाई करत एकूण २२ विद्यार्थ्यांना रस्टिकेट करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

अमरावती विभागात परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. संवेदनशील केंद्रांवर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला असून अनेक केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख केली जात आहे. कॉपीमुक्त वातावरण राखण्यासाठी उड्डाण पथके, व्हिजिलन्स पथके तसेच केंद्राध्यक्षांना कडक सूचना देण्यात आल्या आहेत. सोमवारी इंग्रजीच्या पेपरपासून परीक्षेची सुरुवात झाली. पहिल्या दिवशी बहुतांश केंद्रांवर परीक्षा शांततेत पार पडली. विद्यार्थ्यांनी वेळेत केंद्रावर हजेरी लावत नियमांचे पालन केले.

पेपर दरम्यान विविध परीक्षा केंद्रांवर भरारी पथकांनी अचानक भेटी देत तपासणी केली. काही विद्यार्थी कॉपी करताना किंवा आक्षेपार्ह साहित्य बाळगताना आढळून आले. संबंधित विद्यार्थ्यांकडून चिठ्ठ्या, तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले. मंडळाच्या नियमानुसार तत्काळ कारवाई करत या विद्यार्थ्यांना चालू परीक्षेतून रस्टिकेट करण्यात आले. यात अकोला व बुलाण जिल्ह्यातील प्रत्येकी एक-एक तर वाशिम जिल्ह्यातील २० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी गैरमार्गाचा अवलंब केल्याने त्यांच्यावर कारवाई करावी लागल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. परीक्षा कालावधीत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार सहन केला जाणार नाही, असा इशाराही शिक्षण मंडळाने दिला आहे.



### या केंद्रावर विद्यार्थ्यांना केले रस्टिकेट

अकोला जिल्ह्यातील महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय गांधीग्राम येथे एक विद्यार्थी, बुलढाणा जिल्ह्यातील जिजामाता ज्युनिअर कॉलेज हिवरा खुर्द येथे एक विद्यार्थी, वाशिम जिल्ह्यातील वसंतराव नाईक कला कनिष्ठ महाविद्यालय किन्ही राजा येथे एक विद्यार्थी, वाशिम जिल्ह्यातील अप्पास्वामी ज्युनिअर कॉलेज शेंदूर्जना (अढाऊ) येथे दोन विद्यार्थी तर वाशिम जिल्ह्यातील वाघामायदेवी आदिवासी क.म.वि. रुईगोस्ता येथील केंद्रावर तब्बल १७ असे एकूण २२ विद्यार्थी रस्टिकेट केले आहे.

## थोडक्यात

### फ्रेजरपुरा परिसरातून बकऱ्यांची चोरी

अमरावती : रात्रीच्या वेळी पांढऱ्या रंगाच्या कारमधून आलेल्या दोघांनी एकमेकांच्या शेजारी राहणाऱ्या दोन पशुपालकांच्या एकूण तीन बकऱ्या चोरून नेल्या. त्यांची अंदाजे किंमत १२ हजार रुपये आहे. फिर्यादी पशुपालकाच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी दोन अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दुचाकीच्या धडकेत दाम्पत्य जखमी

अमरावती : मुलीची तब्येत ठिक नसल्याने दाम्पत्य तिला भेटण्यासाठी दुचाकीने कोल्हा, ता. अचलपूर येथून शहरात येत होते. त्याच वेळी चांगापूर ते रजनी मंगल कार्यालय मार्गावर भरधाव दुचाकीने त्यांना धडक दिली. त्यात दाम्पत्य जखमी झाले. त्याना उपचारार्थ खाजगी स्रणालयात दाखल करण्यात आले. जखमीच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### रस्त्यावर वाहन लावल्याने कारवाई

अमरावती : बडनेरा नवी वस्ती बस स्टॅण्ड परिसरात रहदारीच्या मार्गावर दोघांनी आपापले चारचाकी वाहन उभे केले. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होवून अपघाताचा धोका निर्माण झाला होता. ही बाब निदर्शनास येताच बडनेरा पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला.

### कर्मचाऱ्याच्या बॅगमधून रोकड लंपास

अमरावती : दुसऱ्याला चुकाऱ्याचे पैसे दिल्यानंतर उर्वरित २ लाख ८ हजार ५०० रुपये कर्मचाऱ्याने बॅगमध्ये ठेवले होते. ते बॅगेतून अज्ञाताने चोरून नेले. ही घटना नवसारी येथील महानगर पालिकेच्या कॉम्प्लेक्ससमोर घडली. सविस्त वृत्तानुसार टेंबली, ता. धारणी येथील रहिवासी असलेला फिर्यादी हा ९ फेब्रुवारी रोजी रात्री दर्यापूर येथून 4 लाख ५८ हजार ५०० रुपयांचे थकीत पेमेंट घेवून शहरात आला. त्या वेळी मध्यप्रदेशातील देडतलाई येथून अब्दुल गणी यांनी फोनद्वारे फिर्यादीला तुझ्याकडे माणूस पाठवतो, त्याच्याकडे अडीच लाख रुपये दे म्हणून सांगीतले. १० फेब्रुवारी रोजी त्यांचा माणूस पेमेंट घेण्यासाठी आला. त्यांनी त्याला अडीच लाख रुपये दिले व उर्वरित २ लाख ८ हजार ५०० रुपये बॅगेत ठेवले. बॅगसह ते दोघे जेवण करायला नवसारी येथील महापालिकेच्या कॉम्प्लेक्ससमोर गेले. त्या वेळी पैशांची बॅग त्यांच्यासोबतच होती. मात्र जेवण झाल्यावर ते तेथून निघाले.

### गाडगेबाबा गोरक्षणमध्ये गाय-वासरांना चारा सेवा

अमरावती : महाराज प्रकट दिवसाचे औचित्य साधून तालुक्यातील माहुली (धांडे) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावर गाय, वासरांना विशेष चारा, अन्नदान सेवा देण्यात आली.

संस्थेचे संस्थापक संचालक प्रा. गजानन भारसाकळे यांनी केलेल्या गो सेवेच्या आवाहनाला दानदात्यांनी भरीव प्रतिसाद दिला.

### रमेशराव पोकळे यांचे निधन



अंजनगाव बारी : येथील समाजाचे सामाजिक कार्यकर्ते तसेच श्रीकृष्ण लीला उत्सव मंडळाचे माजी सदस्य रमेशराव मारोतराव पोकळे (६२) व्या वर्षी अल्प आजाराने शनिवार दि. ७ रोजी सकाळी अकरा वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्यावर अंजनगाव बारी येथील हिंदू स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात तीन मुले, एक भाऊ व नातूपंतू असा बराचसा आप्त परिवार आहे.

# ...चक्क शिक्षकाने उतरविले गर्ल्स हायस्कूलमधील विद्यार्थिनींच्या मनातील भूत

## जि.प. ( मा.शा ) माध्यमिक मुलींच्या शाळेत जादूटोणा विरोधी जनजागृतीचे प्रयोग

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती,दि.१२ :** विज्ञानाच्या युगात आजही समाजात अंधश्रद्धेची पाळेमुळे घट्ट रुतून बसलेली दिसतात. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा आणि त्यांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये, यासाठी आज १० फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद (मा. शा.) माध्यमिक मुलींची शाळेत एका अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेत भूत आहे अशा अफवांना छेद देत शिक्षक मंगेश खेरडे यांनी विविध प्रयोगांतून अंधश्रद्धेचे पितळ उघडे पाडले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक तथा गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे होते.

कार्यक्रमादरम्यान मंगेश खेरडे यांनी कमंडलुमध्ये तांदूळ घेऊन त्रिशूल फसविणे, हातावर विस्तव ठेवणे, ज्वालामुखीचा उद्रेक, रिकाम्या पात्रातून वस्तू काढणे आणि लिंबातून रक्त काढणे यांसारखे तथाकथित चमत्कार करून दाखवले. मात्र, हे चमत्कार नसून त्यामागे निव्वळ रसायनशास्त्र आणि विज्ञानाची किमया आहे, हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले. भूत-प्रेत किंवा करणी-बाधा हे केवळ मनाचे खेळ असून, विज्ञानाच्या मदतीने आपण या फसवणुकीपासून वाचू शकतो, असा मोलाचा संदेश त्यांनी यावेळी दिला. यावेळी गटशिक्षणाधिकारी तथा मुख्याध्यापक संदीप बोडखे यांनी स्वत: हातावर जळता कापूर घेत तोंडांत टाकत यातील प्रात्यक्षिक करून दाखविले. नंतर विद्यार्थिनींनी सुद्धा प्रत्यक्ष प्रयोग करून अनुभव घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक संदीप बोडखे यांचे मार्गदर्शनात शिक्षक बाळकृष्ण आंधळे, शेषराव मडावी, विरेंद्र ब्राह्मण यांचेसह सर्व शिक्षक व विद्यार्थिनीनी परिश्रम घेतले. जादूटोणा विरोधी कायदा जनजागृती नेहमी पुस्तकी ज्ञान घेणाऱ्या विद्यार्थिनींनी जेव्हा डोळ्यांदेखत या चमत्कारांमागचे विज्ञान पाहिले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरील भीती जाऊन कुतूहल जागृत झाले. अनेक विद्यार्थिनींनी स्वत: पुढे येऊन प्रयोगांविषयी शंका विचारल्या आणि विज्ञानाची कास धरण्याची शपथ घेतली. यावेळी मंगेश खेरडे यांनी जादूटोणा विरोधी कायदा विषयक जनजागृती करत या कायद्यातील बारकावे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

# टाळ-मृदंगाच्या गजरात टाकनगर झाले संतनगरी

## गजानन महाराज प्रगट दिन सोहळा उत्साहात



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि.१२ :** गण गण गणांत बोते च्या जयघोषाने आसमंत दुमदुमला, हवेत अबीर-गुलाल उधळला गेला आणि निमित्त होते टाकनगरातील श्री संत गजानन महाराज प्रगट दिन सोहळ्याचे. गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या जय्यत तयारीची सांगता एका अभूतपूर्व भक्ती उत्सवात झाली. या सोहळ्याने टाकनगराला केवळ उत्सवाचे स्वरूप दिले नाही, तर संपूर्ण परिसराला एका पवित्र संतनगरीची कळा प्राप्त करून दिली.

उत्सवाच्या पूर्वसंध्येपासूनच टाकनगराचे रूप पालटले होते. परिसरातील प्रत्येक रस्ता स्वच्छ करून त्यावर काढलेल्या देखण्या रांगोळ्या आणि फुलांच्या सजावटीने चैतन्य पसरले होते. वारकरी भजन मंडळांच्या अभंगांनी आणि टाळ-मृदंगाच्या सुरावलींनी अवघा परिसर विठ्ठल-गजानाच्या भक्तीत न्हाऊन निघाला होता.प्रगट दिनाच्या शुभमुहूर्तावर पहाटेपासूनच धार्मिक विधींना सुरुवात झाली. श्रीचा अभिषेक आणि पारायणाने वातावरणात सात्त्विकता भरून राहिली. दुपारच्या सत्रात निघालेल्या दिमाखदार पालखी सोहळ्याने साऱ्यांचे डोळे दिपवले. शिस्तबद्ध वारकरी, डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या महिला आणि महाराजांच्या जयघोषात तल्लीन झालेले भक्त यामुळे जणू पंढरीची वारीच टाकनगरात अवतरली असल्याचा भास होत होता.आयोजन समितीच्या चोख नियोजनामुळे या सोहळ्याला विशेष शिस्त लाभली होती. सायंकाळच्या सत्रात आयोजित महाप्रसादाचा लाभ साडेतीन हजारहून अधिक भाविकांनी घेतला.

# श्री संत गजानन महाराज प्रगटदिन प्रित्यर्थ भव्य रक्तदान शिबीर

## ब्रह्मण्डनायक सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेचा स्तुत्य उपक्रम

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती,दि.१२ :** स्थानिक प्रवीण नगर येथील ब्रह्माण्डनायक सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने रविवार, १ फेब्रुवारी रोजी श्री संत गजानन महाराज प्रगटदिन उत्सवाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय येथील रक्तपेढी चमूच्या सहकार्याने पार पडलेल्या या शिबिरात परिसरातील नागरिकांनी, विशेषत: महिला व युवतींनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले.श्री संत गजानन महाराज प्रगटदिन महोत्सवानिमित्त परिसरात श्रीमद भागवत ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या आध्यात्मिक सोहळ्याला सामाजिक कार्याची जोड देण्याच्या उद्देशाने संस्थेच्या वतीने हे रक्तदान शिबीर घेण्यात आले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, एका युनिट रक्तामुळे तीन गरजूंचे प्राण वाचू शकतात. हा संदेश समाजापर्यंत पोहोचावा आणि युवकांमध्ये जनजागृती व्हावी, या उदात्त हेतूने हे शिबीर आयोजित केल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.या शिबिरामध्ये तरुण-तरुणींसह महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढी चमूने रक्त संकलनाचे काम अत्यंत नियोजनबद्ध रितीने पूर्ण केले. हे रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष वैभव बनकर, उपाध्यक्ष मयूर डांगे, सचिव स्वप्नील तायडे, कोषाध्यक्ष राहुल मानकर (महाराज), तसेच विश्वस्त रामदास राऊत, प्रशांत भड, निलेश राऊत, मंगेश कविटकर,रामकृष्ण देशमुख, सागर तायडे, अंकित गाडगे,आकाश वाघमारे,दिलीप देशमुख, बंडू कथिलकर, आनंद गुप्ता,नयन कथिलकर,छोटू देशमुख, कोठे आदींनी परिश्रम घेतले.

# श्री क्षेत्र नागरवाडी येथे गाडगेबाबांचा जयंती महोत्सव

**चांदूर बाजार, दि.१२ :** निष्काम कर्मयोगी गाडगेबाबांचे अंतिम श्रद्धास्थान असलेल्या श्री गाडगे महाराज संस्था, श्री क्षेत्र नागरवाडी येथे गाडगेबाबांच्या जयंती महोत्सवाचे 16 ते 23 फेब्रुवारीदरम्यान आयोजन करण्यात आले आहे. विलास दामेधर व सुरेखा दामेधर यांच्या हस्ते गाडगेबाबांच्या मूर्तीचे पूजन व तीर्थस्थापना होईल. महोत्सवाचे आयोजन संस्थेचे संचालक बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. महोत्सवादरम्यान विविध शैक्षणिक व सेवाभावी उपक्रमांचेआयोजन करण्यात आले आहे.प्रतिमेची काकड आरती व सामुदायिक प्रार्थना, स्वच्छता अभियान, माजी आ. यशोमती ठाकुर व खा. बळवंत वानखडे यांच्या हस्ते गाडगेबाबांच्या सिंहासनस्थीत मूर्तीचे पूजन व महाआरती होईल, गाडगेबाबांच्या मिरवणूक, भरत रेळे, नारायण पडोळे यांचे राष्ट्रीय कीर्तन, तसेच परिसरातील गरजू, आदिवासी बांधवांना ब्लँकेट वाटप तसेच साडी वाटप व त्यानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल.

# ज्ञान विज्ञान महोत्सवाचे भव्यदिव्य आयोजन

## आसरा पुरोगामी विद्यालयाचा उपक्रम



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**भातकुली, दि.१२ :** दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा आसरा शाळेच्या प्रांगणात या विज्ञान महोत्सवचे आयोजन दि. ४ व ५ फेब्रुवारी ला करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, त्यांना विज्ञानाची आवड निर्माण व्हावी, सभोवतालच्या पर्यावरणीय घटना बद्दल जाणिव व्हावी,या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाचे विज्ञान शिक्षक गोपल वडतकर सर करत असतात.या कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमान शैलेशभाऊ मोहोड यांनी केले व शुभेच्छा दिल्या. प्रदर्शनमध्ये पर्यावरण शिक्षण व हरित यावर आधारित प्रयोगासहित, पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चर्चा, करण्यात आली. तसेच नागपूर वरुन आलेल्या श्री शुभम अजमिरे सरांनी लाईव्ह .प्रयोग सादर करून विद्यार्थयांचा आनंद वाढवला. या वर्षी सुद्धा या प्रदर्शनात विज्ञान केन्द्र नागपूर या संस्थेचे फिरते विज्ञान प्रदर्शनची बस दोन दिवस शाळेच्या प्रांगणात थाटात उभी होती. या प्रदर्शनात शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अतिशय चांगल्या प्रकारे सादरीकरण केले तालुक्यातील अनेक शाळातील शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांसहित प्रदर्शनास भेट दिली व प्रयोगाच्या माहिती सहित आनंद लुटला, अतिशय सुंदर प्रतिक्रिया विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांनी दिल्या. यावेळी केन्द्र प्रमुख शैलेंद्र दहातोंडे सर, निपुण मार्गदर्शक श्री बनसोड सर, श्रीमती अवघड मॅडम या अधिकार्यासहित मुख्याध्यापक श्री मोहोड सर, तालुक्यातील अनेक शिक्षक उपस्थित होते या करिता शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती विल्हेकर मॅडम, श्री बोबडे सर, श्री राठोड सर, श्री गांजरे सर, श्री उईके सर व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.असे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# स्व.साहेबरावजी लेंधे स्मृतिप्रित्यर्थ भव्य महाआरोग्य शिबिर

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अंजनगाव सुर्जी, दि.१२ :** स्व. साहेबरावजी लेंधे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शालिनीताई मेघे हॉस्पिटल, नागपूर यांच्या सहकार्याने आश्रय निवास येथे भव्य मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.होते या शिबिरास नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्घाटन प.पू. स्वामी जितेंद्रनाथ महाराज यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार गजानन लवटे, नगराध्यक्ष अविनाश गायगोले, तहसीलदार पुष्पा सोळंके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात सुमारे १८०० नागरिकांनी तपासणीचा लाभ घेतला असून, त्यापैकी १२०० रुग्णांना मोफत चष्मेदेण्यात आले. तसेच ६० रक्तदात्यांनी रक्तदानकरून सामाजिक बांधिलकी जपली. लाभार्थ्यांसाठी भोजन व्यवस्थाही करण्यात आली होती.या उपक्रमाचे नियोजन वैभव लेंधे व मधुराताई लेंधे यांनी केले असून, लेंधे परिवार व मित्र परिवाराच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी ठरला.

# श्री शंकर देवस्थान पापळ येथे श्रीमद् भागवत सप्ताह प्रारंभ

## १६ फेब्रुवारीला भव्य महाप्रसाद व मिरवणुकीचे आयोजन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**पापळ,दि.१२ :** महाशिवरात्रीनिमित्त पापळ येथे श्री शंकर देवस्थान येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सोमवार ९ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी या दरम्यान भव्य दिव्य श्रीमद् भागवत सप्ताह ज्ञानेज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

कथावाचक भागवताचार्य श्री ह.भ.प. धनंजय महाराज इंगळे हरताळा यांच्या समुद्रवाणी मधून कथा ऐकायला मिळणार आहे दिनांक ९ ते १२ फेब्रुवारी रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत विविध भजनी मंडळाचे भजन तसेच शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारीला हभप दिनेश महाराज डोईफोडे दारापूर यांचे हरिकीर्तन शनिवार दिनांक १४ फेब्रुवारीला ह.भ.प. विजय महाराज माथने राष्ट्रीय कीर्तनकार ग्रामगीता प्रचारक अमरावती यांचे कीर्तन होणार तर रविवार दिनांक १५ फेब्रुवारीला ह.भ.प. चंचलताई बोदडे पांढरी यांचे हरिकीर्तन आयोजित केले आहे तसेच सोमवार १६ फेब्रुवारी सकाळी दहा ते बारा पर्यंत ह.भ.प. धनंजय महाराज इंगळे यांचे काल्याचे किर्तन व दहीहंडी व दुपारी एक ते पाच भव्य महाप्रसादाचे आयोजन केले गेले आहे व रात्री सहा ते अकरा भव्य शोभायात्रा व दिंडी निघेल यामध्ये विविध ठिकाणची भजनी मंडळी सहभागी होणारआहे.

या संपूर्ण कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री शंकर देवस्थान मंडळ पापळ व ग्रामपंचायत पापळ तसेच गावकरी मंडळी पापळ यांनी केले आहे.

## नुकसान | खा.बळवंत वानखडे लोकसभेत आक्रमक

# वेगवान शहरीकरणामुळे वनआवरणात मोठी घट

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, १२ फेब्रुवारी :** खासदार बळवंत वानखडे यांनी लोकसभेत विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्री भूपेंद्र यादव यांनी देशातील प्रमुख महानगरांतील वनआवरणाबाबत सविस्तर माहिती दिली.मंत्र्यांनी सांगितले की, भारतीय वन सर्वेक्षण (एफएसआय), देहरादून दर दोन वर्षांनी वन व वृक्ष आच्छादनाचे मूल्यांकन करून 'भारत वन स्थिती अहवाल' प्रसिद्ध करते. आयएफएसआर २०२३ नुसार, बेंगळुरू, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, कोलकाता, मुंबई आणि अहमदाबाद या महानगरांचे एकत्रित वनआवरण ५११.८१ चौ.कि.मी. इतके असून ते शहरांच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे १०.२६ टक्के आहे. २०२१ च्या तुलनेत या महानगरांमध्ये एकूण २.०९ चौ.कि.मी.ची वाढ नोंदविण्यात आली आहे. तपशीलवार आकडेवारीनुसार, अहमदाबाद -मध्ये ५.४८ चौ.कि.मी.ची लक्षणीय वाढ झाली आहे, तर बेंगळुरूमध्ये ०.५९ आणि कोलकात्यात ०.२९ चौ.कि.मी. वाढ नोंदली गेली. मुंबईत ०.०६ चौ.कि.मी.ची किरकोळ वाढ दिसून आली. मात्र, चेन्नईमध्ये २.६४ चौ.कि.मी., हैदराबादमध्ये १.६१ चौ.कि.मी. आणि दिल्लीत ०.०८ चौ.कि.मी. वनआवरणात घट झाल्याचे अहवालात नमूद आहे. मंत्र्यांनी स्पष्ट केले की, प्रमुख शहरी भागांमध्ये एकूण वनआवरण सामान्यत: स्थिर आहे; काही शहरांमध्ये राज्यांच्या धोरणांमुळे व हरित उपक्रमांमुळे वाढ झाली आहे, तर वेगवान शहरीकरणामुळे काही शहरांत घट दिसून येते. यासोबतच, स्मार्ट सिटी मिशनअंतर्गत क्षेत्राधारित विकास, पुनरुज्जीवन आणि हरित क्षेत्रांचा विकास यावर भर देण्यात आल्याचेही मंत्र्यांनी नमूद केले. विविध शहरांतील स्मार्ट सिटी प्रस्तावांमध्ये गतिशीलता, पाणी, स्वच्छता, पर्यावरण आणि हरित क्षेत्रांचा समावेश असून, या प्रकल्पांना राज्यस्तरीय उच्चाधिकार समित्यांची मान्यता देण्यात आली आहे.खासदार बळवंत वानखडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नामुळे शहरी हरित क्षेत्र, वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संतुलन राखण्यासाठी ठोस उपाययोजनांची गरज अधोरेखित झाली आहे.

# शिवरात्रीच्या पर्वावर ग्रामीण परिसरातील शिवभक्त महादेवाच्या वाटेवर

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**खोलापुर, दि.१२ :** देशात सर्वत्र महाशिवरात्रीचे पर्व मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो भोलीच्या दर्शणार्थ महाशिवरात्रीला शक्य होईल त्या ठिकाणी भाविक भक्त दर्शनाला जातात परंतु मोठ्या महादेवाला जाण्याची प्रथा आजही कायम असल्याने अनेक ठिकाणी चे भक्त मोठ्या महादेवाला जातात.

आगामी महाशिवरात्रीच्या पर्वाला ग्रामीण भागात सुरुवात झाली असून भक्तांकडून त्रिशूल घेऊन डबडीच्या तालावर महादेवाच्या वाटेने गा....घोटा घोटा पाणी.. या भक्ती गीताने भक्तजन ताल धरत घरोघरी जाऊन भाविक भक्त कुटुंबासह त्रिशूलाचे ( बाण)पूजन करण्यात येत आहे . वर्षानु वर्षापासून मोठ्या महादेवाला ग्रामीण भागातून भाविक भक्त भोलेच्या दर्शनाला सहकुटुंब जातात.दरवर्षी महादेवाची वारी करणारे भोलेनाथाचेभक्त आठ दिवसापासून त्रिशूल (बाण) घेऊन ग्रामीण परिसरातील गावांमध्ये



घरोघरी जाऊन भक्तिमय वातावरणात भाविक भक्त त्रिशुलाचे मोठ्या धार्मिक आस्थेने आराधना करतात.महाशिवरात्रीच्या दोन-तीन दिवसाच्या अंतराने मोठ्या महादेवा ची सहकुटुंब वाट धरतात.

## घटना - घडामोडी



### पोफाळीच्या जि.प. शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

**उमरखेड :** पोफाळी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित स्नेहसंमेलन आणि 'सप्तरंग' सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. माधवराव गुंडारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कपिल बरडे, उपाध्यक्षा अल्का ढगे आणि सुनील ठाकरे उपस्थित होते. मुख्याध्यापक दरणे यांनी प्रास्ताविक केले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वागत गीत, मोबाईलचे दुष्परिणाम, स्वच्छता अभियान आणि मराठी शाळेचा अभिमान या विषयांवर सादरीकरण केले. तसेच आदिवासी, बंजारा, लेझीम आणि क्लासिकल नृत्यासह सिनेगीतांवर ठेका धरत उपस्थितांची दाद मिळवली. पालकांनी विद्यार्थ्यांवर बक्षिसांचा वर्षाव केला. यावेळी नवनियुक्त शाळा व्यवस्थापन समितीने शाळेला खुर्च्या भेट देण्याची घोषणा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. व्ही. नगारे यांनी केले, तर आभार हाटेकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी शिक्षक आणि पालकांचे सहकार्य लाभले.




### वांजरी आश्रमशाळेत क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव संपन्न

**पांढरकवडा :** वांजरी येथील महाकाली आदिवासी विकास संस्थेच्या प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा प्रमिला गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली आणि सचिव आशिष गेडाम यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने आयोजित या दोन दिवसीय स्पर्धेत मुला-मुलींनी व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो आणि लंगडी या खेळात सहभाग नोंदविला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बाजार समिती संचालक संतोष बोडेवार, उपसरपंच विनोद बोडेवार, उपाध्यक्ष तुरपा पुसनाके, संचालिका रेणुका गेडाम, कनिष्का गेडाम, पोलीस पाटील अशोक कुमरे, कमर खा पठाण, सेवानिवृत्त शिक्षक मोहुर्ले, मुख्याध्यापक वाय. आर. राऊत, साखरकर, वानखेडे आणि मोगरकर उपस्थित होते. प्रमिला गेडाम यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या बोलीभाषेत मार्गदर्शन करत १० वीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. आशिष गेडाम आणि संतोष बोडेवार यांनी शाळेतील शैक्षणिक प्रगती व सुविधांची माहिती दिली. यावेळी वस्तीगृहातील नवीन शौचालय, स्नानगृह आणि वॉशिंग मशीनचे उद्घाटनही करण्यात आले. पालक प्रतिनिधी म्हणून हुसेन आत्राम यांचा सत्कार झाला. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शिल्ड देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाटे आणि आभार प्रदर्शन बोडेवार यांनी केले. सोहळ्याला २०० हून अधिक पालकांची उपस्थिती होती.




### डॉ. विष्णू कुटे यांच्या 'सार्वजनिक अर्थशास्त्र' पुस्तकाचे प्रकाशन

**नेर (परसोपंत) :** येथील नेहरू महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख विष्णू कुटे यांनी लिहिलेल्या 'सार्वजनिक अर्थशास्त्र' या पुस्तकाचे प्रकाशन विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४९ व्या वार्षिक अधिवेशनात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बदललेल्या अभ्यासक्रमासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार सुरेशराव देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून अधिवेशनाचे अध्यक्ष राजेश चव्हाण, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे कुलगुरू प्रशांत बोकारे, प्रकाशराव डांगे, हुद्दा, श्रीकृष्ण बोटे आणि संजय कोठारी उपस्थित होते. या पुस्तकात आर्थिक प्रश्नांचा सूक्ष्म वेध घेण्यात आला असून, सत्र २ च्या विद्यार्थ्यांसाठी ते अत्यंत महत्वाचे आहे. या यशाबद्दल नेहरू महाविद्यालयाचे प्राचार्य उदय मांजरे यांनी विष्णू कुटे यांचे स्वागत केले. अशा शैक्षणिक उपक्रमांमुळे महाविद्यालयाचा सन्मान वाढल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी प्रवीण बनसोड, शांतरक्षित गावंडे, वशिष्ट खोडस्कर आणि पंकज चव्हाण यांनी लेखकाचे अभिनंदन केले. यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे पदाधिकारी आणि मान्यवर या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंगणवाडी ताईंचा यवतमाळात एल्गार!

## मानधन, पेन्शन आणि 'मोबाईल' सक्तीविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि.१२ :** अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा, ग्रॅच्युईटी आणि पेन्शन योजना लागू करावी, तसेच 'पोषण ट्रॅकर' आणि 'फेस रेकग्निशन'ची जाचक सक्ती रद्द करावी, या प्रमुख मागण्यांसाठी 'आयटक'महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी युनियनच्या वतीने गुरुवारी (दि. १२) जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी मागण्यांचे सविस्तर निवेदन देण्यात आले.

शासनाने अंगणवाडी सेविकांना १५ हजार रुपये मानधन जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात केवळ १३ हजार रुपयेच दिले जात आहेत. उर्वरित रक्कम 'प्रोत्साहन भत्ता'म्हणून देण्यासाठी १० जाचक अटी घालण्यात आल्या आहेत. या अटी रद्द करून सरसकट मानधन देण्यात यावे, अशी मागणी युनियनने लावून धरली आहे. तसेच, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युईटी लागू करावी आणि दरमहा पेन्शन योजना सुरू करावी, यावर आंदोलकांनी भर दिला. मोबाईल जुने, कामाची सक्ती नको! शासनाने दिलेले मोबाईल जुने झाल्याने 'फेस रेकग्निशन'मध्ये तांत्रिक अडचणी येत आहेत. त्यामुळे सेविकांची हजेरी आणि कामात अडथळे येत आहेत. शासनाने एकतर नवीन मोबाईल संच द्यावेत किंवा डेटा एंट्री ऑपरेटरची नेमणूक करावी. तोपर्यंत ऑनलाईन कामाची सक्ती थांबवावी, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. तसेच अंगणवाडी पर्यवेक्षिकांची रिक्त पदे त्वरित भरण्याचे आवाहनही करण्यात आले. शिक्षक संघटनेचा पाठिंबा या धरणे सत्याग्रहाला विदर्भ ज्युनिअर कॉलेज टीचर्स असोसिएशनने (विजुक्टा) जाहीर पाठिंबा दिला आहे. शिक्षक आणि अंगणवाडी कर्मचारी यांच्यात समन्वय साधत, प्रा. रमेश जोल्हे, प्रा. रंगराव लांजेवार, प्रा. आनंद हुड, प्रा. सुधीर माने आणि प्रा. गजानन बेलगमवार यांनी आंदोलनात सहभाग नोंदवून पाठींबा दर्शविला. आंदोलनाचे नेतृत्व दिलीप उटाणे आणि ॲड. माधुरी क्षीरसागर यांनी केले. यावेळी वनिता कापसे, सविता कट्यारमल, गया सावळकर, पल्लवी रामटेके, प्रणिता राजूरकर, ललिता भोयर, विद्या ढोरे, मनीषा बेलखंडे, ज्योती चिखळे, मनीषा मरसक, सुनंदा पराते, संगीता डाखोरे, निर्मला माठुरकर यांच्यासह मोठ्या संख्येने अंगणवाडी कर्मचारी उपस्थित होत्या.

### केंद्राचे कामगार कायदे रद्द करा

#### यवतमाळमध्ये 'सिटू'च्या आशा कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**यवतमाळ :** केंद्र सरकारने लागू केलेले चार श्रम संहिता कायदे रद्द करावेत आणि आशा स्वयंसेविकांच्या विविध मागण्या मान्य कराव्यात, यासाठी सिटू संलग्न आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियनने गुरुवारी (ता. १२) यवतमाळमध्ये एल्गार पुकारला. यावेळी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना पाठविण्यात आले.

दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी संपाचा भाग म्हणून यवतमाळ जिल्ह्यात हे आंदोलन करण्यात आले. 'सिटू'चे जिल्हाध्यक्ष ॲड. कुमार मोहरमपुरी आणि सचिव उषा मुरखे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. केंद्र सरकारने कामगारांचे हक्क हिरावून घेणारे कायदे केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. आशा स्वयंसेविकांना दरमहा ५ तारखेपर्यंत मानधन मिळावे, वेतन पावती मिळावी आणि वयाची ६० वर्षे पूर्ण झालेल्यांना ५००० रुपये निर्वाह भत्ता लागू करावा, अन्यथा निवृत्तीचे वय ६५ वर्षे करावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच कुष्ठरोग, क्षयरोग सर्वेक्षणाचे थकीत बिल मिळावे आणि कामाचे तास निश्चित करून सन्मानजनक वागणूक मिळावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. प्रशासनाने दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी ॲड. को. सि.(कुमार) मोहरमपुरी व जिल्हा सचिव कॉ. उषा मुरखे आदींची उपस्थिती होती.

**CAPTION** खाकीसाठी जिद्दीची दौड...



**यवतमाळ :** जिल्हा पोलिस दलातील पोलिस शिपाई आणि बँड्समन पदांच्या १६१ रिक्त जागांसाठी बुधवारपासून (दि. ११) पळसवाडी पोलिस कवायत मैदानावर सुरू झालेला भरती प्रक्रियेचा हा थरार... पहाटेच्या सुमारास ४.०० वाजल्यापासूनच मैदानावर हजेरी लावून, अंगात खाकी वर्दी चढवण्याचे स्वप्न उराशी बाळगत शारीरिक चाचणीत आपले सर्वस्व पणाला लावणारे उमेदवार. धावण्याच्या चाचणीत जिद्दीने आघाडी घेण्यासाठी उमेदवारांमध्ये लागलेली ही चुरस.

## पत्रकार नारायण वंजारी यांच्या निधनाने समाजाची हानी झाली

### संतोष अरसोड यांनी व्यक्त केल्या शोकसंवेदना

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**नेर (परसोपंत), दि. १२ :** नेर तालुका पत्रकार संघाच्यावतीने स्थानिक विश्राम भवनात ज्येष्ठ पत्रकार नारायण वंजारी यांच्या निधनानिमित्त श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मीडिया वॉचचे संपादक संतोष अरसोड यांनी वंजारी यांच्या निधनाने समाजाची हानी झाली असल्याची शोकसंवेदना व्यक्त केली.

दिनांक ६ फेब्रुवारी रोजी नारायण वंजारी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित सभेत बोलताना संतोष अरसोड म्हणाले की, पत्रकाराचे निधन ही समाजाची हानी आहे. समाजहितासाठी झटणाऱ्या पत्रकारांचे अनेकदा कुटुंबाकडे दुर्लक्ष होते. जेव्हा प्रशासनाकडून न्याय मिळत नाही, तेव्हा पत्रकारच समाजाला न्याय मिळवून देतो. वंजारी यांनी 'दैनिक लोकदूत'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले. या कार्यक्रमाला अंकुश वाकडे, प्रवीण पाटमासे, राजेश खोडके, किशोर वंजारी, अरुण राऊत, सुरेश ढोके, उदय कानतोडे, निलेश वंजारी, साहेबराव सावळे, गुलाब खान पठाण, निलेश वाहने, प्रवीण रामटेके, रियाज टिक्की, रवी राऊत, शरद मोरे, उमेश इंगोले आणि गुल्हाने उपस्थित होते. उपस्थितांनी वंजारी यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद दरोई यांनी केले.

## निकिता कुडमते मुलींच्या उंच उडीत जिल्ह्यात प्रथम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**आर्णी, दि. १२ :** यवतमाळ येथील नेहरू स्टेडियमवर आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत शेलु सेंदूरसनी जिल्हा परिषद शाळेच्या निकिता कुडमते हिने ११ ते १४ वयोगटातील मुलींच्या उंच उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. निकिताला बक्षीस म्हणून सायकल, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

जिल्हा परिषद विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धामध्ये निकिता नवनाथ कुडमते हिने सुवर्णपदक पटकाविले. या यशाबद्दल तिला सायकल, बॅग, कंपास पेटी आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. शिक्षक कैलास नेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या सरावामुळे हे यश मिळाल्याचे निकिताने सांगितले. तिच्या या कामगिरीबद्दल मुख्याध्यापक शेरू कादिर सय्यद, विजय मुजमुले, सुनीता लव्हेकर, विनोद कांबळे, अर्चना गारचेलवार आणि शालेय व्यवस्थापन समितीने कौतुक केले. तसेच गटशिक्षणाधिकारी नीता गावंडे आणि केंद्रप्रमुख पांडुरंग वाघमारे यांनी निकिताचे अभिनंदन केले असून तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## घरकुल पूर्ण झाले, तरीही हप्ते थकले!

### दिग्रसमध्ये प्रशासनाचा अजब कारभार; बीडीओंचा 'वॉच' तर लाभार्थ्यांची 'प्रतीक्षा'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दिग्रस, दि. १२:** तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेचा कारभार सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. एकीकडे गटविकास अधिकारी गावोगावी फिरून अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी तगादा लावत आहेत, तर दुसरीकडे कर्ज काढून आणि प्रसंगी दागिने मोडून ज्यांनी घर पूर्ण केले, त्यांचे हप्तेच प्रशासनाकडे थकले आहेत. या विरोधाभासामुळे "घर बांधले, पण हप्ता कधी मिळणार?" असा संतप्त सवाल लाभार्थी उपस्थित करत आहेत.

तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तब्बल ११ हजार ६०० घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी ७ हजार ९०० घरांचे बांधकाम सुरू झाले आहे. मात्र, ३ हजार ७०० लाभार्थ्यांनी अनुदानाचा पहिला हप्ता उचलूनही अद्याप कामाला सुरुवात केलेली नाही. या पार्श्वभूमीवर, घरकुल योजनेला गती देण्यासाठी गटविकास अधिकारी रमेश खारोडे हे स्वतः 'ॲक्शन मोड'वर आले आहेत. ते जातीने गावोगावी भेटी देत असून, कामे तातडीने सुरू करण्याचे आवाहन लाभार्थ्यांना करत आहेत. मात्र, दुसरीकडे चित्र अतिशय विदारक आहे. अनेक प्रामाणिक लाभार्थ्यांनी स्वतःच्या आर्थिक अडचणींवर मात करत घरांचे बांधकाम पूर्ण केले आहे. काहींनी तर कर्ज काढून, तर काहींनी चक्क आपल्या पत्नीच्या अंगावरील सौभाग्याचे लेणे विकून घराचे स्वप्न पूर्ण केले आणि 'गृहप्रवेश' देखील उरकून घेतला. मात्र, प्रशासकीय लालफितीच्या कारभारामुळे त्यांचे हप्ते थकले आहेत. १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता आणि ७० हजारांचा दुसरा हप्ता बऱ्याच जणांना मिळाला आहे. परंतु, केवळ ८५ हजारात घर पूर्ण होत नाही. अनेक लाभार्थी तिसऱ्या हप्त्याच्या प्रतीक्षेत आहेत. तांत्रिक पडताळणी, ऑनलाईन नोंदीतील त्रुटी आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे हप्ते वितरणास विलंब होत आहे. त्यामुळे बीडीओंच्या आवाहनाला प्रतिसाद द्यावा की, थकलेल्या हप्त्याची वाट पाहावी, अशा द्विधा मनस्थितीत लाभार्थी अडकले आहेत. प्रशासनाने तांत्रिक अडचणी दूर करून त्वरित हप्ते वितरित करावेत, अशी मागणी होत आहे.

# अर्थसंकल्पातून महिला सक्षमीकरणाचा मार्ग प्रशस्त

## भाजप महिला मोर्चाचा 'बजेट संवाद'; योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी पुढाकार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि.१२ :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी रोजी सादर केलेल्या 'अर्थसंकल्प २०२६' मध्ये महिलांसाठी नेमक्या काय तरतुदी आहेत? हे सोप्या भाषेत समजावून सांगण्यासाठी भाजप महिला मोर्चाने पुढाकार घेतला आहे. याच उद्देशाने यवतमाळमध्ये 'महिला संमेलन-अर्थसंकल्प २०२६' चे आयोजन करण्यात आले होते. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा अर्थसंकल्प कसा फायदेशीर ठरेल, यावर या मेळाव्यात मंथन करण्यात आले.

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने शनिवारी, दि. ७ फेब्रुवारी रोजी आयोजित या संमेलनात भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चौहान यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी माजी मंत्री मदन येरावार आणि नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. प्रफुल्ल चौहान यांनी आपल्या भाषणात महिला सक्षमीकरणावर भर दिला. ते म्हणाले, 'या अर्थसंकल्पात केवळ घोषणा नसून महिलांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करण्यात आला आहे. मुलींसाठी शैक्षणिक क्षेत्रात नवीन वसतिगृहे उभारणे असो किंवा बचत गटांना बळ देऊन महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे असो, प्रत्येक घटकाचा यात विचार झाला आहे. महिलांनी शासनाच्या या विविध योजना समजून घेऊन स्वतःच्या सक्षमीकरणाचे पाऊल उचलले पाहिजे.' जिल्हा महामंत्री रेखा कोठेकर यांनी बचत गटांच्या माध्यमातून होणाऱ्या परिवर्तनावर प्रकाश टाकला. अर्थसंकल्पातील तरतुदी समजून घेतल्यास महिला कशी प्रगती करू शकतात, याचे महत्त्व त्यांनी सोदाहरण पटवून दिले. या कार्यक्रमाला प्रदेश सचिव माया शेरे, जिल्हा उपाध्यक्ष कीर्ती राऊत, महिला मोर्चाच्या सरचिटणीस निर्मला विणकरे, उपाध्यक्ष अंजली उत्तरवार, संगीता चांडक, सीमा यादव, आर्या गरुड, रंजना पाळेकर यांच्यासह पक्षाच्या विविध पदाधिकारी, नगरसेविका आणि महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### अर्थसाक्षरता काळाची गरज

**'प्रत्येक महिलेला काहीतरी करून दाखवण्याची जिद्द असते. तिला सक्षम व्हायचे असते. मात्र, अनेकदा अर्थसंकल्पाची आणि त्यातील तांत्रिक बाबींची माहिती नसल्याने आर्थिक तरतूद करताना अडचणी येतात. महिलांच्या मार्गातील हा अडसर दूर व्हावा आणि त्यांना प्रगतीचे पाऊल टाकता यावे, याच दृष्टीने या विशेष संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते,' अशी माहिती भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष तथा नगरसेविका शैला मिर्झापुरे यांनी दिली.**


अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com


# बंजारा आरक्षणासाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती गठित

## ना. संजय राठोड यांच्या पाठपुराव्याला यश; समितीसमोर अभ्यासपूर्ण आणि तथ्याधारित मांडणी करण्याचे आवाहन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.१२ :** बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यासाठी आयोग, समिती नेमावी. या मागणीला अखेर यश मिळाले असून उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित झाली आहे. याबाबतचा शासन निर्णय लवकरच निर्गमित होणार असल्याची माहिती मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांनी दिली. या निर्णयामागे मंत्री राठोड यांनी



केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मंगळवार, दि. १०फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र बंजारा आरक्षण कृती समितीच्या सदस्यांनी मुंबई येथे ना. संजय राठोड यांची भेट घेऊन आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली होती. गेल्या चार महिन्यांपासून हा विषय शासन पातळीवर सातत्याने मांडला जात असून, संबंधित विभागांशी समन्वय साधत ना. राठोड यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. समाजाच्या मागणीबाबत शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले होते. त्याच दिवशी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री राठोड यांनी हा विषय पुन्हा उपस्थित केला असता, मागणीनुसार निवृत्त उच्च न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. यामुळे बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला अधिकृत प्रक्रियेत गती मिळाली आहे. यानंतर ना. राठोड यांनी आरक्षण कृती समितीच्या सदस्यांसोबत सविस्तर चर्चा करत समितीसमोर अभ्यासपूर्ण, वस्तुनिष्ठ आणि तथ्याधारित मांडणी करण्याचे आवाहन केले. समितीसमोर ठोस ऐतिहासिक, सामाजिक आणि कायदेशीर आधार सादर केल्यास निर्णय प्रक्रियेला बळ मिळेल, असे त्यांनी सांगितले. निर्णयाबद्दल महाराष्ट्र बंजारा आरक्षण कृती समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मंत्री संजय राठोड यांचे आभार मानले. या यशामागे मंत्री राठोड यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि समाजाच्या मागणीला शासन पातळीवर मिळवून दिलेले प्राधान्य हेच निर्णायक ठरल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे.

## महत्वाचे

### कुऱ्हाडीने घराचा दरवाजा तोडला

**यवतमाळ :** जुन्या वादातून एकाने महिलेच्या घराचा दरवाजा कुऱ्हाडीने तोडून घरातील साहित्याची नासधूस केली. ही घटना २९ जानेवारी रोजी माळीपुरा येथे घडली. फिर्यादी संगीता कामठे यांच्या तक्रारीनुसार, आरोपी मेहेर बेलसरे याने कुऱ्हाडीने दरवाजा तोडून आत प्रवेश केला आणि ५० हजार रुपयांचे नुकसान केले. तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी ३० जानेवारी रोजी यवतमाळ शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### २५ हजारांचे बैल चोरीला

**पारवा :** घरासमोर बांधलेले दोन पांढऱ्या रंगाचे बैल अज्ञात चोरट्याने पळवल्याची घटना घाटंजी तालुक्यातील दत्तापूर येथे घडली. फिर्यादी अविनाश कोवे यांनी २८ जानेवारी रोजी आपले बैल बांधले होते, जे दुसऱ्या दिवशी सकाळी गायब असल्याचे दिसले. चोरीला गेलेल्या ६ वर्षे वयोगटातील बैलांची किंमत २५ हजार रुपये आहे. ३० जानेवारी रोजी पारवा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

### दागिने लंपास

**वणी :** बस प्रवासादरम्यान चोरट्याने वृद्ध महिलेच्या ८ लाख ४० हजार रुपयांच्या ऐवजावर डल्ला मारला. फिर्यादी शोभा डॉंगे या २० जानेवारी रोजी चंद्रपूर बसस्थानक परिसरातून प्रवास करत असताना ही घटना घडली. अज्ञात चोरट्याने त्यांच्याकडील ८२ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी ३० जानेवारी रोजी वणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सोन्याची पोत हिसकावली

**यवतमाळ :** शेतात पायवाटेने जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील ५० हजार रुपयांचे दागिने मोटारसायकलस्वाराने बळजबरीने हिसकावून नेले. ही घटना १० फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता भारी विमानतळाजवळील शेतात घडली. फिर्यादी आशा मडावी या डबा घेऊन जात असताना पाठीमागून आलेल्या अज्ञात इसमाने त्यांना धक्का देऊन गळ्यातील ३५ हजारांचे मंगळसूत्र आणि १५ हजारांचे सोन्याचे मणी हिसकावून पोबारा केला. याप्रकरणी ११ फेब्रुवारी रोजी यवतमाळ ग्रामीण पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला.

### तुरीच्या ढिगाऱ्याला आग

**कळंब :** जुन्या सुडबुद्धीतून आणि दारूच्या नशेत एकाने शेतकऱ्याच्या तुरीच्या ढिगाऱ्याला आग लावून ३० हजार रुपयांचे नुकसान केले. ही घटना ११ फेब्रुवारी रोजी सकाळी औरंगपूर शेत शिवारात घडली. फिर्यादी प्रवीण मोहीजे यांच्या तक्रारीनुसार, आरोपी कवडू बबन राजुरकर याने त्यांच्या शेतातील ३६० तुरीच्या पेंढ्या जाळून खाक केल्या. कळंब पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# पैनगंगा अभयारण्यात ‘संवर्धनाचा’नवा अध्याय

## वाघिणीचे यशस्वी स्थलांतर अन् पर्यटनाला नवे बळ | राज्यातील पहिला ‘पुनर्वनीकरण’उपक्रम फत्ते | स्थानिक रोजगाराच्या संधींत मोठी वाढ

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ संजय भोसले

**ढाणकी, दि.१२ : पैनगंगा वन्यजीव अभयारण्याच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची आणि ऐतिहासिक घडामोड घडली आहे. महाराष्ट्रातील पहिला ’पुनर्वनीकरण’कार्यक्रम या अभयारण्यात यशस्वी ठरला असून, दि. ७ जानेवारी २०२६ रोजी पेंच अभयारण्यातून आणलेली ’पीकेटी-७-सीपी-२’ही मादी वाघीण आता पैनगंगेच्या घनदाट जंगलात पूर्णपणे स्थिरावली आहे. या ऐतिहासिक पावलामुळे अभयारण्यातील वाघांची संख्या वाढण्यास मदत होणार असून, पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत.**




वाघिणीच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा पेंचमधून स्थलांतरित झालेल्या या वाघिणीला पैनगंगा अभयारण्यात एक महिना पूर्ण झाला आहे. तिची प्रकृती आणि हालचाली अत्यंत समाधानकारक असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली आहे. अभयारण्यात २०१८-१९ पासून ’पीएनजी-१’ (जॉनी) हा नर वाघ अधिवास करत आहे. भविष्यात आंतरसंकरामुळे(इनब्रिडींग) उद्भवू शकणारे धोके टाळण्यासाठी आणि वाघांची सुदृढ पिढी निर्माण करण्यासाठी येथे मादी वाघीण आणण्याची मागणी वन्यजीव प्रेमी प्रतीक राठोड यांनी १ जुलै २०२४ रोजी वनमंत्रालयाकडे केली होती. प्रशासकीय पाठबळ आणि यशस्वी अंमलबजावणी या मागणीची दखल घेत वनमंत्री गणेश नाईक, माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि वरिष्ठ वन अधिकाऱ्यांनी दोन वर्षे यावर सखोल अभ्यास केला. अखेर सकारात्मक निर्णय घेत पेंचमधील वाघीण येथे यशस्वीरित्या स्थलांतरित करण्यात आली. ‘या उपक्रमामुळे वाघांची अनुवांशिक विविधता टिकून राहील आणि त्यांचे दीर्घकालीन भविष्य सुरक्षित होईल,‘ असा विश्वास वनपरिक्षेत्र अधिकारी धीरज मदने यांनी व्यक्त केला आहे. पर्यटनाला नवी उभारी अन् स्थानिकांना रोजगार वाघिणीच्या आगमनामुळे पैनगंगा अभयारण्यातील पर्यटनाला मोठे बळ मिळाले आहे. सध्या खरबी आणि मन्याळी या दोन्ही प्रवेशद्वारांवरून सकाळी व संध्याकाळी प्रत्येकी सात वाहनांना जंगल सफारीसाठी परवानगी देण्यात आली आहे. पर्यटक मोठ्या उत्साहाने या वनभ्रमंतीचा आनंद घेत आहेत. या वाढत्या पर्यटनामुळे स्थानिक नागरिकांना गाईड, वाहन चालक आणि इतर सेवांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून, परिसराच्या शाश्वत विकासाला चालना मिळत आहे. नैसर्गिक सौंदर्याचा अनमोल खजिना सुमारे ४०० चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेले हे अभयारण्य घनदाट जंगलांनी वेढलेले आहे. पैनगंगा नदीच्या वळसामुळे येथील निसर्गसौंदर्य अधिकच खुलून दिसते. या जंगलात अस्वल, सांबर, चितळ, रानडुक्कर, नीलगाय, हरिण, रोही आणि बिबट्या यांसारख्या विविध वन्यप्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर अधिवास आहे. वन्यजीव संवर्धन आणि स्थानिक विकास या दोन्ही आघाड्यावर पैनगंगा अभयारण्य आता महाराष्ट्राच्या नकाशावर एक नवा अध्याय लिहीत आहे.

# ‘ड्रग्ज माफिया’च्या मुसक्या आवळल्या

## शिरपूर पोलिसांची मोठी कारवाई



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.१२ :** जिल्ह्याला ‘ड्रग्जमुक्त‘ करण्याच्या पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या निर्धाराला शिरपूर पोलिसांनी मोठे यश मिळवून दिले आहे. नागपूर ते यवतमाळदरम्यान अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या एका हायप्रोफाईल आंतरजिल्हा ड्रग्ज तस्कराला शिरपूर पोलिसांनी अटक केली असून, त्याच्याकडून ९ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे ड्रग्ज माफियांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

शिरपूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार संतोष मनवर यांना मिळालेल्या माहितीनुसार मूळचा पुनवट येथील रहिवासी असलेला आणि गेल्या ५वर्षांपासून नागपुरात वास्तव्यास असलेला श्रेयस उर्फ गुड्डू पाटील (वय २४) हा वणी-शिरपूर परिसरात मोठ्या प्रमाणात ’एमडी’ड्रग्जची विक्री करण्यासाठी येणार आहे. या माहितीवरून पोलिसांनी चारगाव ते वणी रोडवर कडक नाकेबंदी केली. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास एक सिल्व्हर रंगाची डॅटसन गो+कार वेगाने येताना दिसली. पोलिसांनी कार अडवून श्रेयस पाटील याला ताब्यात घेतले. कारची झडती घेतली असता पोलिसांना ५७.१ ग्रॅम ’एमडी’ड्रग्ज आढळून आले, ज्याची किंमत अंदाजे ५,६०,००० रुपये आहे. याव्यतिरिक्त, ड्रग्ज मोजण्यासाठी वापरले जाणारे ३ अत्याधुनिक डिजिटल वजन काटे (किंमत १५,००० रुपये), ४ लाख रुपयांची कार आणि गुन्ह्यासाठी वापरलेला मोबाईल असा एकूण ९,८२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी श्रेयस पाटील हा केवळ कुरियर नसून या रॅकेटमधील एक मोठा दुवा असल्याचे बोलले जात आहे. न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असून, या काळात नागपूर ते यवतमाळपर्यंत पसरलेले हे ड्रग्जचे जाळे उद्ध्वस्त करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि एसडीपीओ सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार संतोष मनवर, सपोनि धीरज गुल्हाने आणि त्यांच्या पथकाने ही धडक कारवाई यशस्वी केली आहे.

# उमरखेडमधील हॉटेलात अन्नात आढळला कीडा

## ग्राहकाच्या तक्रारीनंतर खळबळ; हॉटेल मालकाकडून धमकीचा आरोप

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.१२ :** येथील महागाव रोडवरील नव्याने सुरू झालेल्या ’तुलसी टी पॉइंट’या हॉटेलमध्ये अन्नात कीडा आढळून आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी संबंधित ग्राहकाने पोलिसांत लेखी तक्रार दाखल केली असून, हॉटेल प्रशासनाने मात्र सर्व आरोप फेटाळून लावत उलट ग्राहकालाच धमकावल्याचा दावा करण्यात येत आहे.

पोलिस वसाहत, उमरखेड येथील रहिवासी नीलेश राऊत (वय ४१) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ८:३० ते ९:३० च्या दरम्यान कुटुंबासह तुलसी हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले होते. जेवणादरम्यान प्रथम ’दाल तडका’मध्ये खडा आढळला. त्यानंतर




### हॉटेल मालकाची भूमिका

**या गंभीर प्रकाराबाबत ’हॉटेल तुलसी’च्या मालकांशी संपर्क साधून विचारणा करण्याचा प्रयत्न केला असता, ‘मी तो मालक नव्हेच‘ अशी भूमिका मांडत त्यांनी आपला फोन बंद केला.**

पनीर मसाल्याबाबत तक्रार केल्यानंतर, मुख्य धक्का तेव्हा बसला जेव्हा त्यांच्या ७वर्षीय मुलाला भातामध्ये शिजलेला कीडा आढळला. या प्रकाराबाबत हॉटेल मालक किंवा व्यवस्थापकाला विचारणा केली असता, त्यांनी उद्धट वर्तन केल्याचे राऊत यांनी तक्रारीत म्हटले आहे. हाटेल प्रशासनाने फोटो काढण्यास मनाई केली आणि ‘तुमच्याकडून जे होते ते करा, लवकर निघून जा, नाहीतर बघून घेईन,‘ अशा शब्दांत धमकी दिल्याचा आरोप राऊत कुटुंबाने केला आहे. या प्रकारामुळे राऊत कुटुंबाने अर्धे जेवण सोडून बिल भरले आणि हॉटेलबाहेर पडले. आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर संबंधित हॉटेलचे स्वयंपाकघर अत्यंत अस्वच्छ असल्याचा आरोपही नागरिकांकडून होत आहे. अशा निष्काळजीपणामुळे ग्राहकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने तातडीने या हॉटेलची आणि परिसरातील इतर धाब्यांची तपासणी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# पोलिस भरती उमेदवारांसाठी युवासेनेचा ’मायेचा आधार’

## मोफत निवास व भोजनाची सोय; मातोश्री प्रमिलादेवी राठोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.१२ :** यवतमाळ जिल्हा पोलिस दलात ११फेब्रुवारीपासून पोलिस भरतीची मैदानी चाचणी सुरू झाली असून, राज्यभरातून हजारो तरुण यवतमाळात दाखल होत आहेत. दूरवरून येणाऱ्या आणि आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या या उमेदवारांची गैरसोय टाळण्यासाठी युवासेनेच्या वतीने ’मोफत निवास आणि भोजन’असा स्तुत्य उपक्रम राबविला जात आहे. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड यांच्या मार्गदर्शनात, मातोश्री प्रमिलादेवी दुलीचंद राठोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा सेवाभावी प्रकल्प राबविला जात आहे.



यवतमाळ पोलिस दलातील १६१जागांसाठी सुमारे १५हजार उमेदवारांनी अर्ज केले असून ही भरती प्रक्रिया २५ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. बाहेरील जिल्ह्यातून येणाऱ्या गरीब उमेदवारांना राहण्या व खाण्याची सोय व्हावी, या उदात्त हेतूने स्थानिक ’उत्सव मंगल कार्यालयात’हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ १०फेब्रुवारी रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाणे, तहसीलदार योगेश देशमुख, जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळकर व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. यावेळी एसडीपीओ दिनेश बैसाणे यांनी युवासेनेच्या या उपक्रमाचे कौतुक करताना म्हटले की, ‘पोलिस होण्याचे स्वप्न घेऊन आलेल्या तरुणांसाठी हा उपक्रम संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण आहे‘. या ठिकाणी दररोज दुपारी विद्यार्थ्यांचे आगमन होते. त्यांच्या निवासासह सायंकाळी भोजनाची व्यवस्था केली जात असून, पोलिस भरतीसंदर्भात तज्ज्ञांकडून मार्गदर्शनही दिले जात आहे. उपक्रमाच्या पहिल्याच दिवशी २००हून अधिक, तर दुसऱ्या दिवशी २५०पेक्षा जास्त उमेदवारांनी या सुविधेचा लाभ घेतला. दररोज सायंकाळी शिवसेना, युवासेना आणि महिला आघाडीचे पदाधिकारी स्वतः उपस्थित राहून व्यवस्थेची जबाबदारी सांभाळत आहेत. प्रामुख्याने प्रद्युम्न जवळकर, गजानन इंगोले, दर्शना इंगोले, स्मित दुर्ग, प्रीती उपरे आणि इतर कार्यकर्त्यांच्या परिश्रमामुळे हा उपक्रम भरतीसाठी आलेल्या तरुणांसाठी मोठा आधारवड ठरत आहे.

# यवतमाळात बुधवारपासून ’छत्रपती महोत्सवा’चा भव्य जागर!

## शिवजयंतीचा उत्साह: पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते होणार उद्‌घाटन; व्याख्यान, स्पर्धा आणि पुरस्कारांची मांदियाळी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.१२ :** येथील शिवतीर्थावर शिवजयंतीनिमित्त १८ ते २४फेब्रुवारीदरम्यान ’छत्रपती महोत्सवा’चे अत्यंत दिमाखदार आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे भव्य उद्घाटन १८फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड यांनी गुरुवारी (दि. १२) आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी पत्रकार परिषदेला सचिव खडसे, प्रा. प्रदीप राऊत, सतीश काळे, पंढरी पाठे, प्रशांत कडू, कल्पना कोरडे, अनिता गरुड,



स्नेहल रेचे, स्नेहा निबाळकर, आशा काळे, दत्तू पारखी, नारायण थूल आदींची उपस्थिती होती. वैचारिक आणि सांस्कृतिक मेजवानीच्या उद्घाटन सोहळ्यानंतर दिल्ली येथील प्रसिद्ध पत्रकार अशोक वानखडे यांचे ’छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीती व आजचे वास्तव’या विषयावर व्याख्यान संपन्न होईल. महोत्सवात ३५ वर्षांची परंपरा जपत विविध क्षेत्रांतील मान्यवरांना युवा, पत्रकारिता, कृषिरत्न, आरोग्य सेवा, महिला व सामाजिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. महोत्सवाच्या मुख्य दिवशी, म्हणजेच १९फेब्रुवारीला सकाळी ७ वाजता ’शिव-मॅरेथॉन’ आणि सकाळी ९ वाजता भव्य अभिवादन सोहळा पार पडणार असून, प्रशासनाच्या वतीनेही यावेळी महाराजांना वंदन केले जाईल.

स्पर्धांची मांदियाळी आणि मान्यवरांची उपस्थिती पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात रिल्स, निबंध, रांगोळी, चित्रकला, काव्य, वेशभूषा, गायन, समूह नृत्य, कराटे आणि मोटार सायकल रॅली अशा वैविध्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच रक्तदान शिबिर आणि चर्चासत्रेही पार पडतील. या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून विधान परिषद सदस्य भावना गवळी, नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, जीवन पाटील, मनीष पाटील, वसंतराव घुईखेडकर, राहुल ठाकरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दि. १९ फेब्रुवारीच्या अभिवादन सोहळ्याला खासदार संजय देशमुख, आमदार बाळासाहेब मांगूळकर, जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहतील.

### ३५ वर्षांची गौरवशाली परंपरा

**मागील साडेतीन दशकांपासून यवतमाळात सर्वधर्मसमभावाचे प्रतीक म्हणून हा सार्वजनिक शिवजयंती महोत्सव साजरा केला जातो. या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर गायकवाड यांच्या मार्गदर्शनात विदर्भ ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष प्रदीपभाऊ वादाफळे (स्वागताध्यक्ष), सचिव खडसे, प्रा. प्रदीप राऊत आणि मराठा सेवा संघाची संपूर्ण टीम परिश्रम घेत आहे. महोत्सवाचा बक्षीस वितरण सोहळा २० फेब्रुवारी रोजी माजी मंत्री माणिकराव ठाकरे आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडेल.**

# तालुका प्रमुख नितीन माकोडे यांचा राजीनामा

**यवतमाळ, दि. १२ :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेर तालुका प्रमुख नितीन उर्फ किशोर माकोडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. मागील तीन वर्षांपासून ही जबाबदारी सांभाळणाऱ्या माकोडे यांनी वैयक्तिक कारणास्तव राजीनामा देत असल्याचे स्पष्ट केले. आपले राजीनामा पत्र त्यांनी संपर्क प्रमुख खासदार अरविंद सावंत यांच्याकडे सुपूर्द केले असून, त्याच्या प्रती जिल्हा संपर्क प्रमुख आणि जिल्हा प्रमुखांना पाठवल्या आहेत. यापूर्वी त्यांनी पंचायत समिती सभापती आणि नगरसेवक म्हणूनही कार्य केले आहे. त्यांच्यासारख्या अनुभवी नेत्याने संघटनात्मक पदाचा राजीनामा दिल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, नेर तालुक्यातील ठाकरे गटाच्या पुढील वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.